# हिंदू संघटन
# आणि
# नेपाळी आंदोलन

लेखक

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



# हिंदु संघटनात्मक
# नेपाळी आंदोलनाचा उपक्रम

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# हिंदु संघटनात्मक नेपाळी आंदोलनाचा उपक्रम

**लेखांक १ ला**

**(सन १९२४ - २५)**

या दोन-तीन वर्षांत अखिल भारतवर्षात अत्यंत महत्वाची नि उज्ज्वल भविष्याची जर एखादी चळवळ आरंभलेली असेल तर ती हिंदु संघटनाची चळवळ होय. या चळवळीच्या अंगप्रत्यंगाचा विकास नि परिपोष जर योग्य प्रमाणांत नि एकसारखा होत गेला तर तिचे सुपरिणाम केवळ , भारतवर्षासच नव्हेत ; पण अखिल मनुष्य जातीस , निराळे नि हितकारक वळण लावतील यात आम्हास शंका वाटत नाही. जगात प्रत्येक जातीच्या संघटनेच्या नौब ती, सरसहा दुमदुमत आहेत. सर्व स्लॅव्ह जातीची पॅन स्लॅव्हिझम, सर्व निग्रो लोकांची पॅन एथिओपिझम् , सर्व मुसलमानांची पॅन इस्लामिझम् अशा एक ना दोन अनेक जाती नि धर्म आपापले गट नि गोट नीटपणाने नि नेटाने बळकट करीत आहेत. अत्यंत विलंबाने का होईना , पण हिंदु जातीही आता आपल्या संघटनास प्रवृत्त झाली आहे. यद्‌यापि सगळ्यांच्या मागून तिने संघटनास हात घातला आहे. तथापि मागील इतिहासाच्या अनुभवावरून अशी आशा धरण्यास हरकत नाही , की सगळ्यांच्या मागून येऊन ती सगळ्यांच्या पुढे जाईल नि "खाली असोनि सकलावरी होत" राहील. जर या हिंदु संघटनास , योग्य ते व्यापक स्वरूप मिळेल ; जर हिंदुत्वाची अत्यंत हितकारक नव्हे, तर अत्यंत यथार्थ व्याख्या जी

**आसिंधु-सिंधु-पर्यंता यस्य भारत भूमिका।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव सवै हिंदुरिति स्मृतः।।**

या व्याख्येचा रुंद , खोल नि बळकट पायावर या संघटनाचे भव्य मंदिर उभारले जाईल नि अनवरत उत्साहाने नि उद्‌यमाने या कार्यास ती वाहून घेईल तर अशी एक प्रचंड शक्ती या जगात उत्पन्न होईल की एक नाही पण अशा दहा खिलाफतीसारख्या , आफती जरी उत्तरेकडून वा चहूंकडूनही हिंदुस्थानावर कोसळल्या तरी त्यांचा न्याय्य प्रतिकार करण्यास हे आपले हिंदुस्थान वा हिंदुधर्म सुक्षम होऊ शकेल ; इतकेच नव्हे तर पूर्वेस आपल्या बुद्ध धर्मीय बांधवांच्या हातात हात घालून पुनरपी, अखिल मनुष्य जातीच्या अभ्युदयार्थ पुरोगामित्व नि मार्गदर्शकत्व स्वीकारावयासही ते समर्थ होतील.

हिंदु संघटनेच्या अंगप्रत्यंगांतील कित्येक आवश्यक अंगांकडे आपल्यातील पुढार्यांचे नि कार्यकर्त्यांचे लक्ष यद्यपि आज वेधलेले आहे. यद्यपि शुद्धीकरण , अंत्यजोद्धार, स्वयंसैनिकदल, देवस्थान, सुधारणा इत्यादी अंगांच्या उन्नतीप्रित्यर्थ , थोडीफार मंडळी झटत आहेत; यद्यपि ही सर्व अंगे विशेषतः शुद्धीकरण नि अंत्यजोद्धार ही महत्वाचीच अंगे आहेत. तथापि तिकडे आज लोकांचे लक्ष वेधले जात आहे. म्हणूनच येथे त्यांचा विचार फारसा कर्तव्य नाही. आज येथे मुख्यत्वेकरून हिंदु-संघटनाच्या त्या एका अंगाचा विचार करण्याचे ठरविले आहे, की जे अंग शुद्धिकरणाइतकेच प्रतिकारक सामर्थ्याने संपन्न असून अंत्यजोद्धाराइतकेच निवारक शक्तीही राखीत आहे नि इतके असूनही तिकडे आज लोकांचे लक्ष मुळीच वेधलेले नाही. हिंदु-संघटनाचे हे महत्वाचे अंग आज जरी लोकांच्या लक्षात नसले तरी नि आज ते त्यांच्यापुढे ठेविले असताही क्वचितच त्याचे पूर्ण महत्व जरी त्यास समजणार नाही. तरीही थोडेच काळानंतर नि थोडेही यत्न त्या दिशेने जाताच या आपल्या हिंदु संघटनांचे हे प्रत्यक्ष उत्तमांगही होऊ शकेल. ते अंग म्हणजे नेपाळ होय.

हे केवढे आश्चर्य आहे! हा केवढा खेदजनक अपराध आहे की आम्हा हिंदूंना आज तुर्कस्थानच्या खलीफासाठी काढलेल्या चळवळीची जितकी कळकळ किंवा माहिती किंवा स्मृती आहे तितकी नेपाळच्या की जो आपल्या देशाचा महाराष्ट्र , अंग-वंग, कलिंगाप्रमाणे प्रत्यक्ष भाग आहे , त्या नेपाळच्या हिंदू संस्थानाची वा त्यातील लक्षवेधी सख्ख्या भावाबहिणीची नसावी? आज या सर्व जगामध्ये जर कोठे हिंदुत्वाचा ध्वज फाटका तुटका का होईना पण फडफडत असेल तर तो हिंदु बंधूंनो नेपाळ येथील पशुपतिनाथावर आहे. आज जरी सार्या जगतात हिंदु संघटन मरणासन्न झालेले असले ; तरी मृत न होता कसाबसा आशेचा श्वासोच्छ्वास करीत असेल तर ते हिंदूंनो या नेपाळच्या भूमीच्या अंकावर करीत आहे. तुर्कस्थानच्या खलिफाच्या एका वाड्यांत काय उलाढाली होतात , अरबस्थानच्या कोपर्यां तील एका जिल्ह्याएवढ्या संस्थानिकांचे नाव काय, त्याच्या बापाचे नाव, तो काल कोठे हिंडून आला, आज कोठे जाणार अशा बातम्या छापण्यात नि त्यांच्या चर्चा करण्यात हिंदुपत्रे गढलेली असतात. पण त्यांच्या अंकांचे वर्षोनवर्षांचे गट चाळून पाहिले असता त्यात नेपाळचे नाव देखील आलेले दिसत नाही! पॅलेस्टाईनच्या कोणच्याशा एका शहरात एक मशीद परवा पडली. तिच्या धक्क्याने हिंदुपत्रकारांच्या लेखणीच्या बोरूतील अंतःकरणाला इतका मोठा धक्का बसला की तिच्यासाठी निधी उभारण्याचा नि तिच्या पुनुरोद्धाराची पै न पै हिंदुस्थानांत जमविण्याच्या प्रतिज्ञांच्या कच्च्या बातम्या, तारा नि टिपणे हिंदुपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. परंतु परवा नेपाळच्या हिंदु महाराजांशी एक नवीन संधी, इंग्लंडने केला असता त्याविषयी एखादेही स्फूट नि एखादीही विश्वसनीय बातमी देशांतील सहस्त्र हिंदुपत्रांपैकी कोणी लिहिली नाही. कोणी मिळविली नाही वा मिळविणे आवश्यक आहे अशी सूचना देखील प्रदर्शित केली नाही. तुर्कस्थानात कोठे काही

माणसे निर्धन झाली आहेत. म्हणून त्यांना अन्न वस्त्र देण्यासाठी हिंदुस्थानात वर्गणी गोळा करण्याकरिता तिकडून इकडे एक मंडळ येत आहे हे ठीकच आहे! कारण हिंदुस्थानात आजकाल धनधान्य इतके विपुल झालेले आहे की सगळ्या तीस कोटीची पोटे भरून अतिरिक्त उरलेल्या धनधान्यास आता ठेवावे तरी कोठे, म्हणून मोठा राष्ट्रीय प्रश्न येऊन पडला होता नि ते साठवून ठेवले तर सडून बिडून जाऊन येथील जलवायु दूषित होण्याची भयंकर भीती सर्व देशभक्तांना पडलेली होती. ती निराधारही नव्हती! कारण मागे इतके प्लेग, इंफ्लूएंझा, महामार्यार इकडे झाल्या नि आता येत आहेत , तितक्या सर्व खावयास कमी असल्यामुळे आलेल्या नसून लोकांस अजीर्ण होईतो खावयास मिळते नि उरलेले धनधान्य विनाकारण सडून कुजून जाऊन जल वायु रोगट नि दूषित करते म्हणून होय! तेव्हा अशा स्थितीत, तुर्कस्थानच्या दुष्काळासाठी हिंदुस्थानात चळवळी व्हाव्यात हे ठिकच आहे! आजच्या महोदर मनूत स्वदेशापेक्षा परदेशची आधिक काळजी घेण्यासारखे साधु बनण्याचे सोपे नि स्वस्त साधनही उपलब्ध झालेले आहे. तेव्हा तुर्कस्थान जर दुष्काळासाठी तिकडून इकडे मंडळ धाडते तर त्याच प्रसंगी इकडील दुष्काळासाठी तिकडेही एक हिंदुमंडळ धाडून त्यांनाही साधुत्व संपादण्याचे पुण्य उपार्जिण्यास संधी द्यावी अशी सूचनाही कोणी आणिली नाही! तुर्कस्थान, अफगाणिस्थान, अरबस्थान यांच्यासाठी प्रत्यही स्तंभच्या स्तंभ खरडणार्या हिंदूंच्या द्रव्यावर नि अंशतः वा पूर्णतः हिंदूंच्या लेखणीने लिहिल्या जाणार्यार पत्रास नेपाळमध्ये असणार्याव आमच्या क्षेत्रांची वा बंधुबहिणीची किंवा त्यांच्यात कोणी उपाशी मरतो ; वा अर्धपोटी आहे याची आठवणही न होणे , साधुत्वाच्या आजकालच्या दांभिक व्याख्येस नि तिच्या पंज्यांत सापडलेल्या भोळसट निर्बुद्धास शोभेसेच आहे. परंतु ज्यांना स्वदेशावर निदान परदेशाइतकी तरी प्रेम करणे पाप वाटत नाही. ज्यांना स्वतःच्या योग्य नि न्याय्य वैभवाची नि सन्मानाची निदान परकीयांच्या वैभवाइतकी तरी चाड आहे , जे हिंदु संघटनास निदान परधर्मीय नि परजातीय संघटनाइतके तरी योग्य मानतात, त्या त्या पत्रकारांनी लेखकांनी नि लोकांनी तरी यापुढे हिंदुसंघटनाच्या एका मुख्य अंगाकडे नेपाळातील आपल्या एका देशाच्या , एका रक्ताच्या, एका जातीच्या , एका धर्माच्या या लक्षावधी बांधवांच्या हालचालीकडे शक्तीकडे नि भवितव्यतेकडे अधिक लक्ष देऊन नि अधिक कळकळ बाळगून केलेल्या चुकीचे नि घडलेल्या अन्यायाचे परिमार्जन करावे हे अत्यंत आवश्यक आहे. हे कर्तव्य करून हिंदु जनतेमध्ये नेपाळशी असलेल्या नेपाळेतर हिंदुस्थानच्या संबंधाचीच नव्हे तर एकात्म्याची जाणीव पुन्हा जागृत करण्यासाठी ही लेखमाला हाती घेतली आहे.

इंग्रजी भाषेत अशी एक म्हण आहे की एकदा का एखादी 'थाप' हातातून निसटली की तिला धरण्यास निघण्यासाठी 'सत्य' जो पायात जोडा घालीत आहे तो ती थाप पृथ्वीच्या भोवती तीन प्रदक्षिणादेखील घालून येते , वारंवार असत्याची पुनरुक्ती होत

राहील; नि सत्य, स्वयंभू सामर्थ्याच्या वर्गात जर त्याचा निषेध न करिता चूप बसले तर असत्याचीच छाप सत्यापेक्षा लोकांवर अधिक पडते हे अनेकदा इतिहासात आढळून आलेले आहे. हिंदुस्थान म्हणून कोणी देशच नाही हे विधानही काही काळ या हिंदुस्थानात इंग्रजी लेखकांच्या नि तदनुषंगिक हिंदु लेखकांच्या मज्जांत दुमदुमत होते नि आताही केव्हा केव्हा त्याचा प्रतिध्वनी उमटत नाहीच असे नाही. शीख हिंदु नाहीत असे एकाने म्हटले , दुसर्‍यातने म्हटले नि सत्याने आत्मप्रतिष्ठीत मौन स्वीकारून त्याचा निषेध केला नाही. होता, होता शिखांतच आपण हिंदु नाही ही भावना बळावून त्या मताचे आज हजारो लोक निघाले आहेत. उलटपक्षी त्यांचे हिंदुत्व त्यांस पटवून देण्याचे प्रयत्न करणारी व्याख्याने नि लेख लिहिले जाऊ लागल्याने आता पुष्कळ शीख लोक शीख सनातनी नसेल तरी हिंदूच आहेत, असे पुन्हा मानू लागले आहेत.

एका काळी स्वामी श्रद्धानंदांसुद्धा सर्व आर्यसमाजाची हिंदु शब्दाचा द्वेष करीत नि आपण हिंदु नाही असे मोठमोठ्याने प्रतिपादन करीत. पण आता हिंदु शब्दाचे मूल स्वरूप उत्पत्ती नि मर्म त्यांच्यापुढे जसजसे विशद करून मांडले गेले ; तसतसे सत्याचा प्रभाव पडून हजारो आर्यसमाजी, आपण हिंदूच आहोत असे निर्विकार मनाने, मानू लागले आहेत. बोलेल त्याची नाचणीही विकेल , पण न बोलेल त्याचे गहूंही विकले जाणार नाहीत , ही जगताची रीतच असल्याने नुकताच नेपाळ हा हिंदुस्थानचा प्रांतच नव्हे ; नेपाळी लोक नि त्यांचा देश हे एक हिंदुस्थानापासून सामाजिक नि जातीय दृष्ट्याही स्वतंत्र राष्ट्र आहे , आशियामध्ये जसे इराणशी, जपानाशी तसेच नि तितकेच नेपाळशी हिंदुस्थान विभक्त वा संयुक्त आहे. अशा प्रकारची जी ओरड काही स्वार्थपरायण लोकांनी सुरू केली आहे , तिचा वेळीच निषेध नि संयुक्तिक निषेध करणे हे आम्ही अगत्याचे नि आवश्यक कर्तव्य मानिले पाहिजे. आश्चर्याची गोष्ट ही की नेपाळ हिंदुस्थानचा भाग नाही. तो निराळाच देश आहे, निराळेच राष्ट्र आहे , हे मत प्रतिपादन करण्याचा पुढाकार जरी इंग्रज लेखकांनी घेतला आहे, तथापि त्याचा प्रतिध्वनी आज अनेक हिंदी नि हिंदु म्हणविणार्‍यार अल्पज्ञ लोकांमध्ये उद्भवू लागला आहे. थोडेच दिवसात नेपाळास अशियाच्या उलाढालीत महत्व येण्याचा संभव असल्याने नि हिंदु जातीच्या संघटनेचा तो एक शक्तीमान घटक नि बलवत्तर आधार झाला असता ज्यांच्या स्वार्थलंपट आकांक्षा विफळ होणार आहेत , त्यांना हिंदुजातीच्या गोटातून नेपाळास फोडून नेण्याची आवश्यकता भासू लागल्याने नेपाळी लोक हे हिंदुस्थानी नाहीत अशी कोल्हेकुई दिवसेंदिवस वाढत राहील. तिचे जर वेळीच तोंड बंद केले नाही तर नेपाळच्या अल्पज्ञ स्थितीत तिचा परिणाम होण्यासारखा असल्याने या असत्य विधानाचे ढोंग उघडकीस न आणणे शेवटी हानीकारक झाल्याविना राहणार नाही.

वास्तविक पाहता नेपाळ हा हिंदुस्थानचा प्रांत नाही , हे म्हणणे जर आज ईश्वर कृपेने महाराष्ट्रात छत्रपतींची हिंदुपदपादशाहीच अस्तित्वात असती नि जर मग कोणी

शहाणे महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा भाग नाही असे म्हणते , तर त्या विधानाइतकेच निराधार नि अर्थशून्य वाक्यमात्र असल्याने त्याचा निषेध करीत बसणे म्हणजे त्यास नसते महत्व देणे होय. परंतु हिंदुस्थान हा देशच नाही असली विधानेही निषेधाभावी जेथे लोकांस भुरळ पाडू शकतात. तेथे नेपाळ हिंदुस्थान देशाचा नि हिंदु जातीचा घटक नाही हे असत्यही निषेधाभावी अनेकांस फसवू शकेल हे उघड आहे.

भौगोलिक दृष्टीने अमुक प्रांत अमुक देशाचा घटक आहे ; हे सांगणे नेहमीच सोपे असते असे नाही. विस्तीर्ण समुद्र नि उत्तुंग पर्वत अशा काही अत्यंत स्पष्ट मर्यादा मात्र देशापासून देशास विभक्त करू शकतात. हिंदुस्थान हा अरबस्थानला आपला प्रांत समजू शकत नाही. यद्यपि त्या अरबस्थानांत हिंदु संस्कृतीचा संचार झाला ; तेथे हिंदुजातीने जाऊन प्रत्यक्ष वस्ती जरी केली तरी देखील अरबस्थान हा हिंदुस्थान देशाचा प्रांत समजणे शक्य नाही. कारण अशा उदाहरणात संस्कृती जाती , राष्ट्र इत्यादी देशैक्याच्या इतर लक्षणांहून भौगोलिक वैषम्य इतके बलवत्तर असते की ती इतर सर्व लक्षणेही त्या भौगोलिक भेदास निवारून त्या जनपदास एकदेशीयत्व देऊ शकत नाहीत.

परंतु जेथे असे स्पष्ट , चिरंतन नि निसर्गकृत भौगोलिक भेद वसत नाहीत , तेथे एक जनपद दुसर्याष जनपदाचा प्रांत आहे, प्रदेश आहे वा स्वतंत्र नि मित्र देशच आहे ; हे भौगोलिक स्पष्ट चिन्ह नसल्याने कोणता प्रदेश कोणत्या देशाचा हे आज हजारो वर्षे रणांगणाच्या सभांगणावर विवाद चालला असता अजून ठरू शकत नाही. तेथे जर्मनी नि फ्रान्स यांच्यातून ज्यांच्या इतिहासाशी संस्कृतीशी तो अधिक मिळत असेल तो प्रदेश त्या देशाचा हे लक्षण निर्णायक समजले जाते. तीच स्थिती पोलंडची नि रशियाची , अमेरिकेची नि मेक्सिकोची, कोरियाची नि चीनची.

भौगोलिक लक्षणाचे हे बलाबल ध्यानात घेता नेपाळ हा हिंदुस्थानचा प्रांत , प्रदेश आहे की नाही हा वाद निदान भौगोलिक दृष्टीने तरी उपस्थितच होत नाही. कारण एशियापासून हिमालयासारखा दुर्लंघ्य पर्वत, नेपाळास अत्यंत स्पष्टतेने अलग करीत आहे. भौगोलिकतः नेपाळ हा एशियातील इतर जनपदांपासून इतका पूर्णतेने अलग झालेला आहे, तितक्याच स्पष्टतेने उलटपक्षी तो हिंदुस्थानास संलग्नपणे जोडलेला आहे. एकवेळ दक्षिण हिंदुस्थान हा केवळ भौगोलिक दृष्टीनेच पाहिले तर उत्तर हिंदुस्थानाकडून निराळा देश कल्पिता येईल पण नेपाळ हा बिहार इत्यादी हिंदुस्थानी प्रदेशांहून भिन्न देश कल्पिता येणार नाही. कारण त्यामध्ये विंध्याद्रिहून प्रचंडतर असा कोणताही अडसर आडवा येत नाही. एकवेळ बुंदेलखंड हा बिहारादिक प्रांतांहून भिन्न स्वतंत्र मानता येईल पण नेपाळ मानता येणार नाही. कारण एकदेशीयत्वास छेदणारी कोणतीही गंगा , यमुना नि द्रोणासारखी विस्तीर्ण नदनदी त्यामध्ये पसरलेली नाही.

परंतु वर सांगितलेच आहे की देशादेशांच्या मर्यादा या भौगोलिक कारणांनी ठरविल्या जातात. त्याहून अधिक प्रसंगी त्या इतिहास , संस्कृती, जाती नि संमती यांनीच बहुतेक ठरत असून मग भौगोलिक भेद हे त्यास केवळ आनुषंगिक साह्य देत असतात. भौगोलिक विभेदक अस्तित्वांत असून जर पंजाब नि मद्रास हे एकाच मातृभूमीचे प्रत्यंग बनू शकतात, एकाच देशाचे प्रदेश म्हणून गणले जातात तर त्याच कारणाकरिता ज्यांत त्याहून स्पष्टतर भौगोलिक विभेदक बसत नाहीत असे नेपाळ नि तदितर हिंदुस्थानी प्रदेश हे एकाच पुण्य नि प्रिय भारतभूमीचे अंगप्रत्यंग कसे मानले जाणार नाहीत ? ते तसे आहेतच. परके त्यास मानोत किंवा न मानोत. कारण की ही संस्कृती इतिहासादिक देशैक्याची निर्णायक लक्षणे हिंदुस्थानातील कोणत्याही प्रांतास तितकीच लागू पडतात हे सिद्ध करण्यासाठी प्रथमतः आपण संस्कृती नि ऐतिहासिक संबंध यांचा अल्पस्वल्प विचार करू.

हिमालयाच्या प्रचंड प्रकाराच्या बाहुवेष्टनांत कवटाळून नेपाळास निसर्गाने बाह्य जगातल्या अंगणांतून उचलून भारतभूमीच्या कडेवर ज्या दिवशी दिले , त्या दिवसापासूनच नेपाळचा आम्हां भारतभूमीच्या संतानाशी इच्छेद्य नि अखंड प्रेममय असा सहोदराचा संबंध अविच्छिन्न वाहात नि संस्कृतीच्या प्रेमपाशाने अधिक दृढतर होत आज नेपाळांत आर्य हिंदूंचा नि हिंदु राजश्रीचा जो गौरव आहे तो प्रत्यक्ष काशीप्रयागालाही उरलेला नाही. हिंदु संस्कृती ज्या वैदिक कालापासून उगम पावली त्या अत्यंत पुरातन कालीही नेपाळ हा तिचा एक आधारस्तंभ नि तिच्या देवर्षींनी रचिल्या जाणार्या महामंदिरांचे एक महाद्वार होते अशी पूर्वेतिहास कथांची साक्ष आहे. वैदिक संस्कृती हिंदुस्थानांतच मूलतः उगम पावली हे मत क्षणभर बाजूस ठेवले तरी आर्यांच्या वसाहती हिंदुस्थानात येऊन वसत वसत नि सुधारत सुधारत ज्या महान संस्कृतीला जन्म देत्या झाल्या नि जिचे रूपांतर नि रूपविकास होत होत , आज हिंदु संस्कृतीत परिणत झालेले आहे , त्या संस्कृतीस जन्म देणार्या त्या गोत्रर्षींच्या चरणांनी पवित्र होण्याचा मान अखिल हिंदुस्थानांत जितका पंजाबचा, जवळजवळ तितकाच नेपाळचा आहे. कारण इराण अफगाणिस्थानच्या बाजूने आर्य हिंदुस्थानांत आले किंवा काश्मिरबाजूने ते खाली उतरले या दोन्ही मतांस जितका ऐतिहासिक पुरावा पुरातन ग्रंथांत सापडतो तितकाच आर्यांचे निदान काही संघ तरी तिबेट नेपाळावरून हिमालय उतरून पुढे प्रवेश करीते झाले , या विधानास ही पुष्टी द्यावयास सापडतो. त्रिविष्टप हे तिबेट शब्दांचे संस्कृत मूलरूप असल्याने नि त्रिविष्टप हे देवांचे वसतीस्थान म्हणून सांगितले असल्याने आपल्यांतील काही संघांस तरी त्यांचे पूर्वज तिबेटांतून इकडे आल्याचे स्मरण असावे असे दिसते. पूर्व ग्रंथांतून अफगाणिस्थानच्यावर कोणतेही मोठे धर्मस्थळ वा पुण्य क्षेत्र प्रसिद्ध असलेले क्वचितच आढळते. परंतु काश्मीर नि विशेषतः वर नेपाळच्या मध्ये नि वर हिमालयात आपली अनेक पवित्र स्थळे धर्मक्षेत्रे

नद्या पौराणिक कालापासून आजपर्यंत प्रसिद्ध नि पूज्य मानिल्या जात आहेत. मानस सरोवर, गौरीशंकर, कैलास, पशुपतीनाथ ही सर्व तीर्थे फार पुरातन नि आपल्या पूर्वजांच्या देवांच्या निवासास केव्हा तरी पात्र झालेली अशी असतील. उत्तर कुरू या नावावरूनही इकडच्या म्हणजे दक्षिण कुरूतील वंशजांचा संबंध काश्मीरपासून नेपाळपर्यंतच्या भूमीशी समांतर असलेल्या हिमालयाच्या बाजूच्या देशाशी केव्हा तरी होता. असे मत आहे की , काश्मीर कुभा या मार्गाने काही संघ हिंदुस्थानांत वसावयास आले. तसेच त्याच आर्यांचे अन्य जातीचे आणखी काही संघ त्रिविष्टप वा तिबेटमधून नेपाळात नि आजूबाजूच्या प्रदेशांतून हस्तिनापूराकडे उतरत गेले असावे. याहीपलिकडे जाऊन असे म्हणता येईल की , काश्मीर कुभाकडून आलेल्या आर्यांच्या संघापेक्षा नेपाळच्या दिशेने खाली उतरणारे आर्य तेथील मूळ जातीशी अधिक संमिश्र होत होतच पुढे आले असावे नि त्यांनाच द्रविड या नावाने पश्चिमेकडून आलेल्या आर्यांनी संबोधले असावे. याविरहित हेही विसरता कामा नये, की यक्ष , गंधर्व, किन्नर नि भूत या नावांनी संबोधित केलेल्या जातीची वस्ती हिमालयाच्या पायथ्याशी एकसारखी वसलेली असून त्यांच्याशी संमिश्र होत होतच आजची हिंदु जातीय संस्कृती बनलेली आहे.

आणखी एक तर्क येथे सांगून ठेवणे इष्ट आहे , की वैदिक वा पौराणिक काळातील पृथ्वीची वर्णने नि त्यावरील देश-जाती-खंड-विभाग, निर्देश, हे आज कितीही घोटाळ्याचे वा अर्थशून्य वाटत असले तरी ते ज्या काळी मूळ लिहिले गेले तेव्हा अक्षरशः खरे नसतील असे म्हणता येत नाही. पुढे त्यांचे मध्ये अंधपरंपरेने पुष्कळ अर्थशून्य वर्णने चुकीने वा अतिशयोक्तीने दडपली गेली असतील पण जितके मुळाकडे जावे तितके त्यात अधिक सत्य सापडू शकेल. आज पृथ्वीचे आपण पाच खंड समजतो पण काही भौगर्भिक आघात गुदरून परवा जेथे टोकियो शहर होते तेथे समुद्र आला तसे एखादे खंड गडप होऊन एखादा समुद्र वर आला तर त्यायोगे आजच्या भूगोलास भविष्यकालीन जनतेने खोटे ठरविण्याचा प्रयत्न करणे जसे चुकीचे होईल , तसेच पृथ्वी-देश-जाती इत्यादिकांच्या अनेक कालानंतर प्राप्त झालेल्या आजच्या नामरूपांशी जुनी नामरूपे मिळत नाहीत म्हणून ती केवळ कल्पित वा अज्ञानी लोकांनी अनुभवाविना खरडलेली होती असे म्हणणे चुकीचे होईल. महाभारतादिकात दिलेली पृथ्वीची वचने त्या पूर्वीच्या ज्या काळातील वर्णनावरून ग्रंथीत केली असतील त्या काळात (महाभारत काळ नव्हे) यथार्थ नि वास्तव असू शकतील. इतकेच नव्हे तर त्यांना वास्तव मानून इतर सर्व प्रमाणांशी सुसंगत करण्याचा प्रयत्न केल्यास त्यावरून कधी कधी महत्वाचे सत्यही उघडकीस येईल.

त्या दृष्टीने विचार करता यक्ष , रक्ष, गंधर्व, किन्नर, ऋक्ष, वानर इत्यादी नावे आता जरी त्यांच्या नावावर अनेक रुढ अर्थांची पुटे चढलेली असली तरी पूर्वी एका काळी ती खरोखरीच निरनिराळ्या मनुष्य जातींची नावे होती असे मानावे लागते. रक्ष वा राक्षस

या नावासंबंधी आता बहुतेक एकवाक्यता आहे की ते नाव नि त्याचप्रमाणे रामायणकालीन वानर ऋक्ष ही नावे त्या त्या जातीची असावीत. सिलोनात रक्का (Rakkas) नावांची एक रानटी जाती अजून आहे असे समाज शास्त्रावरील एक इंग्रजी ग्रंथांत वाचल्याचे आम्हास स्मरते. तीच गोष्ट यक्षाची! हिमालयाच्या नेपाळ लगतच्या पायथ्याशी 'यक्का' नावाचे लोक अजूनही राहत असून त्यांच्याच विवाहादि चालिरीती यक्षांच्या पुराणांतील वर्णनाशी पुष्कळ जुळतात. यक्ष शब्दाचेच , अपभ्रष्ट स्वरूप यक्का हे असावे. याच दृष्टीने पाहता आम्हास असा संशय येतो की आपल्या पूर्व ग्रंथांतून किन्नर म्हणून ज्या जातीच्या लोकांचे वर्णन येते तेच लोक हळूहळू हिमालयाच्या पायथ्याची आपली जागा सोडून वैदिक संस्कृतीशी देवाण घेवाण करीत एकात्म पावून पुढे 'कन्नड' या नावाने संबोधले गेले असावेत. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की काश्मीरपासून नेपाळपर्यंत , वसलेल्या हिमालयाच्या पायथ्यावरील या यक्ष , किन्नर, गंधर्व जातीचे उल्लेख आपल्या ग्रंथांतून राक्षसादिकांच्या उल्लेखाप्रमाणे द्वेषसूचक वा निंदागर्भ नसून त्यांची वर्णने कौतुहल , स्नेह नि क्वचितप्रसंगी आदरभावही व्यक्त करणारी आहेत. किन्नर जातीचेच पुढे संस्कृत साहित्यात प्रसिद्ध झालेले कर्नाटक राष्ट्र हे रुपांतर असावे. वर उल्लेखिलेली आमची कल्पना अर्थातच शब्द सादृश्यावरून सुचलेली असल्याने तिला ऐतिहासिक विश्वासार्ह प्रमाणे मिळेपर्यंत केवळ चर्चेसाठी एक कल्पना म्हणूनच पुढे मांडली जात आहे , हे निराळे सांगावयास नकोच. केवळ शब्द सादृश्यानेच पहावयाचे तर कॅनडा हे कर्नाटक नि कन्नड या शब्दाचे रुपांतर होऊ शकत असल्याने तेथेही कन्नड लोक वसत होते , असे म्हणावे लागेल! म्हणून केवळ शब्दसाम्यास अर्थसाम्य नि ऐतिहासिक पुरावा मिळाल्याविना कोणाचाही उल्लेख निर्णायक सिद्धांत म्हणून करता येत नाही.

हे काहीही असले तरी पूर्वग्रंथावरून जी गोष्ट अगदी स्पष्ट आहे ती ही की आज जी संस्कृती हिंदुसंस्कृती म्हणून संबोधिली जाते ती जरी आर्यसंस्कृतीचे रूपविकसनच असले तरी तीत अनार्य, द्रविड, यक्ष, किन्नर, गंधर्व इत्यादी पुरातन ग्रंथातून उल्लेखलेल्या अनेक इतर जातीच्या नि वंशाच्या रक्ताचा विचारांचा नि विकारांचा नि कर्तुत्वाचा प्रभाव स्पष्टपणे दिसत असल्यामुळे नि त्या सर्व जाती नेपाळापासून काश्मीरपर्यंत वसलेल्या होत्या आणि निदान काही आर्य संघ तरी या पूर्वमार्गाने हिमालयातून हिंदुस्थानात उतरले होते ही गोष्ट सिद्ध वा सूचित करणारी बरीच प्रमाणे पुरातन ग्रंथांतून दिसून येत असल्याने हिंदु राष्ट्राचा नेपाळाशी नि नेपाळचा हिंदु राष्ट्राशी जातीय संबंध , अत्यंत पुरातन कालापासून सुरू झालेला आहे हे सूचित होते.

संस्कृतमध्ये भूत या शब्दास राक्षस या शब्दाप्रमाणेच मागाहून जरी गुणवाचक नि दुर्गुणवाचक अर्थ लक्षणेने आला तरीही राक्षस या शब्दाप्रमाणेच भूत हा शब्दही प्रथम जातीबोधक होता असे आम्हास वाटते. यक्ष , गंधर्व, किन्नर, किरात इत्यादी हिमालयीन

जातीचे उल्लेख संस्कृत वाङ्‌मयात असे कौतुकाने नि प्रेमाने केलेले आहेत तसे जरी नसले तरी भूत जातीचा उल्लेख संस्कृतात आर्येतर परंतु नेहमी आर्यांशी संबंध घडलेल्या लोकांचा म्हणून केलेला आहे. किन्नराच्या उलट भूत हा शब्द अपमानास्पद नि कोणातरी संस्कृत भाषीयांस त्रास देणार्या नि बर्या च रानटी अवस्थेत राहणार्यापसंबंधी लावलेला आहे. पुढे तर त्याचे अर्थ पालटत पालटत जे लक्षणाने मृतात्मे भूत जातीय जिवंत मनुष्याप्रमाणे विचित्र नि विक्षिप्त प्रकार मेल्यानंतर करतात त्यांनाही तो शब्द लावण्यात आला. पण प्रथमतः भूत नावाचे लोक हिमालयाच्या पायथ्यांशी वसत असावेत हा आमचा तर्क किन्नर शब्दाच्या उपपतीचे तर्कापेक्षा अधिक दृढतर आहे. कारण नेपाळजवळ असणार्यात एका देशाचे नाव अजूनही जसेच्या तसे म्हटले जात आहे. भूतान हा शब्द आम्हास वाटते भूतस्थान या शब्दापासून निघाला असावा. तेथील लोक अजूनही जवळ जवळ रानटीच आहेत. अजूनही शारीरिक दृष्ट्याही पूर्वी त्या जागी अंगावर दाट केस असलेले लोक राहत असावेत, असे काही प्रवाशी अजूनही तशा काही व्यक्ती त्या बाजूस आढळतात  म्हणून हे म्हणतात, त्यावरून वाटते. त्यांच्या चालिरीती वैदिक पद्धतीस अजूनही इतक्या विलक्षण वाटणार्या  आहेक की आपल्या हजारो वर्षांपूर्वीच्या आर्यांनी जितक्या आश्चर्यांने यास विक्षिप्त समजले असते नि भूत म्हणून म्हटले असते तितक्याच आश्चर्याने आज आपल्याही तोंडातून तोच शब्द पण आता जरा लाक्षणिक अर्थाने निघेल! भूत ह्या जातिवाचक शब्दाचा असा लाक्षणिक अर्थ होऊन जीवितांचे मेलेल्यांशी साधर्म्य कसे स्थापन झाले हे काही आश्चर्य नाही. पिशाच्च शब्दाचा इतिहास हे सहज सिद्ध करील. आज पिशाच्च म्हणजे मेलेले- भूत- जे अत्यंत त्रासदायक असेल ते असे आपण व्यवहारांत समजतो. पण पिशाच्च शब्दाचे हे रूप होण्याचे आधी तो शब्द एका जातीला , त्यांच्या भाषेला नि त्या देशाला लावला जात होता हे सिद्ध आहे. वायव्य सिमेवरील रानटी क्रूर नि असंस्कृत लोकांच्या देशास पिशाच देश असे म्हटलेले पुराणात स्पष्ट आढळते. "गंतव्यं त्वया भूत पैशाचे देशधूर्तके" असा उल्लेख सिंधू पलिकडील देशांतील सीमेवर रानटी 'धूर्त' जातीसंबंधी भविष्य पुराणांत विक्रमानंतरच्या कालविषयक खंडांत केलेला आढळतो. पैशाच भाषेचा उल्लेख तर करावयासच नको. आम्हास असेही वाटते की पुश्तू भाषेचे हे अर्वाचीन नाव पैशाची या शब्दावरून पडले असावे. पिशाच्चस्थान पिश्तान-पश्ति-पुश्तु असा क्रम असू शकेल. कारण पैशाची भाषा त्याच सीमानिवासी आडदांड पिशाच लोकांची अजून आहे. या पिशाच्च नि पैशाची जाती यांच्या रानटी , आडदांड, त्रासदायक नि 'धूर्त' स्वभावाला- आजकालचा पठाण हे याच पिशाच्च नि पार्थीयनांच्या मिश्रणाचे रुपांतर आहे- अनुलक्षून मेल्यानंतर त्रास देणार्याि आत्म्यालाही पिशाच्च झाला म्हणून म्हणू लागले नि तसेच भूत शब्दाचेही असावे. आणखी एका जातीवाचक शब्दाचाही उल्लेख येथे करता येईल. तिर्यकयोनि म्हणजे नीचयोनी म्हणून प्रसिद्ध आहे. भूत वा पिशाच्च योनीप्रमाणेच

तिर्यकयोनीही त्रासदायक जरी समजली गेली नसावी , तरी ती गदळ , नीच नि विक्षिप्त आहे असा समज होता. आम्हांस असे वाटते की मलबारमध्ये अत्यंत खालची जात की ज्यांना अजूनही ते हिंदु असतांही- आयर नायर इत्यादी सर्व हिंदु अस्पृश्य नि कोठे तर अदृश्य समजतात - जिचे नांव थिय्यर नि थिय्या आहे तीच ही असावी. या जातीच्या लोकांत राक्षसादि जातीच्या लोकांतील ग्रंथीत केलेल्या चालीप्रमाणेच मायावी रूप घेण्याची चाल अजूनपर्यंत दिसून येते. पूर्वी तर 'मायावी' म्हणजे मनुष्यास भय पडेल अशी विलक्षण गाढव, माकड, ह्मैस नि अर्ध गर्दभ-अर्धमर्कट अशी पशुपक्षांची विलक्षण सोंगे घेऊन नि तसे टोप घालून रात्री बेरात्री एकाकी मनुष्यास भय दाखवित फिरण्याची चाल सर्वत्र होती. कित्येकदा एखाद्या धीट मनुष्याने पकडून टोप हिसकावून त्याचे खरे स्वरूप उघडकीस आणावे. परंतु वेडगळ समज एकदा समाजात शिरला, म्हणजे तो काढून टाकणे, पूर्वी प्रसिद्धीची नि प्रचाराची साधने इतकी उपलब्ध नसल्याने आजच्याहून कितीतरी कठीण असल्याने तिर्यकयोनी म्हणजे अर्ध मनुष्य अर्ध पशु वा पक्षी अशी कोणची तरी विक्षिप्त योनी असा समज झालेला असावा. ही तिर्यकयोनी म्हणजेच आजकालचे हे थिया नि थिय्यर हे लोक असले तर ते आर्य नि द्रविड या उभयतांच्याही पूर्वीच हिंदुस्थानच्या अत्यंत दाट अशा अरण्यात वन्य स्थितीत राहत असावे नि 'भूत' शब्दाप्रमाणेच या जातीचे नावही पुढे लाक्षणिक अर्थाने विचित्र कल्पनांचे नि विचारांचे निदर्शक होऊन तिर्यक योनीच्या कल्पनेत परिणमले असावेत.

यक्ष, रक्ष, किन्नर, पिशाच्च, भूत, तिर्यक इत्यादी नावांच्या उपपत्तीचा प्रश्न हा येथे अनुषंगिकत्वानेच आला असल्याने त्याविषयी आमच्या तर्काचा केवळ निर्देष करूनच इतके सांगणे पुरे आहे की यातील बर्याीच जाती वैदिक कालाच्या अंतास नि पौराणिक कालाच्या प्रारंभास हिमालयाच्या पायथ्याशी वसत होत्या नि त्या अत्यंत प्राचीन कालापासून नेपाळ नि त्याच्या आजुबाजुच्या प्रदेशांत वसलेल्या या जातीच्या रक्ताचा , संस्कृतीचा नि जीवनाच्या वैदिक रक्ताशी , संस्कृतीशी नि जीवनाशी संबंध नि संमिश्रण होत आलेले आहे नि वैदिक संस्कृतीचे नि आर्य म्हणविणारे अनेक संघही पंजाबात वसले होते असे म्हणण्यास जितका ऐतिहासिक आधार आहे, जवळ जवळ तितकाच त्यांच्यापैकी काही नेपाळातूनही वसत होते, असे मानावयास मिळू शकतो.

भौगोलिक दृष्टीने भूतानही नेपाळाप्रमाणेच हिंदुस्थान देशाचाच एक पोट भाग होय. तथापि संस्कृतीच्या दृष्टीने नेपाळ हा हिंदुस्थान देशाचा केवळ एक भौगोलिक प्रदेशच नसून आमच्या हिंदु राष्ट्राचे एक प्रमुखांगच झालेले आहे. वैदिक काळाचे अंती नि पौराणिक काळाचे प्रारंभी तत्रस्थ जातीय वंश जसे हिंदु संस्कृतीत एकात्म्यत्व पावत गेले नि ज्या रीतीने जसे एकात्मत्व करून गेले तसे नि त्याच रीतीने या क्षणीही तिबेटातून खाली उतरत वेळोवेळी तेथे स्थिर वसती करणारे संघ हिंदुत्वात विलीन होत आहेत. वरून

एखादी टोळी प्रथमतः नेपाळात उतरून बसते , काही वर्षांनी तेथील रीतीभाती शिकते , हिंदुंचा धर्म नि तत्वज्ञान यांच्या विचारांची छाप तीवर पडत पडत लवकरच हिंदु उपाध्याय तिच्या संस्कारास लागतात, आणखी काही वर्षांनी ती टोळी स्वतःस हिंदु म्हणवून घेऊन त्या महान संस्थेत कोणातरी उपजातीची भर घालून अंतर्भूत होते , या आजही रूढ असलेल्या प्रघाताने मागेही आपल्या हिंदु संस्कृतीत नेपाळच्या महाद्वारांतून कशी भर पडत गेली असावी. नेपाळच्या आचार-विचारांचा भारतीय संस्कृतीवर नि भारतीय संस्कृतीचा तत्रस्थ संस्कृतीवर कसा एकसारखा परिणाम होत गेला असावा नि त्यायोगे अंती या आर्य, अनार्य, द्रविड, गौड, भिल्ल इत्यादी नानाविध जातींच्या संमिश्रणांतून नि संघटनेतून उत्पन्न नि विकसित झालेल्या आजच्या हिंदु संस्कृतीवर जितका आपणा महाराष्ट्रीयांचा, बंगालचा नि पंजाबचा तितकाच नेपाळचाही कसा पैतृक वारसा नि औरस अधिकार आहे हे गोचर होते.

तथापि संस्कृतीक दृष्ट्या नेपाळ हा हिंदुस्थान देशाचा , आमच्या जातीचा राष्ट्राचा अविच्छिन्न भाग होय हे सिद्ध करण्यास पौराणिक इतिहासाच्या या विशेषतः आनुमानिक आधारावर अवलंबून राहावयाचे काहीएक कारण नाही. वर उल्लेखलेल्या कित्येक उपप त्ती नि अनुमाने किती अंशांनी तथ्य आहेत नि ग्राह्य आहेत हे सिद्ध करण्याचे प्रस्तुत स्थल नि प्रसंग नसल्याने आम्ही त्यांचा केवळ नामनिर्देशच केला आहे. पण ज्या घटना पौराणिक इतिहासाच्या अंधेरातच पडून राहिलेल्या नाहीत , ज्यांचे वास्तविकत्व अर्वाचिन इतिहासात जवळ जवळ सर्वमान्य झालेले आहे , त्यावरूनही नेपाळ हा भारताच्या ज्ञात इतिहासात अविछिन्नपणाने भारतीय राष्ट्राचा संस्कृतीचा नि देशाचाच प्रांत नि प्रदेश असल्याचे निर्विवाद सिद्ध होत आहे.

अशोकानंतर दुसर्याद गुप्ताच्या साम्राज्यापर्यंत ज्या ज्या राजक्रांत्या भारतीय राष्ट्रांत झाल्या, त्यांचा धक्का नेपाळास बसत गेला. जे जे धर्ममत , जी जी काव्यपद्धती, जी जी शिल्पधारी भारतात उदय पावली नि अस्तंगत झाली तिच्या त्या उदयास्ताचा परिणाम जितका अंग वंग कलिंगादिक भारताच्या तदितर अंग प्रत्यंगावर झाला तितकाच तो नेपाळावरही झालेला आहे. भारताच्या या विस्तीर्ण विराट पुरुषास ज्या वेदना नि भावना होत गेल्या त्याची समवेदना आह्मांप्रमाणेच नेपाळास होत आलेली आहे. हा नेपाळच्या इतिहासाचे विवरण करण्याचा प्रसंग नसल्याने केवळ मुख्य घटनांचाच उल्लेख नेपाळचे भारताशी बुद्धकालीन तादात्म्य नि देशैक्य सिद्ध करण्यास पुरेसा आहे.
बुद्धकालाच्या अंतीही श्रीहर्षांचे साम्राज्यांतच नेपाळ अंतर्भूत होत होता. श्रीहर्ष सम्राट स्वतः तेथे गेले होते अशी कथा आहे. तिकडे भारतीय शकच चालू होता. श्रीहर्षानंतर हिंदुस्थानांत एक राज्यक्रांती होऊन नेपाळावर चीनच्या बुद्धधर्मियांनी एक मोठी स्वारी केल्याचे इतिहास सांगतो. परंतु या स्वारीचे शेवटी नेपाळावर नि भारतावर त्यांचा चिरकालीन असा काहीच

परिणाम न होता या देशांवर पुन्हा भारतीय सत्ताच नांदू लागली. तेथपासून रजपूत कालापर्यंत नि रजपूत कालापासून मुसलमानी सत्तेपर्यंत नेपाळवर हिंदु संस्कृतीचा नि हिंदु राजसत्तेचा ध्वज अप्रतिहत डौलत राहिला.

चीनशी तिबेटशी त्याची युद्धे होत. केव्हा केव्हा एखादा हत्ती नि थोडेसे द्रव्य धाडून देण्यापुरती चीनची सरशी होई. तर केव्हा केव्हा आमचे नेपाळी वीर सीमा ओलांडून तिबेटात घुसून परकीय सेनेचा धुव्वा उडवीत नि त्यांचा गर्व परिहार करीत. पूर्वी गौड देशात गेलेला प्रचंड देव नि त्याचे अनुयायी यांनी नेपाळावर राज्य केले. त्यानंतर कर्नाटकामधील राजा नाच्यदेव हाही आपल्या हजारो अनुयायांसह नेपाळात येऊन बसला. तेलंगणांतूनही आमचे आंध्र बंधु नेपाळमध्ये येऊन सत्ताधारी झालेले होते. नेपाळात अजून तेलंगणी भाषा नि त्या भाषेतील लिखिते आढळतात. हरिसिंग देव नावाचा राजा अयोध्येहून नेपाळात अ. स. १३२४ चे जवळपास प्रवेश करता झाला. या राजाने आपणाबरोबर आपली महाराष्ट्रीय देवता 'तुळजाभवानी' ही आणून नेपाळात स्थापिली नि तिच्या पूजनासाठी महिषवध सुरू केला. हा राजा नि त्याचे तुळजाभवानीचे महाराष्ट्रीय भक्त नेपाळात काही दिवस सत्ताधारी राहिल्यानंतर रुद्रदेव , नरेंद्रदेव इत्यादी रजपूत नि बंगालदेशीय राजे आपल्या अनुयायांसह येऊन राजसत्ता भोगिते झाले. अंती उदेपूरच्या घराण्यांतील गुरख्यांचा वंश १७६८ इसवीत येऊन नेपाळात सत्ताधारी झाला. महाराजा पृथ्वी नारायणसिंगापासून आजपर्यंत हेच घराणे नेपाळावर राज्य करीत आहे.

या नेपाळच्या अत्यंत त्रोटक दिग्दर्शनावरूनही दिसून येईल की , वैदिक नि पौराणिक कालाची गोष्ट, बाजूस ठेविली तरीही अर्वाचीन इतिहासाच्या निर्विवाद साक्षीवरून नेपाळ हा हिंदुस्थान देशाशी गेल्या २००० वर्षे राजकीय, सामाजिक, धार्मिक नि सांस्कृतिक बंधनांनी निगडीत झालेला असून या देशाचाच नव्हे तर या जातीचा रक्ताचा नि संस्कृतीचा पंजाब, बंगाल नि महाराष्ट्र मद्रासेइतका औरस आहे. आज तर तेथे सुदैवाने अजून जिवंत असलेले हिंदु राज्य हिंदुस्थानातील इतर प्रांतांप्रमाणेच मृत झालेले असते--- ईश्वर अमंगळाचे निवारण करो- नि जर मद्रासेपासून तिराईच्या रानापर्यंत सांडलेल्या रक्तमशीचे काही बिंदु पुढे उडून नेपाळचे मानचित्रही (नकाशाही) लाल झालेले असते तर बिहार हा जसा हिंदुस्थानचा प्रांत आहे की नाही ही शंका कोणाही लेखकास येत नाही तशीच नेपाळ हा हिंदुस्थानचा प्रांत आहे की नाही हीही शंका कोणास आली नसती. केवळ आश्चर्याची गोष्ट आहे की जातीने , रंगान, शौर्यमापनाने स्पष्टपणे हिंदुस्थान देशीयापासून विजातीय दिसणारा ब्रह्मदेश हिंदुस्तानचा प्रांत आहे ही गोष्ट ज्यांच्या बुद्धीला गटकन गिळता येते त्यांना रक्त , रूप, रंग, इतिहास, संस्कृती इत्यादी देशैक्याच्या , राष्ट्रैक्याच्या नि जात्यैक्याच्या सर्व लक्षणांनी भारताचाच औरस पुत्र ठरत असलेला नेपाळ हा मात्र हिंदुस्थानचा प्रांत आहे हे विधान गिळता गिळवत नाही! ब्रह्मदेशावर लाल शाई सांडली

म्हणून तो हिंदुस्थानचा प्रांत झाला नि नेपाळवर तितक्या स्वातंत्र्याची सोनेरी कुंचली फिरत आहे म्हणून तो विदेशीय ठरला! जो समाज स्वतंत्र आहे तो हिंदुस्थानचा नव्हे अशी का हिंदुस्थानची व्याख्या हे लोक समजतात!

या लेखात नेपाळ हा प्रचलित राज्यव्यवस्थेत हिंदुस्थानचा प्रांत मानावा किंवा नाही या प्रश्नाचा उहापोह करण्याचा मुळीच हेतु नसल्याने किंबहुना तो प्रश्न हाती घेतलेल्या प्रश्नाहून अगदी स्वतंत्र असल्याने केवळ एका राज्यव्यवस्थेखाली जे भाग असतील तेच काय ते देशैक्यांत समाविष्ट होऊ शकतात. या विचित्र मताचा अधिक खल करण्याचे येथे काही कारण नाही. प्रचलित राज्य व्यवस्थेत नेपाळ हा हिंदुस्थानचा प्रांत नाही हे काही सांगावयास कोणी ब्रह्मदेव येण्याची आवश्यकता नसून ते एखादे प्राथमिक शाळेतील पोरही सांगू शकेल आणि नेपाळ हा पुढे कधीही हिंदुस्थान देशाचा एकछत्रांतर्गत राजकीय प्रांत होणारच नाही. असे प्रत्यक्ष ब्रह्मदेवही सांगावयास आला तरी ते विश्वासार्ह होणार नाही. अलसेस नि लोरेन हे दोनही प्रांत फ्रान्स देशापासून जिंकून घेतल्याने ते जर्मनीचे राज्यांत समाविष्ट झालेले होते. परंतु प्रचलित राज्यव्यवस्थेत ते प्रांत नि फ्रान्स देश भिन्न मानले गेले तरी हाणून ते फ्रान्स देशाहून भिन्न देशच आहेत असे कोणी म्हटले होते की काय ? उलटपक्षी फ्रान्सचे ते अखंड्य नि अविच्छेद्य अंग प्रत्यंग होत असेच फ्रेंच लोक प्रतिपादीत नव्हते काय ? फ्रान्सच्या राजधानीत मातृभूमीच्या प्रख्यात व्यासपीठावर या दोन प्रांताचे सुंदर पुतळे इतर प्रांतांच्या पुतळ्या शेजारीच उभारले होते. फ्रान्स देशाची त्या प्रांतावरील प्रिती चाळीस वर्षापर्यंत त्या पुतळ्यांपुढे विरहाचे वेषांत गुडगे टेकीत होती. त्या प्रांताचे प्रतिनिधी प्रचलीत राज्यव्यवस्थेत नसले तरी सामाजिक, धार्मिक, जातीय, राष्ट्रीय नि सांस्कृतिक अशा प्रत्येक फ्रान्सदेशीय उत्सवात नि कार्यात इतर फ्रेंच प्रांतीय प्रतिनिधीबरोबर समान अधिकाराने, प्रितीने नि भक्तीने स्थान पावत असत नि मान पावत असत. तिकडे जर्मनीनेही ते प्रांत जर्मन देशीय आहेत. असे ठरविण्याचा प्रयत्न चालविला होता. पण तो प्रयत्न देखील ते प्रांत फ्रान्स देशाहून भिन्न प्रचलित राज्यव्यवस्थेत आहेत म्हणूनच ते फ्रान्सचे प्रांत नव्हते तर त्या प्रांताचा इतिहास संस्कृती जाती वा संस्कृती आदिक पुराव्याची मांडणी ते जर्मनच आहेत अशा सिद्धांतास अनुकूल दिसेल अशी करण्याचा प्रयत्न करून होय. या कामावर जर्मनीने प्रख्यात प्रोफेसर इतिहासज्ञ ट्रिश्के यांची नेमणूक करून त्यास एक प्रचंड ग्रंथ लिहावयास आज्ञापिले होते. या ग्रंथातही कोणता समाज वा प्रदेश कोणत्या देशाचा वा समाजाचा भाग वा प्रांत आहे हे प्रचलित नि चंचल अशा राज्यव्यवस्थेत ठरविता येत नसून ते वर निर्दिष्ट केलेली अनेक कारणेच संमिश्र रीतीने सिद्ध करू शकतात असे प्रतिपादन केलेले आहे.

अलसेस नि लॉरेन हे प्रांत फ्रान्स देशीय नसून जर्मन आहेत हे सिद्ध करण्यास जितका पुरावा प्रोफेसर ट्रिश्के यांना सापडला , त्याच्या पावपट पुरावाही नेपाळ हा

हिंदुस्थानीय प्रांत नसून तो कोण्या इतर देशाचा प्रांत वा विभिन्न देशच आहे हे सिद्ध करण्यास मिळणे शक्य नाही. सीमेवरील प्रांतामध्ये ज्या दोन देशांच्यामध्ये तो प्रांत असतो त्याच्या उभय जाती नि संस्कृती थोड्या बहुत मिश्रित असतातच. त्याप्रमाणे नेपाळमध्ये काही अगदी तुरळक लोक आपण चीनमधून आलो असे म्हणत असले नि काही अगदी तुरळक संघांची भाषा चीनप्रमाणे वा तिबेटप्रमाणे मंगोलियन भाषा पैशाची असली तरी नेपाळ हा तिबेटचा वा चीनचा प्रांत होऊ शकत नाही. हे इतके स्पष्ट आहे की, असे म्हणण्याचे अजून इंग्रजी लेखकांचेही धाष्ट्यर् झालेले नाही. मग चीनी वा तिबेटी लोकांची गोष्ट तर दूरच. शीर्षमापनादि शरिरशास्त्रानुसार तर एक नेपाळी एखाद्या चीनी मनुष्यापुढे उभा केला असता चीनच्या पिचक्या डोळ्यांना नेपाळचा शामलवर्ण हा आपला नव्हे हे क्षणार्धात दिसून येईल. पण तोच नेपाळी पाटणा वा बनारस नगरात आणून सोडून दिला असता रंग , रूप, भाषा, संस्कृती इत्यादी लक्षणांनी त्याची तत्रस्थ जनाहून जी विभिन्नता दिसून येईल ती एखाद्या महाराष्ट्रीयास वा पंजाबास वा मद्राशास त्याच नगरांत सोडला असता त्याची जितकी दिसून येईल त्याहून फारशी अधिक असणार नाही. याचे कारण आम्ही वर जो नेपाळचा त्रोटक इतिहास दिला त्यावरून स्पष्ट दिसणारे आहे. ते हे की, नेपाळमध्ये आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, वंग, अंग, कलींग, रजपूत नि मगधादिक भारतीय जातीच्या झुंडीच्या झुंडी , वैदिक कालाची गोष्ट नि किरातार्जुनीय पौराणिक कथा सोडून दिल्या तरी आज दोन हजार वर्षे एकसारख्या जाऊन राहिल्याने , इतकेच नव्हे तर तत्रस्थ लोकांनी विवाहादिक संबंध अनुलोभ प्रतिलोभ पद्धतीने सरसहा ठेवीत गेल्याने जातीय दृष्ट्या जे नेपाळचे रक्त तेच आमचे नि जे आमचे तेच नेपाळचे झालेले आहे. तेव्हा शीर्षमापनादिक शारिरपरिक्षेतही नेपाळ हा हिंदुस्थानचाच औरस ठरला पाहिजे हे उघड आहे.

यापमाणे भौगोलिक ऐतिहासिक, संस्कृतिक, शारीरिक नि जातीय लक्षणांचा विचार केला असता नेपाळ हा हिंदुस्थान देशाचा नि राष्ट्राचा एक अविच्छिन्न नि अविच्छेद्य प्रदेश, प्रांत वा घटक ठरत नाही असे कोणासही म्हणता यावयाचे नाही. पण तरीही जर कोणी दुराग्रहाने नेपाळ हा हिंदुस्थानचा नि हिंदुस्थान हा नेपाळाचा संबंधी होऊ शकत नाही, असे म्हणेल तर आम्ही त्यास असे सांगतो की आमचा कोण नि आम्ही कोणाचे हा प्रश्न मुख्यतः संमतीचा--- हृदयाचा आहे. आमचे हृदय नेपाळ आमचा आहे असे म्हणते , त्याच्या नामनिर्देशाबरोबर प्रेमाने नि ममत्वाने ते भरून येते म्हणून नेपाळ आमचा! हिंदुस्थान हा नेपाळची पितृभूमी आहे. हिंदुस्थान ही नेपाळची पुण्यभूमी आहे. जन्म होताच नेपाळच्या मुलास त्याची माता हिंदुवीरांची नि महात्म्यांची नि हुतात्म्यांची गाणी गाते नि मृत्यू होताच मृताच्या अस्थि त्याचे नेपाळी बांधव गयेस वा गंगेत आणून भक्तीभराने परलोकांच्या पुण्यभूमीत त्याच्या आत्म्यास प्रविष्ठ करण्यासाठी प्रवाहात

सोडून देतात म्हणून नेपाळ हा हिंदुस्थानचा आहे. या आमच्या प्रीतीचे नि ममत्वाचे भू , जल, वायु, तेज नि आकाश ही पंच महाभूते लालनपालनच करीत आल्याने नि त्यांच्या अकृत्रिमत्वाची साक्ष स्वतः इतिहास देत असल्याने नेपाळ हा आमचा आहे नि आम्ही नेपाळाचे आहोत. काश्मीर जितका हिंदुस्थानचा आहे तितकाच नेपाळ हिंदुस्थानचा आहे. द्वारका जितकी हिंदुस्थानची आहे तितकेच पशुपतिनाथाचे क्षेत्रही हिंदुस्थानचे आहे. जोवर हिंदुस्थानात नि नेपाळात हिंदु संस्कृती जिवंत राहील नि जोवर त्यास कोणता भयंकर सृष्टिप्रकोप, एखाद्या विस्तृत समुद्र खणून नि एखाद्या दुर्लंघ्य पर्वत उभारून आम्हापासून हिसडून नेणार नाही तोपर्यंत नेपाळ हा आमच्या हिंदुस्थान देशाचा असाच अविच्छेद्य विभाग राहणार. त्यास आम्हापासून लेखणीच्या फटकार्याचसरशी विलग करणे कोणाही मनुष्यास शक्य नाही.

हिमालयाच्या प्रचंड प्रकाराच्या बाहुवेष्टनांत कवळून नेपाळला निसर्गाने बाह्य जगांतल्या अंगणातून उचलून भारतभूमीच्या अंकावर ज्या दिवशी दिले त्या दिवसापासूनच नेपाळचा आम्हा भारतभूमीच्या संतानांशी इच्छेद्य नि अखंड प्रेममय असा सहोदरत्वाचा संबंध जडला. त्या दिवसापासून वैदिक, पौराणिक नि बौद्ध काळात तो संबंध अविच्छिन्न राहात नि संस्कृतीच्या प्रेमपाशाने अधिकच दृढतर होत आज नेपाळात आम्हा हिंदूंचा आमच्या हिंदू राजश्रीचा जो गौरव आहे तो प्रत्यक्ष काशी प्रयागालाही उरलेला नाही. काशी प्रयागचे पाणी अनेक वेळेला परकीयांच्या उन्मत्त पदप्रक्षालनाने गढूळ झालेले आहे. काशी विश्वेश्वरांच्या मंदिराची जिथे मशीद झाली, तिथे इतर देवतांची गोष्टच काढावयास नको! पण ईश्वरीकृपेने श्रीपशुपतिनाथाच्या देवळाचा कळस हा तरी अशा एका स्थिर पायावर नि शक्तीशाली मुहूर्तावर स्थापला गेला आहे की , तो अद्याप तरी अढळपणे हिंदु गौरवाच्या आकाशात झळकत आहे. वैदिक काळात वैदिक संस्कृतीचा भाग असलेले अफगाणिस्थानांतील हिंदूंचे शाही राज्य ज्या दिवशी मुसलमानी घणाखाली चिरडले गेले त्या दिवसापासून एक दोन शतकाचे आतच अफगाणिस्थान हा हिंदुत्वास नुसता विसरला इतकेच नाही तर त्याचा परम विद्वेषी होऊन बसला. पण त्या मुसलमानी वणव्याच्या होळीत हजारो एरंडाचे वृक्ष कडकड करीत जळून खाक होत असता एखाद्या पोलादी किल्ल्याप्रमाणे नेपाळ हजारो वर्षे टिकाव धरीत केवळ हिंदुत्वास पारखा झाला नाही. इतकेच नव्हे तर आजही हिंदुत्वाच्या अभिमानाने त्याचे अंतःकरण ओतप्रोत भरलेले आहे. त्यांच्या शिराशिरांतून आजही हिंदु रक्त हिंदुत्वाचे प्रेमाने नि भक्तीने उसळत आहे.

कारण नेपाळचे प्रजेत आज दोन धर्मपंथ प्रचलित आहेत. दोन भिन्न धर्म नव्हेत. त्यातील जे लोक बुद्ध धर्माचे अनुयायी समजले जातात , ते स्वतःस हिंदु म्हणविण्यासच नव्हे तर मानण्यासही मुळीच कचरत नाहीत. मूलतःच बौद्धधर्म हा हिंदुधर्मातील अनेक पंथांपैकी एक पंथ असून तो भिन्न धर्म कधीच नव्हता. आताही नाही. पण त्यातही

नेपाळांतील बुद्ध धर्मियांच्या पूजाविधीत , तत्वज्ञानात नि देवीदेवतात इतके सदृश्य नि समवेदना आहे की ते दोन्हीही हिंदुधर्मातील एकाच ग्रंथाचे अनुयायी नाहीत असे सांगितले असताही समजण्यात येणार नाही. सनातनी नि बौद्ध अशा दोन्ही पंथांचे जे अनेक उपग्रंथ आहेत तेही नेपाळात हिंदुस्थानातील इतर राजमार्गातून फुटणार्या नि त्यालाच कोठेतरी येऊन मिळणार्यास अन्य मार्गावर प्रवास करीत असलेल्या इतर जिवांशी सहिष्णुतेने संवाद करीत चालत असतात.

सामाजिक दृष्ट्या नेपाळात गुरखे नि नेवारी असे दोन भेद आहेत. गुरखे लोक हे मेवाडात मुसलमानानी त्रस्त केलेल्या आपल्या पुरातन राजधान्या सोडून मागे इकडे येऊन हे राज्य संपादन करणार्या राजपुतांचे वंशज होत. त्यांचे नाव त्यांच्या गोब्राह्मण प्रतिपालकत्वाच्या महाब्रीदाने पडले असण्याचा संभव आहे. गोरक्षणास आपले महत् कर्तव्य समजून बुद्धानुयायी, मंगोलियन लोकांत ब्रह्मदेश, चीन, जपान, इत्यादी देशांतून अद्यापही चालत असलेल्या गोमांसभक्षणास त्यांनी नेपाळात तीव्र प्रतिरोध नि निषेध केला असेल नि त्यावरून त्यांचे वैशिष्ट्य गोरक्षण या नावाचे स्फूट होत गेले असेल. पुढे गोरक्ष शब्दावरून गुरखा हा अपभ्रष्ट शब्द त्या जातीचाच वाचक झाला असावा. गुरख्यांच्या सर्व चालिरीती त्यांचे शौर्य, त्यांचे धाडस त्यांची विवाहपद्धती , त्यांची राज्यरचना त्यांची बिरुदावली आर्य कुलांच्याच द्योतक आहेत. हे हिंदु धर्माचे कट्टर अनुयायी आहेत. दुसरे नेवारी नावाचे जे लोक आहेत ते गुरखे लोक नेपाळात यावयाच्या आधीचे निवासी होत. संभवतः नेवारी या नावावरून नेपाळ हे नाव त्या देशास पडले असावे. कारण नृपाल या शब्दावरून जरी ते पडू शकते तरी नृपाल हे नेपाळाचेच विशिष्ट स्वरूप केव्हा नि कसे झाले हे समजणे ऐतिहासिक पुराव्याचे अभावी कठीण आहे. नेपाळच्या जागी पूर्वी ते नेवारी लोकही हिंदुधर्माचे नि हिंदुत्वाचे कट्टे अभिमानी आहेत. गुरखे लोक हे हिंदु धर्मातील सनातनपंथाचे आहेत. पण नेवारी लोक काही बुद्धपंथी नि काही सनातनपंथी आहेत. पण पंथ कोणताही असला तरी हिंदुच आहेत. नि त्यांचा बुद्ध पूजाविधी सनातनीयांची एक जवळ जवळ प्रतच आहे. हे वर सांगितलेच आहे. ह्यांच्या विवाहादिक रीतीभाती नेपाळांतील मागे उल्लेखलेल्या वैदिक नि पौराणिक समयास निवास करणार्याच यक्ष , भूत, गंधर्व, किन्नर, किरातादिक मूल जातीच्या , रीतीभातीचे अवशेष असावे किंवा तिबेटांतून वारंवार येत गेलेल्या उपजाती हिंदु धर्मात नि हिंदु जातीत विलीन होत जाताना त्याच्या पूर्वीच्या रीतीभातीची ती हिंदु रूपे असावीत. गुरख्यांचे विवाहसंबंध अत्यंत कडक असून स्त्रीला एकपतीत्व पाळावे लागते , तर नेवारी लोकांत ते उभयपक्षी अत्यंत ढिले नि स्त्रीला पुरुषाइतकेच लिंग स्वातंत्र्य उपभोगू देणारे असतात. नेवारी लग्ने जोवर ती स्त्री नि पुरुष प्रेमाने वा स्वेच्छेने एकत्र नांदू इच्छितात तोवरच टिकतात. पुरुषास तर काय पण स्त्रीसही जर वाटले की आपणास आता तेथे राहणे परवडणार नाही. तर तिच्या इच्छेला कोणीही

आळा घालून तिला त्याच्याशी बळाने तिरस्कारणीय नि प्रेमशून्य संभोग करण्यास भाग पाडीत नाही. ती केवळ एक सुपारी रात्री आपल्या नवर्या च्या उशाखाली ठेवून निघून जाते. सकाळी नवर्यालने ती सुपारी पाहिली की तो नि त्याचा समाज समजतो , की ती दोघेही पुनर्विवाह करण्यास वा अविवाहित राहण्यास मोकळी झाली. त्यांच्या विवाहाची ही रीत पाहून यक्षगंधर्वादी स्त्रियांच्या पुराणांत वर्णिलेल्या लिंग स्वातंत्र्याच्या रीती आठवू लागतात. हे लोक त्या यक्ष गंधर्वादिक जातीचेच अवशेष असावेत हे अनुमान दृढ होते. प्रीतिविवाहास गांधर्व हे नाव तो ह्याच गंधर्वात रूढ असल्याने मिळाले होते. तथापि , तिबेटात अजून सरसहा प्रचलित असलेल्या वैवाहिक चालीचे , अनुकरण करून सर्व पांडवांमिळून एकाच सती द्रौपदीशी लग्न लावण्याची चाल मात्र तितकी आढळून येत नाही. मलबारमध्ये स्त्रियांस जसा बहुपतित्वाचा अधिकार आहे ; तसाच येथील नायर जातीतील स्त्रीशी ब्राह्मणांचा अनुलोभ विवाहही अजून प्रचलित आहे. मलबारमध्ये फारा दिवसांपूर्वी जेव्हा ब्राह्मणाबरोबर आणलेल्या नि तत्रस्थ मूळच्या जातीची संघटना आरंभिली गेली. तेव्हा या अनुलोभ विवाहाने ब्राह्मणांची नि त्यांचा रक्त संबंध श्रेष्ठ जातीचे श्रेष्ठ गुण वा बीज नष्ट न होता कनिष्ठास मात्र अधिकाधिक उच्चतरत्वास नेता येईल या आशेने आरंभिला गेला. ब्राह्मणांनी आपल्या वडील मुलांचे लग्न ब्राह्मणांशी लावावे नि इतर ब्राह्मण मुलांनी नायर कन्यकांशी प्रेमानुरुप नि नायर कन्यकेच्या आवडीस अनुसरून शरीर संबध लावावे; ही चाल पडली. समान परिस्थितीत समान उपाय सहजच सुचतात. त्यातही आर्यांच्या पूर्व इतिहासाच्या अनुभवाने त्या त्या परिस्थितीत उत्कृष्ट ठरलेली ही अनुलोभ विवाहाची पद्धती समाजशास्त्रासही बरीच संमत होण्यासारखी आहे. तेव्हा नेपाळातही उच्च संस्कृतीचे रजपूत गुरखे नि त्या संस्कृतीशी तादात्म्य पावू इच्छिणारे पण किंचित कनिष्ठ प्रतीचे नेवारी यांच्या मिश्रणापासून एकजीव नि एकप्राण राष्ट्र निर्माण करण्यास या अनुलोम पद्धतीचाच अंगिकार केला गेला हे आम्हा हिंदुंच्या परंपरेस युक्तच होते. आज या दोन जातीचे रक्तच नव्हे तर भाषा , स्वरूप नि संस्कृतीही एक होऊन मलबारमध्ये वा हिंदुस्थानातील इतर प्रांतात ब्राह्मण कोण नि शूद्र कोण हे सांगितल्याविना ओळखणे पुष्कळ वेळा कठीण व्हावे इतक्या साफ रीतीने जसे मूळच्या नवागत लोकांच्या मिश्रणाने एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होत आले आहे, त्याचप्रमाणे नेपाळांतही पुष्कळ अंशी झालेले आहे. ही परकीय नवागतास आपल्या विशाल हृदयत्वाच्या बाहूंस पसरून शीघ्रच आत्मसात करण्याची हिंदूंची प्रवृत्ती आजही तेथे तेच कार्य नि त्याच क्रमाने करीत आहे. दर दहा-बारा वर्षांत तिबेटीय असलेल्या टोळ्या नेपाळात वसत वसत हिंदूंच्या उपाध्यायांच्या भजनी लागतात. पूजाविधी , संकट बिंकट वा आधिव्याधी निवारणाच्या वेळेस ते हिंदु उपाध्यायाचे शिष्यत्व घेत नि हिंदु समाजातील चालीरीती उचलीत या जाति हिंदु समाजामध्ये इतक्या साफपणे मिळून जातात की दोन-तीन

पिढ्यांचे आतच नवागतीची टोळीची टोळी स्वतःलाच हिंदू समजू लागते नि इतर हिंदूंत आणखी एक नवीन जात बनवून वा जुन्या एखाद्या जातीत मिसळून लय पावते. अशा रीतीने नेपाळात हिंदुधर्म नि हिंदुजाती याचे स्वरूप विवर्धमान राहण्यास तेथील सहिष्णु रीतीभाती जितक्या कारणीभूत झालेल्या आहेत. तितकेच त्या लोकांचे शौर्य , धैर्यादि सद्‌गुण नि राजकीय शक्ती शालित्वही कारणीभूत झालेले आहे.

आज अनेक शतके नेपाळवर पूर्ण स्वतंत्र किंवा स्वातंत्र्यप्राय ध्वज डुलत आहे. पूर्वी केव्हा केव्हा चीनी-सम्राटाची नावापुरती-एखादा हत्ती किंवा एखादी शालजोडी सम्राटास पुरस्कार देवविण्यापुरती सत्ता असे, तर कधी कधी नेपाळचे वीर सीमा उल्लंघून तिबेटांत उतरून वरपर्यंत आपल्या शौर्याचा वचक बसवीत ते तरवारीची धमक दाखवीत जात. पुढे इंग्रजांशी झालेल्या एक दोन लढायांतही नेपाळने बर्याच शौर्याने आपला टिकाव धरल्याने ब्रिटिशांचे पंजातही तो पूर्णपणे गुंतू शकला नाही. नेपाळच्या राजवाड्यांत वरचेवर बरेच घोटाळे उत्पन्न होत असत. पण अशाच घोटाळ्याचा नि अंतः कलहाचा लाभ घेऊन जेव्हा इंग्रज वर चढू येऊन पाहू लागला , तेव्हा त्या लागलेल्या ठोकरीपासून नेपाळ योग्य तो धडा शिकला नि आज जवळ जवळ पन्नास पाउणशे वर्षात तेथील राज्यात आपसातील बखेडा उपजला नाही असे म्हटले तरी चालेल.

तेथील राज्यव्यवस्थेप्रमाणे मुख्य महाराज हे राज्यातील सेनापतीत्वासुद्धा सर्व कारभार आपल्या मुख्य प्रधानाकडे सोपवितात. शाहू छत्रपतीप्रमाणेच नेपाळच्या महाराजांनीही हा अधिकार वंशपरंपरेने आपल्या प्रधानाकडे सोपविला असल्याकारणाने राज्याचे नि म्हणूनच राष्ट्राचे धुरीणत्व त्या प्रधानाचेच स्कंधावर नि कर्तबगारीवर अवलंबून असते. आजकालचे प्रधानच नव्हे तर महाराजेही कर्तव्यदक्ष , देशोदेशांत पर्यटन केलेले नि जगताच्या उलाढालीस ओळखून असणारे आहेत. नेपाळमध्ये असलेले सैन्य थोडे असले तरी आपल्या हिंदुंच्या इतर संस्थानांतून ते जवळ जवळ शोभेचे असते , तसे नसून ते खरे खुरे सैन्यच आहे. ते थोडे असले तरी ते गुरख्यांचे असल्याने नि त्याला सशक्त सुटसुटीत नि कार्यक्षम करण्याकडे महाराजांचे नि प्रधानाचे लक्ष वेधलेले असल्याने ते लक्षावधी बाजार बुणग्यास भारी आहे. सैन्याप्रमाणेच नवीन शस्त्रास्त्रेही नेपाळमध्ये अवश्य तितकी नसली तरी शक्य तितकी सज्ज ठेवण्यात नि वाढविण्यात येतात. नेपाळचे कित्येक विद्यार्थी राजकीय आज्ञेने जपानमध्ये नि युरोपमध्ये नव्या तोफा ओतण्याची नि नव्या शस्त्रास्त्रांची नि सैनिक शास्त्राची विद्या संपादण्यास मधून मधून नि थोड्या प्रमाणाने का होईना , पण जातात. मागे लढाईमध्ये भेट म्हणून उत्कृष्ट विमानांचा एक संच महाराजांनी इंग्रजांस दिला नि काही स्वराज्यांतही ठेवला. थोडे दिवसांत स्वराज्यापुरती विमाने करण्याचा कारखाना निघण्याचाही--- अद्याप निघाला नसला तरी ---पूर्ण संभव आहे.

परंतु नेपाळची शक्ती त्यांच्या ह्या खड्या सेनेने मापली जात नाही. नेपाळात जितकी खडी सेना आहे त्यांच्या अनेक पटीने ब्रिटिशांच्या सेवेत नेपाळचे गुरखे लोक सैनिक शिक्षण घेत असतात. महाराजांचे राज्यांतून गुरख्यांची तरूण पोरे ब्रिटिशांचे सेनेत शिरून अनेक लढायांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन आजपर्यंतच्या उत्कृष्ट सैनिक शोधांचा नि शास्त्रांचा प्रत्यक्ष उपयोग करून नि पाहून परत पेन्शन घेतल्यावर आपल्या गावी जाऊन राहतात. गेल्या महायुद्धांत प्रत्यक्ष जर्मनांबरोबर लढलेले नि महा समरांतही सामरीक डाव पेचाचे, साहसाचे नि आत्मविश्वासाचे अनुभव घेतलेले हजारो शूर गुरखे नेपाळातही खेडोखेडी आपल्या नवीन तरुणांस नि गावकर्यांसस ते डौलाने सांगत बसलेले असतील. आज बरेच पिढ्या ते हाच व्यवसाय करीत आले असल्याने सामरीक शिक्षा नि युद्ध क्षमता या गोष्टी गुरख्यांच्या हातचा मळ , झालेल्या आहेत. नेपाळांतील प्रत्येक झोपडीत प्रत्यक्ष लढाई पाहिलेला एक म्हातारा वीर प्रत्यक्ष लढाई मारीत असलेला एक प्रौढ वयस्क नि लहानपणापासून लढाईच्या वीर्योत्कर्षक कथा नि प्रसंग ऐकत नि तरवार , घोडा, बंदुक नि कवाइत या खेळण्याशी खेळत वाढलेला नि समर शिबिरात भरतीसाठी जाण्यास निघणारा एक तरूण वसत आहे. अशा रीतीने गुरख्यांची जातीची जातीच एक मोठी खडी सेना आहे. नि तिचे महाराजांस नि त्यांच्या राष्ट्रास प्रेमाचे पाठबळ आहे. गुरखा तरूण म्हटला की तो नेपाळातील स्वराज्याचे सेनेत तरी भरती होणार किंवा ब्रिटिशांच्या सेनेत तरी होणार हे ठरलेले आहे.

हेही ठरलेलेच असते की जे ब्रिटिशांच्या सेनेत भरती होतील ते तरूण ब्रिटिशांची आज्ञा पाळण्याची शपथ घेतांना असे स्पष्ट सांगतात की जर कधी ब्रिटिशांची नि नेपाळच्या महाराजांचीच लढाई जुंपली तर स्वकीय स्वधर्मीय नि स्वराष्ट्रीय अशा आमच्या नेपाळच्या राजाशी लढण्यास मात्र आम्ही या शपथेने बांधले गेलेलो नाही. अशा रीतीने आज नेपाळात युरोपातील राष्ट्रांप्रमाणे न्यूनाधिक प्रमाणाने घरोघर सक्तीचे सैनिक शिक्षण मिळाल्यासारखेच झालेले आहे. नि त्या योगे खडी सेना जरी थोडी असली (नि थोडी जरी ती आहे तरी इतर कोणत्याही हिंदी संस्थानापेक्षा अधिक , संख्येने देखील अधिक आहे. हे सांगणे नकोच) तरी नेपाळच्या स्वातंत्र्यावर संकट गुजरले असता सर्व गुरखा जाती म्हणजे एक नवीनातले नवीन सैनिक शिक्षण देऊन सज्ज केलेल्या सेनेचा एक तळच आहे.

त्या तळाभोवती दुलर्ध्य अशा प्रचंड पर्वतांचा निबिड अरण्यांचा नि अरुंद आणि उभट घाटांचा एक नैसर्गिक कोट त्या तळाचे रात्रंदिवस संरक्षण करीत उभा आहे. अशा बलिष्ट स्थलाचे नि अशा शूर जातीचे अधिपती हिंदु आहेत. हाडामासाचे , रक्तबीजाचे, पुराण परंपरेचे सूर्यवंशाचे गो-ब्राह्मण रक्षक ब्रीदाचे हिंदु आहेत. आणि आज ब्रिटिशांनी जो त्यांच्याशी नवीन संधी केला त्यात त्यांनी या हिंदुमहाराजांचे स्वातंत्र्य मान्य केले आहे.

या गोष्टीचे महत्व हे हिंदुंनी , निदान १०० रुपयांच्या खादी विक्र्या इतके देखील नसेल का? नि असेल तर दोन रुपडीची खादी सर्व दिवसांत विकली म्हणून कृतार्थता मानणार्याच या अजागळ तरूण पिढीच्या डोक्यात नेपाळशी झालेल्या संधीची बातमी ऐकून एक क्षणभर तरी काही तेजस्वी विचार, काही तीक्ष्ण दु:ख, काही थोर आशा, काही धाडशी योजना, उत्पन्न झाल्या होत्या काय? हजारांत, लाखांत, एखाद्याच्या कदाचित असतील! अफगाणशी तीन चार वर्षापूर्वी एक नवीन संधी करून इंग्रजांनी त्यांचे स्वातंत्र्य मान्य केले त्या योगे अफगाणिस्थानास इतका आनंद झाला की प्रतिवर्षी त्या दिवसाची स्मृती म्हणून एक स्वातंत्र्योत्सव अफगाणिस्थानावर दुमदुमत असतो. हिंदुस्थानांतही त्याचा प्रतिध्वनी निघत असतो. यंदाही त्या स्वातंत्र्याच्या उत्सवाप्रित्यर्थ हिंदुस्थानात प्रमुख मुसलमानांनी नि हिंदूंनीही थोडेच दिवसांपूर्वी एक भोजन समारंभ केलेला होता. फार काय पण हैद्राबादचा निजाम देखील आपला स्वातंत्र्योत्सव करीत असतो नि त्यात मोठमोठ्या मुसलमान पुढार्यां ची अद्वातद्वा भाषणे होत असतात. ज्या हिंदुस्थानात हैद्राबादच्या निजामच्या राज्याच्या स्थापनेचा उत्सव होतो नि अफगाणिस्थानच्या स्वातंत्र्याकरिता भोजन समारंभ होतात. त्याच हिंदुस्थानात नेपाळच्या स्वातंत्र्यार्थ शाब्दिक का होईना, पण ब्रिटिशांची मान्यता मिळाल्यासाठी एखादे पानही आनंदाने हलत नाही.

नेपाळचे स्वातंत्र्य जवळजवळ दिखाऊ आहे ? समजा! पण हैद्राबादेहून तरी ते अधिक दिखाऊ नाही ना ? नेपाळचे स्वातंत्र्य शाब्दिक आहे ? समजा--- पण हैद्राबादेस शाब्दिक स्वातंत्र्यसुद्धा नाही. उभ्या हिंदु जनतेस आजच्या एका नेपाळला शाब्दिक तरी पण स्वातंत्र्य आहे. त्याचे ते स्वातंत्र्य शाब्दिकतेतून काढून चरितार्थतेत नेऊन सोडण्यासाठी प्राणापलिकडे प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे , का ते स्वातंत्र्य शाब्दिक आहे म्हणून केवळ नाके मुरडीत बसण्याचे आहे. आज जर आपण नेपाळशी झालेल्या ह्या संधीविषयी चोहोंकडे सभा केल्या असत्या , त्या संधीत जे काही बरे वाईट आहे. त्याची उघड नि स्पष्ट बातमी प्रसिद्ध करून वा करवून त्यासंबंधी चर्चा केली असती नि प्रेमभराने नेपाळच्या या गौरवाचे अभिनंदन सर्वतोमुखी करून नेपाळच्या महाराजांस आपणा हिंदुनी हिंदु महासभेच्या वतीने आपले हार्दिक अभिनंदन कळविले असते. तर नेपाळास अखिल हिंदूंच्या पाठबळाने केवढी नैतिक शक्ती आली असती. त्याचे हिंदुसंघटनाच्या चळवळीकडे किती लक्ष वेधले असते. आमच्या गुरखा बंधूंच्या मनात आमच्याविषयी केवढे राष्ट्रप्रेम नि जातीय अभिमान उत्पन्न झाला असता!

गुरखे लोक आम्हा हिंदुंशी फटकून वागतात नि वेळ प्रसंगी आम्हाविरुद्धही जातात असा नेहमी आक्षेप घेण्यात येतो पण या दोषांचे खापर , जितके गुरख्याच्या शिरांवर तितकेच आपल्याही शिरावर फोडावयास नको काय ? आपण गुरख्यासंबंधी केव्हा नि कोणाची नि किती सहानुभूती दाखविली आहे? की ज्यायोगे त्यांच्या मनात आपल्याविषयी

जातीय प्रेम उत्पन्न व्हावे! आमच्या राष्ट्रीय सभेस तर नेपाळ हा हिंदुस्थानातला एक प्रांत आहे. असेही वाटत नाही. इतकेच काय पण , ज्या हिंदु संघटनाचे कार्य नेपाळला त्या चळवळीचे केंद्र समजल्याने शक्तीशाली नि द्रुततर यशस्वी होण्याचा संभव आहे , नि अखिल हिंदूंचे संघटन करणे हेच ज्यांचे उद्दिष्ट आहे , त्या हिंदुसंघटनच्या पुढार्यांचनी ही अजूनपर्यंत नेपाळची सहानुभूती संपादण्यास नेपाळात हिंदुत्वाची चळवळ आरंभण्यास काहीही हालचाल केली नाही. मग गुरखे लोकांत नेपाळाबाहेरील हिंदुस्थानसंबंधी औदासिन्य आहे त्यात काय आश्चर्य?

आम्हांस पक्के आठवते की जवळजवळ सोळा वर्षापूर्वी एका शीख गृहस्थांशी आमचे जातीय जागृतीसंबंधी बोलणे चालले असता अखिल पंजाबमध्ये जागृती कशी उत्पन्न करावी हा प्रश्न निघाला. ते गृहस्थ स्वतः उत्कट देशाभिमानी होते. ते निराशेने मान हलवीत म्हणाले , “ते काहीही करा! पंजाबातील शिखांत जागृती उत्पन्न करणे फार कठीण आहे! ” आणि खरोखर! त्या वेळचा शीख समाज शैथिल्य , कूपमंडूकता नि देशाभिमान शून्यता ह्यात आजच्या गुरख्यास हार गेला नसता. पण आम्ही त्या शीख मित्राची पाठ थोपटीत थोपटीत त्यास आश्वासिले की , पहा! आपण ठरवीत आहो इतक्या गोष्टी जर केल्या तर पाच वर्षांचे आत शीख समाज जागृत होऊन खडबडून उठलाच पाहिजे. पाच वर्षांचे आत शीख लोक, जातीय कार्यासाठी आजच्या सनातनी तरुणासारखेच, बलिदान करतील. पाच वर्षांचे आत करतील!

शिखांत प्रचार करण्याचे कार्य ठरलेल्या मार्गाने झाले नि पाच वर्षांचे आंतच अवघा शिखसमाज जातीय जागृतीने खडबडून उठला!

हिंदुत्वाच्या अभिमानाने, जातीय प्रेमाने नि आपलेपणाने गुरख्यांसही जर आपण जवळ करू, हिंदुसंघटनेच्या कल्पनेचा प्रचार त्यांच्यात करण्यासाठी त्यांना विनवू , जर त्यांच्या मनात ज्यायोगे हिंदु पूर्वजांचे पराक्रम यांची स्मृति उद्दिपत होईल अशी भाषणे नि तदनुसार अत्यंत प्रेमळ कृती करू; तर शीख जसे पाच वर्षांचे आत आम्हास येऊन मिळाले तसे गुरखेही निश्चयाने मिळतील. त्यांच्यात नि आमच्यात प्रस्तृत राजकारणाचे समदुःखोत्पन्न ऐक्य नाही हे अंशतः खरे आहे पण ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे! आमच्याप्रमाणे त्यांची नाके साफ कापली गेली नाहीत. आमच्या इतर संस्थानिकाप्रमाणे ते अर्थशःच नव्हेत तर अक्षरशः परतंत्र झाले नाहीत. तीर्थक्षेत्रांचे रक्षण करण्यासाठी त्यांना अजून निधर्मी नि विजातीय लोकांच्या राजपुरुषांचे सहाय्य घ्यावे लागत नाही. पंढरीच्या वाटेवर मुसलमानांनी भूमी घेऊन जशी आता या यात्रेस मनाई करण्याची उघड उघड भाषा बोलण्यास सुरवात केली आहे तशी पशुपती नाथास जाणार्या लाखो यात्रेकरूंस आडकाठी करण्याची कोणा अहिंदुंची माय व्याली नाही हे आमचे महद्भाग्य होय. नेपाळ याअर्थी प्रचलित नि दुधखुळ्या राजकारणात वा धर्मकारणात आमचा समदुःख-सुखी नाही हेच बरे.

कारण त्यात सर्व दुःख भरलेले असून त्यात मुळीच सुख नाही. आम्ही दुःखात बुडालो तर बुडालो पण निदान आमचा एक भाऊ तरी तिकडे स्वतंत्र्यप्राय असून आमच्या परीस अनेक पटीने सन्मानात नि सुखात नांदत आहे हे आपले भाग्यच होय. तथापि या प्रचलित दुधखुळ्या राजकारणात समदुःखसुखी नसला तरी नेपाळ आमच्या खर्याखुर्याि राजकारणात नि धर्मकारणात आमचा खराखुरा भागीदार नि आम्हाशी समदुःखसुखी आहेच आहे. कारण आज नेपाळही हिंदु आहे. हिंदुंची जी अधोगती आम्हास जाचते , तीच उद्या त्यांनाही जाचणारच. हिंदूच्या ह्रदयात संघटणाच्या उत्पन्न झालेल्या लोभनीय आकांक्षा सफल झाल्या तर त्यात नेपाळची शक्तीही वृद्धिंगत नि संघटित होणारच. कारण राजकारणांत वरवर जरी त्यांचा संबंध दिसत नसेल तरी धर्मकारणात नेपाळ नि तदितर हिंदुस्थान यांच्या हिताहितांत नि भावभावनेत , लेशमात्र भिन्नता नाही. पूर्व बंगल्यात गेल्या सन १९२६ च्या आंदोलनाचे वेळी जेव्हा मुसलमान गुंडांचे नि गुरख्यांचे साह्य घेऊन सरकारने हिंदु लोकांस चेपण्याचा बेत केला, तेव्हा मुसलमानी गुंडांनी खुशाल देवळांत शिरून हिंदुंना छळले. पण हे कृत्य गुरख्यांना सहन झाले नाही. बंगल्यातील कालीमातेची देवळे , काही बंगाल्यांचीच नव्हेत! ती सर्व हिंदूची आहेत. अशा देवळात मुसलमान गुंड शिरतांना दिसताच गुरख्यांचा धर्माभिमान एकदम जागृत झाला नि हिंदूचा पक्ष घेऊन ते त्यांच्यावरील अधिकार्यांुच्या अनुज्ञेची वाट न पाहता मुसलमानांवर तुटून पडले नि त्यांनी देवळाचे रक्षण केले. तीच स्थिती मलबारची. मलबारमध्ये दोन-तीन सालापूर्वी मोपल्यांनी जेव्हा इत्याचार आरंभिले नि हिंदुंवर पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे तुटून पडून देवांचा नि धर्माचा उच्छेद त्यांनी आरंभिला तेव्हा तिकडे व्यवस्थेसाठी असलेल्या गुरख्यांनी हिंदूच्या देवळांचे नि धर्माचे रक्षण इतक्या कळकळीने केले की हिंदूस ते कोणी धर्मरक्षकच आले आहेत की काय, असे वाटले! उद्ध्वस्त देवळे पाहून नि धर्मांतराची दुःखे ऐकून तो प्रसंग जसा काही नेपाळवरच गुजरला आहे असे त्यांचे मन तळमळू लागले. त्यांनी मोपल्यास यथायोग्य शिक्षा करण्यास कमी केले नाही. अशा उत्कट धर्माभिमानी बांधवांशी आम्ही जाऊन जर त्यांची सहानुभूती हिंदु संघटणास याचू लागलो तर ती आज नाही उद्या मिळालीच पाहिजे.

गुरख्यांचा नि आमचा संधी होण्यासच संधी नाही हे म्हणणेही न कर्त्याचा वार शनिवार या म्हणण्याप्रमाणेच आहे! अहो , दहा हजार कोसावरून येऊन इंग्रजास त्यांचा परिचय करून घेता आला. त्यांची भाषा शिकता आली , त्यांचे राजवाड्यातील खडानखडा माहिती मिळविता आली. आम्हा त्यांच्या सख्ख्या भाऊबंदास एका घरात राहणार्यांयस त्यांचा परिचय होणार नाही , प्रयत्न केल्यासही होणार नाही असे म्हणणे आमच्या दुर्बलतेची उत्साहशून्यतेची नि ऐदीपणाची सीमाच होय! दर वर्षी हजारो यात्रेकरू नेपाळात पशुपतीनाथाचे यात्रेस जातात नि येतात. एक नाही दोन नाही हजारो व्यापारी लोकांचे तांडे

द्रव्याची ने आण करीत असतात. नेपाळातील डॉक्टर , उपदेशक, उपाध्याय, यांत्रिक, शिल्पी, प्रकाश लेखक (फोटोग्राफर) , गायक, व्यवस्थापक शेकडो प्रकारच्या अधिकारांवर इकडून सुशिक्षित लोक नेण्या आणण्यांत येतात , आणि तुम्ही म्हणता नेपाळशी परिचय होणे कठीण!! तेही राहो , पण हजारो गुरखे प्रत्यक्ष ब्रिटिशांच्या सत्तेतील हिंदुप्रांतातून राहात आहेत. श्रीकाशीला गुरख्यांची एक स्वतंत्र वसाहतच वसलेली असून त्याचे निमित्त गरीबगुरिबांपासून तो प्रत्यक्ष श्रीमंत प्रधानापर्यंत गुरख्यांची आवक जावक तेथे चालू असते. बाजारा-बाजारातून मोठमोठ्या सेना शिबिराच्या नगरात ते तुमच्या घरात देवळात भेटतात, दुकानात बसतात, तिर्थांत स्नाने करतात. उत्सवात भाग घेतात! ते काही नाही ; इच्छा पाहिजे आहे. नेपाळशी परिचय करणे कठीण आहे! नेपाळशी तर काय पण उत्तर ध्रुवावरील पाच हिंदुंची जरी वसाहत असेल तरी तरी तेथे जाऊन त्यांचा परिचय करून घेणे हिंदुसंघटनांचे कर्तव्य आहे. हिंदु जातीची इतर सर्व लेकरे एकत्र झालेली आहेत. पण आमचा नेपाळी बंधु का बरे आला नाही ? मातृभूमीच्या नि स्वधर्माच्या रक्षणार्थ तिची पंजाबातील, महाराष्ट्रातील, बंगाल्यातील, सिंधांतील, मद्रासेतील सर्व लेकरे सज्ज होऊ पाहात असतांना नेपाळातील तिचे लाडके पुत्र , कुठे बरे राहिले ? अशा तळमळीने जर आपण त्यास शोधावयास निघू; हाक देऊ, तर ते आपले धर्मबंधु त्वरीत आपणास येऊन मिळतील यात शंका नाही.

परंतु हिंदुस्थानावर फासला गेलेला ब्रिटिश क्रौर्याचा रक्तरंग पाहण्याची ज्यांना आजन्म सवयच झालेली आहे त्यांना हिंदुस्थानातील तांबड्या रंगाच्या सीमेवरच हिंदुस्थानची सीमा वाटावी नि पलिकडील पिवळा सोनेरी स्वातंत्र्यांचा रंग पाहून त्या रंगाचा देश हिंदुस्थानाबाहेरील कोणता तरी देश आहे असे वाटावे. हे दुर्दैवाने ज्यांच्या डोळ्यांवर झापड टाकलेली आहे; त्यांना साहजिकच आहे! व्यक्तीचीच गोष्ट काय ? संघांची नि संस्थांचीही बुद्धी या विषयात इतकीच अंध नि बधिर झालेली आहे. राष्ट्रीय सभेतील प्रांतात नेपाळची गणना नाही! हिंदुस्थानच्या स्वराज्याचा विचार करणार्यांच्या डोक्यात नि त्यांच्या प्रत्यही शेकडोंनी, जन्मणार्याच नि मरणार्या हजारो स्वराज्य योजनेत नेपाळचा उल्लेख नाही! फार काय पण स्वदेशाचा भाग म्हणून त्यांना त्यांची आठवण होत नाही. इतकेच नव्हे तर विदेशाचा भाग म्हणूनही त्यास कोणी महत्व देत नाही. कारण अफगाणिस्थान , इराण, तुर्कस्थान यांच्या किंवा फिलिपाअन नि फिजी बेटाच्या तारांनी , विचारांनी नि स्मृतींनी गजबजलेल्या हिंदुपत्रांतून नेपाळच्या संबंध एखाद दुसरे स्फूट बारा बारा वर्षातही लिहिण्याची आवश्यकता कोणासही वाटत नाही. कारण काय ? तर नेपाळ अजूनपर्यंत , स्वतंत्रप्राय आहे. नेपाळ ही हिंदूची एक सत्ता आहे. नेपाळात हिंदु मंदिरांतील मूर्ती गजनवीच्या सोट्याखाली चिरडल्या गेल्या नाहीत. नेपाळात हिंदु भक्तांच्या दिंड्यास नि हरिभजनाच्या थव्यास मशिदीवरून जातांना वाद्ये बंद करा म्हणून सांगण्याची नि न

ऐकले तर त्यांची डोकी फोडून , पालखी तोडून , 'अल्ला हो अकबर ' म्हणून गर्जना करण्याची कोणाची माय व्याली नाही. नेपाळचा रंग अजून पिवळा आहे. नेपाळचा राज दुंदुभी अजून पुरता फुटला नाही. आमचे नाक जितके साफ कापले गेले आहे तितके नेपाळचे नाक साफ कापले गेले नाही. नेपाळ अजून चारी मुंड्या चित झाला नाही. म्हणून सहजच नेपाळ या नकट्या पडखाऊ पण मुखदुर्बल हिंदूंना आपला वाटत नाही. ह्या करताच जर तो हिंदुस्थानच्या बाहेरचा गणला जाणार असेल तर देव करो नि तो यावच्चंद्र दिवाकरौ असाच हिंदुस्थानाच्या बाहेर राहो. आणखी पूर्णशः बाहेर जावो! हिंदु धर्मावर नि हिंदु श्रीवर स्वतंत्र श्वेतछत्र धरीत आहे. त्याहून दूर जाऊन उभा राहो. नाहीतर हिंदुस्थानातील स्पर्शजन्य दास्य साथीच्या उत्पाताने हिंदूंच्या आशेचा हा अंतिम पल्लवही करपून जाईल.

राष्ट्रीय सभेच्या मंडपात प्रांताप्रांतासाठी विभाग राखून ठेवेलेले असतात. हिंदुस्थानातील सर्व प्रांत एक आहेत. मातृभूमीच्या मंदिरात तिच्या पूजेसाठी सर्व पुत्र आलेले आहेत, एकत्र झालेले आहेत. पण त्या पुत्रात नेपाळचे स्थान का बरे नाही दिसत ? नेपाळ हिंदुस्थानाबाहेर आहे काय ? त्या प्रांतासाठी मंडपांतील एक भाग इतर प्रांतांप्रमाणे राखून ठेवला तर त्यावर 'नेपाळचे स्वागत असो' म्हणून करुणामय आमंत्रणाच्या अक्षरांनी चिन्हित केलेली ध्वजा फडकत ठेवली तर ते दृश्य इकडे हिंदूंच्या मनावर नि तिकडे नेपाळी बांधवांच्या मनावर केवढा नैतिक परिणाम करील बरे! निदान हिंदुमहासभेने तरी पुढील वर्षापासून ही व्यवस्था अवश्य करावी. जोपर्यंत नेपाळसारखा हाडामासाचा हिंदूंचा प्रांत नि जाती आमच्या संघटनांत प्रविष्ठ झालेली नाही नि तिची आम्हास आठवणही होत नाही, तोपर्यंत आमचे हिंदुसंघटन पूर्ण होणार नाही. एतदर्थ , आता तरी प्रत्येक हिंदूने जिकडून नेपाळ नि तदितर हिंदु प्रांतांचा संबंध दाट जुळून येईल नि इकडील नवजीवनाच्या लहरी तिकडे पोचतील असा प्रयत्न करीत असावे. हिंदुपत्रांनी वारंवार नेपाळच्या बातम्या , इतिहास, हालचाली यावर स्फुटे लिहावी. नेपाळात जाऊन परत आलेल्या प्रवाशांची प्रवास वर्णने छापावी. नेपाळास न गेलेल्या लोकांनी पूर्वीचे लोक जसे पशुपतीनाथाच्या यात्रेस धार्मिक कर्तव्य म्हणून जात तितक्याच धर्म समजुतीने हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनार्थ नि हिंदु जातीच्या संघटनासाठी आजही गेले पाहिजे. हिंदुमहासभांनी नि त्यांच्या शाखांनी नेपाळचे महाराजांच्या आयुरारोग्यासाठी प्रार्थना केल्या पाहिजेत. हिंदु स्वातंत्र्याच्या ध्वजाचा तो एक पदर तरी अजून गत वैभवाची स्मृति जागृत ठेवण्याचे नि उत्तेजित करण्याचे कार्य करीत आहे. म्हणून आनंद प्रदर्शित केला पाहिजे. गुरख्यांतील विद्वानांस नि देशभक्तांस आमंत्रण देऊन हिंदुसभांतून त्यांची व्याख्याने करविली पाहिजेत. गुरखा भेटेल तेथे त्यास विनविले पाहिजे की , तू हिंदु, मी हिंदु! बंधु! तुझे रक्त तेच माझे रक्त आहे! आपण दोघेही एकाच हिंदु बिजाचे आहोत , श्रीकृष्णाचे

भक्त आहोत! आपणा दोघांसही एकाच मातृभूमीने जन्म दिला आहे! भारत ही दोघांची पुण्य भूमी आहे! त्या भूमीवर, त्या धर्मावर, त्या जातीवर, त्या आपल्या हिंदुत्वावर आज अवनतीची छाया पडली आहे. त्या आपल्या हिंदु संस्कृतीची मुसलमान आज सुंता करू म्हणतात! ख्रिस्ती लोक तिला बाप्तिस्मा देऊ पहातात! परवशता तिचा गळा छाटू पहाते! दुर्बलता तिचे हृदय पिळू पाहाते! उठ! बंधो उठ! जर तूही उठशील , जर पशुपतीनाथांचे मंदिरात हिंदु-संघटनाचे कार्यालय स्थापले जाईल नि नेपाळचा ध्वज विजयी होईल , तर बंधो! तुझ्या व माझ्या मातृभूमीच्या भाग्याचा उदय सन्निध आला आहे म्हणून समज!

हिंदुत्वाचे यज्ञागारांत इतर सर्व ऋत्विज जमले आहेत. केवळ तुझी वाट पाहात आहेत. जर माझ्या आशा तुझ्याही हृदयात उद्दीपित होतील तर आपल्या हिंदु जातीची ती अत्त्युच्च नि आज असंभाव्य वाटणारी आकांक्षाही यशस्वी होईल! कोणची ती तुला मग सार्गीन!

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक २ रा**

# नेपाळास राष्ट्रीय सभेने भारताचा एक प्रांत गणलेच पाहिजे

आपल्या एकमात्र स्वतंत्र राज्याविषयी आपल्या हिंदु लोकांत किती अनास्था आहे. हे आपल्या लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीच की काय खिलाफितीच्या चालकांनी अफगाणिस्थानांतील जो कोणी राजकीय वाटसरू हिंदुस्थानाच्या मार्गाने जाता येता भेटेल , त्यास पानसुपार्याज करण्याचा परिपाठ घातलेला आहे. मागे प्रत्यक्ष अमीरच हिंदुस्थानात आले होते. पण नेपाळचे राजकीय अधिकारी अनेक वेळा आपल्या प्रांतांतून जातयेत असता त्यांचा गौरव करण्याची बुद्धी हिंदूंच्या एकाही संस्थेस अद्यापी का बरे होऊ नये? नेपाळवर हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज अजूनही डुलत आहे. नेपाळात आजही उत्कृष्ट युरोपियन सैनिक शिक्षणात मुरलेला नि जर्मन सैनिकांच्या बरोबरीने विमानातून , रथातून, रणतून झुंजलेला असा ६० हजार हिंदु सैनिक हिंदु सेनापतीच्या आज्ञेत हिंदु ध्वजाखाली सज्ज आहे. ते काहीही नसले तरी नेपाळात आज आपले सख्खे भाउबंध अर्धा कोटी वसत आहेत. इतकी गोष्टही आम्हा हिंदुंस त्यांच्याकडे आकर्षण करण्यास पुरेशी होती. तथापि , नेपाळचे हिंदु राजकारणात आज नावही निघत नाही! बंगलोर येथे नेपाळचे कर्नल राजा जय पृथ्वीसिंह बहादूर यांचे हस्ते पौर्वात्य वस्तूंचे प्रदर्शन उघडणार आहे असे म्हणतात. आता हिंदूंच्या अनेक संस्थांपैकी काहीनी जर या आपल्या हिंदू वीरांची- या कर्नल महाशयांची गाठ घेतली नि त्यांच्या मार्गाचा पत्ता काढून त्यास ठिकठिकाणी पानसुपार्या केल्या. तर नेपाळात नि आपल्यात पडलेले एक प्रकारचे मनोमालीन्य दूर होऊन आपले प्रेम नि ऐक्यभावना उद्दीपित होऊन अखिल हिंदुराष्ट्राची संघटना होण्यास काही तरी सहाय्य झाल्याविना राहील काय? प्रस्तुत प्रश्न केवळ राजा जय पृथ्वीसिंहाचाच नाही. परंतु जेव्हा जेव्हा आपल्या नेपाळी बंधूंतील पुढारी इकडे येतील तेव्हा त्यांचा असा सामाजिक सन्मान राजकीय नसले तरी राष्ट्रीय स्वागत करणे हे आपल्या हिंदु संघटनास अत्यंत उपकारक आहे. इतकेच नव्हे तर हे आपले निरपेक्ष जातीय कर्तव्य आहे.

* * *

इतकेच नव्हे तर हिंदुमहासभेचे देखील हे कर्तव्य आहे. येत्या अधिवेशनामध्ये नेपाळतर्फे काही प्रतिनिधी, आणविण्याची व्यवस्था केली जावी. हिंदूंच्या त्या एकमात्र नि स्वतंत्रप्राय राज्याचे , त्या स्वातंत्र्याचे अभिष्टचिंतन नि अभिनंदन करणारा एखादा उद्बोधक ठराव, हिंदुमहासभेच्या बैठकीत जर आणला जाईल नि तद्नुरोधाने हिंदुमहासभेचे अध्यक्ष जर नेपाळच्या महाराजांस त्याच्या अभिष्टचिंतनपर नि अभिनंदनपर ठराव तारेने

वा विशिष्ट प्रतिनिधीद्वारा कळवितील तर आपल्या दूरस्थ देशबंधूंस , ज्ञातिबंधूंस नि धर्मबंधूस किती आनंद नि अभिमान वाटेल बरे! हिंदु संघटन म्हणजे काही परावलंबी हिंदूंचेच संघटन नव्हे. गुलामगिरीत पडण्याचे महत्कार्य त्यांजकडून झाले नाही , म्हणून आपले नेपाळी गुरखे, हिंदुत्वालाच मुकले, असे तर कोणी समजत नाहीना ? मग प्रत्येक स्थानिक वा प्रांतिक हिंदुसभेत नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिशांनी मान्य केले म्हणून आनंद नि अभिमान प्रदर्शक ठराव का आणण्यात येत नाही!

* * *

हिंदुमहासभेच्या चालकांत कोणी असे समजो वा न समजो ; राष्ट्रीय सभेत तरी निदान अजून अशी समज असावी असे दिसते. कारण हिंदुस्थान देशाचे म्हणून जे भाषावार प्रांत पाडण्यात आले त्यात नेपाळचा उल्लेख मुळीच नाही. राष्ट्रीय सभा ही आपणास हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा म्हणविते. ब्रिटिश हिंदुस्थानच नव्हे , तर मग हिंदुस्थानातील सर्व राष्ट्रभक्तांस तीत प्रवेश करण्याचा अधिकार आहे. गोमांतक , पांदिचरी इत्यादी परदेशाच्या अंमलाखाली असलेले प्रांत विभागसुद्धा आकर्षून एकजीव केले पाहिजेत. हिंदुस्थानचे भवितव्य ठरविण्याचा अधिकार हा ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांस जितका आहे तितकाच पोर्तुगीज किंवा फ्रेंच हिंदुस्थानासही आहे नि पारतंत्र्यांत पचत असलेल्या निर्जीव हिंदुस्थानाला जर हा अधिकार आहे तर त्या सजीव स्वातंत्रप्राय हिंदुस्थानास नेपाळच्या हिंदु राज्यास हिंदुस्थानची राष्ट्रीय भवितव्यता पाहाण्याचा अधिकार नाही असे म्हणावयाची कोणाची छाती आहे? अखिल भारतीयांचे अखंड अच्छेद्य असे भारतीय राष्ट्र होय. त्या राष्ट्राचा देशी संस्थाने हा घटक आहे. त्या राष्ट्राचा स्वतंत्र नेपाळ हा घटक आहेच आहे. मग जी राष्ट्रीयसभा त्या राष्ट्राचे भवितव्य आज घडवीत आहे नि देशी संस्थाने आपल्या कार्यक्षेत्राचा भाग समजत आहे , तिला हिंदुस्थानच्या कोणत्याही इतर भागास आपल्या कक्षेबाहेर समजण्याचा अधिकारच राहत नाही. हिमालयापासून समुद्रापर्यंत नि सिंधुपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत असणारा एकही अणुरेणु त्यांतून कोणी निराळा करू म्हणेल तर आम्ही जिवांत जीव असेपर्यंत तसे होऊ देणार नाही. या अखिल भारताचे ऐक्यच नव्हे तर एकात्मता प्रस्थापित करण्याच्या आमच्या ध्येयाची नि निश्चयाची सार्वजनिक घोषणा राष्ट्रीय सभेने--- तिला राष्ट्रीय म्हणविणे असेल तर--- केलीच पाहिजे. हिंदुस्थानचे जे भाषावार प्रांत तिने ठरविले आहेत त्यात देशी संस्थाने जशी तिने समाविष्टलेली आहेत तशीच तिने कोणत्याही ढोंगी कारणास वा राजकीय घोटाळ्यास न भिता गोमांतक , फ्रेंच हिंदुस्थान नि नेपाळ यांचा समावेश केलाच पाहिजे. त्यास त्यांचे प्रतिनिधी राष्ट्रीय सभेस धाडण्याचा अधिकार दिलाच पाहिजे. यंदाच्या राष्ट्रीय सभेत कोणीतरी हा प्रश्न काढील काय? या प्रश्नाचे तिकडच्या आपल्या हजारो देशबंधूंस आपल्या राष्ट्रैक्याची जाणीव होईल नि त्यातूनही महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या गुरख्यासारख्या लाखो शूर वीर देशबंधूंस

विसरल्याचे पाप परिमार्जित केले जाईल यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या मंडपात नेपाळची--- गोमांतकाची--- फ्रेंच हिंदुस्थानची एक एक कक्षा इतर प्रांतातील विभागाप्रमाणे राखण्यात येईल काय? येईल अशी प्रस्तुत लेखकाला आशा आहे.

**लेखांक ३ रा**

# येती हिंदुसभा आणि नेपाळचा ठराव

**(सन १९२४ - २५)**

बेळगांवास भरणार्यान हिंदुमहासभेच्या अधिवेशनास जे काही ठराव अवश्य संमत व्हावेत म्हणून आजपर्यंत सार्वजनिक सूचना आलेल्या आहेत. त्या सर्वात नेपाळविषयक ठरावास आपण अग्रस्थान दिले पाहिजे असे पुष्कळ पुढार्यांचे आणि हिंदुसभांचे मत आधीच प्रसिद्ध झालेले आहे. तथापि एक दोन ठिकाणी या ठरावाविषयी ज्या काही शंका प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत, त्याचे समाधान सार्वजनिकपणे करणे भाग आहे.

"नेपाळच्या हिंदु महाराजांचे स्वातंत्र्य ब्रिटिश सरकारने मान्य केले. त्याविषयी अखिल हिंदूंना जो अभिमान नि आनंद वाटत आहे नि जीर्णशीर्ण का होईना परंतु हिंदुत्वाचा जो एकमात्र स्वतंत्र ध्वज नेपाळवर फडकत आहे. तो पाहून प्रत्येक हिंदूच्या मनात ज्या आशा नि भविष्यकालीन जातीय आकांक्षा जागृत होतात त्या व्यक्त नि सूचित करण्यासाठी नेपाळच्या महाराजाधिराजांस अभिनंदनपर नि अभिष्टचिंतनपर पत्र लिहून ते एका प्रतिनिधीमंडळाचे हस्ते महाराजांचे सेवेस प्रत्यक्ष सादर करावे निदान डाकद्वारे प्रविष्ठ व्हावे ". हा ठराव जवळ जवळ याच शब्दांत रत्नागिरीच्या हिंदुसभेने नाशिकच्या हिंदुसभेने नि आणखी कित्येक हिंदुसभांनी पसार केलेला आहे. तो अधिवेशनात महासभेनेही संमत करावा असे डॉ. मुंजे , श्री. अणे, श्री. शंकराचार्य इत्यादी पुढार्यां चे मत अलिकडे प्रसिद्धच आहे. तथापि अजूनही कोणास शंका असल्यास खालील कारणांचा विचार केला असता, त्यांच्या त्या शंकाचे निसरन होईल ती कारणे अशीः-

१)या ठरावाने नेपाळकडे सर्व हिंदु जनतेचे लक्ष आकृष्ट होऊनही त्याविषयी ब्रिटिश सरकारास नेपाळविरुद्ध वैषम्य वाटण्याचा काही संभव नाही. निदान काहीही न्याय्य कारण नाही. (म्हणून इंग्रजास वैषम्य वाटेल ही भिती व्यर्थ आहे. ) कारण या ठरावातील नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिशांनी मान्य केले , म्हणून प्रदर्शित केलेले अभिनंदन दोघांच्याही कृत्यांचे आहे. इंग्रजांच्या राजाने नि नेपाळच्या राजाने एकमेकांस सहेतुकता परस्पर तारा केल्या त्या His Majesty the King of England to his Majesty the King of Nepal अशाच होत्या. हे फॉरवर्डमध्ये प्रसिद्ध झालेलेच आहे. तेव्हा हे अभिनंदन दोघांच्याही, ब्रिटिशांच्याही सौजन्याचे आहे.

२) या ठरावाचा राजकारणाशी काही एक संबंध नसून , नेपाळचे स्वातंत्र्यामुळे हिंदुसमाजास सामाजिक, धार्मिक नि जातीय गौरव साहजिकच प्राप्त होऊन हिंदुसंघटनेस जो एक

सबळ, आर्थिक नि नैतिक प्रत्यक्ष आधार मिळणार आहे , त्यामुळे नेपाळच्या हिंदुमहाराजांचे अभिनंदन सर्व हिंदुसमाजास धार्मिक नि जातीय दृष्टीने अवश्य वाटणे अगदी स्वाभाविक आहे नि हा ठराव इतकेच सूचित करीत आहे. म्हणून काहीही राजकीय घोटाळा न्याय्यतः उत्पन्न होणे अगदी अशक्य आहे.

३) या वेळेस जरी मौन स्वीकारले तरी केव्हांतरी हिंदु संघटनांच्या चळवळीस नेपाळचा पाठिंबा आपणास मिळविलाच पाहिजे. जेव्हा जेव्हा कोणत्याही रीतीने आपण नेपाळविषयी सार्वत्रिक जागृती करू लागू तेव्हा नेपाळास 'राजकारणी घोटाळ्यात पाडाल हो! ' म्हणून ओरडणारी काल्पनिक भीती दत्त म्हणून पुढे उभी राहणारच. म्हणून नेपाळच्या जागृतीची चळवळ नित्याचीच सोडून द्यायची की काय?

४) आणखी अशा भलत्याच काल्पनिक नि निष्कारण भीतीने कोणास घाबरवून सोडता येईल इतके काही आपले नेपाळचे राज्य शेणामेणाचे केलेले नाही.

५) आणि अशा अन्यायाच्या रीतीने कोणी धमकी घातल्यास आपल्या नेपाळी बांधवांत अनायासानेच अकल्पित जागृती उत्पन्न होऊन स्वसंरक्षणास ते अधिकच सज्ज नि समर्थ होतील. अशा रीतीने ही भीती इष्टापत्तीच ठरेल.

६) त्यातूनही अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे ही की हा ठराव आपण करीत आहोत त्यात नेपाळच्या महाराजांचे काही एक अंग नाही. तेव्हा त्याचे उत्तरदायित्व (Responsibility) सर्वस्वी आपल्या शिरावर आहे. तदर्थ नेपाळच्या महाराजास कोणासही उत्तरदा यी (Responsible) धरता येणार नाही. राष्ट्रीय सभा ब्रिटिशांच्या हाताखालील संस्थानिकांना आपल्या कक्षेत समजून त्यांच्याविषयी वाटेल ती चर्चा करते म्हणून ब्रिटिशांनी त्या संस्थानांस केव्हाही उत्तरदायी ठरविले की काय ? मग नेपाळ तर स्वतंत्र राज्य आहे. आमच्या बर्या े वाईट बोलाविषयी त्यास उत्तरदायी कोण धरू शकणार?

७) सरतेशेवटी हे ध्यानात ठेविले पाहिजे की हा ठराव काही आता नवीनच प्रसिद्ध होणार आहे असे नाही. गेल्या वर्षात नेपाळविषयक चर्चा उभ्या हिंदुस्थानात सुदैवाने सुरू झालेली आहे. हिंदुसंघटनाचे केंद्र आधार निदान घटक तरी नेपाळच्या हिंदु राज्यास करावे अशी इच्छा नि यत्न सार्वजनिकपणे सुरू झालेले आहेत. हाच ठराव अक्षरशः नाशिकच्या हिंदुसभेने नि आणखी कित्येक हिंदुसभांनी प्रसिद्धपणे मान्य केलेला आहे. नि त्याची चर्चा नि अनुकूल चर्चा 'लोकमान्य', 'स्वधर्म', 'भारत मित्र', 'अग्रेसर' इत्यादी महाराष्ट्र, बंगाल,

पंजाब येथील पत्रांनी स्फुटांतून नि अग्रलेखांतून आधीच केलेली आहे. दुसरे असे की , नेपाळच्या महाराजांस हिंदुसभेचे अध्यक्षस्थानच द्यावयाची सूचना , मोठमोठ्या प्रांतीय हिंदुसभांनी परिषदांनी केलेली आहे. फॉर्वर्डला बॅरीस्टर सावरकर यांनी त्याच अर्थाची दिलेली तारही प्रसिद्ध झालेलीच आहे. तेव्हा हिंदुसंघटनाचे लक्ष नेपाळकडे प्रमुखपणे वेधलेले आहे नि असणारच हे आता सर्व जगास स्पष्टपणे आधीच कळलेले आहे आणि त्यापासून जे काही परिणाम व्हावयाचे ते ह्या काल्पनिक भीतीविषयी पाहता आधीच झालेले आहेत ; होणार आहेत. म्हणून हिंदुमहासभेने हा ठराव संमत केला असता, काही नवीन गोष्ट केली असे होणारे नसून , हा ठराव करण्यात केवळ आपले न्याय्य कर्तव्य तेच तिने केले , इतकेच काय ते सिद्ध होणार आहे.

ही सर्व कारणे पाहूनही जर कोणास या ठरावास निष्कारण विरोध करावासा वाटला तर त्या काही व्यक्तींसाठी हा ठराव गाळणे कधीही उचित होणार नाही. विरोधावरच आले तर कसून विरोधही करून हा ठराव संमत करून घेतला जावाच. फॉर्वर्डमध्ये डी. ए. धर्माचार्य या नेपाळी गृहस्थांनीच नेपाळच्या महाराजांनी हिंदुसंघटनांचे पुढारीपण स्वीकारण्यास काहीएक हरकत नाही , असे आपले मत प्रसिद्ध केले आहे. तेव्हा , स्वतः नेपाळी लोकांस जी भीती शिवत नाही , तिचा आम्ही नसताच बागुलबोवा करून , नेपाळविषयी जागृती करण्याचे महत्कार्य, करण्यास कचरावे हे सर्वथैव अयोग्य आहे.

www.savarkarsmarak.com

लेखांक ४ था

# नेपाळचे आंदोलनावरील विपक्षाची टीका

**(सन १९२५)**

अलाहाबादच्या लीडरमध्ये नेपाळ हे हिंदुस्थानचा भाग नाही , म्हणून एका इंग्रजी गृहस्थाने लावलेल्या अपूर्व शोधाचा मनोरंजक वृत्तांत प्रसिद्ध होत आहे. या गृहस्थाच्या दृष्टीपथात हा अपूर्व शोध आताच कसा झाला , हे जाणण्याची जिज्ञासा सर्वांसच होणे साहजिक आहे.

कोणचीही महत्वाची चळवळ यशस्वी होण्याचे आधी तिला तीन गंडातरांतून आपला मार्ग आक्रमावा लागतो. या सामान्य नियमाप्रमाणे पाहिले असता नेपाळच्या विषयी हिंदुस्थानमध्ये जी जागृती गेल्या वर्षात झाली, तीमुळे विपक्षाचा राग अनावर होऊन त्याने तिचा विरोध करण्यास पुढे यावे हे सुचिन्हच समजले पाहिजे. कारण या योगानेही नेपाळविषयक चळवळ उपेक्षा नि उपहास या दोन गंडांतरांतून सुरक्षित पार पडून वर उल्लेखिलेल्या गंडांतरापैकी शेवटच्याशी सामना करावा लागावा इतकी सबळ झालेली आहे असे सिद्ध होत आहे.

नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिश सरकारने मान्य केल्याला जवळ जवळ दोन वर्षे होऊन गेली. परंतु नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्यासंबंधी भारतवर्षातील हिंदु लोकांत इतकी अनास्था नि हिंदु संघटनांच्या कामी त्या आपल्या सरळ नि सुसंघटीत सत्तेचा किती महत्वाचा उपयोग होणार आहे याविषयीचे इतके अज्ञान होते की या प्रश्नाकडे कोणत्याही हिंदु संस्थेचे लक्ष गेले नाही. परंतु गेल्या वर्षापासून महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांनी जेव्हा हा विषय हाती घेतला 'स्वातंत्र्य' (नागपूर), 'लोकमान्य' 'स्वधर्म' इत्यादी पत्रांनी नेपाळविषयक जेव्हा लेख लिहिले नि रत्नागिरी, नाशिक, पुणे, नागपूर इत्यादी हिंदुसभांनी महासभेस नेपाळच्या स्वातंत्र्याविषयी अभिनंदनपर ठराव करण्याची शक्य तर तेथील महारा जासच महासभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे आमंत्रण देण्याची विनंती जेव्हा केली, तेव्हा या जागृतीची लाट पंजाब, बंगाल नि दिल्ली येथील हिंदू पत्रांपर्यंत जाऊन पोहोचली. मग नेपाळविषयक लेख सर्वत्र येऊ लागले. हिंदुसंघटनाचे कार्य नेपाळमध्येही आरंभून नेपाळांतील नि इकडील आजपर्यंत विलग झालेल्या हिंदु बांधवास पुन्हा एकदा एकाच ध्येयाने उत्स्फूर्त आणि एकाच शक्तीने समर्थ नि संघटित केले असता, अखिल हिंदुसमाजाचे उद्दिष्ट कार्य साधणे सुलभतर होईल ही गोष्ट हिंदुसमाजाच्या लक्षांत अंधुक रीतीने येऊ लागली. अंती बेळगावास हिंदुमहासभेच्या पंडित मालवीयसारख्या अधिकारी अध्यक्षाने स्वतःच्या अंधुक भावनेचा अंधुक उच्चार करून नेपाळच्या एक मात्र उरलेल्या आपल्या स्वतंत्र हिंदु

राज्याविषयी अखिल हिंदूंच्या मनात वाटत असलेला आदर नि उद्भवणार्या आशा प्रदर्शित करणारा ठराव महासभेपुढे मांडला आणि तो महासभेने एकमताने संमतही केला.

परंतु हिंदुसमाजात नेपाळविषयक ही जागृती होत असता तिचे महत्व त्यास जितके अंधुक रित्या भासू लागले त्यापेक्षा पुष्कळ स्पष्टपणे विपक्षास दिसू लागले होते. म्हणून या जागृतीच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्नास त्यांनी नुकताच आरंभही केलेला आहे. शीखास तुम्ही हिंदु नाही असे शिकविण्यात आले तसेच गुरख्यांसही तुम्ही हिंदुस्थानचे कोणी लागत नाही. भौगोलिक, ऐतिहासिक नि राजकीयदृष्ट्या नेपाळ हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे असे सिद्ध करण्यासाठी लेखांची एक मालाची माला एका इंग्रज गृहस्थाने लिहिण्याचे कार्य आजच का हाती घेतले किंवा ते त्याजकडून घेवविले गेले , हे वरील वृत्तांत वाचन वाचकांस सहज समजणारे आहे.

या गृहस्थाच्या वरील विचित्र विधानांचा पोकळपणा दाखविण्याचा यत्न करणे हे महाराष्ट्र ईश्वरकृपेने नि आपल्या पौरुषाने जर आज स्वतंत्र असते नि म्हणून ते हिंदुस्थानचा भाग नसून सिंधियांचा एक भाग आहे असे कोणी इतिहासज्ञ 'लीडरच्या' त्या ऊंटावर बसून जर सांगावयास आले असते तर त्या विधानाचा निषेध करण्याइतकेच अनावश्यक नि निरर्थक होणार आहे. केवळ या विधानाचा उल्लेख करण्याचे महत्वही त्यास इतक्यासाठी द्यावयाचे की , हिंदुसंघटनाचे चळवळीकडे विशेषतः तिला नेपाळच्या हिंदु राज्याच्या ध्वजाच्या छायेखाली येऊ शकणार्याट धार्मिक , सामाजिक नि जातीय महत्वाकडे संघटनाचे प्रतिस्पर्धी कसे डोळ्यात तेल घालून बघत बसलेले आहेत हे आपल्या ध्यानांत यावे.

आज नेपाळ हा हिंदुस्थानचा भाग नाही असे म्हणण्याची ज्याची प्राज्ञा झाली , त्याच्याच सारखा दुसरा एखादा बृहस्पती नेपाळी हे हिंदुही पण नाहीत असेही पण म्हणावयास धजावयाचा. तेव्हा हा दुसरा अपूर्व शोध लागण्याचे आधीच नेपाळांतील आमच्या हिंदुबंधूंनी तिकडे हिंदुसभा स्थापन करून नि काही प्रमुख नेपाळी प्रतिनिधीस त्या सभांच्याद्वारे महासभेस धाडून ह्या आक्षेपकांची तोंडे उघडण्याचे आधीच बंद करून टाकावी. त्याचप्रमाणे कानपूरच्या राष्ट्रीय सभेनेही हिंदुस्थानचा नेपाळ हा एक अविच्छेद्य नि अखंड भाग आहे असे अधिकारयुक्तवाणीने घोषित करावे.

लेखांक ५ वा

# नेपाळी आंदोलन

(सन १९२५)

**Our doubts are traitors.**
**And make us lose the good that we oft might win,**
**By fearing to attempt**

*-Shakespeare.*

**संशय घातकी आमुचे।**
**हितलाभ, हिरावुनीघेती। आमुचे।।**
**जिंकु, नित्य शकण्या; परि ते।**
**यत्न ते, कधी न पैं होती। भीतीने।।**

**(-अनुवाद - गजानन शर्मा)**

गेल्या वर्षभरातील नेपाळी आंदोलनाची समाधानकारक झालेली वाटचाल पाहून , विशेषच प्रसन्नता वाटते. व्यवस्थित नि समर्थपणे नेपाळी आंदोलन चालविल्यास तिचे नैतिक बळ हिंदुसंघटनेला तिच्या भवितव्या संबंधात , कितपत उपयोगी पडू शकेल , याविषयी दोन-एक वर्षापूर्वी सामान्यतः यच्चयावत् हिंदुस्थान नि हिंदु नेतेसुद्धा पूर्णपणे अनभिज्ञ होते. 'तुर्की खलिफाच्या विषयात त्याच्या प्रति हिंदूंचे कर्तव्य ऋण काय ? नि कॉन्स्टँटिनोपलमधील दुष्काळग्रस्त गरीब लोक ; याविषयी हिंदूंची वृत्तपत्रे स्तंभांमागून स्तंभ, लिहिण्याच्या उद्योगात किती गढून गेली होती! सिरीयामधील कुठलीशी एक मोडकळीस आलेली मशीद ढासळली ती काय ? आणि हिंदुजनांची मने पार हेलावून गेली ती काय? आणि मौलाना शौकत अल्लीबरोबर ती मशीद पुन्हा बांधण्यासाठी , हिंदुजनता निधी गोळा करण्यात व्यग्र होती! हिंदु पुढारी त्यांच्यातील सर्वसमर्थ जे महात्मा गांधी , ज्यांना मात्र नेतृत्व करण्याचेच नेहमी कळते पण कोठे (कुणाचे , कोणत्या विषयात आणि कसे) करावे हे मात्र कधीच कळत नाही , अशा गांधींच्या नेतृत्वाखाली त्यांच्या दुबळ्या हातांनी आणि प्रत्येक नसानसाला ताण देऊन खलिफाला तुर्कस्थानच्या सिंहासनावर आरूढ करण्यासाठी टेकू लावीत होते. मात्र त्याच खलिफापासून त्याचे स्वतःचे लोक (तुर्कस्थानी नागरिक) नित्यासाठी मुक्त होण्याची इच्छा बाळगून होते आणि मेसापोटेमिया , अरबस्थान, अजिप्त आणि सिरीया यांना आणि अर्थातच सगळ्या जगाला वाचविण्याच्या

उठाठेवीत त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले होते ; पण मात्र प्रगतीपथावरील एकमेव स्वतंत्र हिंदु राज्य असलेल्या नेपाळकडे लक्ष न देता! हिंदुस्थानची चिंता न करता!

जेव्हा अफगाणिस्तानच्या स्वातंत्र्याला ब्रिटिश राष्ट्राने औपचारिक मान्यता दिली तेव्हा हिंदु वृत्तपत्रांमध्ये हिंदु व्यासपीठांवर उत्साहाची लाट उसळली आणि सहस्रावधी हिंदु त्या प्रसंगाच्या वर्धापनस्मृतिदिनी समारंभाच्या सोहळ्यात सहभागी झाले. पण नेपाळच्या हिंदु राज्याच्या (सार्वभौम) स्वतंत्रतेला ब्रिटिश राष्ट्राने औपचारिक मान्यता दिल्यानंतर काही महिने उलटून गेले तरी , हिंदूंच्या वृत्तपत्रांनी नेपाळला पूर्णपणे उपेक्षितच ठेवलेले आहे. बहुसंख्य हिंदु वृत्तपत्रात त्यासंबंधिचे वृत्तही आलेले नाही ; अँग्लोअंडियन वृत्तपत्रांना मात्र मान्यतेचा अर्थ नीट उमगला नि त्यांनी काही सूचक अभिप्रायांसह त्याची नोंद घेतली आहे. ब्रिटन आणि नेपाळ ह्यांनी स्वाक्षर्या केलेल्या त्यांच्या अत्यंत महत्वपूर्ण संधी (तह) नि त्याच्या शर्ती ह्यासंबंधीच्या वृत्तापेक्षा आसामच्या कुठल्याशा खेड्यापाड्यात कुठलेसे खादी भांडार उघडले जाते नि त्याचे वृत्त अतिशय ठळकपणे महत्वपूर्ण म्हणून हिंदुस्थानातल्या मोठमोठ्या वृत्तपत्रांत मुंबई, चेन्नई (मद्रास) कलकत्ता ते थेट लाहोरच्या दैनिक वृत्तपत्रांत साप्ताहिकपत्रात प्रकाशित होते! गोष्टी अगदी अशाच घडल्यात आम्ही काही अतिशयोक्ती करीत नाही. नव्हे! नव्हे! आजसुद्धा हिंदुवृत्तपत्रांमधला एक समूह (एक गट ---वर्ग) आपल्या (हिंदुंच्या) हितसंबंधाविषयी अशाच आत्मघातकी आंधळेपणाने नि त्याहीपेक्षा वाईट निराशाजनक निरुपयोगी बनून , म्हणजे त्यालाच ते अगदी जितके तोर्यापने लगटून राहतात की जणु काही त्यांच्या टोपीत खोवलेले जणू ते एक पिसच (तुराच)! अमीर आणि सुलतान यांच्याविषयीची माहिती जाणून घेणे मुसलमानाला अभिमानाचे वाटते. त्याचा तोरा तो गिरवितो. मात्र हिंदूला विचारा--- "ज्या एकमेव स्वतंत्र हिंदु राज्यावर अजूनही निष्कलंक नि (न झुकता , न कलता) उन्नत असा ध्वज फडकतो आहे. त्याविषयी तुम्ही कधी काही ऐकलंय का ?" तो शुंभासारखा तुमच्याकडे पहात राहील! जर तुम्ही नेपाळचा उल्लेख केलात तर जास्तीत जास्त तो आपले खांदे आकसून घेईल आणि गुरगुरत (कुरकुरत) म्हणेल, ---'कोण? गुरखे! पक्के विश्वासघातकी आहेत ते!'

नेपाळच्या विषयात हिंदूंची त्यांनी दाखविलेली अपराधी अनास्था (उदासीनता) आणि प्रतिक्रिया म्हणून मग नेपाळबाहेरील हिंदूविषयी नेपाळनेही दाखविलेली तशीच अपराधी वृत्ती. याचा तीव्र नि कठोर निषेध केला तो 'मराठा' वृत्तपत्राने अगदी सर्वप्रथम नि त्यामुळे नेपाळमधील नि नेपाळबाहेरील हिंदूंमध्ये झालेल्या या सर्वसाधारण जागृतीची दूरगामी परिणती या अखिल हिंदु जगताचे सैन्य उभारण्यात आणि एक व्यापक , निश्तिच आणि सुयोग्य रूपरेषा आखून सामाईक ध्येय गाठता येणे शक्य आहे. हा त्या जागृतीचा अर्थ सिंधमधील हिंदूंना आणि कलकत्याच्या हिंदूंना ---हिंदु वृत्तपत्रांना बरोबर समजला. आर्य समाजाची वृत्तपत्रेही चेतून उठली. हिंदुमहासभेने तर आपले अध्यक्षपदच नेपाळच्या

महाराजाधिराजांना दिल्यात जमा होते आणि जरी महाराज ते काही सज्जड (सबळ/महत्वाच्या) कारणासाठी स्वीकारू शकले नाहीत आणि तो प्रश्न तेवढ्यावरच सोडावा लागला, तरी अंतिम टप्प्यापर्यंत त्याविषयी आग्रह चालूच होता. तरी पण मग महासभेने आपल्या बेळगावच्या अधिवेशनात सर्वानुमते प्रस्ताव सम्मत केला आणि त्यात इंग्लंडने नि त्याचप्रमाणे फ्रान्सनेही नेपाळच्या स्वतंत्र हिंदू राज्याला मान्यता दिली , म्हणून नेपळच्या त्या महाराजांचे अभिनंदन केले आहे. निखिल हिंदुस्थानात हिंदु देशभक्तांच्या अंतःकरणात नेपाळच्या शक्तीसामर्थ्याने आणि थोरवीने ज्या आशांचे नि उत्कट महत्वाकांक्षांचे उद्बोधन केले आहे त्यांचाही अर्थपूर्ण शब्दात उल्लेख केला आहे.

हिंदुमनाच्या ह्या सर्वसाधारण जागृतीने साहजिकच विरोध पुढे ओढवून घेतला. पवित्र इतिहासाच्या नावाने खोटेनाटे प्रश्न वाद , उकरून निःपक्षपातीपणाचा आव आणून खोट्या युक्तीवादाने दिशाभूल करण्याचे नि भेद पाडण्याचे प्रयत्नातील हेतु हा की 'नेपाळ हा हिंदुस्थानचा भाग नव्हता, कधीच नव्हता ह्यावर आणि नेपाळमधील हिंदु लोक आणि नेपाळबाहेरील हिंदु लोक त्यांच्यामध्ये सामाईक असा काहीच लागाबांधा नि गरजांच्या उणीवाही नव्हत्या, यावर हिंदूनी विश्वास ठेवावा. पण अशा प्रकारच्या कपटी , लबाड नि अप्रामाणिक प्रयत्नांनी गुरख्यांना त्यांच्या हिंदुबांधवांपासून वेगळे पाडण्याचा नि तोडण्याचा खटाटोप पाहून मात्र सर्वसाधारण लोकांचे ह्या प्रश्नाविषयीचे कुतूहल नि कळकळ तीव्रतेने वाढीस लागली आणि हिंदूंच्या आशेचे क्षितिज या नेपाळी आंदोलनाच्या अस्पष्ट दर्शनेंकरून, अधिकच विस्तृतपणे फाकू लागले.

त्या पाठोपाठच नेपाळचे महाराज आणि नेपाळचे प्रंतप्रधान यांच्या वर्धापन दिनांच्या निमित्ताने नेपाळी आंदोलनाला ते अस्तित्वात आल्यापासून आता तिसर्याि टप्प्यात नेऊन पोचविले का की , नेपाळच्या प्रश्नाविषयीच्या कामकाजासंबंधात हिदू लोकांना आता खूपच स्वारस्य वाटू लागले होते. त्यामुळे गुरख्यांना आता स्वतःचे बळ , महत्व नि आत्मसन्मान ह्यांचे भान येण्याइतकी त्यांच्यात जागृती झाली आहे आणि आपण आशा करू या की निखिल हिंदु जगताचे एक प्रमुख अग्रेसर हिंदु लोक समूह गट म्हणून जे काही ऋण ते लागतात; त्या कर्तव्याविषयीचे भानसुद्धा त्यांना आले असावे. या वर्षी गुरखे आणि नेवारी या नेपाळच्या नागरिकांनी त्यांचे सार्वभौम महाराज आणि त्यांचे महनीय पंतप्रधान ह्यांचे वर्धापन दिन , राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरे केले आणि त्या समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये (कामकाजामध्ये) अगदी प्रामुख्याने निरनिराळ्या प्रख्यात प्रतिष्ठित हिंदूनी भाग घेतला होता. नेपाळच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण यथोचित श्रद्धेने आणि समारंभपूर्वक करण्यात आले आणि भक्तीभावनेने सर्व हिंदूनी एकमेव हिंदू राज्याच्या त्या ध्वजाला मानवन्दना दिली. गुरख्यांनी राष्ट्रीय गीते गायिली. ज्यांतून त्यांना त्यांच्या मातृभूमीची सुसंघटित होऊन सेवा करण्यास आणि हिंदु धर्म आणि वंश

(जाती) यांचे कैवारी बनून (त्यांच्या संरक्षणार्थ) संघर्ष करण्यास आग्रहाने सांगितले आहे. एका थोर समाजाच्या (राष्ट्राच्या) जागृतीची ही नांदी आहे, मुख्य लक्षणे आहेत. उण्यापुर्‍यात एक वर्षांच्या कालावधीत नेपाळबाहेरच्या हिंदूंनी नेपाळमधील आपल्या देशबांधवांविषयी आणि नेपाळी हिंदू बांधवांविषयी जी थोडीशीच का होईना ; पण जी कळकळ व्यक्त केली (आस्था दाखविली) नि जे प्रेम दिले त्याने गुरख्यांना जाग आणली आणि त्यांना अगदी इतका छान गंभीर प्रतिसाद देण्यास भाग पाडले आहे. हा संघटनेच्या दृष्टीने शुभशकुनच होय.

रत्नागिरी, नाशिक, मुंबई, सिंध, पुणे आणि कलकत्ता या हिंदुसभांनी उदाहरणच घालून दिले. इतर अनेक ठिकाणच्या हिंदुसभांनी अगदी दिल्लीसह त्याचे सत्वर अनुकरण केले. नेपाळचे सार्वभौम राजे आणि त्यांचे महनीय पंतप्रधान यांना , त्यांच्या वर्धापनदिनांच्या दिवशी, प्रकट सभा आयोजित करून त्यांना प्रकटपणे मानवंदना देऊन प्रकट अभिनंदन पत्रे त्यांच्याकडे पाठविण्यात आली. हिंदूंना त्यांच्याविषयी किती जिव्हाळा किती आदर , किती अभिमान वाटतो याविषयी त्यांना कळविण्यात आले आणि हिंदुराज्याच्या संबंधात त्यांच्या हृदयात असलेले प्रेमादराचे स्थान आणि त्यांना भरंवसापूर्वक वाटणारी आशा ती हीच की , हे राज्य ईश्वरेच्छेने हिंदुसंघटन चळवळीचा प्रमुख आधारस्तंभ होईल आणि तिच्या तो डोलकाठीप्रमाणे उपयोगी पडू शकेल हेही त्यांना विश्वासपूर्वक कळविण्यात आले.

वर्षभरातील काम तसे काही निराशजनक नाही. ते आनंददायकसुद्धा आहे. कारण की आता नेपाळविषयीची हिंदूंना वाटणारी जाण नि जिज्ञासा तर वाढली आहेच पण त्याहीपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे नेपाळची स्वतःची जाणसुद्धा आता वाढलेली आहे. पण आपल्याला हेही विसरून चालणार नाही की अजून जे मिळवावयाचे आहे त्या मानाने जे काही आपण केले आहे ते प्रायः काही नसल्यातच जमा आहे. कारण सध्या तरी चालू असलेल्या सगळ्या चळवळी , हिंदु जगताच्या अंतःकरणात धास्ती उत्पन्न करणार्‍या च आहेत. त्या चळवळींपैकी , नेपाळी आंदोलनासारखी महत्वपूर्ण नि अत्युत्तम यशस्वी , फलदायी होऊ शकेल अशा प्रकारची भरीव अर्थपूर्ण चळवळ एकही नाही जिचे उद्दिष्ट नेपाळच्या हिंदूंना त्यांचे नेपाळच्या बाहेरील धर्मबांधव नि देशबांधव यांच्यासह एका रांगेत आणणे आणि त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण करून एका मोठ्या आदर्शाची प्रेरणा त्यांना देऊन एका सुसंघटित सबळ सशक्त (समर्थ), 'परिपूर्ण अशा एका हिंदुजगता'त परिवर्तित करणे हे आहे. होय! हेच काय ते हिंदुसंघटनाचे उद्दिष्ट होय!

**लेखांक ६ वा**

# नेपाळा जागा हो !

**(सन १९२६)**

**या भूमण्डळाचे ठायी। हिंदु ऐसा उरला नाही**
**हिंदुराष्ट्र राहिले काही। तुम्हा कारणे**

राजाधिराज नेपाळाधीश, राणा त्रिभुवन वीर विक्रमदेव यांचा २१ वा वर्धापन दिन दिनांक १९ जुलैला होता.

या मंगलप्रसंगी अहो राणाजी! हिंदुजगत अगदी मनःपूर्वक आपले शुभाभिनन्दन करून अभिष्ट चिंतिते आणि निष्ठापूर्वक आपल्याला मानाचा मुजरा (दोन्ही कर जोडोनी , त्रिकालचरणी मस्तक ठेवून, सविनय प्रणाम) करीत आहे. हे अभिनंदनपत्र सादर अग्रेषित.

साधारण तीनशे वर्षांपूर्वी एक महाराष्ट्रीय विरागी साधू , संत अटकेपासून कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथापर्यंतच्या भारत वर्षातील चारही धामांची यात्रा करण्यासाठी परिभ्रमण करीत गेले नि अखिल हिंदुस्थानचे परिभ्रमणांत, परिनिरीक्षण करून ते महाराष्ट्रात परतले ते रक्तबंबाळ अंतःकरण होऊन नि आक्रंदन करीत राहिले की सार्याे जगभरात सर्वत्र सर्वदूर कोठेही पतन पावलेल्या हिंदु जातीच्या हितकारणासाठी हिंदूंचा वाली (कैवारी) असा कुणीही नाही. अशी एकही जागा (एकही स्थळ नाही) नाही की जिथे हिंदूंचा राष्ट्रध्वज आपले मस्तक नव्याने उन्नत करू शकेल. जेव्हा रुधिरदिग्ध विदग्ध अंतःकरण हे असं उच्चारतांही न येण्यासारखे (अनुच्चारणीय) दुःख आणि अस्वस्थ चिंता वागवीत असतानांच त्यांच्या डोळ्यांनी सापेक्षतः एक उदयोन्मुख युवक आणि त्याची उदात्त टोळी हेरली. त्या वैराग्यशील साधूचा ऊर देशभक्तीच्या आनंदाने अगदी उचंबळून आला आणि त्या त्रिकालदर्शी ज्ञात्याने तो उदात्त वीर युवक नि त्याची शूर अनुयायी टोळी ह्यांच्याकडे निर्देश करीत उच्चरवाने घोषणा करीत म्हटले की सार्या जगात येथून तेथून कोठेही जो आपल्या जातीला मोठेपणा प्राप्त करून देईल नि वैभवाप्रत नेऊन पोचवील असा कोणी हिंदु जरी उरला नसला , तरीसुद्धा अरे महाराष्ट्रा! तुझ्याच ठायी , तो एक वीर पुरुष (युवक) नि त्याची धैर्यशील शूर टोळी ह्यांच्यात मला आशेच्या खुणा जाणवत आहेत. आपले राष्ट्र आणि आपला धर्म त्यांच्याकडूनच टिकला--- टिकविला जाईल.

**“ह्या भूमण्डळाचे ठायी। हिंदू ऐसा उरला नाही।**
**महाराष्ट्र धर्म राहिला काही। तुम्हा कारणें।।”**

असे म्हणून त्यांनी त्यांच्याहाती , दैवी कृपाप्रसादाचे, प्रतीक रूप म्हणून भगवा पटका (मुण्डासे) दिला (ले).

हे विरागी साधू होते संत रामदास. उदयोन्मुख युवक होते श्री शिवछत्रपती आणि त्यांची शूर अनुयायांची टोळी जिने आणि जिच्या वारसदार वंशजांनी तो पटका त्यांचा राष्ट्रध्वज म्हणून उभविला आणि त्याला अटकेपर्यंत मिरवीत नेला. तो ध्वज शक्ती नि वैभव ह्यांचे प्रतिनिधित्व करीत राहीला नि (त्या सवेच) बलिष्ठ हिंदवी साम्राज्याच्या विशिष्ट अशा महत्कार्याचेही!

हे तीनशे वर्षांपूर्वी झाले!

स्वतःच्या, त्याच्या, हिंदुजातीवर कोसळलेल्या ह्या दुसर्‍याह संकटाच्या वार्तेने व्यथित झालेल्या त्याच्या जाज्ज्वल्य देशभक्तीपूर्ण चैतन्यशीलतेच्या कारणाने तो या आपल्या पृथ्वीतळावर भेट देण्यासाठी आला तर पुन्हा एकदा हिंदु राजांच्या नि राज्यांच्या राजमुकुटांच्या नि सामंती मुकुटांच्या भग्नावशेषांवर , ढिगार्‍यांवर उभे राहून आणि रक्तबंबाळ अंतःकरणाने एकूण परिस्थितीचा आढावा घेत जाणून घेण्याचा प्रयत्न करील की जो कोणतासा लाभप्रद पवित्रा घेण्यामुळे (पुनश्च हरिःॐ म्हणून) नव्याने श्रीगणेशा (प्रारंभ) करता येईल आणि बदललेल्या (पालटलेल्या) परिस्थितीवरही मात करता येईल यासाठी सुयोग्य असे जे कोणते सतत परिवर्तनशील असे जे गतीशील साधन , उपलब्ध होईल, त्या साधनाने पण आपला आदर्शवादही समोर ठेवून हे नेपाळा! संत रामदास , अगदी बिनचूकपणे पूर्वी जसा महाराष्ट्राकडे केला होता तसाच , आग्रही आर्जवी अंगुलीनिर्देश तुझ्याकडेच करून , आणि त्रिकालदर्शी , तत्ववेत्यास साजेशा तारस्वरात आवेशाने गर्जून उठेल-

**ह्या भूमण्डळाचे ठायी। हिंदू ऐसा उरला नाही।**
**हिंदुराष्ट्र उरले काही। तुम्हां कारणे।।**

हिंदूंचे राजकिरीट आणि मुकुट यांच्या नष्टभ्रष्ट अवस्थेमध्ये हिंदूंच्या ज्वलंत आशा आकांक्षा नि महत्वाकांक्षा बीजरूपाने अजूनही तुझ्या ठायीच जिवंत असून तुझ्यारूपाने सिंहासनारूढ आहेत हे मी जाणून आहे! ईश्वराने तुला काही उगाच वाचविलेले नाही. हिंदूंच्या गतवैभवाची नि प्राचीन गौरवाची हिमालयाइतकी उतुंग ऊंची हिंदुजाती नि हिंदुराष्ट्र तुझ्यामुळे अजूनही गाठू शकतील!

कधी कधी दिसायला अगदी क्षुल्लक पण क्षुद्र वाटणार्‍यांमध्ये सुदृढ बलवती अर्थपूर्ण सांकेतिकता गुप्तपणे ठेवणे, प्रारब्धाला पुष्कळदा भावते आवडते! तर मग हे असे असू शकते काय ? आख्यायिका (दंतकथा) जे काही सांगते ते खरे असल्यास जरिपटका भगवा जो रामदासांनी शिवछत्रपतींना दिला होता तो काही अद्भुत चमत्कारपूर्ण स्थित्यंतर

होऊन नेपाळच्या दुर्गात, माघार घेऊन विसावला आणि काठमांडूच्या मंदिरात पेशव्यांच्या गादीसवेच सुरक्षित ठेवून पूजिला जात आहे!

ज्या हिंदुजाती आणि धर्माचे कर्मी कारणी जसे नेतृत्व करण्याची राजचिन्हे आणि राजपदके शिरोभूषणे नि आभूषणे ह्यांचे प्राधिकार जे एकदा मराठ्यांकडे होते ते आता , पालटलेल्या परिस्थितीत अर्थातच आवश्यकतेनुरूप साधनातही फेरफार होऊन अखिल हिंदु जगताच्या कारणी हे नेपाळा! कैवारी म्हणून तू स्वतःला गुंतवून घेण्यासाठी तुझ्या हाती सोपविले आहेत. असेही असू शकेल काय ? जर आख्यायिका (दंतकथा) खरी असेल तर मराठ्यांना हे पाहून आनंदच वाटतो; संतोषच वाटतो; की, त्यांची भूतकालातील ही स्मारक चिन्हे त्यांना (मराठ्यांना) जिंकणार्या शत्रूंच्या राजधानीतील कोणत्याशा एखाद्या (विविध वस्तुपदार्थ) संग्रहालयात उद्धट नि ग्राम्य विदेशीजनांनी टक लावून निरखिली जाऊन त्यांची जी उघड्यावर पडून मानखण्डना झाली असती ती पासून वाचवून ती अत्यंत सुरक्षित आणि सन्मान्य अशी आश्रयस्थानी नेपाळात सुरक्षित आहेत , की जिथे हिंदुंच्या स्वातंत्र्याचा मानदण्ड (Standard) अजूनही स्वतःच्या स्वाधीन धरलेला आहे.

आमच्या क्षीण दुबळ्या हातांनी हिंदुकारणाचा हा ध्वज तुझ्या हाती सोपविला आहे , तो हे नेपाळा , उंचच उंच धरून ठेव. जागा रहा आणि तुझ्या नवीन नि उत्कट प्रबल दायित्वांची जाण करून घे! संघटनाचे नेतृत्व कर! आम्ही तुझे अनुगामी, अनुचर, अनुयायी असू! आपल्या हिंदु जातीच्या संरक्षक देवता तुझ्या ठायी , प्रबळ आशाकांक्षांच्या आणि उत्कट भव्यदिव्य संकल्पनांच्या प्रेरणा करोत ; तुझ्या सेनादलांचे नित्य नूतन बल नि शक्ती संवर्धन करोत आणि हिंदु जगत् अखिलमनुष्य मात्राच्या राष्ट्रकुलात पुनः स्थापित होऊन आपल्या सुयोग्य स्थानी अगदी श्रीरामचंद्राच्या किंवा प्रियदर्शी अशोकांच्या काळी होते. तसे त्याचप्रमाणे पुनः एकदा विराजमान होईतो यश नि वैभव तुझ्याच मागे असोत.

www.savarkarsmarak.com

**लेखांक ७ वा**

# हिंदू परिषदेच्या मुंबई अधिवेशनात नेपाळ

**(सन १९२६)**

आवर्जून सांगण्यायोग्य असे परिषदेचे आगळे महत्वपूर्ण असे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे संघटन आंदोलनाच्या विषयात आपल्या नेपाळी हिंदूंच्या भावभावनांचे प्रतिनिधीत्व करण्याच्या ठाम निश्चयाने निर्धारित हेतूने , कलकत्त्याहून सुदूर मुंबईस मार्गस्थ होऊन नेपाळी नेते श्री . आगमगिरी यांनी लावलेली उपस्थिती आणि केलेले अंतकरण हेलावून सोडणारे हृदयस्पर्शी भाषण हे होय!

अत्यंत (सर्वाधिक) प्रबळ आणि ठळठळीत अशा एकमेव सुव्यवस्थित हिंदूंच्याच एका भागाची, म्हणजेच, नेपाळी हिंदूंची केवळ सहानुभूतीच नव्हे , तर त्यांचा वास्तविक सक्रीय सहभाग, जोपर्यंत (हिंदु) संघटन आंदोलनाला प्राप्त होत नाही , तोपर्यंत सकल हिंदूंचा प्रवक्ता म्हणून , सकल हिंदूंच्या प्रतिनिधीत्वाचा अधिकार ते सांगू शकत नाही. (त्याला सांगता यावयाचा नाही) ज्या क्षणी संघटनात्मक आंदोलनात नेपाळ पदन्यास करील आणि त्या आंदोलनाच्या नेतृत्वास मान्यता देईल , नेतृत्व करण्यास पुढे येईल त्या क्षणापासून हया जगतात संघटनांची शक्ती निश्चयानेच कोणाकडूनही सहजासहजी हेटाळली वा उपेक्षिली जाणार नाही. हिंदूंची एकमात्र सत्ता म्हणून नेपाळ स्वतःचे जे काही जसे नि जितके देणे लागते ते सर्व काही तसे नि तितकेच आपणा सर्वांचेही लागते. हिंदु म्हणून आपणावर ज्या ज्या कशाचाही जो जसा नि जितका परिणाम होतो. त्या त्या प्रत्येकाचा तो तो तसा नि तितकाच परिणाम आपल्या नेपाळी बांधवांवर आणि नेपाळमधील सहधर्मीयांवर व्हावयासच हवा! निखिल हिंदु जगताची ही जाणीव नेपाळमधल्या, साध्यातल्या साध्या, गरीब गरीबापर्यंत नेपाळी हिंदूंच्या मनावर हळूहळू ठसविलीच पाहिजे. हेच उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून उणीपुरी गेली २ वर्षे वृत्तपत्रांमधून नि व्यासपीठावरून हया नेपाळी प्रश्नाचे महत्व समजण्याची जाण लोकांना व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न करण्यात आलेले आहेत. गतवर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद राजाधिराज नेपाळ नरेश किंवा त्यांचे सकळगुणमंडित पंतप्रधान यांना देऊ करण्यासंबंधात अध्यक्षपदावरून बुद्धिपुरस्पर पुढे आणलेल्या प्रस्तावाला बेळगावच्या हिंदुमहासभेच्या विशेष अधिवेशनात एकमताने स्वीकृति देऊन नेपाळ नरेशांचे त्यांच्या प्रागतिक धोरणाविषयी अभिनंदन करण्यात आले. आणि हिंदूंच्या मनीमानसी त्यांनी जपलेला, नेपाळमधील आपल्या बांधवांविषयीचा नितांत वत्सल स्नेह, जिव्हाळा आणि विश्वसनीय राजनिष्ठ अभिमान हया भावभावनांविषयीही त्यांना

आश्वस्त करण्यात आले. असा हा जो हितसंबंध आमच्याकडील हिंदूंनी नेपाळमध्ये सुस्पष्टपणे सूचित करून दाखविण्यास प्रारंभ करताच त्यानेच स्वाभाविकतःच ज्या काही लोकांची सर्व शक्ती हिंदुंना जाति-संप्रदाय-प्रांत पंथ आणि वर्ग , ह्यातच विभागून भिन्न ठेवण्याच्या विशिष्ट महत्कार्यातच उपयोगात आणली जाते, अशा त्या काही लोकांचे पित्त खवळले! झाले! जनमानसावर ठसविण्यासाठी विलक्षण तर्हेअवाईक खोडसाळ अपायकारक अशी औपपत्तिक कंडी पिकविण्यात आली ; की तिबेटप्रमाणेच नेपाळही हिंदुस्थानचा भाग मुळी नव्हे; नव्हताच! इतकेच नाही तर नेपाळच्या बाहेरील आम्हा हिंदूंशी वांशिक किंवा जातिविषयक संबंधाने वा संघटनेने नेपाळचा कसलाच संबंध वा लागाबांधा मुळी नव्हताच! हा खोडसाळपणा, स्पष्ट, सहज समजणारा असूनही दुर्दैववशात काही नेपाळी हिंदूसुद्धा या अघळपघळ विचार सरणीला बळी पडले आणि म्हणू लागले. "आम्ही हिंदी नाही; आम्ही नेपाळी आहोत! संघटनाला आमच्याशी काही कर्तव्य नाही.

नेपाळी हिंदूना संघटनापासून फोडण्याचा (त्यांची फारकत करण्याचा) हा अश्लाघ्य नीच प्रयत्न हाणून पाडण्यासाठी आणि त्या तसल्या प्रयत्नाला बळी पडलेल्या साध्या भोळ्या सरळ मनाच्या नेपाळी हिंदूंचे डोळे उघडण्यासाठी , कोणा प्रमुख नेपाळी हिंदु धुरीणांनी पुढे येण्याची उघडपणे हिंदुसभांच्या अधिवेशनामध्ये भाग घेण्याची आणि हिंदुसंघटनाच्या कारणासाठी त्या कामी निःसंदिग्ध शब्दात प्रतिसाद देण्याची आवश्यकता होती. हे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून 'मुंबई हिंदु परिषदे 'च्या नेत्यांनी त्यांना रत्नागिरी हिंदुसभेने संमतिलेला ठराव सादर केला होता. त्यानुसार कार्यवाही करूनही एक विशेष निमंत्रण आपल्या कलकत्त्याच्या हिंदु बांधवांना पाठवून विनंती केली ; की त्यांनी अशा एका मान्यवर प्रमुख सद्गृहस्थांना कृपया धाडून द्यावे की जे सभेस मंडित करतील आणि संघटन आंदोलनाविषयीची माहिती समक्षच सांगून त्या संबंधीच्या आपल्या नेपाळी बांधवांच्या मानसिकतेची भावभावनांची ओळखही करून देतील , जेणेकरून आम्हासही त्यासंबंधात थोडीफार जाण येईल. त्यांच्या सुदैवाने असे व्यक्तिमत्व , मिळविण्याचे भाग्य त्यांना लाभलेही! निखिल हिंदु जगताच्या आंदोलनात नेपाळी बांधवांनी भाग घ्यावा एतदर्थ, कोलकाट्याच्या 'कृष्णसंदेश' या आपल्या प्रमुख साप्ताहिकांतून आवाहन करणारे लेख वारंवार ज्यांनी लिहिले आणि कोलकाट्याच्या 'गोरखा संघटन संस्थेला ' ज्यांनी गतीमान केले ते धैर्यशील संघटक व्यवस्थापकांपैकी एक मान्यवर श्री. आगमगिरी यांच्या रूपाने! त्यांचे भाषण हे संघटन आंदोलनापासून नेपाळची फारकत व्हावी असे इच्छिणार्यार शाळभूतांना दिलेले खणखणीत नि ठणठणीत परिणामकारक प्रत्युत्तर होते. (आंदोलनाच्या विषयात तसेच ते कार्यसाधकही होते!) प्रारंभीच्या मंगलाचरणाचे वाक्यच सद्गृहस्थांनी जे आग्रहपूर्वक आवेशाने उच्चारले ते म्हणजे नेपाळी आणि गुरखे हे भारतवर्षाला आपली पितृभूमी आणि पुण्यभूमी असेच मानतात. भारतवर्षाकडे ते याच दृष्टीने पाहतात. नेपाळ

हा भारतवर्षाचा हिंदुस्थानचा अविभाज्य भाग असून तो नेहमीसाठी तसाच राहणारही आहे. ते पुढे म्हणाले की नेपाळ बाहेरील हिंदूंच्या प्रारब्धात हिंदु म्हणून जे काही भोग त्याना भोगावे लागतील ते तसेच नेपाळी हिंदूंनाही भोगावे लागणारच! त्यांचा जो आणि जसा परिणाम हिंदू'वर होणार तो नि तसा नेपाळी हिंदूंवरही होणारच ! कारण , अखिल हिंदु जगताशी आणि सकळ हिंदू समाजाशी संबंधित असे सामाजिक सांस्कृतिक धार्मिक नि सांप्रदायिक असे हे सर्वांगीण जीवन आणि तदंगभूत तत्संबंधित प्रश्न (त्यांचा नेपाळशी असलेला संबंध लक्षात घेता) नेपाळला भारतवर्षापासून दूर अलग राहण्याचा विचार सुद्धा करणे केवळ अशक्य आहे! अविचारी हल्ले आणि मानखण्डना भोगावयास लागलेल्या दुःखी कष्टी व्यथित हिंदुजनांविषयी एक नेपाळी म्हणून अपार सहानुभूती वाटत असल्याचे सांगून हेलावलेल्या सभेला आश्वस्त करीत त्यांनी असे घोषित केले की हिंदूंच्या संस्कृतीवर हिंदू धर्मावर , हिंदु मंदिरावर, हिंदूंच्या मानसन्मानावर कधीही कोणाही हल्ले जर केले तर परिणामशून्य निष्क्रियतेने नेपाळ केवळ राहणार नाही , तर त्या हल्ल्यांच्या प्रतिकारार्थ, संरक्षणार्थ अखिल हिंदुस्थानातील हिंदूंच्या सवेच त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे ठाकेल. ते (भाषणासाठी उठून उभे राहिले तेव्हा लोकांनी त्यांना जसे स्वागतीले आणि भाषणानंतर ज्या प्रकारे पसंतीची पावती दिली त्यावरून (ज्यांना 'ता' वरून ताकभात ओळखण्याइतकी) आकलन शक्ती आहे , त्यांना हे समजून चुकले असलेच पाहिजे. प्रामाणिकपणेच हे मान्यही केलेच पाहिजे की नेपाळ यथाशीघ्र आणि धीटपणे हिंदुसंघटन कारणाचा स्वीकार करील आणि रांगेत येऊन आपली जागा घेईल! नागरी सांप्रदायिक सांस्कृतिक धार्मिक आणि वांशिक हितसंबंधाच्या विषयात पंजाबी असोत की पहाडी असोत! मराठे असोत किंवा मद्रासी असोत! नायर असोत की नेपाळी असोत! आपण सगळे , एकच, सगळे हिंदूच आहोत. आपण सर्वांनी एकच असावे अशीच आपणासर्वांची समान भूमिका असावी , ती यथार्थ व्हावी , असे आपणास वाटते अशा प्रकारची जाण सगळ्यांना थोड्याच अवधीत स्पष्टपणे उमजून होईल.

**लेखांक ८ वा**

# नेपाळच्या महाराजांचे उत्तर

**"हिंदूंची उन्नती तीच माझी उन्नती आणि त्यांची अवनिती तीच माझी अवनती"**
**- नेपाळचे महाराज.**

रत्नागिरी हिंदु सभेने हातात घेतलेल्या कार्यापैकी नेपाळीय आंदोलन हेही एक असल्याने त्याविषयी या संस्थेच्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणे ती प्रथमपासून झटत आली आहे. गतवर्षी नारळी पौर्णिमेच्या दिवशी त्या संस्थेने अनेक थोर पुढार्यांनना राख्या धाडल्या. त्यात अग्रपूजेचे स्थान नेपाळच्या महाराजांचे होते. त्या सुंदर राखीचा स्वीकारही महाराजांनी प्रेमपूर्ण पत्र धाडून केला होता. गुरखासंघ स्थापन होताच त्याची प्रथम प्रसिद्धी महाराष्ट्रात या सभेनेच केली आणि तिच्या एका पुढार्याखने अलिकडेच १५ रुपये संघास धाडले आहेत.

त्यानंतर या सभेने मुंबईस भरणार्या प्रां. हिंदु परिषदेच्या वेळी एक ठराव करून धाडला होता की त्या समयी नेपाळच्या कुणातरी प्रमुख गृहस्थास आमंत्रण देऊन हिंदुसंघटनेविषयी नेपाळचे हिंदुबांधवास किती महत्व वाटते , हे सांगण्यास संधी द्यावी. त्या ठरावानुसार मुंबई हिंदुसभेच्या चालकांनी श्री. आगमगिरी या गुरख्यांच्या एका पुढार्यावस कलकत्त्याहून आमंत्रण देऊन सन्मान्य पाहुणे म्हणून सभेस बोलाविले होते. त्यांचे मुंबईच्या हिंदुपरिषदेत जे भाषण झाले आणि त्या भाषणसमयी त्यांचे त्या प्रचंड हिंदु सभासदांच्या समुदायाने जे स्वागत केले त्यावरून नेपाळमधील हिंदु संघटनास लोकमत कसे अनुकूल होत चालले आहे , हे दिसेल. श्री. आगमगिरी यांनी केलेल्या भाषणाचा दूरवर परिणाम होत आहे. त्यांच्या भाषणाचे गुरखाली या नेपाळच्या मुख्य भाषेत भाषांतर होऊन प्रसिद्ध झाले आहे. त्या भाषणाने आणि त्यांनी मुंबईच्या हिंदु सभेत घेतलेल्या भागाने नेपाळी लोकांत जागृती होण्यास पुष्कळच भर पडली असून दार्जिलिंग येथे गुरख्यांनी हिंदुसभेत समाविष्ट व्हावे म्हणून गुरख्यांचे लेख प्रसिद्ध होत आहेत. दार्जिलिंगकडे कित्येक नेपाळी हिंदू मुली परधर्मीय लोकांच्या घरी प्रथम सेविका म्हणून ठेविल्यानंतर बाटविल्या जातात; या गोष्टीकडे आता त्यांचे लक्ष वेधले असून हिंदु सभा स्थापन करून संघटीतपणे या भयंकर प्रकाराचा विरोध करावा असे घाटत आहे.

त्याचप्रमाणे फेब्रुवारी १९२६ मध्ये दिल्लीस भरणार्यार हिंदुमहासभेचे अध्यक्षस्थान नेपाळचे महाराज यांसच द्यावे अशी सूचना प्रथमतः या सभेने सर्व हिंदुमात्रास केली. ती दिल्लीच्या 'अर्जुन' पत्राने श्री. गणेशपंत सावरकर यांचे पत्रासह प्रसिद्ध केली. तिचा उपयोग होऊन ज्या प्रांतांनी इतरांची नावे सुचविली होती. त्यांनी ती मागे घेऊन महाराजांचे नाव सुचविले. आणि शेवटी अखिल भारतीय हिंदुसभेने महाराजांस अध्यक्षपद सादर केले. यद्यपि महाराजांस ते स्वीकारता आले नाही. तथापि त्यांचे जे उत्तर हिंदुमहासभेस आले त्यांत त्यांनी जे अध्यक्ष पदावरून सांगणे ते सांगून टाकलेच.

हिंदुस्थानांत हिंदू संघटनाची चळवळ निघाल्यावर ह्या जगातील एक मात्र स्वतंत्र असे जे नेपाळचे हिंदुराज्य त्यालाही या संघटनाच्या चळवळीचे धक्के बसून नवीन चैतन्य उत्पन्न होणे क्रमप्राप्तच होते! दोन वर्षापूर्वी नेपाळचे नाव फारच थोड्यांस माहीत होते. नेपाळच्या हिंदु राज्याच्या शक्तीचा जर योग्य विनियोग केला गेला तर त्या शक्तीच्या हिंदुसंघटनास होणार्याा कल्पनातीत उपयोगाची जाणीव उभ्या हिंदुस्थाना दहा-पाच जणांस होती वा नव्हती परंतु २ वर्षे नेपाळ विषयक लेखांनी चर्चेने आणि नेपाळातील गुरखा लीग संस्था हिंदुसंघटणाच्या वाङ्मयाचा प्रचार करीत असल्याने गुरखे लोकांनी आपण हिंदु आहोत. आणि अखिल हिंदुस्थानचे जे सुखदुःख तेच आपले सुखदुःख ही भावना तीव्रतेने उत्पन्न होऊ लागली. हैद्राबादच्या हिंदुसभेने नेपाळच्या महाराजांचे स्वातंत्र्य इंग्रज सरकारने देखील मान्य केल्याबद्दल जेव्हा अभिनंदनपर ठराव केला तेव्हा त्या ठरावाच्या उत्तरात आणि नुकत्याच दिल्लीस भरलेल्या हिंदु महासभेचे अध्यक्षस्थान नेपाळच्या मुख्य प्रधानास देण्याविषयी एकमताने जो ठराव झाला ; त्या ठरावाचे उत्तरात नेपाळचे प्रत्यक्ष महाराजांसही हिंदुत्वाच्या अभिमानाची भावना, व्यक्त केल्याविना राहवले नाही.

"अखिल हिंदुमात्र हा माझा धर्मबंधु असल्याने त्याची उन्नत्ती तीच माझी उन्नती आणि त्याची अवनती तीच माझी अवनती असे मी समजत असल्याने हिंदु जातीच्या उन्नत्यर्थ माझे हृदय हे सर्वदा चिंता वहात आहे आणि त्या कार्यी माझा हस्त यत्न तत्पर राहणार आहे" असे अभिवचन त्या उत्तरात नेपाळच्या महाराजांनी दिलेले आहे.

गेल्या कलकत्त्याच्या दंग्यांतही जेव्हा सर्व हिंदुलोकांवर संकट कोसळले तेव्हा त्याच्या प्रतिकारार्थ गुरखे लोक पूर्वीप्रमाणे उदासीन न राहता हिंदूंच्या खांद्यास खांदा भिडवून देवालयाचे संरक्षण करतांना आणि आततायी विधर्म्यांचा प्रामुख्याने सूड उगवितांना आढळून आले. मुंबईच्या प्रांतिक हिंदुसभेत नेपाळच्या ज्या प्रतिनिधीस हेतुपूर्वक आमंत्रित केले होते. त्या श्री. आगमगिरीचे थरारून सोडणारे भाषण ज्यांनी ज्यांनी म्हणून ऐकले नि वाचले असेल , त्याला गेल्या दोन वर्षाच्या चळवळीने आपल्या नेपाळी धर्मबंधूस हिंदुत्वाची हिंदुराष्ट्राच्या दृढ प्रेमाची आणि त्याच्या अन्नत्यर्थ आपणही

कसून प्रयत्न केला पाहिजे. या निश्चयाची केवढी जाणीव उत्पन्न झाली आहे. हे स्पष्ट दिसून आलेच असेल. झाले, हे जे व्हावयाचे कार्य आहे. त्याचे नुसते सूतोवाच आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक ९ वा**

# नेपाळची जागृती

**(सन १९२७)**

गेल्या तीन वर्षामध्ये नेपाळच्या आपल्या विस्मृत देशबांधवाविषयी आपल्या नेपाळेतर हिंदु प्रांतांत जशी प्रभावाची जाणीव बळावत चालली आहे. त्याचप्रमाणे आणि आंशिकतः त्या आपल्या जाणिवेच्या आणि नेपाळविषयक जागृतीच्यामुळेच आपल्या नेपाळी बंधूंतही अखिल हिंदु समाजाविषयी उत्कट सहानुभूती आणि ममत्व उत्पन्न होत चालले आहे. हिंदुसंघटनाच्या डिंडिमाचे प्रतिध्वनी नेपाळांतील थोर पुढार्यांच्या आणि विचारी लोकांच्या मनात आणि कृत्यांत अधिकाधिक स्पष्टपणे उठत आहेत. तीन वर्षांपूर्वी हिंदुस्थानात इतस्ततः पसरलेल्या आपल्या लक्षावधी गुरखा बंधूंस इतर हिंदुसमाजाचे सुखदुःखांशी आपले सुखदुःख आणि हिंदूंच्या भवितव्याशी आपणही हिंदूच असल्याने आपलेही भवितव्य अगदी अविच्छेद्यपणे निगडित झालेले आहे , ही भावना जवळ जवळ नव्हतीच असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे हिंदुमध्ये ते आपले नेपाळी बंधू उदासीनपणे रहात असत. आपल्यांतील अनेक उत्क्षोभक चळवळीतही ते आपणाशी समवेदना अनुभवीत नसत. आपल्या अखिल हिंदुजगताच्या आशा आणि आकांक्षा ते एखाद्या तटस्थ परकी समाजाप्रमाणे निर्मम वृत्तीने पहात इतकेच नव्हे, तर त्यांच्या त्यांच्यांतही राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले संघटनात्मक प्रयत्न करण्याची कोणी खटपट करीत नसे. परंतु गेली तीन वर्षे हिंदू समाजाचा नेपाळी हिंदूस त्यांचे स्वातंत्र्य त्यांनी अजून स्वपराक्रमाने अबाधित राखलेले असल्यामुळे अग्रपूजेचा मान मिळाला पाहिजे अशा प्रवृत्तीने प्रेरित झालेली नेपाळ विषयक चळवळ जी चालत आली तीमुळे आपणा नेपाळेतर हिंदूस नेपाळचे महत्व कळून येत चाललेले आहे. इतकेच नसून नेपाळी हिंदूसही त्यांचे स्वतःचे महत्व पूर्वी कधीही कळले नव्हते, तसे स्पष्टपणे कळून येत आहे. आपल्या सुखदुःखाशी तेही समरस होऊ पाहात आहेत. आपल्या आशा हळुहळू त्यांच्याशी हृदयात उगवू लागल्या आहेत. आपल्या अग्रपूजेचा मान स्वीकारीत असता त्या अग्रपूजेने ध्वनीत केलेले आपणा सर्व हिंदुंचे प्रमुखत्व पावणार्यानच्या शिरावर आपणा सर्व हिंदूंच्या त्या महान ध्येयासाठी झटण्याचे उत्तरदायित्वही प्रमुखपणे त्यास जाणवू लागत आहे. हे हिंदु आपण हिंदु. हा हिंदुस्थान आपल्या हिंदूंची पितृभूमी आणि पुण्यभूमी. ह्याच्या प्रीत्यर्थ प्राणपणाने झटणे हे ह्या आपल्या नेपाळी हिंदूप्रमाणेच आपलेही परम कर्तव्य आहे. किंबहुना नेपाळेतर हिंदु आणि नेपाळी हिंदु हे भेदही केवळ राजकीय परिस्थितीच्या तात्कालिक योगायोगाने पडले आहेत. ते स्वाभाविक नाहीत. जसा बंगाल , जसा महाराष्ट्र , तसाच नेपाळ. या असिंधुसिंधु

हिंदुभूमीचा एक प्रांत या हिंदुस्थान देशाचा एक प्रदेश, या हिंदुराष्ट्राचा केवळ एक नागरिक मात्र आहे. अशी राष्ट्रैक्याची भावना अशी हिंदुत्वाची उत्कट समवेदना नेपाळातील अनेक विचारी पुरुषांच्या हृदयांत संचरू लागली आहे आणि हिंदुसंघटनाच्या महनीय ध्वजाखाली ते आपणा सर्व हिंदूबरोबरच सुखदुःखाचे समान वाटेकरी होऊन हिंदु जगताच्या महान आकांक्षा सफळ करण्यासाठी प्रकटपणे सम्मीलित होऊ पहात आहेत.

या नवीन आशेचा उदय आणि या नवीन कार्याची जाणीव उत्पन्न होताच आजवर दृष्टीस न पडलेली जागृती नेपाळी समाजात दिसून येऊ लागली. महान ध्येयाचे दर्शनासरशीच राष्ट्रीय माणसात महान शक्ती संचरू लागतात. नेपाळात राष्ट्रीय जागृतीची ही प्रादुर्भूत होणारी चिन्हे कोणती आहेत , त्यांच्यांत काय उलाढाली चालल्या आहेत आणि हिंदुसंघटनेच्या दृष्टीने त्यांचा काय उपयोग आहे हे आपणा सर्वांस विदित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपल्या चळवळीचे प्रतिध्वनी त्यांच्यात उत्पन्न करण्याचीही तितकीच आवश्यकता आहे. या दोन्ही उणीवा भरून काढावयाच्या असतील तर परस्परांच्या विचारांशी संलग्न असणारी आणि आचारांस संलग्न करणारी वृत्तपत्रे त्यांच्यांत आणि आपल्यात निघाली पाहिजेत. एवढ्यासाठी गेल्या ३ वर्षांच्या प्रयत्नांचा परिणाम होत होत गुरखा जातीतच नव्हे तर उभ्या नेपाळी जनतेत अशा प्रकारच्या वृत्तपत्रांची रुचि उत्पन्न झाली आहे हे ऐकून कोणाही हिंदूस आनंदच वाटेल. स्वतःचे महत्व त्यास कळू लागल्यावर त्यांच्यातील प्रमुख मंडळींनी ब्रिटिश हिंदुस्थानात विस्कटलेल्या जवळ जवळ दहा लक्ष नेपाळी हिंदूस संघटित करण्याचे प्रयत्न करण्याचे ठरवून कलकत्ता आणि डेहराडून येथे संघ स्थापन केले असून डेहराडूनच्या संघाने वर चांगलीच चळवळ चालविली आहे. त्यांच्या द्वारा दोन उत्तम प्रकारे चालविलेली पत्रे प्रसिद्ध होऊ लागली असून त्यापैकी इंग्रजी पत्राचे नाव "Himalyan Times" असे असून नेपाळी भाषेत प्रसिद्ध होणार्याअ पत्रांचे नाव "गुरखा समाचार" हे आहे. नेपाळी भाषेत प्रसिद्ध होणार्या पत्राची लिपी नागरीच असल्याने आणि ती भाषा आपल्या संस्कृतोत्पन्न हिंदुभाषासंघांतीलच असल्याने हिंदीप्रमाणेच सर्वांत थोड्या परिचयानेच कळण्यासारखी असते. या दोन वर्तमानपत्राचे प्रसिद्ध झालेले चारपाच अंक आमच्याकडे नियमितपणे त्यांचे संपादक श्री. ठाकूर चंदनसिंह ह्या विद्वान आणि देशभक्त गृहस्थांनी धाडलेले आहेत. त्यांचे या आठवणीविषयी आम्ही येथे प्रकट आभार मानीत आहो. या पत्राच्या योगाने त्यांचे विचार आमच्या लोकांस कळविण्याचे चांगले साधन झाले असल्यामुळे त्यांतील महत्वाचे लेख आणि वृत्तांत वेळोवेळी आम्ही या वृत्तपत्रांतून वाचकास सादर करणार आहोत.

या खाली भाषांतरीत केलेल्या लेखांवरून हिंदुसंघटनांची लाट नेपाळात पसरविण्याच्या तीन वर्षांच्या प्रयत्नास कसे यश येऊ लागले आहे आणि नेपाळी जनतेत

आपल्या आशांचे आणि प्रयत्नांचे पडसाद कसे स्पष्टपणे उमटू लागले आहेत हे गेल्या तीन वर्षातील नेपाळविषयक चळवळीचे ज्यांस ज्ञान आहे. त्यांच्या तत्काळ लक्षात येईल. वर उल्लेखलेले नेपाळी लेखक ठाकूर चन्दनसिंह आपल्या हिमालयन टाईम्स या इंग्लिश पत्रात लिहितात.

"हिंदुस्थानी साम्राज्याच्या उत्तर पूर्व आणि वायव्य या तीन दिशांस तीन भिन्न देश, तीन भिन्न संस्कृतीचे आणि धर्माचे प्रतिनिधीस्वरूप होऊन निवसतं आहेत. अफगाणिस्थान, सयाम आणि नेपाळ ही ती तीन स्वतंत्र राज्ये होत. हिंदुस्थानांतील हिंदुजगताच्या हितसंबंधाच्या आणि ममत्वाच्या दृष्टीने या तिन्हीत नेपाळचे राज्य हेच अत्यंत महत्वाचे गणले गेले पाहिजे. तरीही यद्यपी आग्रा , अयोध्या, बिहार आणि बंगाल यांना हे राज्य अगदी लगडून आहे , तरी नेपाळची माहिती आणि परिचय नेपाळेतर हिंदूंस अगदीच नाही म्हटले तरी चालेल . परंतु सुदवाची गोष्ट ही की , अलीकडे मात्र नेपाळेतर हिंदूंच्या हृदयांत नेपाळी बंधूंच्या आणि नेपाळच्या महाराजांच्याविषयी उत्कट प्रीती उत्पन्न होऊ लागली असून नेपाळविषयी आपले ममत्व ते वारंवार प्रदर्शित करू लागले आहेत. नेपाळच्या महाराजांचा वाढदिवस हिंदुस्थानात अनेक ठिकाणी उत्साहाने पाळण्यात येऊ लागला आहे. ब्रिटिश हिंदुस्थानात नेपाळी राजघराण्यांतील किंवा सत्ताधिकार्यांेतील कुणीही उच्चपदस्य गृहस्थ येताच त्याचे तत्रत्थ हिंदु जनता मोठ्या प्रेमाने स्वागत करू लागली आहे. नेपाळीय हिंदु जनतेविषयी नेपाळेतर हिंदूंची हृदये दिवसेंदिवस अधिकाधिक आकर्षण आणि भक्ती अनुभवू लागली आहेत. आम्हांस ही प्रवृत्ती अगदी स्वाभाविक आहे , असे वाटते. कारण या जगतात सर्व राष्ट्रांत ह्या आपल्या हिंदुराष्ट्राची परिस्थिती फारच शोचनीय आहे.

जगाच्या राजकारणात आज ख्रिश्चन राष्ट्रे सर्वतोपरी प्रबळ आणि अग्रगण्य झालेली आहेत. मुसलमानांची सत्ता जरी आज फारच खालावली असली तथापि इराण , अफगाणिस्थान आणि तुर्की यांच्या बळावर पुन्हा केव्हा तरी आपण डोके वर काढून ह्या सर्व आशियांतील देशांत मुसलमानी सत्ता स्थापू , अशी प्रकट आणि उत्कट महत्वाकांक्षा त्यास अजून घेरून राहिली आहे. जपान , चीन, सयाम ही बौद्ध राष्ट्रेही प्रगतिपर आणि प्रबळ होत आहेत.

परंतु हिंदु राष्ट्रांची स्थिती किती शोचनीय आहे! एका काळी या हिंदुस्थांनात हिंदु राष्ट्रच काय ते निवसत होते. परंतु अवनतीच्या फेर्यांीसरशी ती स्थिती पालटून आज एक तृतियांश लोकसंख्या मुसलमानी पंजांत गवसलेली आहे. अशा स्थितीत प्रत्येक राष्ट्र आपआपल्या भवितव्यतेसाठी झटत असता या चढाओढीत आपले काय होणार ह्या चिंतेने हिंदु जनतेस विचलित करावे हे साहजिकच आहे. त्यांना असे वाटणे साहजिक आहे , की आपले राज्य धुळीस मिळालेले असतांना आपल्यामध्ये ज्या धर्मास इतर धर्मातून ज्याच्या

ज्याच्यावर हात मारता येईल त्यास आपल्या गोटात ओढून आणणे हे धार्मिक कर्तव्य म्हणून वाटते, असा आक्रमशील धर्माचे लोक घुसून घर करून राहिलेले असतांना आणि जगतामध्ये नैतिक किंवा राजकीय साहाय्य किंवा सहानुभूती देणारी कोणतीही अन्य जाती अस्तित्वात नसतांना जे एक लहान परंतु प्रबळ हिंदु राष्ट्र अद्यापही जिवंत उरलेले आहे. त्या नेपाळच्या हिंदु राज्याच्या आधाराची अपेक्षा करणे हा आमचा अधिकार आहे नेपाळच्या त्या स्वतंत्र हिंदु राज्याचे तो आधार आणि ती स्फूर्ती आपल्या या उभ्या हिंदु जगतास देणे हे कर्तव्य आहे. नेपाळी जनतेतही आपल्याच धर्माच्या आपल्याच संस्कृतीच्या आपल्याच इतिहासाच्या रक्ताच्या ह्या पुरातन हिंदु राष्ट्राविषयी अत्यंत प्रीती आणि ममत्व वसत आहे. याविषयी आम्हाला मुळीच शंका नाही. या आपल्या दोन्हीही देशांच्या कल्याणासाठी ही गोष्ट अत्यंत आवश्यक झालेली आहे की नेपाळ आणि हिंदुस्थान या उभय देशातील लोकांत निसर्गतःच वसत असलेली ही प्रीती आणि ममत्व ज्यायोगे एकसारखे वृद्धिंगत होत राहील अशा प्रकारचे प्रयत्न दोन्ही राष्ट्रांकडून सारखे केले गेले पाहिजेत. दळणवळणाची साधनेही सुधारली पाहिजेत. आणि ह्या आपल्या हिंदूंच्या दोन देशांमध्ये धनिष्ठ बंधुभाव उत्पन्न झाला पाहिजे. ”

वरील नेपाळी संपादकांच्या ह्या भाषांतरित लेखाच्या शेवटी आणि मध्यंतरीही नेपाळ आणि हिंदुस्थान हे दोन भिन्न देश आहेत , असा ध्वनी उत्पन्न करणारी काही वाक्ये आलेली आहेत. ती अगदी न कळत आलेली आहेत यात शंका नाही. परंतु शब्दांच्या अस्पष्ट आणि हानिकारक उपयोगाने विचारही हळुहळू अस्पष्ट आणि हानिकारक वाटू लागतात. हा नियम असल्याने असल्या अत्यंत महत्वाच्या विषयाविषयी बोलताना आम्ही सर्वांनीच प्रथमपासूनच तोलून तोलून शब्द व्यवहृत केले पाहिजेत , अशी आमची सर्व हिंदु लेखकास प्रेमाची विनंती आहे. नेपाळ आणि हिंदुस्थान हे दोन देश आहेत. हेच तर तत्व आपले विपक्षी आपल्या डोक्यात कोंबून कोंबून भरू पहात आहेत. या हिंदु राष्ट्राचे अखंडत्वास भंग करू पहाणार्या तत्त्वांचा तीव्र निषेध करून नेपाळ आणि हिंदुस्थान दोन देश नाहीत. नेपाळ आणि नेपाळेतर हिंदुस्थान हे एकजीवी एकप्राण एक अखंड राष्ट्र आहे. असे आपण सर्व सिद्ध करू पहात आहोत. एतदर्थ 'महाराष्ट्र आणि हिंदुस्थान' हे दोन देश किंवा बंगाल आणि हिंदुस्थान हे दोन देश , यॉर्कशायर आणि इंग्लंड हे दोन देश , प्रशिया आणि जर्मनी हे दोन देश , ही वाक्ये जशी वदतो व्याघाताच्या दोषाने लिप्त असल्यामुळे त्याज्य आहेत ; तसेच नेपाळ आणि हिंदुस्थान हे दोन देश आहेत , हे वाक्यही आपण सर्वांनी त्याज्यच मानले पाहिजे. नेपाळ हिंदुस्थानचा एक प्रांत आहे. हिंदुस्थान हा देश. महाराष्ट्र किंवा बंगाल किंवा नेपाळ हे त्यांचे प्रांत वा प्रदेश (provinces). आज नेपाळ सुदैवाने स्वतंत्र उरला आणि इतर नाहीत. पण जसा महाराष्ट्र स्वतंत्र उरला असता तरी तो तेवढ्यासाठी हिंदुस्थानाबाहेरचा एक स्वतंत्र, विभिन्न देश झाला नसता तसेच नेपाळ हाही

होऊ शकत नाही. भेद दाखविणेच तर नेपाळ आणि हिंदुस्थान ही दोन राज्ये आहेत. असे म्हणावे. पण राष्ट्र, देश असा हिंदुस्थानच! तो योगायोगाने आज झालेल्या चंचल राजकीय परिस्थितीमुळे खंडत्व पावू शकत नाही. हे तत्व आपणा सर्व हिंदूंनी अत्यंत काळजीने लक्षात वागवून त्याची स्पष्ट व्यक्तता होईल , अशी भाषा प्रथम पासूनच वापरावी ही आमची नम्र परंतु आग्रहाची विनंती. सर्व हिंदु लेखक लक्षात बाळगतील अशी आम्हास उत्कट आशा आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

लेखांक १० वा

# नेपाळ हिंदूत संघटनाची ज्योत

**(एप्रिल १९२७)**

आपला नेपाळ प्रांत , आपल्या हिंदुस्थान देशाच्या विस्ताराच्या मानाने आपणास जरी लहान वाटला तरी जगातील कित्येक स्वतंत्र देशांहून त्याचा विस्तार आणि लोकसंख्या अधिक आहे हे आपल्या ध्यानात आपण नेहमी वागविले पाहिजे. त्याचे एकंदर क्षेत्रफळ ६०,००० चौरस मैलांचे आहे. नेपाळी लेखकांचा असा आक्षेप आहे की इंग्लिश ग्रंथांतून आणि प्रतिवृत्तांतून नेपाळच्या विस्तारास आणि लोकसंख्येस शक्य तितके हीन आणि अल्प करून दाखविण्याचा प्रयत्न केलेला असतो ; हे साहजिकच आहे. कारण या अखिल हिंदुस्थानांत हिंदुजगताला आपली भवितव्यता पुनः उज्ज्वल करून घेण्यास ज्या काही राष्ट्रीय शक्ती उपयोगी पडण्यासारख्या आहेत त्यात या नेपाळच्या स्वतंत्र आणि संघटित पराक्रमी राष्ट्राची गणना, प्रामुख्याने होत आहे. म्हणूनच त्या राष्ट्राच्या शक्तीकडे आपले लक्ष वेधले जाऊ नये हे आपल्या विपक्षास अत्यंत इष्ट वाटणे साहजिकच आहे. इंग्रजांसारखा राजनितीपटु लोकांस , एवढ्यासाठीच नेपाळचे सामर्थ्य जितके न्यून करून दाखविता येईल तितके दाखविणे इष्ट आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. नेपाळची लोकसंख्या इंग्रजी गणनेने कितीही अल्प दाखविली तरी नेपाळी लेखकांच्या मताप्रमाणे एक कोटीची आहे यात काही शंका नाही. युरोपमधील बेल्जम, हॉलंड स्पेन, पोर्तुगाल किंवा स्वित्झलर्‌ंड या आणि इतर अनेक सर्व्हिया , बल्गेरिया इत्यादी राष्ट्रांच्या लोकसंख्येहून आणि बळाहून नेपाळचे आपले स्वतंत्र हिंदुराज्य कमी नाही. त्यातही पराक्रमाचे दृष्टीने तर ते ह्या राष्ट्रातील कित्येकांहून निःसंशय श्रेष्ठ आहे. ही गोष्ट , प्रत्यक्ष युरोपच्या रणांगणावर जर्मन लोकांसारख्या शूरवीर राष्ट्रांशी झालेल्या सन्मुख समरांत त्यांनी आजकालच सिद्ध करून दिलेली आहे. ह्या एक कोटीच्या हिंदु राष्ट्रांत दहा लक्ष सैनिक--- लढाई आणि शिबिरांत जन्म काढून पटाईत झालेले सैनिक--- नेपाळच्या हाकेसरशी रणांगणांत उतरू शकेल , इतकी त्याची समरशक्ती प्रबळ आहे. कारण नेपाळची प्रत्येक झोपडी ही एक एक शिबिरच असते. त्यातील वृद्ध पुरुष सैनिकभृती (पेन्शन) घेणारा कोणी कसलेला सैनिक असतो. त्यांतील तरूण नेपाळच्या किंवा इंग्रजांच्या नोकरीत कुठे तरी सेनेमध्ये नोकर असतो. त्यांतील किशोर लहानपणापासून आपल्या बापाच्या किंवा आजाच्या लढाईतील प्रत्यक्ष अनुभविलेल्या रणकथांस ऐकत कृपाणांशी , खुकरीशी आणि नव्यांतील नव्या बंदुकीशी खेळत असतो. नेपाळचे राष्ट्रचे राष्ट्र एक सैनिकांची छावणीच आहे. त्यातही आता त्यांनी आपल्या राज्यांतच बंदुकांचे तोफांचे आणि इतर शस्त्रांचे कारखाने काढले असून त्यात नेपाळी शिल्पयांत्रिक स्वतः तोफा ओततात. नेपाळी कारागीर

शस्त्रे घडवीत असतात. विमानांची कलाही त्यांस अभ्यस्त असून , विमान विभागांची उन्नतीही झपाट्याने व्हावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. नवीन संधीप्रमाणे नेपाळला शस्त्रास्त्रे पाहिजे त्या देशांतून आणण्याची मोकळीक आहे , असे इंग्लिशांनी मान्य केलेले आहे.

अशा त्या प्रबळ शक्तीचा विनियोग हिंदुस्थानच्या महान आकांक्षाचे पूर्तीस्तव कसा करावा ती कुर्मकुशलता जर आपणात असेल तर हिंदुस्थानच्या परमोच्च भाग्याचा तो दिवस आपणास एक शतकाने जवळ आणता येईल!

'एतदर्थच नेपाळी आंदोलना'चे सुतोवाच आलेले आहे. त्यांचे पहिले पाऊल म्हणजे शक्तीच्या अस्तित्वाची जाणीव हे होते. ज्या मारक संकटाचे पेचांत आपले हे हिंदु राष्ट्र आज अगदी कासावीस होऊन राहिलेले आहे त्यासच मारण्यासाठी हाताशीच एक साधन पडलेले आहे. याची जाणीव हिंदु राष्ट्रात उत्पन्न करणे हे पहिले काम होते. हिंदुसंघटनाच्या लाटा नेपाळात पोचवून आपल्या नेपळी बंधूंत आणि धर्मबंधूंत आपणाविषयीचे वसत असलेले नैसर्गिक महत्व चेतवावयास पाहिजे होते. आणि नेपाळेतर प्रांतातील हिंदूंस ह्या नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्याच्या शक्तीच्या विनियोगाचा मंत्र उपदेशिण्यास पाहिजे होता. हिंदु संघटनाच्या प्रत्येक पुरस्कर्त्यास ही गोष्ट नवीन उत्साह दिल्यावाचून राहाणार नाही की ते राष्ट्रीय महत्व , तो अखिल हिंदु अभिमान आणि तद्विषयक त्यांचे कर्तव्याची जाणीव नेपाळी जनतेत झपाट्याने उत्पन्न होत आहे. नेपाळचे महत्व आणि अखिल हिंदु दृष्टीने आपल्या राष्ट्रीय जीवनाचे धोरण ठरविण्याची उत्कट इच्छा नेपाळात स्फुरू लागली आहे. नेपाळी हृदयात हिंदुसंघटनाचा प्रबळ प्रतिध्वनी उठू लागला आहे.

काही दिवसांपूर्वी नेपाळी जनतेत अखिल हिंदु जागृती कशी होत आहे याविषयी काही माहिती दिली होती. त्यांच्यात नवीन वर्तमानपत्रे निघून काही ठिकाणी त्यांचे गुरखा संघही स्थापन झालेले आहेत, हे आम्ही त्या लेखात सांगितलेच होते. त्याचप्रमाणे नेपाळी लेखकाचे लेखांत हिंदुत्वाचा आणि हिंदुराष्ट्राचा गौरव वाढविणे , हे नेपाळचे अगदी विशिष्ट आणि अत्यंत पवित्र कर्तव्य आहे ही जाणीव कशी उत्पन्न होऊ लागली आहे हे दाखविण्यासाठी त्या लेखकांचे एकदोन उतारेही आम्ही दिलेले होते. हिंदुसंघटणाच्या विषयाकडे नेपाळी लोकांचे लक्ष कसे आकृष्ट होऊ लागले आहे हे गेल्या दोन महिन्यापूर्वी डेहराडूनला जो एक शुद्धिसमारंभ झाला त्या वेळेस त्यासंबंधी नेपाळसंघाचे पुढारी श्री. ठाकूर चंदनसिंग यांनी केलेल्या भाषणावरून व्यक्त होत आहे. ते म्हणाले , "मी या सभेत गुरखा संघाचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित झालो आहे. स्वामी श्रद्धानंद यांच्या बलिदानाने आपण सर्व हिंदूंनी एक होण्याच्या आणि विधर्मी लोकांस हिंदु धर्माची दीक्षा देण्याच्या आंदोलनास एक प्रकारचे धार्मिक पावित्र्य आणलेले आहे. आता अशी वेळ आली आहे की ,

कोणत्याही विचाराच्या हिंदूंनी शुद्धीपासून फटकून राहता उपयोगी नाही. मुसलमान पुरुषांना शुद्ध करून घेण्यापेक्षा, मुसलमान स्त्रियांना शुद्ध करून घेण्याकडे आम्ही अधिक लक्ष दिले पाहिजे. आम्ही गुरखे सनातनपंथीय आहोत. पण शुद्धिआंदोलनात कोणाच्याही मागे राहणार नाही. "

अशा रीतीने गुरखासंघाचे वतीने हिंदुसंघटणाचे कार्याविषयी ठाकुरचंदन सिहाने जे आश्वासन दिले त्याचे प्रत्यंतरही ठिकठिकाणी येत आहे. पत्वाखालीच्या सत्याग्रहाची माहिती, 'श्रद्धानंदाचे' वाचकांस आहेच. ज्या चिकाटीने आपल्या हिंदुबांधवांनी आज सहा महिने प्रत्यही भजनी मेळे वाद्यांसह मशिदीवरून वाजत नेत राहून आपला वाद्ये वाजविण्याचा अधिकार सरकारास , सशस्त्र शिपायांस मुसलमानी गुंडगिरीस न जुमानता गाजवीत आणिला आहे. त्या वीरोचित झुंजीच्या दर्शनाने वीर जाती गुरख्यांचे रक्तही उद्दीपित झाले नसते , तरच आश्चर्य होते. नैनितालच्या गुरखा समाजाने आपल्या हिंदु बंधूंच्या सत्याग्रह मंडळास लेखी वचन दिले आहे की , साह्यास गुरखेही येत आहेत. त्यांच्यापैकी कित्येकानी त्या सत्याग्रहांत प्रत्यक्ष भाग घ्यावयाचा ठरवून गुरखा वीरांची पहिली टोळी पत्वाखालीस सत्याग्रह करण्यास लवकरच जाणार आहे. या वेळपर्यंत ती गेली असल्याचे कळते. पत्वाखालीच्या सत्याग्रहांत काय किंवा कलकत्ता कोहाट आदिक दंग्यांचे स्थळी काय, किंवा पूर्वी राजकीय वा धार्मिक अशा कोणत्याही चळवळीचे वेळी शांतता रक्षणाचे नावाखाली हिंदु लोकांचे अधिकार पायाखाली तुडविण्या-साठी जेव्हा जेव्हा सशस्त्र सेना धाडण्याचा प्रसंग येई तेव्हा तेव्हा गुरखे लोकांस धाडण्यात येई. परंतु आजवर त्यांच्यात अखिल हिंदुत्वाची आणि हिंन्दी देशाभिमानाची जाणीव उत्पन्न झालेली नसल्याने त्याचे वर्णन अगदी एखाद्या भाडोत्री विदेशीयांसारखे घडत असे. परंतु या गेल्या दोन तीन वर्षांतील नेपाळी आंदोलनाच्या परिणामाने आणि सार्वजनिक जागृतीने आपल्या नेपाळी बंधूंत अखिल हिंदुत्वाची आणि हिंदी राष्ट्रैक्याची उत्कट जाणीव आणि योग्य अभिमान उत्पन्न होऊ लागला असल्याने आता पत्वाखालीला दिसू लागली आहेत , तशी दृश्ये दिवसेंदिवस अधिक दिसू लागतील, यात काही शंका नाही. एका बाजूला सरकारच्या सेनेतील सशस्त्र गुरखे हिंदूंस वाद्यांची बंदी करण्याकरिता संगिनी रोखून उभे राहतील तर दुसर्या बाजूला देशभक्त आणि धर्मसेवक गुरखे अखिल ध्वजाखाली झुंजत त्या संगिनीची टोके बोथट करीत असतील आणि अशा रीतीने हळूहळू या धर्माभिमानी गुरख्यांचे हिंदुत्वाचे प्रेम आणि तेज पाहून त्या स्वजना-विरुद्ध लढणार्याय गुरखा सेनेतही स्वदेशप्रेम आणि धर्म वीरत्वाचे तेज उत्पन्न होईल आणि आज जसा त्यांचा उपयोग त्यांच्या हिंदुधर्माचे नि स्वदेशाचेच आकांक्षाविरुद्ध सहज आणि बिनधोक करता येतो तसा "हिंदुस्थान देशाचे हिताहित तेच आपले हिताहित आणि हिंदु जगताचे उन्नती-पतन तेच

आपले उन्नती-पतन आहे " हे आपल्या गोरखा बंधूस कळकळीने सांगत त्याचे गुर खा लीगचे प्रमुख पत्र 'गुरखा संसार' (१५ फेब्रु १९२७) म्हणते,

". . . हायहाय! आमच्या हिंदू लोकांचे हे केवढे पतन! मूठभर मुसलमान खैबर घाटांतून येतात ते काय आणि हिंदुस्थान जिंकतात ते काय ? अजूनही जर आम्ही स्वतःचे संघटन करून त्यात अस्पृश्यांस ह्या कोटी कोटी धर्मबंधूंस आपविणार (आपले करणार) नाही तर शीघ्रच हा आमचा हिंदुस्थान , हिंदुस्थान न राहता त्यास इस्लामस्थान म्हणावे लागेल!"

"हे हिंदूंनो आता तरी जागे व्हा! हे गुरखा वीरहो , आजवर आपल्या हिंदुजातीला जागविण्यास, हिंदुजातीत, उत्तेजन उत्पन्न करण्यास तिची रक्षा करण्यास या भारतवर्षात भविष्यकाळी हिंदुधर्माचे जयध्वज गौरवाने फडकावीत ठेवण्यासाठी झुंज घेण्यास आज जर हिंदुसमाजात कोणा जातीस इतरांहून काहीतरी अधिक शक्ती असेल तर हे गुरखावीरहो, ती तुम्हास आहे. सध्या आपल्या गुरखा जातीत विद्येचा अभाव आहे. पण आपण बलधारी शूर वीर आहोत. आपणास हिंदुचे शत्रू हे (Japs without brains) गुरखे हे मस्तकशून्य जपानी आहेत! म्हणून म्हणतात. जर आपण धैर्य धरून आपली वर्तमान स्थिती सुधारली तर हे जग आपणास आज जपानी लोकांस म्हणते त्याचप्रमाणे म्हणेल की हे प्रज्ञावंत आणि पराक्रमी गुरखा लोक! These enlightened and enterprising Gurkhas!

हे गुरखा जाती , म्हणून उठ बुद्धी आणि शक्ती ही दोन्हीही संपादन कर. या जगतात ह्या गुणांनी युक्त होत्साती तू आपला हा हिंदुधर्म आणि आपला हा आर्यावर्त देश यांना गौरवाचे उच्च शिखरावर नेऊन बसीव. हरघडी हरदिन ह्या कर्तव्याची आठवण ठेव. तर भविष्यकाळी स्वदेशाचे आणि स्वधर्माचे कल्याण होईल नाहीतर तूही जर अप्रसन्न होऊन ध्येय विसरून पडलीस तर न हिंदुधर्म उरेल न हिंदुस्थान उरेल."

वरील उतार्या वरून आपल्या नेपाळी बंधूंत हिंदुस्थानच्या आणि हिंदुधर्माच्या भवितव्याचा भार हा सर्वांपेक्षा आपल्याच शिरावर अधिक आहे. आणि त्या कर्तव्यसागरात हिंदुराष्ट्राचे अग्रेसरत्व पत्करून आम्ही धर्मक्षेत्रात उडी घेतली पाहिजे तरच आम्ही धर्माचे हिंदू ही जाणीव उत्पन्न होऊ लागली आहे हे सहज दिसून येईल नेपाळी बंधूंच्या अंतःकरणात :-

"ह्या भूमंडळाचे ठायी हिंदु ऐसा उरला नाही! हिंदुधर्म राहिला काही तुम्हा कारणे ", या महान मंत्रांतील गूढ दिव्यार्थ , प्रस्फुरित होऊ लागला आहे. नेपाळी आंदोलन सफल होऊ पहात आहे.

तरी अजून काहीच झाले नाही. हे नुसतं बीज रुजले इतकेच ; कार्य ते पुढेच आहे. धर्मक्षेत्रात अजून पराक्रमाचे पाऊस पडावयाचे आहेत. हंगाम तर त्याचेही पुढे आहे! नेपाळी

लेखक म्हणतो, "जपानचे उदाहरण आमच्या समोर आहे. जर आम्ही गुरखे यत्न करू तर आमचे हिंदुराष्ट्रही जपानसारखेच जगात वर्चस्व पावेलच पावेल. "

बंधो! तथास्तु! ही आकांक्षा हा आत्मविश्वास तुमच्यात उत्पन्न व्हावा , तुमचा पराक्रम सूप्तीतून जागृत व्हावा. म्हणून ही सारी रात्र आम्ही तुम्हांस करुणरवाने हाका मारीत तुमच्या भवितव्यावर पहारा देत बसलो होतो!

गेल्या फेब्रुवारी महिन्यात नेपाळच्या इतिहासात लिहिण्यासारखी आणखी एक गोष्ट घडून आली. नेपाळच्या राज्यात रेल्वेचा प्रवेश झाला. स्वतः नेपाळ सरकारने आपल्या देखरेखीखाली आणि आपल्या सत्तेची पहिली रेल्वे बांधवून तिचा त्या दिवशी महाराजाधिराजांचे हातून उद्घाटन समारंभही केला. नेपाळी सेनेने आपल्या स्वतंत्र अधिपतीचे प्रचंड उत्साहात आणि बंदुकांच्या फेरीत स्वागत करून त्यांची मोठी मिरवणूक काढली होती. त्यावेळी महाराजाधिराजांच्या मार्गावर फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या ह्या रेल्वेमुळे नेपाळांतील प्रवास फारच सुखकर झाला आहे. त्यामुळे भारतीय नव्या विचारांचा प्रवासही तितकाच द्रुततर होणारा आहे. हा लोहपथ म्हणजे नेपाळी आणि नेपाळेतर हिंदु यांच्या अंतकरणांस आणि क्रियेस जोडणारा एक प्रबळ ज्ञानतंतूच होणार आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक ११ वा**

# नेपाळ आणि श्रीयुत रामनंद चतर्जी

'प्रवासी' नावाच्या बंगाली मासिकात , श्री. रामानंद चतर्जी यांचा नेपाळ आणि अफगणिस्थान या विषयावर एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी अफगाणिस्थानची आणि नेपाळची तुलना केली आहे. अफगाणिस्थानची लोकसंख्या अधिकात अधिक ६४ लक्ष असून, त्यात लढाईचे वेळी उपयुक्त असे फार फार तर ३० लाख शस्त्रधारी निघू शकतील. नेपाळची संख्याही ५६ लाख इंग्रजी ग्रंथकार देतात. (परंतु, स्वतः नेपाळी लेखक, ९० लक्ष ते एक कोटीपर्यंत नेपाळी लोकसंख्या आहे. म्हणून सांगतात. ) साहस , पराक्रम, रणकौशल्य यात नेपाळी लोक अफगाणांच्या तोडीस तोड आहेत. मुसलमान लोक अफगाणांची हिंदुस्थानवर स्वारी कधी होईल अशा उत्सकतेने तिची मार्गप्रतिक्षा करीत आहेत. आणि तशी ती स्वारी होताच , अफगाणी मुसलमानांसाठीच इंग्रजांच्या राज्यास उलथून टाकून हिंदुस्थानांत अफगाणी पण मुसलमानी राज्य स्थापू म्हणून हे हिंदी मुसलमान मोठ्या आवडीने मनचे मांडे खात आहेत.

परंतु पुढे प्रवासीकार सांगतात की , "कोण्याही हिंदूने असे स्वप्नांतही आणले नाही की इंग्रज जाताच नेपाळचे हिंदुराष्ट्र हिंदुस्थानावर राज्य करू लागेल! आम्ही हिंदु लोक इतके चिंतीत आहो की , भारतवर्षातून जेव्हा इंग्रज निघून जातील तेव्हा हा देश स्वाधीन होईल आणि अफगाणिस्थान , नेपाळ, तिबेट आणि चीन इत्यादी शेजार्यांतशी बंधु प्रेमाने वागेल!"

**हिंदुस्थान आणि नेपाळ काय दोन आहेत?**

श्री. रामानंद चतर्जीसारख्या विज्ञ अनुभवी आणि विचारी लेखकांचे हातून वर उल्लेखिलेले वाक्य लिहिले जावे, याचे आम्हांस राहून राहून आश्चर्य वाटत आहे! हिंदुस्थान हा एक देश आणि नेपाळ हा एक तिबेट चीनसारखा दुसरा देश-ही, अगदी अडाणी कल्पना, राजकारणाच्या जुन्या चाकोरीतच जन्मभर रखडत पडल्याने ज्यांच्या नवीन भौतिक , धाडसी आणि क्रांतिकारक अशा कोणत्याही विचारांस ग्रहण करण्याच्या शक्तीच नष्ट झालेल्या आहेत, अशा हिंदूतील प्रमुख समजल्या गेलेल्या शेकडो जणांची अजूनही आहे , हे आम्हास माहितच आहे. परंतु श्री. चतर्जीसारख्या पुष्कळ प्रसंगी स्वतंत्र आणि विशाल विचारांस ग्रहण करण्याची क्षमता ज्यांच्या अंगी दिसून आलेली आहे , अशा लेखकांनेही नेपाळ आणि हिंदुस्थान हे दोन निरनिराळे देश आहेत , असे अद्याप समजत रहावे यांचे आम्हांस आश्चर्यच नव्हे तर तीव्र दुःख वाटते.

लहानपणाच्या भूगोलात नेपाळ हा "स्वतंत्र" देश आहे म्हणून सातव्या वर्षी जे पाठ केले ते सत्तराव्या वर्षी देखील , आमचे लोक विसरू शकत नाहीत. भारतीयांची

स्मृतिशक्ती श्रेष्ठतम आहे. म्हणून उगीच नाही जगात तिचा इतका गौरव होत! नेपाळ "स्वतंत्र" देश आहे म्हणजे तो हिंदुस्थानचे इतर प्रांतांप्रमाणे ब्रिटिशांच्या जबड्यांत गवसून परतंत्र झालेला नाही , इतकाच त्याचा अर्थ घेतला पाहिजे , ही गोष्ट आमच्या विद्वान लोकांसही अजून समजत नाही! त्यांस आम्ही असे विचारतो की , नेपाळला हिंदुस्थानच्या शेजारचा एक तिबेटसारखा दुसरा देश म्हणून जे आपण म्हणता ते कोणच्या कारणांसाठी? 'ब्रिटिश हिंदुस्थान म्हणजे हिंदुस्थान', अशी विकृत व्याख्या आपणा सर्वांच्या डोक्यात जी खोल जाऊन बसलेली आहे. तिचाच हा परिणाम नव्हे का? नाही तर, हिंदुस्थानच्या अनेक प्रांतापैकीच, नेपाळही एक प्रांत असता , हिंदुस्थान देशाचा आणि राष्ट्राचा एक उपांग एक घटक असता, त्यास शेजारचा एक विदेश म्हणून समजण्यास आपणास तो प्रांत अजून सुदैवाने स्वतंत्र आहे, त्याहून दुसरे कोणचे गमक उपलब्ध झाले आहे? ब्रिटिशांच्या हातात न गवसणे म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रापासून विलग होणे ही का स्वराष्ट्र आणि विराष्ट्र यांची व्याख्या आहे ? हिंदुस्थान म्हणजे परतंत्र असणारा देश! जो स्वतंत्र भूभाग तो हिंदुस्थानी राष्ट्राचा भाग होईल तरी कसा ? नेपाळ स्वतंत्र आहे. तेव्हा तो दुसरा देश असलाच पाहिजे , अशी अत्यंत दास्यप्रवण आणि दास्य सुलभविचारप्रणाली नेपाळास हिंदुस्थानच्या बाहेरचा एक विदेश आहे. म्हणून म्हणणारांच्या त्या विधानांत अंतर्भूत झालेली असते. त्यांनी या विचार-विभ्रमांतून आपली सुटका करून घेण्यास नुसते इतकेच स्वतःस विचारावे की जर दुर्दैवाने हिंदूंचे हे अवशिष्ट उरलेले एकमात्र स्वतंत्र राज्य पंजाबप्रमाणेच इंग्रजांच्या हातात गुरखायुद्धांत अपजयी होऊन सापडले असते आणि त्याचा बिहारप्रमाणेच एक प्रांत होऊन दिल्लीच्या गव्हर्नर जनरलच्या हाती त्याची सूत्रे असती नि विधिमंडळात त्यांचे निवडून आलेले प्रतिसहकारी प्रतिनिधी आणि राष्ट्रीय सभेत त्यांचे निवडणुकीत पडलेले असहकारी प्रतिनिधी येते, जाते तर नेपाळ हा हिंदुस्थानपासून विलग असलेला एक विदेशी आहे. एक परराष्ट्र आहे ; असे आपणास कधी तरी वाटते का ? बंगाली, मराठी किंवा पंजाबी जसे एका राष्ट्रांचे घटक असून राष्ट्रीय सभेत एकत्र बसतात. तसेच नेपाळही बसत असते. तर त्यांना विदेशी म्हणून निवडून काढण्यास , कोणचे तरी दुसरे गमक सापडणे शक्य झाले असते का ? पण केवळ ब्रिटिशांनी वधिलेल्या आपल्या स्वातंत्र्याच्या रक्ताच्या लाल रंगाने, बिहारपर्यंतच हिंदुस्थानी भूगोल लाल झालेला दिसतो आणि नेपाळवर त्याचे शिंतोडे उडालेले दिसत नाहीत , म्हणून नेपाळ हा विदेश वाटू लागला. स्वातंत्र्य गमावणार्याल गमाउपणाच्या कर्तबगारीने आम्ही मराठे, बंगाली, पंजाबी, हिंदुस्थान देशाच्या नागरिकत्वास पारखे झालो! नाही. ---बिचारा नेपाळ , त्याने स्वातंत्र्य गमावले नाही. हिंदुत्वाचा देववंद्य ध्वज आपल्या दृढ अशा वीरबाहूंच्या बळावर अजूनही कसाबसा सन्मानाच्या उंच आकाशांत फडकावित ठेविला आहे. या पापासाठी तो हिंदुस्थान देशाच्या नागरिकत्वास मुकला! भारत वर्षांच्या बाहेर , आम्ही त्याला हाकून दिले ; कारण,

भारतवर्षाचे मुख्य राष्ट्रीय लक्षण जे 'गमाउपणा" ते नेपाळात इतके उस्कटपणे दिसून येत नाही! इंग्लिशांच्या भूगोलात नेपाळास विदेश म्हणोत पण नेपाळ इंग्रजांच्या हाती गवसला नाही म्हणून आपणही त्याला 'विदेश' समजावे काय? खरे पाहिले असता

**आज नेपाळ हाच काय तो खरा हिंदुस्थान आहे**

आणि आम्हींच हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचे अधिकारापासून पदच्युत झालेले आहोत. खरे भारतवर्ष आज जर कोठे जिवंत असेल तर ते नेपाळांत आहे. बंगाल, महाराष्ट्र, पंजाब इत्यादी आमचे प्रांत भारतवर्षाचे केवळ स्मशान आहे. कारण येथे आम्ही भारताचे स्वातंत्र्य आणि हिंदुस्थानचा ध्वज पारतंत्र्याच्या चितेवर जाळून टाकिला! श्रीकृष्णाच्या आणि वेद भगवानाच्या भारताचा आज जर कोणी खरा उत्तराधिकारी असेल , केवळ वंशावळीच्या चिटोर्यायच्या पुराव्याने नव्हे , तर त्या पुराव्यासहच त्याहूनही निःसंदिग्धतर , अशा पराक्रमाच्या पुराव्याने जर आज श्रीकृष्णाच्या स्वदेशाचा उत्तराधिकारी होण्यास आम्हा हिंदूंत कोणी योग्य असेल तर तो नेपाळच होय! त्याने हिंदुस्थान देशाचे हिंदुपण अजून राखिले आहे. या पितृपरंपरांगत भारतावर आम्हा सर्व बुडाउ आणि अकर्मण्य कुलांगारांपेक्षा त्या वीरवर कुलदीपकांचाच अधिक अधिकार आहे.

**स्वतंत्र राहिला म्हणून नेपाळ ब्रिटिश हिंदुस्थानच्या बाहेर पडले; पण हिंदुस्थानच्या बाहेर पडणार नाही!**

जर स्वतंत्र राहिला म्हणून भारतवर्षात समाविष्ट होण्याचा अधिकार नेपाळला उरत नसेल, तर परतंत्र झाल्यामुळे आम्हांस भारतवर्षाचे नाव काढण्याचाही अधिकार उरत नाही. राजकारणाच्या काकतालीय घटनेने , नेपाळ आज आपल्या हिंदुस्थानच्या इतर प्रांत , संघाच्या कक्षेबाहेर एकटा पडला आहे. म्हणून तो हिंदुस्थान देशाचा एक प्रांत नसून एक विदेश आहे, असे अजूनही कोणास वाटत असेल तर त्यांनी स्वतःस असे विचारावे की जर आज महाराष्ट्र किंवा बंगाल स्वतंत्र असता तर केवळ एवढ्यासाठी आपण त्यास 'विदेश' म्हणून समजो असतो का? स्वदेश कोणता आणि विदेश कोणता; हे राजकीय उलढालीच्या अपघाताने मुख्यतः ठरत नसते , तर ते जाती , भूजल, निसर्ग, इतिहास आणि मुख्यतः इच्छा इत्यादी कारणांवरून निश्चित होत असते ही गोष्ट आमच्यामधील बहुश्रुत विद्वानांसही सांगावी लागावी हे केवढे आश्चर्य आहे?

आणि जर कोणा हिंदु लेखकास नेपाळ हा जाती , भूजल-निसर्ग, इतिहास इत्यादी प्रमुख कारणांसाठीच हिंदुस्थानी देशापासून विभिन्न असा एक विदेश वाटत असेल, तर ती गोष्ट वरील आश्चर्याहूनही अधिक आश्यर्यकारक समजली पाहिजे. आज दोन तीन वर्षे या विषयाची इतकी चर्चा हिंदुस्थानातील कित्येक इंग्रजी आणि देशी पत्रांतून झालेली आहे की, मासिक पुस्तकाच्या संपादकासारख्या अद्यावधी (up-to-date) माहिती असणे अवश्य असणार्यास गृहस्थास ती माहित झाली नाही , असे सहसा घडावयाचे नाही. नेपाळ हा

हिंदुस्थानचाच एक प्रांत आहे आणि हिंदुस्थान जेव्हा स्वतंत्र होईल आणि त्याचे सर्व भाग विभाग संयुक्त करून एक राष्ट्र बनविण्यात येईल तेव्हा त्यात नेपाळ हा प्रांतही बंगाल महाराष्ट्राप्रमाणेच अगदी नैसर्गिक अधिकारानेच समाविष्ट होईलच होईल! ही गोष्ट गेल्या दोन तीन वर्षांच्या चळवळीने बहुतेक हिंदु पुढार्यांच्या आणि सुशिक्षितांच्या कानावर गेलेली आहे. त्यास पटत चालली आहे. इतकेच न व्हे , तर मुसलमानांस त्या नेपाळविषयक हिंदु जागृतीची भिती पडावी इतका तिचा गवगवा आधीच झाला आहे.

दिल्लीच्या खिलाफत परिषदेच्या अध्यक्षांनीदेखील एका वर्षापूर्वीच हिंदु महासभेच्या पुढार्यांवर असा आक्षेप केला होता की , मुसलमानांच्या अफगाणिस्थानाविषयीच्या आकांक्षास प्रत्युतर म्हणून हिंदु लोक नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्याशी , संगनमत करू लागले असून नेपाळ हा भारतवर्षाचा एक , सहजसिद्धच प्रांत आहे , म्हणून प्रचार करीत फिरत आहेत. ह्या एका नवीन संकटासही मुसलमानांस तोंड द्यावे लागेल! ' या खिलाफत परिषदेच्या अध्यक्षांच्या भाषणात आम्हांस तरी काहीच आक्षेपार्ह दिसत नाही. नेपाळशी आमचे संगनमत होणारच होणार! कारण ते कोणास प्रत्युत्तर म्हणूनच केवळ करावयाचे नसून ते नेपाळचे आणि आमचे संगनमत , निसर्गाने ज्या दिवशी , भारत घडले , त्याच दिवशी घडवून आणिलेले आहे.

हिंदुस्थान आणि नेपाळ दोन देशच नाहीत. जसे हिंदुस्थान आणि बंगाल हे दोन देश नाहीत ; बंगालचे आणि आमचे , महाराष्ट्राचे आणि आमचे , पंजाबचे आणि मद्रासचे संगनमत जसे आम्ही सर्व एका हिंदुस्थानी राष्ट्राचे अविभाज्य आणि सहज अवयवच असल्याने निसर्गानेच घडविलेले आहे. तसेच नेपाळशीही आमचे संगनमत सहज उपजत घडलेले आहे. हिंदुस्थान हा नेपाळी , बंगाली, मराठी इत्यादी सर्व हिंदुमात्रांचा स्वदेश आहे. आम्ही सर्व हिंदु एकराष्ट्र आहोत; होतो आणि असणार आहोत.

**कोणत्या कारणासाठी तुम्ही नेपाळ विदेश आहे म्हणून म्हणता?**

ते हिंदुस्थानच्या अगदी उत्तरेकडील पर्वतावर वसलेले आहे म्हणून ? पण मग काश्मीर कुठे वसलेले आहे ? त्यास कसे हिंदुस्थानचा भाग समजता ? नेपाळात तिबेटमधल्या मानव वंशाचे मिश्रण आहे म्हणून ? पण मग बंगालमध्ये मंगोलियनांचे महाराष्ट्रात सिथियनांचे , राजपुतान्यात हूणांचे , पंजाबात पिशाचांचे मिश्रण आहे. म्हणून शेकडो दंतकथा आणि कथा प्रचलित आहेतच की नाहीत? बंगालचा किंवा महाराष्ट्राचा हिंदु हा जितका तिबेटी किंवा इंग्रजी मनुष्याशी विसदृश दिसतो आणि एकमेकाशी सुसदृश दिसतो. तितकाच नेपाळी हिंदूही त्यांच्याशी विसदृश आणि आमच्याशी सुसदृश दिसतो. नेपाळात मराठी , रजपुती, बंगाली, आंध्र आदि अनेक हिंदुप्रांतांच्या वसाहती जाऊन रक्तामांसाने एकजीव झालेल्या आहेत आणि नेपाळांतून अनेक वसाहती या महाराष्ट्र प्रांतापर्यंत येऊन आमच्यात एकजीव होऊन गेलेल्या आहेत. इतिहासाने म्हणाल तर

पांडवांचे काळापासून चंद्रगुप्तापर्यंत पौराणिक साक्षीवरून आणि गुप्तांपासून गुरख्यापर्यंतच्या ऐतिहासिक साक्षीवरून, भारतवर्षाचा किंवा हिंदुस्थानच्या राष्ट्राचा नेपाळ हा महाराष्ट्र-पंजाब-बंगाल्याइतकाच अविछिन्न अवयव झालेला आहे. किबहुना चंद्रगुप्ताच्या पूर्वीपासून तो हर्षाच्या साम्राज्यापर्यंत नेपाळ हा महाराष्ट्र बंगालहूनही भारतीय साम्राज्याचा निकटवर्ती आधार आणि उपांग होता. तेव्हा कोणच्या आधारावर किंवा कोणच्या कारणासाठी तुझी बिहारपर्यंतच हिंदुस्थानची सीमारेषा आखूंन आमच्या रक्ताच्या, बीजाच्या आणि धर्माच्या नेपाळला मात्र हिंदुस्थान देशाच्या आमच्या भारतवर्षाच्या बाहेर ढकलू पाहाता? ही विक्षिप्त कल्पना केवळ ब्रिटिश हिंदुस्थानच्या भूगोलात नेपाळचा उल्लेख नाही म्हणूनच काय ती लोकांच्या डोक्यात नकळत घुसली. दीद दमडीच्या परक्यांनी रचलेल्या भूगोल पत्रकाच्या चिटोर्याडने टिपून टाकिता येईल इतके काही नेपाळच्या आणि आमच्यामधील एकजीव रक्तभिसरण आजही झालेले नाही ? तेव्हा आमची सर्व हिंदु जनतेस अशी विनंती आहे की नेपाळ हा हिंदुस्थान देशाचा एक अविच्छेद्य भाग आहे. आमच्या राष्ट्रशरिराचे तो एक एकजीवी उपांग आहे ही भावना रात्रंदिवस जागृत ठेवा! ब्रिटिश हिंदुस्थानच्या भूगोलाचे चोपडे आज आहे आणि उद्या फाटले जाईल. त्या ब्रिटिश हिंदुस्थानच्या भूगोलाविरहित निसर्गनिर्मित, असा हिंदुस्थानचा एक, दुसरा अमर भूगोल आहे आणि त्या हिंदु हिंदुस्थानच्या भूगोलात नेपाळचा उल्लेख आहे! तो मात्र कोणाच्याही धाकदपटशाने पुसला जाणार नाही. हिंदुस्थान आणि नेपाळ अशी भाषा देखील नकळत्या राष्ट्रद्रोहाचे लक्षण आहे. हिंदुस्थान आणि महाराष्ट्र हा जसा वदतोव्याघात आहे , तसेच वरील वाक्यही आहे. आमची आमच्या नेपाळी स्वदेशबंधूंस आणि स्वधर्मबंधूंस विनंती आहे की, अशा भाषेचा प्रतिवाद आणि निषेध जसा आम्ही करतो तसा त्यांनीही प्रकटपणे करावा. या दोन तीन वर्षांतील नेपाळ-विषयक जागृतीमुळे नेपाळी लोकांत हिंदुसंघटनेची तत्त्वे, प्रसृत होत आहेत, त्यांचे संघ बनत आहेत. देहराडूनची 'गोरखा समाचार' आणि हिमालयन टाईम्स' अशी हिंदुस्थानास भरतवर्षास आपला स्वदेश समजणारी राष्ट्रवादी पत्रे नेपाळी कर्ते पुरुष चालवीत आहेत. त्यांनी नेपाळ हा हिंदुस्थान देशाचा महाराष्ट्राइतकाच नैसर्गिक ऐतिहासिक आणि जातीय विभाग नाही. अशा अर्थाच्या विधानांचा तीव्र निषेध करावा. नेपाळ ब्रिटिश हिंदुस्थानचा भाग नसेल; पण हिंदु, हिंदुस्थानचा भाग आहेच आहे. भारताचे तो अविभाज्य आणि राष्ट्रीय पूर्वजपूजित शिरोभूषण आहे. भारताची जी भवितव्यता, तीच नेपाळची खरी भवितव्यता आहे. आम्हांस नेपाळी हे कोणी विदेशी लोक नाहीत तर ते आमच्या स्वदेशीय बंगाल , पंजाब प्रांतस्थांप्रमाणे राष्ट्रबंधु आहेत. म्हणूनच राष्ट्रीय सभेत नेपाळास स्थान मिळालेच पाहिजे. जसे मुंबई बंगाल इत्यादी विभागाचे गट ठेवलेले असतात, तसाच एक नेपाळच्या नावाने त्या राष्ट्रीय महामंदिराच्या सभामंडपात एक उपमंडप राखून ठेवला जावा आणि नेपाळी प्रतिनिधीस आमंत्रऊन राष्ट्रीय सभेत

समाविष्ट होण्याचा त्यांचा राष्ट्रीय अधिकार त्यास देण्यात यावा. राष्ट्रीय सभा भारतीय राष्ट्रसभा आहे. “ब्रिटिश अंडियन कॉंग्रेस” म्हणून ती स्वतःस म्हणवीत नाही; तर “अंडियन नॅशनल कॉंग्रेस”असे म्हणविते. एतदर्थ पांडेचरी, गोमांतक यांसही त्यात समाविष्ट होण्याचा जसा अधिकार आहे , तसाच नेपाळलाही आहे. इतकेच न व्हे , तर बंगाल महाराष्ट्रादिक कोणच्याही प्रांतापेक्षा नेपाळला भारतीय राष्ट्रीय सभेत प्रवेश करण्याचा अधिकार अधिक आहे. कारण भारतीय राष्ट्राचे स्वातंत्र्य त्याने आपल्या विभागात तरी अजून राखून ठेविले आहे. ज्याने भारतीय स्वातंत्र्याचा ध्वज अद्याप अद्याप परशत्रूपुढे न नमविता कसाबसा पण, अशरणपणे फडकवीत ठेविला आहे ; त्या नेपाळला भारतीय राष्ट्र सभेत नुसता समावेशच नव्हे, तर अग्रपूजेचा मान मिळाला पाहिजे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

लेखांक १२ वा

# भिऊ नकोस; नेपाळा ऊठ आणि दाराशी ठोठावीत असलेल्या या भारताच्या भाग्यश्रीचे स्वागत कर ! !

**(डिसेंबर १९२७)**

**'साहसे श्रीः प्रतिवसती**

आगामी महायुद्धाचे मुख्य रणांगण रशियामध्ये पडणार ,ते युद्ध रशियादिक राष्ट्रांचा इंग्रजी साम्राज्यावर निकराचा हल्ला असल्याने , त्याचे मुख्य लक्ष त्या ब्रिटिश साम्राज्याचे काळीज असलेली जी हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता तीच असल्याने हिंदुस्थानच्या उत्तर सीमेच्या आजूबाजूस असलेल्या लहान लहान राष्ट्रातील जी अफगाणिस्थान आणि नेपाळ ही दोन प्रमुख राष्ट्रे आहेत. त्यास या युद्धाच्या दृष्टीने अत्यंत महत्व प्राप्त होणार ; हे उघड आहे. हे महत्व अफगाणिस्थानने ओळखिले आहे- पण नेपाळ?

नेपाळ, आज हिंदूंच्या आशेचा खड्ग आहे. त्याने जर हे महत्व वेळीच ओळखिले आणि त्या संधीचा लाभ घेण्यासाठी वीरोचित धडाडीने यत्न केला तर , हिंदूंचा ध्वज भाग्याचा परम उच्च बिंदूवर पोचविण्याची ही अभूतपूर्व संधी त्यास साधता येण्यासारखी आहे. पण नेपाळात ही महान महत्वाकांक्षा जागृत झाली आहे काय?

गेल्या दोन तीन वर्षांत हिंदुसंघटनाच्या विजेचा धक्का नेपाळी राष्ट्रासही थोडा थोडा तरी बसून, आमच्या गुरखा जातीत काही नवचैतन्य उत्पन्न झालेले आहे; ही समाधानाची गोष्ट आहे. त्यांच्या नवीनच स्थापन झालेल्या , गुरखा संघांची द्वितीय वार्षिक बैठक , डिसेंबरात डेहराडूनला भरणार आहे. पण तीत नुसत्या विधवाविवाह, हुंडा इत्यादी स्वयंपाक घरातील उलाढालींची चर्चा होणार असेल; तर अशा बैठकीत काही विशेष तात्पर्य आहे असे नाही. या सुधारणा उपयुक्त आहेत ; पण त्या बायाबापड्या देखील करू शकतील. गुरख्यांच्या वीरबाहुंना या पोळपाट लाटण्यांत धुवीत बसण्यासाठी देवाने उत्पन्न केले नसून त्याकडे एका महान राष्ट्राच्या उद्धाराचे वीरकार्य आज देवाने सोपविले आहे. त्यास साजेलशी भीषण भव्य महत्वाकांक्षा त्या संघार्थ एकत्र जमणारे गुरखा वीर , वीर्यशाली चढाओढीत त्यांचा विजयाश्व निधड्या छातीने उडी घेईल काय ? उभे गुरखा राष्ट्र , उभे नेपाळ, हिंदुत्वाच्या देवास , मस्तकी धरून कार्य क्षेत्रांत हलकल्लोळ उडविण्यास पुढे सरसावेल अशी प्रचंड खळबळ जर हे गुरख्यांचे संघ उत्पन्न करतील तरच त्यांच्या जन्माचे साफल्य!

गेल्या दोन महिन्यांपूर्वी अफगाणिस्थानने आपला स्वातंत्र्योत्सव गाजविला. त्या वेळी काबूलच्या राजाचे पायांपुढे एका मुसलमानाने सलाम करून भर उत्सवात गहिवरून

विचारले की , “काबुलके बादशाह , आपल्या मस्तकावर हिंदुस्थानच्या बादशाहीचा मुगुट चढविण्याचा धन्य दिवस कधी उगवेल ?” मुसलमानांच्या तोंडचा हा प्रश्न अफगाणिस्थानच्याच नव्हे तर हिंदुस्थानातीलही लाखो मुसलमानांच्या हृदयातील गुप्त आशेचा एक प्रतिध्वनी होता! त्यास काबुलच्या राजाने जे उत्तर दिले ते वर वर कितीही गुळचट असले, तरी गेल्या जर्मन युद्धापासूनचे अफगाणी गुप्त राजकारण ज्यांस माहित आहे, ते त्यामुळे फसले जाणार नाहीतच. इंग्रज तर फसले जाणार नाहीतच , नाहीत. ते सर्वजण हे जाणून आहेत की , हिंदुस्थानचा बादशहा होण्याची भयंकर महात्वाकांक्षा अफगाणिस्थानांतील राजापासून रंकापर्यंत , सर्वांस वेडावून सोडीत आहे. मुद्दाम हिंदुस्थानावर पसरविलेल्या या बातमीने तरी नेपाळचे डोळे उघडावयास नकोत काय? याचा भीषण अर्थ आणि त्यापासून घेण्याचा बोध नेपाळने घ्यावयास नको काय ? गुरख्यांच्या नसांनसांतून, नवचैतन्याची विद्‌युत्‌ त्या बातमीसरशी भरावयास नको काय?

अफगाणिस्थान आणि नेपाळ! या दोघा राज्यांच्या आजच्या चैत्यन्यांत आणि कर्तृत्वात केवढा फरक पडत चालला आहे! वास्तविक पाहता अफगाणिस्थानची लोकसंख्या ६० लाख असून नेपाळच्या हिंदु राज्याचीही कमीत कमी तितकीच आहे. अफगाणिस्थानास पूर्ण स्वातंत्र्य मिळालेले आहे तर नेपाळही आज पूर्णपणे स्वतंत्रच आहे. नेपाळांत प्रत्येक नागरिक सशस्त्र आहे. इतकेच नव्हे तर नेपाळांत प्रत्येक वयात आलेला मुलगा हा एक सैनिकच आहे. नेपाळातील प्रत्येक झोपडी ही एक लहानसे शिबीर , एक लहानशी शिपायांची छावणीच असते. कारण तीमध्ये जो वृद्ध आजोबा असतो , तो इंग्रजांच्या किंवा नेपाळच्या सैनेत युद्ध कर्मात जन्म घालवून अवसर (पेनशन) घेतलेला कोणीतरी वृद्ध वीर असतो. त्या झोपडीतील कर्ता पुरुष त्या अवसरप्राप्त वृद्ध वीराचा मुलगा किंवा पुतण्या नेपाळच्या किंवा इंग्रजांच्या सेनेत कुठे तरी चाकरीवर असलेला किंवा कोणाच्या तरी रणांगणांत प्रत्यक्ष लढाई घेत असलेला झुंजार वीर असतो. त्या झोपडीतील वयात येऊ घातलेला नातू त्या झुंजार वीराचा बच्चा आपल्या आजोबाच्या आणि बापाच्या तोंडून ते लढत असलेल्या युद्धाची वर्णने ऐकत, आपल्या तरवारीशी, खुकरीशी आणि बंदुकीशी खेळत बसलेला असतो. नेपाळातील हे सैनिक म्हणजे कोणी आपल्या इकडच्या परतंत्र संस्थानांतील, बुद्धिबळांतील प्यादी नसतात ; तर त्यांनी मारिलेल्या लढायांत त्यांनी अर्वाचीन युद्धकलेतील नव्यांतील नव्या आयुधांचा उपयोग केलेला असतो. ते शूरांतील शूर जर्मनांच्या तोफांवर तुटून पडलेले असतात. अफगाणांच्या कडव्यांतील कडव्या सीमान्त रानवटांच्या छातीत, खुकरी खुपसून उभे राहिलेले असतात , विषारी धुराच्या वातावरणांत ठाण मांडून झुंजलेले असतात ; वरून भयंकर नवीन स्फोटके वर्षणार्यात जर्मन विमानांस खालून गोळ्या घालून पक्षासारखे टपकन भूईवर पाडून टाकलेले असतात. आपल्या इकडील जे लोक , इंग्रजी सैनिकांबरोबर युरोपीय युद्धांतही न हटता लढत राहिले , तसे तर ते

लढलेले असतातच; पण त्यावाचून इंग्रजांच्या अधिपत्त्याखालीच कायती झुंज घेण्याची परावलंबी संवय, स्वतंत्रपणे झुंज देण्याची संधीच त्यास न मिळाल्यामुळे जशी आपल्या इकडच्या हिंदी शिपायांस लागलेली असते तशी आपल्या नेपाळातल्या हिंदू शिपायांस नसून ते आपल्या हिंदू सेनापतीच्या आज्ञेखाली स्वतंत्रपणेही शिस्तीने युद्धे लढू शकतात. नेपाळांत सैनिकच नव्हे, तर प्रबळ हिंदु सेनानी आणि सैन्य संचालनातही युरोपसारख्या युद्धशास्त्रांत अग्रणी झालेल्या खंडातच ज्यांनी आपले सेनापतीत्व निष्णतापूर्ण रीतीने गाजविले असे हिंदू सेनापतीही असतात. नेपाळात जपान इत्यादी देशांतून शिकून आलेले युद्ध सामुग्रीकार, शिल्पी आहेत. इतकेच नव्हे तर नवीन तोफा ओतणारे आणि तोफांच्या आणि इतर आग्निनलिकांच्या रचनेत सुधारणा करून नवीन आयुधे निर्माण करणारे काही कल्पकही निघत आहेत. पूर्वी नेपाळास सर्व शस्त्रास्त्रे ब्रिटिश हिंदुस्थानांतूनच आणवावी लागत; पण आता ती अट नेपाळने तोडून घेतली असून आता नेपाळला इतर कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे आयती शस्त्रास्त्रे वाटेल त्या देशातून आणता येतात. अफगाणिस्थानांत एकंदर लढाऊ लोक जास्तीत जास्त पंचवीस लक्ष उभारता येतील, तर नेपाळलाही तितकेच उभारता येण्यासारखे आहेत. अफगाणिस्थान आणि नेपाळच्या आर्थिक सामर्थ्यात किंवा निसर्ग सामर्थ्यातही काही म्हणण्यासारखा फरक नाही. हिमालयाच्या दुर्लंघ्य तटाचे नेपाळास चोहोबाजूंने संरक्षण मिळत आहे. नेपाळास समुद्रतट नसल्याने त्याचा कोंडमारा होतो. तर अफगाणिस्थानचीही तीच स्थिती आहे. आणि म्हणून तर अफगाणिस्थान कराची बंदर घशांत टाकण्यासाठी इतका हपापलेला आहे.

सध्याच्या जागतिक राजकारणाच्या उलाढालीतही नेपाळहून अफगाणिस्थानचे भाग्य काही फारसे अधिक उघडलेले नाही. अफगाणिस्थानच्या एका बाजूस इंग्रज उभा आहे. तसा नेपाळच्याही आहे. अफगाणिस्थानच्या मागे रशियासारखी बलाढ्य आणि इंग्रजांच्या मुळावर आलेली प्रजासत्ताक शक्ती उभी आहे , तर नेपाळच्या सीमेलाही तीच शक्ती तितक्याच उत्सकतेने पाठिंबा देण्यास उभी आहे. रशियाचे योद्धे, विमाने, सेनापती, शास्त्रज्ञ अपार शस्त्रसामुग्री दार उघडताच अफगाणिस्थानांत ओतली जाऊ शकेल. तशीच ती नेपाळातही एका घटकेच्या आत पोचू शकेल. अफगाणिस्थानच्या पश्चिमेस त्याच्या संस्कृतीची आणि त्याच्यासारखीच इराण , तुर्कांची राष्ट्रे आहेत , तर नेपाळच्याही पूर्वेस चीनचे विस्तृत जिवंत आणि समर्थ बनत चाललेले आणि नेपाळच्या हिंदु संस्कृतीस देवसंस्कृती-प्रमाणे पूज्य मानणारे वृद्ध राष्ट्र त्याच्या हाताशी हात घालण्यास सज्ज आहे. अफगाणिस्थानास हिंदुस्थानांतील अफगाणांचे धर्मबंधु सात कोटी मुसलमान यश चिंतीत आहेत; तर नेपाळास त्याच्या रक्तामांसाच्या धर्मबंधूचांच नव्हे तर स्वदेश बंधूंचीही २२ कोटी हिंदु जनता यश चिंतीत आहे.

नेपाळ आणि अफगाणिस्थान हे प्रस्तुत असे जवळ जवळ सबळ असताही आणि दोघांच्या दाराशीही एक अत्यंत भव्य दिव्य आणि महान भवितव्यता विजयमाला घेऊन उभी असताही तिच्या स्वागतासाठी अफगाणिस्थानचे हृदय इतके उतावीळ साहसी आणि उत्कट का? नेपाळचे हृदय इतके थिल्लर , भयभीत आणि उद्विग्न का ? त्या महान भवितव्यतेचे तेज पडताच अफगाणिस्थानचे डोळ्यात वीरश्रीचे पाणी चकाकू लागले आहे. पण त्याच तेजाने नेपाळचे नेत्र दिपावल्यासारखे होत आहेत. त्या तेजस्वी महत्वाकांक्षेचा संचार होताच , अफगाणिस्थानचे वीरबाहु फुरफुरू लागले आहेत. पण नेपाळचे बाहु कंपायमान होत्साते त्यांचे शरसंधान चळू लागले आहे. कोण्या अद्भुत आशेच्या शिखरावर चढून चढून अफगाणिस्थान आगामी भाग्यश्रीच्या दुंदुभीचे निनाद , ऐकण्यासाठी हपापत आहे; तर नेपाळ त्या निनादाचे पडसाद जसजसे जवळ येत चालले आहेत तसतसा अधिकच संत्रस्त होऊन कानात बोटे घालू पहात आहे. हे असे का?

नेपाळा! असे करू नकोस. भारतश्री , तुझ्या दारांशी ठोठावीत आहे! नेपाळा , उठ, भिऊ नकोस, तर रामचंद्राच्या आणि विक्रमाच्या वंशास साजेल असा साहसाने पुढे होऊन तिचे स्वागत कर! ती विजयश्रीची माळ तुझ्याच गळ्यात रुळावी म्हणून ही भारतीय आशेची सीता उत्कंटित झालेली आहे! तरी हे हिंदु वीरा आता हिंदुत्वाची लाज राख. तू उदयपुरच्या महाराण्यांचा वंशज , उदयपूरचे महाराणे स्वतःस हिंदुपती म्हणून म्हणवीत आले, तो मान तुझा! मग हे काय? आमचे सगळ्यांचे हात तुटले, तेव्हा हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज देवाने तुझ्या हाती सोपवून दिला. तो तू अजूनही तोलून धरीत आहेस , मग आता भाग्याचा आणि विजयाचा मुहूर्त अगदी हाताशी आला असता , हा व्यामोह, तुला शोभत नाही; तर भिऊ नकोस, साहसे श्रीः प्रतिवसती!

नेपाळचे महाराज आणि अफगाणिस्थानचा अमीर हे दोघेही कालगतीने सध्या अशा एका भाग्य बिंदूवर येऊन पोचले आहेत की, एक पाय चुकला, भीतीने तो एक क्षणभर जर रेंगाळला, तर सहस्त्र सहस्त्र वर्षांनीच कायती एकदा केव्हा तरी सामोरी येणारी राष्ट्रलक्ष्मी पाठमोरी होऊन निघून जाईल, पण सुनिश्चित साहसाचा, दृढ हस्त पुढे करण्याचा अवकाश की सहस्त्रोसहस्त्र वर्षांच्या राष्ट्रीय तपस्या , फलोन्मुख झाल्या तरच जो एखाद्या वीरपुंगवास लाभू शकतो, असा एक दैदीप्यमान महानमुगुट विजयश्री त्याच्या मस्तकावर स्थापन करील!

अशा निर्णायक क्षणी या दोन्ही राष्ट्रांच्या कार्यक्रमांत आणि साहसात केवढा फरक पडत चालला आहे! या डिसेंबरमध्ये काबूलचा राजा आणि नेपाळचा महाराजा हे दोघेही फिरतीवर निघणार आहेत. पण काबुलचा राजा हिंदुस्थानची गिधाडी पाहणी करून लगेच युरोपमध्ये निरनिराळ्या राजधान्यांस भेट देणार. तो इंग्लंडला जाऊन इंग्लंडच्या सम्राटाबरोबर गाडीत एक स्वतंत्र राष्ट्राच्या अधिपतीच्या अधिकाराने मिरवून , इंग्लंडने

आपले स्वातंत्र्य मान्य केले आहे - त्याची युरोपभर नाटकी थाटामाटाने घोषणा करील! तो फ्रेंच अध्यक्षास भेटेल, जर्मन राष्ट्राचे अध्यक्ष वीरवर हिंडेनबर्ग यांच्याशी कानगोष्टी करील; बहुधा, रशियाच्या बलाढ्य आणि त्याच्याशी स्नेहसंबंध स्थापित केलेल्या सोव्हियत सरकारास भेट देऊन केवळ इंग्रजांस चिडविण्यासाठीच मॉस्कोच्या जनसंमर्दाकडून होणार्या त्याच्या जयघोषाचा मार्गातून स्वीकार करील आणि मुसोलिनीला नसला तरी तुर्कस्थानच्या केमालपाशाला प्रत्यक्ष भेटून येईल. अशा रीतीने अफगाणिस्थान म्हणून एक निर्जिव नावच कायते ज्या जगाने ऐकिले होते. त्या जगात अफगाणिस्थान हे एक जिवंत राष्ट्र असून जगाच्या घडामोडीत त्याचे एक स्वतंत्र स्थान आहे. इतकेच नव्हे तर जगातील बलाढ्य राष्ट्राशी जीविषयी चर्चा करणे अवश्य आहे आणि जिचा धाक त्या बलाढ्य राष्ट्रांसही पडावा, अशी एक महान महत्वाकांक्षा त्याच्या हृदयात शिरू शकावी इतका तो साहसप्रबळ झालेला आहे, अशी तो जगतास प्रत्यक्ष प्रचिती पटवून सोडील.

वास्तविक पाहता अफगाणिस्थान म्हणजे एक टीचभर देश , न समुद्रतट , न सरोवर, न शीण-गंगेसारखी नदनदी. पण इंग्लंडसारख्या प्रबळ सुंदाची रशिया-सारख्या प्रबळ उपसुंदाशी जी टक्कर जुंपलेली आहे , आणि जी आता लवकरच हातघाईवर येणार आहे- त्या दोघांच्या झुंजीत या लहानशा अफगाणिस्थानचे स्तोम सहजगत्या इतके वाढले आहे की, मॉस्को आणि लंडन या दोन्ही बलाढ्य राजधान्यांत जर्मनीची किंवा अमेरिकेची जितकी चर्चा चालते , तितकीच या भावी संग्रामार्थ अफगाणिस्थानच्या शत्रुमित्रत्वाची धाकधूक लागून राहिली आहे. अफगाणिस्थानने हे त्याच्या भाग्यश्रीने खाल्लेली असंभव्य उचल पुरती ओळखिली आणि तिच्या हेलकाव्यासरशी चक्कर येऊन घाबरून न जाता तो तिचा पूर्णपणे उपयोग करून घेण्याचे साहस करू शकला आहे. यातच त्याच्या प्रस्तुत यशाची आणि भावी विजयाची मुख्य किल्ली आहे. भावी महायुद्धाच्या अभूतपूर्व उलाढालीत आपले भाग्य उघडून घेण्यासाठीच अफगाणिस्थानचा अमीर, युरोपला जात आहे. तो तिकडे प्रत्येक राजधानीत हिंडून आंतरराष्ट्रीय संगनमते करून, गुप्त आणि प्रकट कारस्थाने रचून आंतरराष्ट्रीय बाजारात आपल्या कर्तृत्वाच्या नाचण्या ओरडून अधिकांत अधिक दराने विकल्यावाचून राहणार नाही. नेपाळच्या गव्हांहूनही असंभाव्य अधिक दराने , अफगाणिस्थानच्या नाचण्या , विकल्यावाचून राहाणार नाहीत. कारण अफगाणिस्थान युरोपच्या आंतरराष्ट्रीय बाजारात राज्यांच्या देवघेवीची भाषा भयरहित साहसाने स्पष्टपणे बोलू लागला आहे.

पण नेपाळ? तो आंतरराष्ट्रीय बाजारात तर राहोच ; पण स्वतःच्या मनाशी देखील या साहसी देवघेवीची भाषा , बोलण्यास दचकत आहे! दुसरे आपल्या नाचण्या देखील ओरडून विकीत असता , नेपाळ आपले गहू देखील जगास दाखविण्यास कचरत आहे. बाजारभाव टिकाऊ नसतात; म्हणून शंकाविव्हळ हृदयाने आम्ही आमच्या नेपाळी देशबंधूंस

चेतावणी देत आहेत की वीर हो वेळीच सावध व्हा ; नाहीतर परके नाचण्यावारी साम्राज्ये विकत घेतील आणि आपल्या गव्हांसही ही असंभाव्य संधी निघून गेली की , कोणी थुंकूनही विचारणार नाही!

अफगाणिस्थानचा राजा युरोपातील बलाढ्य राष्ट्रांशी भावी महायुद्धाची कूटकारस्थाने करण्यास लंडनपासून मॉस्कोपर्यंत दौरा करण्यास निघाला असता , नेपाळचे महाराजही डिसेंबरातच दौर्या वर निघणार आहेत. पण तो दौरा कोठपर्यंत ? तर कलकत्त्याच्या कुंपणापर्यंत! तेथे म्हणे व्हाइसरॉयांशी काही बोलणी होऊन ते परत नेपाळांत जाणार! का ? अफगाणिस्थानचा राजा मोठ्या डौलाने स्वतःच्या स्वतंत्रपणाचा ध्वज फडकावित काबुलपासून युरोपखंडाच्या राजधान्यास जाऊन येण्यास निघाला असता नेपाळच्या महाराजांनी सिंहाचे कातडे पांघरून कलकत्त्याच्या कुंपणापर्यंतच काय ते सरपटून थांबावे! हे असे का? जी महत्वाकांक्षा अमीरास अफगाणिस्थानच्या बाहेर, वीरश्रीचा संचार करवीत आहे. तत्समान, कोणा महान आशेचा स्पर्श, नेपाळच्या हृदयास झालाच नाही की काय ? नसेल तर या पक्षाघातास कारण काय- याचा दोष कोणाकडे- यास काय उपाय योजावा?

ह्याचे कारण म्हणजे, साहसाची शक्तीच- आत्मविश्वासाचा दुर्दांतपणा- हिंदूंच्याही ललाटी भाग्यश्रीची महान भवितव्यता लिहिलेली असू शकेल ही भावनाच आपल्या हिंदु जातीत नामशेष झालेली आहे हे होय. चाणक्याची चंद्रगुप्ताची विक्रमाची परंपराच मृतप्राय झालेली आहे हे होय.

याचा दोष एकट्या नेपाळच्या महाराजांचा किंवा कोण्या अधिकार्याचचा नसून तो दोष अवघ्या हिंदुजातीचा आहे. महाराज काय एक व्यक्ती- उभ्या राष्ट्राच्या पाठिंब्यावाचून ते तरी काय करणार? आणि तो पाठिंबा असताही ती एक व्यक्ती मागे पुढे करू लागली ; तर तिची कथा तरी काय आहे ? राष्ट्राने केलेला निश्चय आणि केलेले साहस त्यास झेपणार नाही तर त्या व्यक्ती दूर सारून राज्यवर्धिष्णु शक्तीने संपन्न असा दुसरा अग्रणी राष्ट्रास निवडता येईल.

याचा उपाय आता हा एकच आहे की उभ्या हिंदुजातीच्या तिच्याच अकर्मण्य भीरुतेमुळे झालेल्या या पक्षघाताच्या रोगास निरस्त करून तिच्यांत नवचैतन्य भरविण्यासाठी त्या हिंदुजातीत प्रस्तुत वीरतेचे संघटनेचे आणि स्वातंत्र्याचे सामर्थ्य ज्यांच्यामध्ये सापेक्षतः अधिक प्रमाणांत निवसत आहे , त्या आमच्या नेपाळी वीरवरांनी गुरखा जातीने हिंदूंचा प्रकट पुढाकार घेऊन जगात जी राज्या साम्राज्यांच्या देवघेवीची भीषण चढाओढ लागली आहे, तिच्यात निर्भिडपणे उडी घ्यावी! ते स्वतंत्र आहेत; ते राजस आहेत, ते वीर आहेत. अफगाणिस्थानच्या प्रतिस्पर्धेस हाणून पाडून , भाग्यश्रीची वरमाला वरण्याचे त्यांच्यात सामर्थ्य आहे. म्हणूनच आम्ही त्यांसच उभ्या गुरखा- जातीसच- ही साग्रह विनंती करीत आहो. की त्यांनी आता आपल्या दाराशी ठोठावित उभ्या असलेल्या

या महान भारतीय भवितव्यतेचे स्वागत करण्यास हिंदुत्वाचा ध्वज उत्तोलून आणि "देव मस्तकी धरून" कार्यक्षेत्रात उतरावे अढळ ठाणे मांडावे, कर्तव्यावर अचूक शरसंधान करावे.

जर नेपाळांतील गुरख्यांस प्रकटपणे आपल्या महत्वाकांक्षा समजत नसतील तर गुरख्यांच्या पुढार्यांनी त्यास त्या समजावून द्याव्या. अफगाणिस्थान ज्या निर्भय साहसाने पुढे जात आहे. त्याच गतीने आणि परिस्थितीस अनुरूप आणि अनुकूल पडेल त्या भिन्न किंवा समान साधनांनी आणि मार्गानी त्यांनी नेपाळ राष्ट्रास रणक्षेत्रांत उतरण्यास भाग पाडावे.

जी सुवर्ण संधी अफगाणिस्थानास हाक मारीत आहे. तीच नेपाळास हाक मारीत आहे. बलाबल समान आहे. शत्रु मित्र समान आहेत. अफगाणिस्थान स्वतंत्र्योत्सव जसा डौलांत गाजवितो तसा नेपाळने का गाजवू नये ? अफगाणिस्थानने रशियादिक युद्धशास्त्रांतील वैमानिक, सैनिक, सामुद्रिक आणि आर्थिक तज्ञ आणून आपले वैमानिक , सैनिक सामर्थ्य वाढविले, तसे नेपाळनेही इंग्रज, जपान, रशिया इत्यादी राष्ट्रातील तज्ज्ञांस आणून आणि डोईजड होईतो कोणत्याही एका राष्ट्राची तज्ञांच्या हाती आपली शेंडी न देता आपली वैमानिक आणि सैनिक सिद्धता निदान अफगाणिस्थानाइतकी तरी प्रबळ का करून घेऊ नये ? अफगाणिस्थानाने, युरोपात फ्रेंच जर्मन इटली इत्यादी राष्ट्रांत आपला राष्ट्रप्रतिनिधी नेमून स्वतंत्र राष्ट्राचे अधिकार गाजविले तसे , नेपाळनेही आपले राष्ट्रप्रतिनिधी युरोपांतील प्रत्येक राजधानीत स्वतंत्रपणे का स्थापू नये?

या एका गोष्टीचा देखील किती दूरवर परिणाम होईल. उभ्या जगात हिंदूंचे स्वतंत्र राष्ट्र असू शकते ही कल्पनाच लुप्त झाली आहे. नेपाळचा स्वतंत्र हिंदु ध्वज पॅरिस , बर्लिन, मॉस्को, लंडन, रोम, न्यूयॉर्क येथे त्या त्या देशांतील आपल्या स्वतंत्र राजदौत्यागारावर (कॉन्सलेटवर) तर फडकत राहील ; तर हिंदूंचेही अजून एक तरी स्वतंत्र राष्ट्र जिवंत आहे. ही घोषणा उभ्या जगात होणारी आहे, हिंदूंची पत उभ्या जगात वाढणार आहे. इतकेच नव्हे तर ही जाणीव होताच आज अफगाणिस्थानची जी महती युरोपास वाटत आहे तीच नेपाळचीही वाटू लागून ; नेपाळच्या स्वातंत्र्यास ती राष्ट्रे धडाधड मान्यता देऊ लागतील. पेशव्यांचे पुणे पडल्यापासून परराष्ट्राचे राजदूत हिंदूंच्या राजवाड्यांपाशी येणे बंद झाले ते पुनः येरझारा घालू लागतील. काठमांडूच्या हिंदु राजवाड्यांच्या महाद्वाराशी फ्रेंचांचे जर्मनीचे आणि रशियाचे राजदूत येऊन वाट पहात उभे राहतील आणि अफगाणिस्थानशी परराष्ट्रीय राजकारण बोलून त्याच्या मैत्रीची जशी याचना करीत आहेत तशी नेपाळची करूं लागतील! ह्या योगे नेपाळचे राष्ट्रबळास , जागतिक नैतिक बळाचा पाठिंबा मिळून इंग्रजांस आज असलेली मैत्री अधिक दृढ करण्याची प्रबळ इच्छा होईल.

तसेच अफगाणिस्थानाप्रमाणे नेपाळनेही आता राष्ट्रीयसंघांत लीग ऑफ नेशनमध्ये आपले स्वतंत्र राष्ट्र- प्रतिनिधी धाडून आपले स्वातंत्र्य का प्रस्थापू नये ? युरोपांत जर्मन

युद्धाचे वेळी आमच्या गुरख्यांनी गाजविलेल्या शौर्यामुळे त्यांच्या शूरत्वाविषयी आदरच नव्हे, तर वचक उत्पन्न झालेला आहे. पण गुरखे म्हणजे इंग्रजांचे दास , ही त्यांची समजूत आहे. ती नेपाळ खोटी का पाडीत नाही ? रशियांशी टीचभर अफगाणिस्थान , तुल्यारिमित्रत्वाचा संधी करितो- नेपाळनेही तसा नको ; पण निदान व्यापारी संधी तरी स्वतंत्रपणे का करू नये? आज नेपाळचे स्वातंत्र्य, लंडनास कागदावर काय ते नोंदिले आहे. त्याच्या उपयोग आणि उपभोग घ्यावयाची इच्छा नसेल तर त्याचा काय उपयोग ? तुर्कस्थान, चीन आणि इराण आणि शक्य तर जपान , यांच्याशीही अफगाणिस्थानाप्रमाणेच आपल्यास हितकर ते ते संधी नेपाळ का करीत नाही ? कमीत कमी एकदा स्वतः नेपाळचे महाराजा, प्रधान महाशय हे युरोपांतील राष्ट्रास स्वतंत्र राष्ट्राच्या अधिकाराने जाऊन भेट का देत नाहीत ? मुसोलिनी काय म्हणतो ते का ऐकत नाही ? हिंडेनबुर्गशी हस्तांदोलन करून, ट्राट्स्कीच्या कानाशी लागून फ्रेंच अध्यक्षांशी मंत्रणा करून लंडनच्या सम्राटांचे बरोबरीने खुर्चीशी खुर्ची टाकून केमालपाशाच्या अंतरंगात डोकावून नेपाळचा वीर प्रधान का परत येत नाही ? नुसत्या कलकत्त्याच्या कुंपणापर्यंत धावणारा सरडा होऊन , तो का राहतो? का? भय? कोणाचे? का? एकदा युरोपच्या आंतरराष्ट्रीय घडामोडीत बोट खुपसा , की हे हिंदुपते! असलेले भय नष्ट होईल , नसलेले बळ प्राप्त होईल! थोडे साहस करा- की आपल्या पूर्वजांच्या दहा दहा पिढ्यांची भाग्यांची स्वप्ने , आज त्या पिढीत खरी ठरतील आणि तो सोन्याचा दिवस उगवेल! सरड्यासारखे नाही, आता सिंहासारखे चला.

इंग्लंड तुमचे मित्रराष्ट्र , तुमच्या न्याय्य महत्वाकांक्षेस सहाय्य करणे हेच मित्राचे कर्तव्य. तशात तुम्ही स्वतंत्रही आहात. अफगाणिस्थानचे आकांक्षांना ते आजही प्रत्यवाय करीत नाहीत. तुम्हीही निर्भयतेने न्याय्य आकांक्षा संपादन करण्यास लागा. शूर गुरख्यांचे वीरराष्ट्र तुम्हापुढे आहे. हे २२ कोटी हिंदु तुमच्या पाठीशी आहेत. आंतरराष्ट्रीय भव्य भीषण, उलाढालींची संधी हाताशी आहे.

म्हणून ईश्वरावर भरंवसा टाकून हे गुरखा जाती , आपले भाग्य आपल्या हाताने लिहून काढ. इंग्लंड आज तुझा मित्र आहे. त्याहून दसपट मैत्री तोच तुझ्याशी त्याच क्षणी दाखवू लागेल , की ज्या क्षणी तू तुझ्या या दाराशी ठोठावीत असलेल्या , भारताच्या भाग्यश्रीचे स्वागत करण्यास तुझा निद्रिस्त वीरबाहू पुढे करशील! एतदर्थ याच क्षणी हे क्षूद्र हृदयदौर्बल्य त्यक्त्वा, उत्तिष्ठ परंतप!! तुझे कार्य न्याय्य (Just) आहे. तुझी साधने वैध (Legitimate) आहेत! नेपाळा, तुला विजयश्री माळा घेऊन वाहीत आहे!

लेखांक १३ वा

# अमीर, आपण इतके गोड बोललात की, आम्हांस आपला बळकट संशय येतो

**(५ जानेवारी १९२८)**

**साध्वाचारो साधुना प्रत्युपेयः।**
**मायाचारी मायया बाधितव्यः।।**

काबूलच्या अमीरांनी विलायतेस प्रवास करण्याकरिता हिंदुस्थानांतून जाण्याचे ज्या दूरदर्शी उद्देशाने ठरविले होते , तो त्यांच्या मनातील उद्देश आशातीतपणे सफळ झाला , त्यात काही शंका नाही. कराचीपासून मुंबईच्या धक्क्यापर्यंत लाख लाख मुसलमानांनी त्यांचे प्रचंड आणि अगदी मनःपूर्वक स्वागत करून अमीर त्यांच्या मनांतील ज्या भावनेचा ठाव पहात होते, त्या भावनेचे उत्कट अस्तित्व त्यांच्या प्रत्ययास आणून दिले. (अमिराने , जे न बोलता विचारले ते हिंदी मुसलमानांनी न सांगता कळविले)

सरकारनेही अमीराच्या स्वागतास शक्य तितके भव्य स्वरूप देण्यास हयगय केली नाही. वास्तविक पाहता अमिराहून हैद्राबादचा निझामदेखील जवळ जवळ तितक्याच उत्पन्नाचा धनी आहे आणि अमीर जितक्या प्रदेशांवर किंवा लोकसंख्येवर राज्य करतो ; तितक्या किंवा त्याहून जास्त प्रदेशावर आणि लोकसंख्येवर राज्य करणारे राजेही हिंदुस्थानात दुर्मिळ नाहीत. परंतु हैद्राबादेचे निझाम किंवा म्हैसूर महाराज किंवा सूर्यकुलोत्पन्न उदयपूरचे राणे मुंबईस कधी येतात आणि कधी जातात याचा सामान्य जनतेस पत्तादेखील लागू नये, इतक्या दुलर्क्ष्याने जे सरकार त्यास वागविते, तेच सरकार आणि त्याचे व्हाईसरॉय आपल्या बायकामुलानिशी एकाद्या सम्राटासारखा बडेजाव ठेवण्यात दंग झाले होते त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे स्वातंत्र्य होय. अफगाण स्वतंत्र आहे. एतदर्थ त्याने आता पाच सहा वर्षापूर्वीच इंग्रजांशी उघड उघड युद्ध केले असतांही आज त्याचे जीवश्च कंठश्च मित्र म्हणून , राजकीय थाटामाटाने स्वागत केले जाते आणि त्याच्या इतकाच उत्पन्नाचा आणि प्रजेचा धनी असणार्याग निझामाने मध्यंतरी थोडी बरोबरीने दृष्टीस दृष्टी मिळविण्याचे प्रयत्न करताच त्याची मान यःकश्चित पोलिसी दंडुक्याने पुन्हा खाली चेपण्यात आली.

अमीर स्वतंत्र आहे. म्हणून इंग्रज सरकारने त्याचा एवढा उदो उदो केला. हे जरी खरे आहे. तरी त्याच्या आगमनास एवढे महत्व येण्याचे दुसरेही एक परिणामकारक कारण होते. हे विसरून चालणार नाही. ते कारण म्हणजे अफगाणिस्थानच्या भोवती असलेल्या रशिया, तुर्क आणि अराणादिक स्वतंत्र राष्ट्राचे इंग्रजांविरुद्ध रचले गेलेले कूट हे होय. जर

शक्य असते तर सरकारने अमीराला हिंदुस्थानांतून प्रसिद्धपणे सार्वजनिक स्वागत स्वीकारीत आणि आपल्या केल्या गेलेल्या सरकारी बडेजावाने मुसलमानांतील बाजारबुणग्यांचे मनावर इंग्रजी सत्तेची क्षुद्रता आणि अफगाणची नसती प्रबलता याचा विकृत परिणाम होऊ देऊन हिंदी मुसलमानांचे डोळ्यास अंधेरी आणणारी , अफगाणी राज्य हिंदुस्थानावर करविण्याची , भयंकर महत्वाकांक्षा जागृत करण्याची चूक केली नसती. अमीराच्या स्वागताची संधी साधून हजारो खिलाफती गुंडांनी , मुसलमानांत मुसलमान बादशाहीविषयी, घातुक लालसा उत्पन्न करण्याचा कावा साधून घेतला.

हे इंग्रजांस कळत नाही असे नाही. अमीराचे आणि त्याच्या पुढे मागे नाचणार्या, खिलाफती पुढार्यांचे मनात काय चालले आहे याचा ठाव न लागण्याइतकी ती मने खोल नव्हती किंवा त्या उथळ मनांतील मर्मही दिसू नये इतकी दृष्टी अंधळी असण्यास इंग्रज म्हणजे काही कोणी हिंदूतील राजकारणी बाया-बापड्याही नव्हेत. परंतु अमीराचे स्वागत राजकीय डामडौलाने करण्याचा आणि सार्वजनिकपणे हिंदी-मुसलमानांस करू देण्याचा घातुक परिणाम दिसत असूनही इंग्रजांस अमीराला सार्वजनिकपणे हिंदुस्थानातून मिरवत जाऊ द्यावे लागले. - कारण त्याच्यामागे उभा असलेला इराण आणि तुर्कस्थान ; पण मुख्यत्वे रशिया! जर अमीरास हिंदुस्थानांतून मिरवत जाऊ देण्यात आले नसते तर तो द्वेषाने अधिकच जळफळत रशियाच्या मार्गाने युरोपात उतरून त्याच्या मनात उद्दीपित झालेली साम्राज्याची महत्वाकांक्षा सफळ करण्यासाठी रशियादिक इंग्लंडच्या शत्रूंशी अधिकच प्रकटपणे लगट करू लागता. एतदर्थ वरवर तरी , असलेली गोडी बिघडवून घेण्याची चूक इंग्रजांनी केली नाही. अमीराच्या स्वागतार्थ जी जी इंग्रजी तोफ सुटत होती ती अमीराच्या प्रेमाची तितकीशी द्योतक नव्हती ; परंतु ती रशियाच्या प्रतिस्पर्धित्वाची आणि भीती संकुल संशयाची द्योतक होती.

अमीराच्या दौर्यास जे एवढे गाजावाजाचे स्वरूप आले त्याने मुसलमानी बाजारबुणग्यांपासून तो खिलाफती पुढार्यांपर्यंत जगात अखंड मुसलमानी बादशाही स्थापित करण्याविषयी सदोदित घुमसत असलेल्या धर्मांध महत्वाकांक्षेस अमीर बळी पडण्याचा उत्कट संभव आहे हे जसे एक कारण अफगाण स्वतंत्र आणि बलवंत असल्यामुळे त्याचा गौरव बरोबरीने करण्याचे थोडेफार भागच पडले, आणि तसे जर न केले तर तो रशियाच्या हातात अधिकच त्वरेने जाऊन पुढे मागे हिंदुस्थानवर रशियाची स्वारी झाल्यास तो इंग्रजांच्या विरुद्ध रशियाच्या हातात एक अधिकच प्रबळ साधन होऊ शकेल हा सरकारास पडलेला पेच हे जसे दुसरे कारण तसेच तिसरे एक कारण त्या दौर्या स इतके बडेजावाचे स्वरूप आणण्यास निमित्तभूत झालेले होते. ते म्हणजे प्रस्तुत अमीराची व्यक्ती होय. हा अमीर काबूलच्या सिंहासनावर बसलेल्या राजांमध्ये एक अत्यंत कर्ता आणि महत्वाकांक्षी पुरुष आहे. यात शंका नाही. नादिरशहा आणि अहमदशहा यांच्याप्रमाणे तो हिंदुस्थानच्या

बादशाहीचे मांडे मनातल्या मनात पूर्वी तरी खात होताच. हे निश्चित असल्याने तो त्यांच्यासारखा महत्वाकांक्षी आहेच , आहे. ती महत्वाकांक्षा प्रत्यक्षपणे व्यवहृत करून दाखविणार्या कर्तृत्वांत तो त्याची बरोबरी करू शकेल , की नाही; ही गोष्ट जरी अजून सिद्ध व्हावयाची आहे. तथापि, काबूलचे सिंहासन हस्तगत करण्यांत उभ्या अफगाणांच्याच नव्हे तर उभ्या हिंदी मुसलमानांच्या धार्मिक आणि राजकीय आशेचा केंद्र आपणाकडे ओढून घेण्यात आणि राशियासारख्या इंग्रजांच्या शत्रूंशी उघडपणे सूत्रे जुळवून आणि संधी स्थापून त्यांने इंग्रजांस ज्या साहसाने दाबात ठेवले आहे ते साहस दाखविण्यात त्याने विलक्षण कर्तृत्वशक्ती आधीच व्यक्त केलेली आहे. त्यांची प्रगतिप्रियता ही कमालपादशाहाच्या वळणावर जात आहे. अशा कर्त्या राजकारणी , महत्वाकांक्षी आणि साहसी, राजाचे तेज हे वाखाणल्यावाचून शत्रूसही रहावणार नाही. हे साहजिक आहे आणि म्हणूनच त्याचे एवढे देव्हारे माजविण्यात राजकीय धोरण घातक होणारे आहे हे मनात डांचत असणार्या नाही काबूलच्या या पौरुषशाली अफगाण राजाचे वैयक्तिक तरी स्वागत करावे, असे जे वाटले ते पराक्रमाची प्रशंसा करणार्याक मनुष्याच्या उपजत प्रवृत्तीचेच एक द्योतक होते.

ज्या व्यक्ती-महत्तेने अमीराचे स्वागत , इतक्या गाजावाजासह घडवून आणले , त्याच व्यक्ती- महत्तेने त्या प्रचंड स्वागताचा जसा कारस्थानी उपयोग करून घ्यावयास पाहिजे होता, तसा करून घेणारा गंभीर आणि मर्मभेदक अभिनय करण्याची शक्तीही अमीरास प्राप्त करून दिली. मुसलमान लोक तर अफगाणी राजास , आपला बादशाह मनांतल्या मनात मानतातच आहेत. त्यांची त्याच्या भारतीय राजकारणाविषयक भयंकर आकांक्षास सक्रिय सहानुभूतीही मिळणारीच आहे. याचे अमीरास गेल्या महायुद्धापासून त्यासरखे प्रत्यंतर मिळतच होते. परंतु त्याच्या मनाला हिंदुजनतेची आपणाविषयी काय भावना आहे हे अजमावून पहावयाचे होते. हिंदूंची सहानुभूती संपादन करावयाची होती. त्या उद्देशास तो लाख लाख मुसलमानांच्या 'अल्ला हो अकबर 'च्या आणि 'अफगाणी बादशाहाकी जय 'च्या गर्जनांच्या वादळांतही विसरला नाही. त्या लोकसमुद्राच्या अपूर्व लाटावर आरूढ झाला असता , त्याची मांड ढळली नाही. ते स्वागत आपला जन्मदत्त अधिकारच आहे; अशा सहज थाटाने त्याने स्वीकारून हिंदूंच्या मनास जे सहज वश करून घेईल असेच वर्तन आणि भाषण तो निर्भयपणे करता झाला. वास्तविक पाहता अमीर हिंदूंविषयी इतके कळकळीचे उद्गार न काढता तरीही हजारो हिंदु त्याच्या स्वागतार्थ जमा झालेच असते आणि शेकडो लघाळ नि लाळघोटे लोक त्यांच्यापुढे पुढे करण्यासाठी लाळ घोटीत उभे राहिलेच असते. कारण लतकोडगेपणाच्या आणि परधार्जिण्या भिकारडेपणाच्या जिण्याचे हिंदूंमध्ये आजकाल तर नुसते पेवच फुटले आहे. हिंदूंच्या ह्या उपजत 'उदो उदो' करण्याच्या प्रवृत्तीस त्या विलक्षण अफगाणाने तत्काळ ओळखून टाकले आणि सरासरी

वीस बावीस गोंडस वाक्यात त्याने लाखो हिंदूंस लाखो मुसलमानांप्रमाणेच आपल्या वर्चस्वाचे दास करून सोडले. त्या वीस बावीस गोंडस वाक्यांसरशी अफगाणच्या अमीराच्या राजकीय धोरणाचा सुगावा असलेल्या हिंदु वृत्तपत्रकारांसही त्याने त्याचा विसर पाडला. उभे हिंदु मुद्रालय (The press) त्याने वीस बावीस वाक्यासरशी विकत घेतले. आजकालची लतकोडगी उदारता तर इतकी भाळली की तिने अमीराच्या त्या बावीस वाक्यांस एखाद्या नवीन वेदाचा अविर्भाव कल्पून त्याचे श्रवण मनन निदिध्यास करण्यासाठी त्यांची परम भक्तीभावाने साप्ताहिक आणि दैनिक पारायणेच सुरू केली.

हिंदूविरुद्ध ते वाईट बोलले असते , तर कोणी अमीराचे तोंड थोडेच धरणार होते! तरी पण ते हिंदूंविषयी इतक्या न्याय्य दृष्टीने बोलले हे त्यांच्या थोरपणाचेच लक्षण आहे. असेही कोणाला वाटेल. एका स्वतंत्र राष्ट्राचा राजा या दृष्टीनेही , त्यांची काही वाक्ये स्मरणीय वाटतील. “मी प्रजेचा सेवक आहे ” हे वाक्य शक्य तो त्यांच्या राज्यांत ते आचरणात आणतात, याविषयी काही शंका नाही. त्यांनी मुसलमानांस सडेतोड उपदेश केला की, तुम्ही हिंदु धर्मास सन्मानाल तर हिंदु तुम्हांस सन्मानतील , त्यांच्याशी आततायीपणाने वागण्यात तुम्ही तुमच्या धर्मासच कलंक लावीत आहात. धर्मांधतेची बिजे पेरणारे मुल्ला हेच तुमचे खरे शत्रू असून हिंदू नव्हेत. ” असे त्यांनी लाखो मुसलमानांस बजावून सांगितले. मुसलमानांस इतके निक्षून ही वाक्ये सांगण्याचे साहस अजूनपर्यंत कित्येक लाळघोट्या हिंदूंसही होत नाही. पण ते त्या वीर्यशाली अफगाणाने केले. मुसलमानांच्या अत्युत्साही जयजयकाराने तो हुरळून जाऊन त्यांना दूर करण्याचे भयाने हिंदूंची सहानुभूती संपादण्याच्या आपल्या मुख्य उद्देशापासून तो विचलित झाला नाही. त्याच्या या धीरोदात्त, चाणाक्ष, न्याय्य आणि समयोचित वर्तनाविषयी हिंदु जनतेने त्यांचे आभार तेवढ्यापुरते तरी मानले पाहिजेत ; असेच कोणालाही वाटेल. परंतु अमीराच्या झालेल्या स्वागताविषयी इतकी चर्चा केल्यानंतर आणि हिंदुंविषयी त्यांनी काढलेल्या अनेक न्याय्य उद्गाराविषयी त्यांचे आभार मानल्यानंतर शेवटी जो मुख्य प्रश्न उभा राहतो तो हा होय की अमीराच्या हिंदुस्थानातील या सर्व उठाठेवीचा राजकीय हेतु , काय होता आणि त्यांनी हिंदूंविषयी काढलेल्या या उद्गारांचा राजकीय अर्थ काय निघतो ? ते स्पष्ट झाल्यावाचून त्या उद्गारास हिंदूंनी खरोखर महत्व किती द्यावे आणि अमीराच्या या दौर्यावचे हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीवर जे इष्टानिष्ट परिणाम घडणारे असतील ; त्यांचा पुरस्कार वा परिहार कसा करावा हे निश्चितपणे ठरविता येणारे नाही.

प्रथमतः आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की हिंदी जे लाखो मुसलमान लोक अमीरास आपल्या बादशाहीप्रमाणे जाणून बुजून मान देत होते. ते सर्व आपणा हिंदूंच्या पूर्ण परिचयाचेच गृहस्थ आहेत. त्यांच्या खिलापती आकांक्षा आणि सहाराणपुरापर्यंत , काढलेल्या रेघा आपणास ठाऊक आहेत. जर अमीर हिंदुस्थानवर स्वारी करील ; तर

इस्लामी गौरवाकरिता आम्ही त्याविरुद्ध न लढता त्यांचे यशश्चिंतनच करू म्हणून प्रकटपणे या लोकांनी उद्गार काढलेले होते. यांच्यातले शेकडो जण मुसलमानी राज्यच , हिंदुस्थानावर झाले पाहिजे , असे मत धर्ममत म्हणून धारण करणारे आहेत. बरे ज्या अफगाणांवर अमीर राज्य करतो आणि ज्याचेच आधारावर तो आपल्या राजकीय महत्वकांक्षेचे मनोरे बांधीत आहे. ते अफगाण हिंदूंविषयी काय समजतात आणि कशा प्रवृत्तीचे लोक असतात हे कोहाट आणि पेशावरच्या आगीच्या डोंबातही ज्यांस दिसले नसेल, ती मनुष्ये नसून निर्जीव प्रेतेच असली पाहिजेत. अफगाण म्हणजे पठाण आणि पठाण म्हणजे काय ? हे मुंबई कलकत्त्यातील एखाद्य पानविक्या हिंदूसही सांगितल्यावाचून समजणारे आहे! अशा आडदांड आणि हिंदूंविषयी निर्दय तिरस्कार आणि उपजत द्वेष बाळगणार्याआ पठाणाच्या सेनांचा अमीर हा सेनापती आहे आणि हिंदुस्थानास इस्लाममय करण्याचा चंग बांधलेल्या लाखो मुसलमानांचे नेतृत्व उघडपणे घेण्याची तो इच्छा करणारा आहे. इतकी एक गोष्ट जरी आपणां हिंदूंतील प्रत्येकजण डोळ्यापुढे ठेवील तरी त्यास हे सहज समजून येईल की हिंदुंशी न्यायाने वागण्याचा अमीराचा उपदेश हा शब्दशः कितीही चांगला असला- आणि तो जितक्या प्रमाणात चांगला आहे तितक्या प्रमाणात आपण अमीराचे आभारीही आहो- तथापि , त्या उपदेशाचा आतील हेतु हा आपल्या हिंदूंच्या मनात अमीराच्याविषयी प्रेम उत्पन्न करून त्याचे आधारावर हिंदुस्थानचे राज्यावर काबूलचा जो पूर्वीपासून डोळा आहे ; त्या उद्देशाचे मनोरे उभारण्याचा असावा , नव्हे जवळ जवळ असलाच पाहिजे. या अमीराचे पूर्वचरित्र आपणास ठाऊक आहे. यांच्या पूर्वीच्या अमीराने महायुद्धांत हिंदुस्थानावर स्वारी करून आपली मुसलमानी बादशाही स्थापन करण्याची महान पर्वणी साधली नाही ; म्हणून हिंदुस्थानातील खिलाफत पंथीय धर्मांध मुसलमान आणि झाडून सारा अफगाण मुसलमान त्या पूर्वीच्या अमीरावर चिडून गेला होता आणि त्याची हत्या होताच त्या क्रांतीय उलाढालीत त्या लोकक्षोभाचा पुरस्कारक म्हणूनच हा अमीर राजा होऊ शकला. आजही त्याची लोकप्रियता त्याच्या हातून हिंदुस्थानावर स्वारी करवून तो मुसलमानी बादशाहीचे रम्यद्भूत युग पुन्हा आणू शकेल याच एका आशेने प्रेरित झालेली आहे हे लाखो मुसलमानांच्या आणि पठाणांच्या तोंडून प्रत्यही जे उद्गार निघतात , त्यावरून निर्विवादपणे सिद्ध होत आहे. हिंदुस्थानावर याच अमीराने जेव्हा उघड उघड स्वारी केली होती तेव्हा हिंदी मुसलमानांशी संगनमत करून आपण हिंदुस्थानात उतरताच त्यांनी ठिकठिकाणी 'अल्ला हो अकबर ' म्हणून आपल्या साह्यार्थ प्रचंड उठावणी करावी; अशी कारस्थाने ह्यानेच रचलेली होती. आणि त्या वेळेस विफल झालेली ती महत्वाकांक्षा त्याने आता सोडून दिली आहे , असे निदर्शविणारे एकही कारण आजपर्यंत घडलेले नाही. उलट त्या त्याच्या भयंकर डावास आता अधिकच रंग भरत चालला आहे . जसे जसे रशियाचे आणि इंग्रजांचे वितुष्ट वाढत जात आहे. आणि

महायुद्ध जवळ जवळ येत आहे. तसतशी हिंदुस्थानावर अशा महायुद्धात होणार्यार या अफगाणी स्वारीची भीषण निश्चितीही वाढतच जात आहे. अमीराची , त्यांच्या धर्मोन्मत प्रजेची, सहायकांची आणि हिंदुस्थानात दिल्लीपासून मद्रासपर्यंत प्रमुख मुसलमान तितका मुंबईस एक होऊन अमीराचा जो उदो उदो करता झाला त्या हिंदी मुसलमानांच्या हिंदी भारत-विद्वेषी प्रवृत्तीचीही हिंदु-भारताच्याच हितास अत्यंत भयप्रद असलेली वस्तुस्थिती आणि परिस्थिती स्पष्टपणे आणि निर्भीडपणे त्यांचेपुढे मांडून आम्ही आमच्या हिंदु बांधवास विचारतो की या परिस्थितीच्या प्रकाशात अमीराची ही भाषणे , वाचली असताच त्यांचा त्यातील खरा उद्देश आणि त्यांचा खरा मतितार्थ कळू शकेल हे स्पष्ट आहे , नव्हे काय?

अमीरसाहेब, आपण इतके गोड बोललात की, आपली आम्हांस बलवत्तर शंका येते! आपण आपल्या राज्यात गोवध बंदी केलेली आहे. हे आपण आम्हांस वारंवार सांगितलेत. त्याविषयी आम्ही आपले आभारी आहोत. आपण हिंदुमुसलमानांस अगदी , अगदी सन्मानतेचे वागविता हे ऐकूनही आम्हांस गुदगुल्या झाल्या. पण आपण त्याबरोबरच हेही का बरे सांगितले नाही की आपल्या राज्यात हिंदूंना जिझीया कर अजूनही द्यावा लागतो! जिझीया म्हणजे जो मुसलमान नसेल , तो मुसलमान नाही म्हणून काफर आहे म्हणून त्यावर बसविलेल्या विशिष्ट कर. ह्या उपमर्दकारक कराचे औरंगजेबाचे नुसते नाव काढताच उभा राजपूताना आणि महाराष्ट्र आपली संतप्त तरवार उपसून रणांगणांत उतरला होता! तो जिझिया "काफरांचा कर" हिंदुस अफगाणिस्थानांत द्यावा लागतो ना ? त्याचप्रमाणे अफगाणी राज्य मुसलमानी राज्य असल्याने येथील मुल्ला मौलवीस मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याची आणि काफरांस मुसलमान करून घेण्याची परवानगी असते. परंतु हिंदुस मात्र आपल्या धर्माचा उपदेश करून मुसलमानांस हिंदु करून घेण्याची सक्त मनाई असते ही गोष्टही सत्य आहे की नाही? हिंदूत आणि मुसलमानांत मी काहीच फरक करीत नाही हे सांगण्यात आपल्या राज्यात धर्मवेडाचा लवलेशही उरला नसून सर्व नागरिक आपआपली धर्ममते निर्वेधपणे आचरू शकतात , असे दाखविण्याचा आपला उद्देश जर असेल, तर आम्ही विचारतो की हिंदूंची गोष्ट तर राहोच , ते तर जाणून बुजून प्रत्येक पठाणाच्या दृष्टीने "काफरच" असणार त्यांस जिझीया दिलाच पाहिजे! पण जे मुसलमान त्यांस तरी आपले राज्यांत निर्बंध समानतेने वागवितात काय ? मुसलमानांतील अहमदिया किंवा कादियानी हा पंथ आपल्या सुन्नी पंथापासून काही विषयी भिन्न असल्यामुळे त्यास मुसलमानांसही काही मते भिन्न एवढ्यासाठीच , संगसारीच्या दगडांनी ठेचून मारण्याच्या शिक्षा या एक दोन वर्षांतच देण्यात आल्या आणि मुसलमानी निर्बंधास अनुसरून आपण त्यांचा कुराणी न्याय अनुसरून सात आठ कादियानी मुसलमानांस दगडफेकीने ठार मारण्यात आले. हे खरे नाही काय ? या गोष्टी धडधडीत पुढे दिसत असता , आपण केवळ

गोवध बंद केलात आणि तितके उत्तमच केलेत- म्हणून आपल्या पठाण राज्यातील राक्षसी धर्मवेड पार उच्छेद पावले असून हिंदू अगदी रामराज्यांत नांदत आहेत , ह्या मायावी वार्तांवर कोणता चाणाक्ष मनुष्य विश्वासू शकेल? पण आश्चर्य! की, या अमीरांच्या भाषणाच्या या मायावी मृगास पाहताच हुरळून जाणारी हिंदूंच्या लतकोडग्या भाबडेपणाची प्रवृत्ती या मायेस खराखुराच कांचनमृग समजून मला तोच हवा म्हणून इच्छा वृत्तपत्रोपत्री प्रदर्शित करीत आहे?

बरे समजा, अमीर अगदी साधुपुरूष आणि न्यायपरायण राजा आहे. पण त्याची प्रजा! हे कडवे पिढ्यान पिढ्या , पाळण्यांतच हिंदूंच्या द्वेषाचे बाळकडू प्यालेले आणि हिंदुस्थानातील स्त्रिया आणि संपत्ती लुटणे हाच आपला पूर्वजार्जित वारसा आणि अभिलाषणीय पराक्रम आहे; अशी अंगाईची गीते ऐकलेले हे पठाण? हे कोहाटचे, पेशावरचे आणि या सहामाहितच धर्मोन्मुख होऊन हिंदूंची उभी वस्ती मारून हुसकून देणारे सीमान्तवासी पठाण? जर हिंदुस्थानात तरवार उपसून हे पिशाच्चदळ कधी घुसले , तर अमीर अगदी साधुवृत्ती आहेत असे गृहीत धरले; तरी ह्या भूतबाधेच्या पायी हिंदुस्थानची राखरांगोळी होणार ती होणारच नाही काय ? अहमदशहा, नादिरशहा आणि महंमद घोरी यांच्या वेळचे आणि त्यांच्या भाष्याचेच कुराण अजून अफगाणचा बच्चा बच्चा वाचीत आहे. विश्वसत आहे-त्यांची टोळधाड आजही हिंदु हिंदुस्थानास तितकीच किंबहुना अधिक भयप्रद होणारी आहे की, जितकी गझनीचे आणि घोरीचे वेळी ती झाली! बारा शतकांच्या हलाहलाहून कडु अशा या राक्षसी वृत्तीवर अमीरांची दहा बारा गुळचट वाक्ये कशी विरजण घालू शकतील? त्या अनुभवजन्य भयाच्या हलाहलाची गोळी कशी गोड करू शकतील ? तेव्हा आपण हिंदुस समानतेने वागवितो आणि गोवध बंद करितो आणि मुसलमानांस हिंदूंशी सख्याने रहावयास शिकवितो. हे पुनः पुनः सांगण्यात अमीराचा उद्देश जर असा असेल, की या वाक्यामुळे हिंदूंच्या तोंडास पाणी सुटावे आणि त्यास अफगाणी बादशाही हिंदुस्थानांत झाली तर केवळ रामराज्य सुरू होईल. मुसलमानांच्या धर्मवेडापासून आपली सुटका होईल, अशी लघळ आशा उत्पन्न व्हावी, जर आपला हा हेतु असेल की, आपल्या भारतावरील भविष्यकाळाच्या एखाद्या स्वारीस, हिंदी मुसलमानाप्रमाणेच हिंदूंचीही सक्रिय सहानुभूती मिळावी. तर अमीर! आपला तो उद्देश विफल होणारा आहे! तो हेतू अत्यंत दुष्ट असून हिंदुहितास अत्यंत घातक असल्याने त्या हेतूच्या रावणी घाल्यास संधी मिळवावी , म्हणूनच केवळ आपण या गोड गोड भाषणाच्या मायावी कांचनमृगास हिंदूंच्या आशेच्या सीतेसमोर असे नाचविले आहात असे आपणास स्पष्टपणे सांगण्याचे साहस करणे हे आम्ही आपले परम पवित्र कर्तव्य समजतो.

बारा गोड वाक्यांचे काय , इंग्लंड जेव्हा, हिंदुस्थानचे घरात घुसण्यासाठी असे लालचावले होते. तेव्हा त्यांच्या राजांनी आणि गर्व्हनर यांनी अशीच बाराशे वाक्ये

उच्चारली होती! सर्व धर्मांच्या प्रजेस आम्ही अगदी समानतेने वागवत असतो आणि वागवू असे त्यांनीही देवाच्या शपथेवर हजार वेळा सांगितले होते. हिंदुस्थानचे कल्याण हेच आमचे उद्दीष्ट आम्ही केवळ व्यापारी , राज्याचा आम्हांस मुळीच लोभ नाही , असेच ते सांगत होते. ते असेच गोरेगोमटे दिसले. अशाच गोडवचनांच्या , कांचनमृगाच्या, मायावी सौंदर्यांने हिंदी आशेस त्यांनी मोडून टाकले आणि त्यांचा विवेक दुरावताच त्यांच्या राजश्रीवर झडप घातली! फार लांब नको, आता महायुद्धामध्येही इंग्लंड हे लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीच महायुद्धात पडले नव्हते का? शेवटी अनेक लहान राष्ट्रास गटकन गिळून तोंड पुशीत बाहेर आले!

अमीर गोड बोलले, उत्तम! आभार आहेत त्यांचे! ते स्वतःच्या प्रजेस , समानतने वागवितात! खरे असेल तर आम्ही हिंदु अभिनंदितो- पण दुरून! ते प्रजेचे सेवक म्हणवितात! आम्ही हिंदु त्यास प्रशंसितो- पण दुरून! सर्प , विंचु, नारायण, परी वंदावे दुरून!

परंतु जर हिंदु हिंदुस्थानचे मन , त्यांच्या त्या 'प्रजेस समानतेने वागविणार्यास' औदार्याचा उपभोग घेण्यास या भुलथापांनी वळेल , अशी ते आशा करीत असतील ; तर त्यांचे डोळे जितके लवकर उघडतील तितके आता उत्तम! हिंदु-हिंदुस्थानास कोणच्याही प्रजापणाच्या समानतेचा उपभोग नको आहे. त्यास आता राजेपणाचे स्वातंत्र्य हवे आहे! त्या राजेपणाचे स्वातंत्र्याचे कार्यार्थ हिंदुस्थान अफगाणिस्थानच्या अमिराच्या मैत्रिचा आणि शक्तीचाही आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्य तो उपयोग करून घेईल- पण दुरून! जर विरोधावरच वेळ आली ; तर विरोधही करण्यास , तो मागे पुढे पाहणार नाही. त्या नादिरशाही आणि अहमदशाही महत्वाकांक्षेचे तक्त दिल्लीत ज्या घणाने फोडून चक्काचूर केले, तो हिंदु पण ईश्वरी कृपेने त्या महत्वाकांक्षेच्या या नव्या अवताराचेही मनोरथ तसेच पूर्ण करून टाकण्यास समर्थ होईलच होईल! अहिंदु साध्वाचारास आमचा हिंदु साध्वाचार अभिनंदित राहील- मायाचारास मायाचार म्हणून पाडील!

**लेखांक १४ वा**

# नेपाळविषयक चर्चा

**(१९ जानेवारी १९२८)**

नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्याविषयी हिंदु राष्ट्रात दिवसेंदिवस अधिक अधिक चर्चा होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

* * *

जर कधी इंग्रजांची आणि रशियाची लढाई जुंपली- आणि जी निकट भविष्य काळीच जुंपेल असा पूर्ण रंग दिसत आहे -तर अफगाणिस्थान आणि नेपाळ या दोन्ही राज्यांस सैनिक दृष्टीने अत्यंत महत्व प्राप्त होणारे आहे. युद्धमान राष्ट्राच्या महायुद्धातील ही दोन्ही राज्ये मुख्य रणक्षेत्रे बनल्यावाचून रहाणार नाहीत. त्या दोघांच्या हातीच हिंदुस्थानच्या साम्राज्याच्या किल्ल्या पडणार आहेत. इंग्लिश साम्राज्याचे मुख्य युद्धसचिव हिंदुस्थानात येण्याचा जो अपूर्व योग , इतक्या तातडीने आज येत आहे ; त्याचे हेच एक मुख्य कारण आहे. नेपाळच्या महाराजांचे कलकत्त्यास त्याच वेळी होणारे आगमन ही काही आकस्मिक घटना नसून तिच्यामागे राजकीय डावपेच खेळले जात असावेत हे उघड आहे, या विषयाकडे हिंदुस्थानांतील लोकांचे लक्ष हळू हळू वेधले जात आहे , ही गोष्ट खालील एक दोन उतार्यांवरून स्पष्ट होईल.

* * *

कलकत्त्याचे “श्रीकृष्ण संदेश” हे प्रमुख हिंदी साप्ताहिक ‘महान घटना’ नामक शीर्षकाखालच्या अग्रलेखात लिहिते की , “अफगान अमीरने आगमनके बाद लगभग इतने ही महत्वकी एक और घटना होनेवाली है। उत्तर पश्चिमसे यदी अफगान अमीर आ रहे है तो नेपालके महाराज कलकत्तेतक आवेंगे। अफगान अमीर बम्बई वा ईसरायका आतिथ्य ग्रहण करकेही चार दिनमे चले जायेंगे। परन्तु , नेपालके महाराज वा ईसरायका अतिथ्य ग्रहण करनेके बाद भी यहाँ स्वतंत्र रूपसे रहेंगे। उनका विचार कलकत्तेमे १५ दिन रहनेका है। ता. २६ दिसम्बर को महाराजका यहा शुभागमन होगा। हमारे सहधर्मी और स्वाधीन हिन्दुराज्यके विधाता श्री ३ महाराज चन्दू शमशेर जङ्ग बहादूर राणाका उस अवसरपर कलकत्ता- वासियोंकी ओरसे, कलकत्ता कारपोरिशनकी ओरसे तथा कलकत्तेके हिंन्दुओंकी ओरसे महान स्वागत होना चाहिये। नेपाल-महाराज अपने सेनापतीयोंके साथ आ रहे है। नेपालके महाराज, नेपालके सेनापती, ब्रिटिश सरकारके युद्धमंत्री तथा विमानमंत्री अन सब युद्धदेवताजींका एक साथ भारतमे आगमन ही यह कोई साधारण समाचार नही हो सकता। यह कोई महान राजनितीक महत्वकी घटना है। अफगान अमीरके आगमन और

विदेशभ्रमणका जो राजनितीक महत्व है , वही नेपालके महाराजके आगमनका भी है। नेपालका स्वाधीन हिंदुराज्य, हिंदु स्वाधीनता और गौरवके संकोचका प्राप्त हुआ अंश है और प्राकृतिक नियमानुसार इसका फिरसे वैसा ही या उससे भी अधिक विस्तार होना अवश्यम्भावी है।"

* * *

श्रीकृष्ण संदेशाने आणखी लिहिले आहे , की "अफगाणिस्थानचा अमीर, हा मोठा महत्वाकांक्षी पुरुष आहे. त्यातही रूससारख्या इंग्लिशांच्या कट्टया द्वेष्ट्याचे राष्ट्र. अफगाणिस्थानच्या पाठीसच असल्याने, आज त्या परिस्थितीचा पुरा पुरा लाभ घेण्याचा अमीराचा निश्चय दिसत आहे ; आणि त्यांच्यात तसे साहसही वसत आहे. -- एकंदरीत , अफगाण अमीराचे आगमन आणि विदेशयात्रा यांचे जे राजकीय महत्व आहे , तेच नेपाळच्या महाराजांचेही आहे. नेपाळचे हिंदु राज्य हे हिंदु स्वातंत्र्याचा आणि गौरवाचा जो संकोच होत आला, त्याचा अंतिम अंश आहे. म्हणूनच निसर्गनियमाप्रमाणे त्या संकोचाच्या अंतिम बिंदुपासून त्या हिंदु स्वातंत्र्याचा पहिल्यासारखा किंवा त्याहूनही अधिक विकास आणि विस्तार पुनः होणे अवश्यं भावीच आहे. "

* * *

या पत्राप्रमाणेच गुरखा लीगचे मुखपत्र हिमालयन टाईम्स हे ही या संधीचा पुरता अर्थ ओळखून आहे. त्यानेही त्यावर अग्रलेख लिहिला असून नेपाळचे महाराज कलकत्त्यास येतील, तेव्हा हिंदुस्थानभर पसरलेल्या लाखो गुरख्यांनी त्यांचे चरणी आपली उत्कट राजनिष्ठा व्यक्त करावी असे लिहिले आहे. कलकत्त्यास ५०००० गुरखे आहेत!

नेपाळी लोकांत गेली दोन वर्षे होत चाललेली जागृती ही किती महत्वाची गोष्ट आहे; यांचे प्रमाणपत्र हिंदुजनतेचे तिच्याकडे जे अधिकाधिक लक्ष वेधले जात आहे. त्यावरूनच प्रमाणित झालेले असून , त्यास आपल्या कृपाळू ब्रिटिश सेवक सत्तेचे (ब्यूरॉक्रसीचे) एक उदार प्रमाणपत्र , अलिकडेच मिळाले आहे. कारण गुरखासंघावर गुप्त पोलीस विभागाची वक्रदृष्टी होण्यास आरंभ झालेला असून ती संस्था, राजद्रोही उलाढाल्या करणारी (Seditious Body) आहे; असे गुप्त पोलिसचे प्रतिवृत्त तिच्याविरुद्ध गेल्याचे त्या संघाकडून प्रसिद्ध झाले आहे! हिंदुस्थानांत कोणतीही संस्था थोडे फार उपयुक्त काम करू लागताच तिला C. I. D. ची 'राजद्रोही' किंवा 'संशयित' म्हणून पदवी मिळायची हे ठरलेलेच असते. याच सिद्धांताचा उपसिद्धांत म्हणजे गुप्त पोलिसांनी एखाद्या संस्थेस "संशयित" किंवा "राजद्रोही" म्हटले म्हणजे ती बहुधा काही तरी राष्ट्रास उपयुक्त असे कार्य करीत आहे. असा विश्वास लोकांनी बाळगावा , हा होय. या उपसिद्धांतावरून सी. आय. डी. ची वक्रदृष्टी गुरखा संघाकडे वळली ; हे त्या संस्थेच्या हातून काही तरी जिवंतपणास शोभेसे, राष्ट्रकार्य होत असावे ,त्याचेच द्योतक आहे. आपल्या उपयुक्ततेचे

प्रमाणपत्र सरकारी मुद्रेसह त्या गुरखा संघास असे इतक्या लवकर मिळाले, हे त्या संस्थेस खरोखरच अभिमानास्पद आहे. नेपाळच्या आमच्या धर्मबंधूंस C. I. D. ने "संशयित" म्हणावे, इतकी जागृती होत चाललेली पाहून प्रत्येक हिंदूंस मनःपूर्वक आनंद होत आहे.

* * *

नेपाळच्या हिंदुराष्ट्रास इंग्रज सरकारनेच हे प्रमाणपत्र दिले आहे असे नसून , मागे जर्मनीच्या कैसरनेही त्या हिंदुराष्ट्राचे महत्व असेच वाखाणलेले होते. सन १९१४ ते १८ व्या वर्षात जे महायुद्ध चालले होते , त्यात श्रीयुत राजा महेंद्रप्रताप यांच्या हस्ते जर्मन सम्राट कायसर यांनी नेपाळचे महाराजांना एक आणि अमीराला एक , अशी दोन पत्रे एकत्रच दिलेली होती. त्यात अमीराप्रमाणेच नेपाळच्या हिंदु महाराजासही स्वतंत्र राष्ट्राचे अधिपती म्हणून गौरवून नेपाळचे स्वातंत्र्य जर्मन सरकार मानीत आहे , मानीत राहील, असे आश्वासन दिलेले होते. नेपाळचे महाराजांस His Majesty असे बरोबरीच्या नात्याने इंग्रजांचे राजाने म्हणण्याचे पूर्वीच जर्मन सम्राटाने तसे संबोधिले होते. आणि नेपाळच्या राज्याचा विस्तार दिवसेंदिवस होत जावा. म्हणून उत्कट इच्छा प्रदर्शित केली होती. इंग्लिशांच्या कूटनितीमुळे श्री. महेद्रप्रताप यांस तिबेटातूनच परत फिरविण्यात येऊन ते पत्र नेपाळच्या महाराजांच्या हाती न पडू देण्याचा जो चिवट प्रयत्न करण्यात आला , तो काही उगीच नव्हे.

* * *

जर्मन सम्राट , इंग्लिश गुप्त पोलिस आणि इंग्लंडचे मुख्य युद्धसचिव (The minister of war) यांना ज्या नेपाळच्या राजकीय भविष्याविषयी इतकी चिंता वहाविशी वाटते. आणि त्यांच्या जागृतीकडे लक्ष लावून पाहणे महत्वाचे वाटते , त्या नेपाळच्या राजकारणाची नुसती वास्तपुस्तही करण्यास आमच्या राष्ट्रीय सभेच्या पुढार्यां स वेळ का सापडत नाही. याचे कित्येकांना आश्चर्य वाटेल ; पण त्यात त्यांचा काहीच दोष नाही. 'रॉयल कमिशन' वर साक्ष द्यावी का देऊ नये आणि नीलच्या पुतळ्यावर हातोडा मारावा की नुसता चिखल मारावा, या अत्यंत बिकट आणि राष्ट्राचे सर्व जीवित ज्यावर अवलंबून आहे. अशा महत्वाच्या प्रश्नांची राष्ट्रीय काथ्याकूट करण्याचे सोडून , अफगाण आणि नेपाळच्या सीमेवर रशिया तिकडून आणि इंग्लंड इकडून का डाव खेळत आहेत , इत्यादी यःकश्चित पोरखेळांत वेळ दवडण्याइतके , काही अदूरदृष्टी लोक नाहीत! असले पोरखेळ इंग्लंडच्या युद्धसचिवासारख्या उनाड आणि रिकामटेकड्या लोकांनी खेळावे! आमच्या पुढार्यांपसारख्या थोर, राजकारणपटु आणि उत्तरदायी लोकांनी तिकडे लक्ष घालणे मुळीच शोभणारे नाही! तेही जर असले रिकामटेकडे आणि स्वप्नाविष्ट (Dreamy) उद्योग करू लागले, तर नीलच्या पुतळ्यावर चिखल कोण फेकणार ? हिंदुस्थानात इतका गाळ आणि चिखल असता नीलच्या पुतळ्यावर तो फेकण्याचे सोडून , हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे ,

इंग्लंड-रशियाच्या धकाधकीत घुसण्याचे काय प्रयोजन आहे ? त्यांस आपला चरखा आणि चिखल हीच अमोघ साधने पुरे आहेत!

परंतु गुरखा लोक राजकारणाच्या या चिखलात अजून आमच्या सत्याग्रहाइतके आकंठ रुतले नसल्याने त्यांची राजकीय जागृती निराळेच रूप घेऊ लागली आहे , हे वर दिलेल्या माहितीवरून आणि विशेषतः C. I. D. च्या प्रमाणपत्रावरून स्पष्ट होत आहे. त्याचेंच आणखीही एक द्योतक म्हणजे हे की नेपाळेतर , हिंदुस्थानात नागरिक म्हणून निवसत असलेल्या नेपाळी लोकांसही विधिमंडळांत प्रतिनिधीत्व मिळावे , म्हणून नेपाळी लोकांत एक महत्वाची चळवळ सुरू झाली. ब्रिटिश हिंदुस्थानांत जवळ जवळ दहा लक्ष नेपाळी लोक आहेत. अशाच अल्पसंख्येच्या शीख हिंदुस जर आपले विशिष्ट प्रतिनिधी विधिमंडळात धाडता येतात , तर नेपाळी हिंदूस ते धाडण्याचा अधिकार अवश्य मिळाला पाहिजे. जाती-विशिष्ट प्रतिनिधित्व आमूलाग्र बंद झाले तर सर्वोत्तमच पण जर मुसलमानादिकांस ते देणे पडत आहे. तर ते हिंदूसही काही काळ देणे अवश्य आहे. विशेषतः नेपाळी लोकांत हिंदी राजकारणाची जिवंत कळकळ आणि ज्ञान उत्पन्न होण्यास , त्यांचे नेपाळी प्रतिनिधी विधीमंडळात नेमले जाणेच इष्ट आहे. रॉयल कमिशन हिंदुस्थानात येताच, गुरख्यांचे वतीने हा प्रश्न त्यांचे पुढे मांडण्यात येणार आहे. नेपाळी-हिंदुस्थानांतून ब्रिटिश- हिंदुस्थानात , येऊन राहिलेल्या दहा लाख नेपाळी हिंदूस सध्या दोन्हीकडच्या अधिकारास आणि प्रतिनिधीक सत्तेस , मुकावे लागते. हा अन्याय आहे. यासाठी विधिमंडळांतून आणि कलकत्ता , डेहराडून, काशी इत्यादी ज्या ज्या ठिकाणी नेपाळचे लोक पुष्कळ निवसलेले आहेत; तेथील स्थानिक संस्थांतून गुरख्यास (नेपाळ्यांस) त्यांचेच विशिष्ट प्रतिनिधी धाडण्याचा अधिकार, अवश्य मिळावा. आमची आमच्या नेपाळी बंधूंस अशी आग्रहाची सूचना आहे की त्यांनी राष्ट्रीय सभेसही गुरखा संघाच्या वतीने प्रतिनिधी निवडून धाडण्यास अगदी सत्वर आरंभ करावा. विधिमंडळांत स्थानिक संस्थात आणि राष्ट्रीय सभेत गुरख्यांचे विशिष्ट प्रतिनिधी जसजसे जाऊ येऊ लागतील , तसतसे हिंदी राजकारणाशी त्यांचे जीवन समरस होईल. आमच्या राजकीय सुखदुःखाचे प्रतिध्वनी आमच्या इकडच्या नेपाळी बंधूंच्या रक्तांत उरू लागतील आणि त्याचे भावभावनांनी तिकडील नेपाळस्थ गुरख्यांची अंतःकरणे चेतू लागतील. अशा रीतीने नेपाळचे आणि नेपाळेतर हिंदी विभागांचे राजकीय जीवन एकाच चेतनेने रसरसू लागून कमीत कमी उभे हिंदु हिंदुस्थान तरी , एकाच ध्येयाने स्फूर्त होऊन संभूय प्रयत्नाने आपले भाग्यशाली भविष्य घडू लागेल.

## स्वतंत्र हिंदु राष्ट्राचा कर्ता पुरुष

उभ्या जगात हिंदूंचा अभिमान धरण्यासारखे नेपाळ हे एकच एक हिंदु राष्ट्र आहे. त्या राष्ट्रांतील लोक नवयुगाच्या चालीबरोबर चालू लागले असून आधुनिक सुधारणा ,

यंत्रविज्ञान इत्यादींचा आत शिरकाव होऊ लागला आहे. घातुक रुढीमुळे हे उत्थान होण्यास जरी अवधि लागत असला तरी नेपाळच्या स्वतंत्र राज्यांतील अनेक पुरुष परिश्रम करीत आहेत. अशा पुरुषांत नेपाळचे महाराज सर चंद्रसेन शेरजंग बहादुर राणा हे होत. नुकतेच हे कलकत्त्यास आले असता त्यांचा जो सन्मान झाला, तो सुप्रसिद्ध आहे. आज त्यांचे वय ६५ वर्षांचे असले तरी मुख्य प्रधानकीचे कार्य ते अत्यंत कुशलपणे पार पाडीत आहेत. गेली पंचवीस वर्षे त्यांनी अत्यंत परिश्रम करून , राज्यकारभाराची धुरा यशस्वीपणे ओढली यावरून त्यांना लोकांविषयी वाटत असलेले प्रेम दिसून येते. काठमांडूच्या निसर्गसुंदर नितांत रम्य अशा नगरात सिंगदरबार ह्या राजवाड्यांत आधुनिक सुधारणेची साधने जरी गजबजून दिसत असली तरी महाराजांची राहणी अत्यंत साधी असते. कोणाही व्यक्तीने जाऊन त्यांना भेटावे आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगाव्या , आपली गार्‍हासणी कानावर घालावी. दुपार झाली की आपल्या लवाजम्यानिशी ते प्रत्यही नगरसफरीस बाहेर पडतात नि प्रजेचे प्रणाम स्वीकारीत स्वीकारीत ते परततात. कर्मनिष्ठ ब्राह्मणाप्रमाणे त्यांचे प्रत्यहीचे वर्तन असते. त्यांची प्रजेवर विलक्षण छाप असून निःपक्षपाती न्यायाधिश म्हणून त्यांचा लौकिक गाजत आहे. महाराजांचे आठ पुत्र नेपाळमध्ये आपल्या स्वतंत्र राष्ट्राची सेवा करीत,त्यांचा गौरव वाढवीत आहेत. सेनापती सर मोहन नि सर बाबर सैनिक दळाचे प्रमुख आहेत. सर केसर हे राज्यकारभारांतील एक विभागाचे काम पहात असून सेनापती सिंग हे धर्मार्थ संस्थांवर प्रमुख आहेत. सेनापती कृष्ण , सेनापती विष्णु, सेनापती शंकर नि मदन हे त्याचे चारी पुत्र नेपाळच्या सेनेत मोठमोठे अधिकारी आहेत. आज नेपाळची जी प्रगती दिसत आहे तिला महाराज कारणीभूत आहेत. अनंत काळपर्यंत चालत आलेली गुलामांच्या व्यापाराची पद्धत महाराजांनीच नष्ट केली नि त्यासाठी त्यांचा सर्व जगभर नावलौकीक झाला. त्याचप्रमाणे नेपाळीराज्यात पहिली रेल्वे उघडण्याचा मानही महाराजांसच लाभलेला आहे. काठमांडूच्या आसमंतातील एखाद्या पर्वताच्या शिखरावरून नगराकडे दृष्टि फेकल्यास नव्या सुधारणांनी नटलेली नगरी आहे. असे कोणासही वाटेल. अशा ह्या आमच्या स्वतंत्र हिंदु राज्याच्या कर्त्या-पुरुषाला आयुरारोग्य लाभावे अशीच कोणाही हिंदु बांधवाची इच्छा असणे सहाजिक आहे.

**लेखांक १५ वा**

# अखिल भारतीय गुरखा संघाचे तृतीय अधिवेशन आणि नेपाळच्या महाराजांचे प्रस्तुतचे कर्तव्य

**(१९२८)**

"When we compare the conditions now arising with marvellous rapidity in Afganistan where we behold batches of several hundred young Afhgans being sent every year by their Government to foreign countries all over this world for training and reforms being carried out in every branch of administration of that country we cannot but heave a sigh of grief to observe the contrast which conditions in Napal present ! . . . . . . Nepal is the hope of the Hindus, Nepal is the shield of India, and if Nepal will not reap the fruit of the immense potentialities which are open to it and boldly enter with the realms of modern civilization and progress, the future history of this vast country of the Hindus shall be written in letters of blood and tears: and if Hinduism falls there shall be no hope for Nepal either. "

**The Hymalayan Times**

5th January 1928

.

"अफगाणिस्थानास जागतिक राजकारणांत जी महती प्राप्ती झालेली आहे , ती अफगाणिस्थाना-प्रमाणेच समबल असणाऱ्या नेपाळास प्राप्त झाली नाही हे पाहून गुरख्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव होऊ लागली आहे! हिंदू राष्ट्राची नेपाळ ही ढाल आहे. आज नेपाळ ही उभ्या हिंदु जगताची आशा आहे. एक महान भवितव्यता नेपाळास पाचारीत आहे! जर नेपाळने तिचे स्वागत करण्याचे साहस न केले , तर उभ्या हिंदुराष्ट्राचा इतिहास अश्रूंनी आणि रक्तांच्या बिंदूनी लिहिला जाईल आणि जर हिंदुराष्ट्र विनष्ट झाले तर त्यासहच नेपाळचाही नाश होणारच! जो हिंदुराष्ट्राचा विनाश तोच नेपाळचाही विनाश! " असे कळकळीचे आणि हृदय हालवून सोडणारे , उद्गार वरील उताऱ्यात गुरख्यांतील प्रमुख पुढाऱ्याने काढलेले आहेत!

गुरखा जातीच्या एकमात्र प्रमुख पत्रातील वर उद्धृत केलेले अवतरण वाचून आम्हास अत्यंत आनंद झाला. आज दोन तीन वर्षे झालेले त्रुटित आणि एकाकी प्रयत्नही इतके फलद्रुप झालेले पाहून मनास अर्थातच अधिक प्रयत्न करण्यास अधिक उत्साह प्राप्त होत आहे आणि अशी निश्चिती वाटू लागत आहे ; की आणखी दोन तीन वर्षे जर हे वाढत्या प्रमाणावरचे प्रयत्न आणखी वाढत्या परिमाणाने , आणि प्रबळतेने केले जातील , तर हिंदुंचे हे एक मात्र स्वतंत्र राज्य , वरील अवतरणात आमच्या गुरख्यांच्या पुढार्या ने म्हटल्याप्रमाणे अखिल हिंदु राष्ट्राची ढालच नव्हे तर तलवारही होईल.

गुरखा राष्ट्राच्या उद्धारार्थ जे काही थोडे देशभक्त अखिल हिंदुत्वाच्या अभिमानाने प्रेरित झालेले आणि आजच्या जगाच्या परिस्थितीचे मर्म ओळखण्याइतकी पात्रता आणि प्रगतिप्रियता असलेले झटताहेत , त्यात वरील उतारा लिहिणारे ठाकूर चंदनसिंग हे एक होत. गेल्या तीन वर्षात नेपाळी लोकांत जी एक नवी जागृती झालेली आहे. तिला केंद्रीभूत करण्याचे कार्यी त्यांनी काढलेल्या Hymalayan Times 'गुरखा समाचार' या दोन पत्रांचा फार उपयोग झालेला आहे. सध्या नेपाळी संपादकाने चालविलेली अशी तीच दोन पत्रे आहेत. त्या व्यतिरिक्त गुरख्यांच्या जातीय संघटनासाठी 'गुरखा संघ' म्हणून जी संस्था गेल्या दोन तीन वर्षात स्थापन झालेली आहे , तिचे प्रमुख चालकात ठाकूर चंदनसिंग ह्यांचे नाव अग्रगण्य झालेले आहे. अशा प्रमुख गुरखा गृहस्थाने वरील लेख लिहिला आहे. यावरून गुरखा जातीत हिंदु संघटनाच्या तत्त्वांचा आणि महत्वाकांक्षांचा संचार कसा झपाट्याने होऊ लागत आहे हे स्पष्ट होत आहे.

ह्याच आशेने "श्रद्धानंद" ही आज वर्षभर नेपाळास हालवून हालवून डिवचून डिवचून जागे करण्यास झटत आला! श्रद्धानंदातील अमीराचे आगमनाविषयीचे आणि नेपाळच्या उद्‌बोधनासाठी कळवळून हाका मारणार लेख , दिल्लीचे 'अर्जुन' कलकत्त्याचे 'श्रीकृष्ण' पंजाबातील आर्यसमाजी उर्दू पत्रे आणि 'गुरखा समाचार' ह्यांच्यात भाषांतरीत होऊन आणि इतर अनेक साधनांच्या द्वारे नेपाळच्या कानाशी आज वर्षभर सारखे ध्वनीत होत आहेत. आज त्यांचा प्रतिध्वनी नेपाळच्या अंतःकरणातून स्पष्टपणे उठला. हिंदुराष्ट्राच्या उद्धाराचे उत्तरदायित्व आज ईश्वराने नेपाळच्या कर्तव्यावर सोपवून दिले आहे ही जाणीव नेपाळच्या पुढार्यांत उत्पन्न झाली! आरंभ तर ठीक झाला!! नेपाळच्या राष्ट्रीय कर्तव्यपराङ्मुखतेस , लावलेला महत्वाकांक्षेचा पहिला सुरुंग तर ठीक उडाला!!

## हजारो गुरख्यांचा राष्ट्रीय उत्साह

आणि या सुरुंगासरशी त्या महान महत्वाकांक्षेचे प्रतिध्वनी केवळ काही निवडक पुढार्यांच्या अंतःकरणातच उठले असे नसून ते हजारो गुरख्यांच्या रक्तात निनादत जात आहेत. ही गोष्ट ज्यांनी ज्यांनी डेहराडूनला झालेले गुरखा संघाचे ह्या वर्षांचे तृतीय

अधिवेशन पाहिले आहे. त्यांच्या त्यांच्या प्रत्ययास आल्यावाचून राहिले नाही. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष सरदार जीवनसिंग हे कत्तेल- अमिराच्या महायुद्धांतील प्रख्यात वेढ्याचे प्रसंगी त्या वेढ्यांत लढलेले आणि त्यांतून जे फारच थोडे लोक वाचून परत आले. त्यातील एक खंदे योद्धे आहेत. त्याचप्रमाणे गुरखा सैन्यांतील इतर अनेक सुभेदार आणि इतर वरिष्ठ अधिकारी या अधिवेशनात समाविष्ट झालेले असल्याने या चळवळीमुळे इंग्रजी सत्तेच्या पोटांत दुखूं लागावे हे साहजिकच होते.

नेपाळच्या जागृतीचे वैशिष्ट हेच आहे की , ती चळवळ इंग्रजांच्या हिंदुस्थानातील आजवर अत्यंत आधारभूत मानल्या गेलेल्या अगदी राखीव अशा सेनेतच फैलावत जाणारी आहे. कारण हिंदुस्थान हातात ठेवण्यास जी हिंदी सेना , इंग्रजांनी ठेवलेली आहे. तिच्यांत कालपर्यंत मुख्यत्त्वेकरून शीख आणि गुरखा पलटणी ह्याच , त्यांच्या अगदी अंध आणि म्हणूनच अगदी राखीव अशा असत. सत्तावनचे राष्ट्रीय क्रांतीयुद्ध ह्या शीख आणि गुरखा पलटणीच्या तरवारीनेच इंग्रज मोडू शकले ; त्यापैकी १९०५ ते १९१० पर्यंतच्या राष्ट्रीय चळवळीच्या धक्क्याने शीख जागा झाला तो अजूनही सैनिक आहेच. पण आता तो देशभक्तही झालेला आहे. पण गुरखा मात्र , अजूनही नुसता एखाद्या यंत्राप्रमाणे शब्दाबरोबर बार उडविणारा एक शून्यहृदय सैनिकच होता.

### शीख आणि गुरखे

इंग्रजी सत्तेच्या हिंदुस्थानातील विषारी तरवारीच्या दोन धारा होत्या ; पैकी शीख सैनिक असूनही देशभक्त होताच त्या तरवारीच्या एका बाजूच्या धारेचे विष उतरले. राहिला होता गुरखा! तोही आता देशभक्तीने रसरसू लागला तर त्या दुसर्‍ाे बाजूची विषारी धारही बोथट होऊन जाईल. गुरखा हा जागृतहृदय झाला, तरी तो सैनिक राहिलाच! पण तो एक देशभक्त सैनिक होऊन राहील. पहिल्याप्रमाणे अंध अन्यायाच्या विषाचे पाणी चढविलेली तरवार तो हाती धरणार नाही आणि असे होण्याचा संभव असल्यामुळेच काही अन्याय्यप्रवण आणि स्वार्थांध इंग्रजी राजनीतीज्ञांचे पोटात गुरख्यांची राष्ट्रीय जागृती पाहताच भीतीचा गोळा उठू लागतो. परंतु सुदैवाने डेहराडूनच्या या अधिवेशनातल्या प्रसंगी तेथील इंग्रजी अधिकार्यांगनी तुटेल तो ताणण्याचा वेडेपणा न करता वीर गुरख्यांच्या न्याय्य आकांक्षांस वाचा फुटू द्यावी असेच ठरविले आणि त्या अधिवेशनात अनेक गुरखा सैनिक सुभेदार आणि इतर सेनानी यांस प्रकटपणे भाग घेण्यास येथील इंग्रजी सैनिक अधिकार्यांदनी ना केली नाही. महाराजा नाभा हेही अधिवेशनास उपस्थित होते. अनेक गुरखा रेजिमेंटचे ठिकठिकाणाहून अभिनंदनपर संदेश आले होते. झालाबादचे महाराज , गडवालचे महाराज, सरफारीचे महाराज, सिक्कीमचे महाराज आणि इतर थोर व्यक्तींच्याही सहानुभूतीच्या तारा आल्या होत्या संमत झालेल्या ठरावांत मुख्य म्हणजे

**परदेशगमननिषेधाचा निषेध**

हा ठराव होता. आपणास हा एक यत्किंचित सामाजिक सुधारणेचा ठराव वाटेल. पण नेपाळच्या परिस्थितीत ह्या ठरावाचे राष्ट्रीय महत्व इतके आहे की , आज नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्याचे वृक्षाची वाढ खुंटविण्यास जर एखादी विषारी कीड कारणीभूत होत असेल तर ती ही यःकश्चित दिसणारी पंडितांची परदेशगमन निषिद्धतेची आज्ञा होय. नेपाळ स्वतंत्र झाले असताही त्यास जगतांत आपले स्वातंत्र्य रशिया , इटली, अमेरिका, फ्रान्स इत्यादी राष्ट्रांत आपले राजदूत स्थापून प्रस्थापित करता येत नाही. कारण , परदेशगमन निषिद्ध! त्यामुळे नेपाळचे भूपतीस तर काय पण प्रधानांच्या जामातासही , मास्कोला जाऊन स्टालिनची , रोमच्या मुसोलिनीची, तुर्कीच्या कमालची भेट घेता येत नाही. आपले शेकडो कामगार , तिकडे धाडून नविनांतील नवीन सैनिक नि शास्त्रीय कला आणि साधने शिकता येत नाहीत! कारण परदेशगमननिषिद्धतेचा हा घरघालु सोवळेपणा! रशियादिक राष्ट्रांची प्रत्यक्ष परिस्थिती पाहून , त्यांच्याशी संबंध जोडता न आल्याने आज सर्वस्वी इंग्रजांचे हातातील खेळणे बनत आहे. अफगाणिस्थानचा परिचय आणि मैत्री उभ्या जगाशी घडू लागताच , रशियाच्या द्वारे इंग्रजांस आणि इंग्रजांच्या द्वारे रशियास त्यास चापता येते. पण नेपाळास हिंदुस्थानच्या आडाबाहेर पडताच येत नसल्याने त्याला त्या आडातील सगळ्या मंडूकांत मोठ्या असणार्याद इंग्रजी कूपमंडूकाची, हाजी हाजी करून रहावे लागत आहे. सर हेन्री कॉटनसारख्या काही इंग्रजांसदेखील नेपाळला इंग्रजांनी किती अन्यायाने वागविले आहे. ते सांगितल्यावाचून राहवत नसून 'मित्रांचा विश्वासघात' अशा आशयाची नेपाळच्या विषयावर त्यांनी खरमरीत टीका मधून मधून केलेली आहे. नेपाळास परराष्ट्रीय व्यापार, परराष्ट्रीय राजकारण, परराष्ट्रीय गौरव, काहीच संपादता येत नाही , कारण त्याचे पाय त्या परदेशगमननिषिद्धतेच्या दोरीने बांधून टाकलेले आहेत! नेपाळच्या राज्याच्या शक्तीच्या कंठास ही एक यःकश्चित दिसणारी रुढी एखाद्या फांशीच्या तांतासारखी करकचून धरीत आहे. नेपाळच्या हिंदुराष्ट्राचे आणि त्यामुळे उभ्या हिंदुजगताच्या स्वातंत्र्याच्या आणि वैभवाच्या उत्तुंग आकांक्षेस ही एक रद्दी पोथीच्या फाटक्या पानांतील पुसट ओळ आडवी यावी- आणि तिने दिग्विजयोत्सुक राष्ट्राचा रथ आडवावा!! पण गोष्ट तशीच घडत आहे खरी! नेपाळ-राज्याच्या मुख्य प्रधानांनी प्रांजलपणे, प्रसिद्ध केले की , परराष्ट्रांत राजदौत्यागारे उघडून नेपाळची शक्ती वृद्धिंगत करण्यासाठी नेपाळी लोकांस परदेशी धाडणे इत्यावश्यक असतांही ते करणे दुर्घट होत आहे. कारण आमच्या राजपंडितांनी परदेशगमन निषिद्ध म्हणून घोषित केले आहे!

**ह्या राजपंडितांचे असे हे घर बुडवे सोवळे**

आता जाळून टाकले पाहिजे! परदेशांत जाण्याचे त्यांचे स्वदेशी सोवळे विटाळते , पण परदेशास स्वतःच्या देशांत घेण्याने मात्र त्यांचे सोवळे विटाळत नाही! हिंदुस्थानने दुसर्यांच्या म्लेंच्छ देशांत जाऊ नये; पण दुसर्याट वाटेल त्या म्लेंच्छाने हिंदुस्थानांत येऊन त्यांच्या सिंहासनावर बसले तरी त्यात त्यांचा धर्म बुडत नाही! अशा या आत्मघातकी कूपमंडूकांचा निषेध यापूर्वीच झाला पाहिजे होता. तो उशीराने का होईना ; पण गुरख्यांच्या गेल्या अधिवेशनाने केला, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.

तीन चार हजार गुरख्यांनी एकमताने गर्जना करून घोषित केले आहे , की आम्ही परदेशगमन करणार! आम्ही जागतिक उलाढालीत भाग घेणार! या ठरावाप्रमाणेच ब्रिटिश हिंदुस्थानांत वसलेल्या तीन लाख गुरख्यांना विधिमंडळांत प्रातिनिधिक अधिकार देण्यात यावेत याविषयी ठराव झाला. अस्पृश्यांच्या एका शिष्ट मंडळाने संघाचे बैठकीत प्रवेश करून आपली दुःखे सांगितली तेव्हा , शुद्धी, अस्पृश्यतानिवारण आणि संघटण या तीन चळवळीसही गुरखा जातीचा पूर्ण पाठिंबा असल्याचे संघाने घोषित केले. हिंदू जातीच्या जीवन मरणाचा प्रश्न या शुद्धी-संघटनाशी संबंधित आहे. शुद्धी-संघटन करू तरच आम्ही हिंदु जगू असे गुरख्यांनी निस्संदिग्धपणे , समर्थन केले. इतरही अनेक उपयुक्त आणि प्रगमनशील ठराव संमत करण्यात येऊन अखिल हिंदुसंघटनांच्या नवचैतन्याचा संचार होताच, गुरखा जाती कशी खडबडून जागृत होत आहे , हे कोणासही कळून चुकावे असा अपूर्व राष्ट्रीय उत्साहात, हे अधिवेशन उठले. आता या उत्साहांचा लाभ घेण्याचे नेपाळच्या महाराजांचे कर्तव्य आहे. त्यांच्या राष्ट्राचा त्यास पाठिंबा आहे. त्यांनी आता परराष्ट्रीय राजकारणात अफगाणिस्थानाप्रमाणे धडाडीने भाग घेण्यास आरंभ करावा. मेलेल्या आणि मारक युगाच्या पोथ्या रद्दीच्या फळीवर फेकून देऊन नवयुगाच्या नवीन स्मृतिच्या पोथ्या उघडाव्या. इंग्रजांशी येत्या महायुद्धांत मित्रत्वाचा व्यवहार करणे तो ज्यायोगे ते मित्रत्व नेपाळच्या आणि अखिल हिंदु राष्ट्राच्या लाभास आणि गौरवास अनुकूल होईल , अशाच रीतीने केला पाहिजे. इंग्रजांस निक्षून सांगावे की नेपाळ दुर्बल दासासारखा तुम्हांस आता यापुढे बिनअट सहाय्य देणार नाही. महायुद्धात इंग्रजांना नेपाळच्या मैत्रीची अत्यंत आवश्यकता आहे. तेव्हा निदान मागे ब्रिटिशाने घेतलेले सिमल्याचे बाजूचे प्रांत आणि इतर काही प्रदेश नेपाळ सरकारास इंग्रजांकडून परत मिळाले पाहिजेत , असे निःसंकोचपणे महाराजांनी सांगून टाकावे. कलकत्त्यास कारस्थाने घाटत आहेत. त्याचवेळी महाराजांनी जे काय बोलणे ते उघड आणि स्पष्ट आणि निर्भयपणे बोलून टाकावे. नेपाळचे राजे एकवेळ पाटणा नगरी नांदत होते. नेपाळ जर इंग्रजांचा मित्र आहे , तर ते त्या राजाचे पूर्वजार्जित

घर, इंग्रजांनी नेपाळास परत का देऊ नये? नेपाळी लढाईत, नेपाळचा जो भाग, ब्रिटिशांनी शत्रू म्हणून जिंकून घेतला; तो भाग आज दोन पिढ्यांचा मित्र म्हणून इंग्रजांनी नेपाळास परत का करू नये ? महायुद्धात साह्य देण्यापुरतेच जर "Our allies", आमचे स्वतंत्र साथीदार म्हणून नेपाळास गौरवावयाचे असेल ; तर ही असली सुकी साथी कवडीच्या मोलाची नाही. 'तुझे ते माझे , आणि माझे ते माझेच ' हा डाव इंग्रजांनी टाकल्यास , नेपाळच्या महाराजांनी तो यावर हाणून पाडण्यास भिऊ नये, मग जे होईल ते होवो. गुरखा जातीच्या हृदयात नवा उत्साह नवी आकांक्षा , नवे बळ संचरत आहे. उभे हिंदु राष्ट्र महाराजांच्या न्याय्य पक्षाचे समर्थक आहे. तेव्हा नेपाळच्या वाढत्या विस्तारास आणि महत्वास आणि महान आकांक्षांस शोभेल आणि अनुकूल पडेल ; अशीच स्वहितकारक मैत्री करीन, नाही तर भलत्याच झंझाटात पडणे आम्हांस साफ परवडत नाही ; असे त्यांनी निक्षून सांगून टाकण्यास या वेळी मुळीच कचरू नये , अशी आमची त्यांस साग्रह विनंती आहे.

## नेपाल - महाराजा स्वागत

## रत्नागिरी-हिन्दू सभाका प्रस्ताव

रत्नागिरी हिन्दू-सभाने नेपाल महाराजकी सेवामे यह स्वागतपत्र भेजा है-

हिन्दुओके एकमात्र स्वतंत्र राज्यके अधिपती महाराजाधिराज नेपालके मुख्य प्रधान श्रीमहाराज चन्द्रसमशेर जंग बहादूर राणा कलकत्तेमे पधारनेवाले है, यह सुनकर यह सभा उनका स्वागत करके अखिल हिन्दुजनताकी उनके उपर जो हार्दिक निष्ठा और पूज्यबुद्धी और प्रीती है उसे व्यक्त करती है। और ऐसी आशा प्रदर्शित करती है , की हिन्दु जातीके महान भविष्यके नेतृत्वका ध्वज , अपने प्रबल हाथमे , लेकर नेपाल शीघ्रही कार्यक्षेत्रमे पदार्पण करेगा।

**- उपाध्यक्ष,**

**श्री हिन्दु सभा, रत्नागिरी.**

**वरील ठरावास महाराज मुख्य प्रधान नेपाळ यांचे उत्तर त्यांचे अमात्य (Private Secretary) यांचे हस्ते आले आहे :--**

**88 Theatre Road, Calcutta.**

**२२ पौष ८४**

प्रिय महाशय,

रत्नागिरी हिन्दु सभाका श्रीमान महाराजका स्वागत प्रकाशक आपका पत्र पाया. सभाका प्रीतीपूर्वक स्वागत तथा शुभेच्छा के लिये हार्दिक धन्यवाद स्वीकार हो.

**- आपका प्रेमाभिलाषी**

**मरीची मानसिंह, बडा काजी**

**श्रीयुत उपाध्यक्ष, हिंदुसभा,**

**रत्नागिरी प्रेसिडेन्सी**

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक १६ वा**

# हा पहा घर बुडावू 'विटाळा'चा प्रताप

**(१९२८)**

हिंदुस्थानचे पाय परतंत्रतेच्या बेड्या ठोकून परकीयांनी जखडले आहेत. त्या परकीय बेड्या अत्यंत जड आणि विषदिग्ध आहेत ; परंतु त्या पायांतील परक्यांच्या दास्यशृंखलांहूनही हिंदुस्थानचा जीव जर आज काही अंशी अधिक तीव्रतेने व्याकूळ होत असला, तर तो ह्या विटाळवेडाच्या ज्या बेड्या आपण स्वतःच आपणास ठोकून घेतल्या आहेत, त्यामुळेच होय. परक्यांच्या बेड्या पायात पडल्या आहेत ; पण ह्या 'विटाळा'च्या स्वकीय बेड्या आमच्या हृदयासच , जखडून धरीत आहेत. ह्या 'विटाळा'पायी खाण्यापिण्याच्या विटाळापायी- धर्मचा धर्म , जातीची जाती, वंशचा वंश हिंदुत्वास मुकतो ; अशा अत्यंत बाष्कळ आणि विमूढ समजुतीपायी , पाच कोटींवर हिंदु परकियांस बाटविता आले! जे आज आठ नउ कोट हिंदु स्वराष्ट्रास मुकून बळे बळे परधर्मात आम्ही ढकलले! आणि स्वतःचे शत्रू करून घेतले ; त्या नऊ कोटीत निदान पाच कोटी हिंदु तरी निव्वळ ह्या विटाळवेडाचे पायी बाटले गेले! ख्रिश्चनांच्या किंवा मुसलमानांच्या हातचे पाणी किंवा फडताळांतील पाव त्यांनी खाल्ला म्हणून ते बाटले म्हणून वंशपरंपरा आम्ही त्यांस मुकलो. आजही मुकत आहोत.

ह्या 'विटाळा'पायी एका ब्राह्मण वर्णाचे एक हजार ब्राह्मणवर्ण झाले. एका क्षत्रियाचे एक हजार वर्ण झाले. बंगाली ब्राह्मण , कनोजी ब्राह्मण, स्वारस्वत ब्राह्मण, मद्रासी ब्राह्मण-बहुतांशी केवळ त्यांच्या खाद्याखाद्याच्या भिन्नतेमुळे आणि आपण खात नाही ते दुसर्यांनी खाल्ले म्हणजे त्यांच्या पंक्तिस्पर्शाने देखील , आपण बाटतो, आपणास विटाळ होतो. ह्याच विलक्षण समजुतीने मुख्यतः हा आजचा चातुर्वर्ण्याचे चार हजार वर्ण करणारा, राष्ट्रविघातक जातिभेद मुख्यतः उत्पन्न झाला.

ह्या 'विटाळा'पायी परदेशगमन निषिद्ध झाले. परदेशांत सोवळे अन्न आणि सोवळे पाणी मिळणार नाही , शिवाशिव होईल, म्हणून मुख्यतः म्हणूनच परदेशगमन निषिद्ध झाले. त्यामुळे परदेशांतील उलाढाली कळेनाशा झाल्या. परसहवासाचा विटाळ , त्याने हिंदुत्वाचा मुकटा बाटतो. पण केवढे आश्चर्य! की तो विटाळ आपण परदेशांत गेला म्हणजेच काय तो होतो! परके आपल्या देशांत आले म्हणजे होत नाही!! आज अरेबियांत जितके मुसलमान नसतील , तितके हिंदुस्थानात आहेत. उत्तरेस तर हिंदूंच्या घरात मुसलमानाच्या घराच्या भिंती खेटून असतात ; पण तो विटाळ नाही. परक्यांच्या वेशांत जाऊन तिकडून दोन पैसे, दोन तोळे सोने किंवा दोन चार राज्ये कमावणे हा विटाळ, पण परदेशी यांना आपल्या देशांत येऊ देऊन आपले दोन पैसे गमावणे , दोन तोळे सोने देऊन

टाकणे, दोन चारच काय, पण सारीच्या सारी राज्ये त्यास घेऊ देणे हा विटाळ नाही. हे अगदी धर्मकृत्य! वास्तविक पाहाता , परदेशाचा मनुष्य, आपल्या देशास शिवू देणे , हा 'विटाळ' हिंदुंनी मानिला असता, तर एक वेळ इतके असभ्य आणि आत्मघातक होते ना! पण कुठली उलटी बुद्धी सुचली पहाः हिंदुंनी अटक ओलांडू नये , राघोबा दादांच्या सिंधुपार उडू पाहाणार्याट विजयी घोड्यांने देखील अटक उतरू नये, नाही तर हिंदूंची जात जाते! पण मुसलमानांचे हजार महंमद घोरी आणि गजनी आणि सेंट झेवियर आणि क्लाइव्ह भुईची आणि पाण्याची अटक उतरून देवळे फोडीत आणि स्वराष्ट्र झोडीत आंत घुसले ; तर त्याने काही विटाळ होत नाही. हिंदूंची जात जात नाही!! शेवटच्या बाजीरावाचे वेळेपर्यंत इंग्रजांची मोजकी माणसेच नव्हे- तर सेनाच्या सेना , हिंदुस्थानांत घुसल्या होत्या , हिंदुस्थानांतील राज्यांची राजधान्यांची, राजवाड्यांची खडान खडा माहिती- त्यांच्या सेना किती , त्यांच्या गल्ल्या किती, त्या राजवाड्यांत खोल्या किती-राणी कोणत्या खोलीत राहाते आणि तिच्या दासींपैकी कोणती बातम्या देण्याइतकी तोंडाळ आणि पोटाळ आहे , ही सर्व वित्तंबातमी ते इंग्रज मिळवून टिपून ठेवीत , प्रत्यक्ष गारपिरावर उभे होते! पण त्याने हिंदूंची जात गेली नाही. हिंदूंचा मुकटा विटाळला नाही. पण राघोबा दादाने दोन हिंदू विलायतेस-इंग्लंडचे राज्य घेण्याकरिता नव्हे , तर नुसते राजकीय बोलणे करण्यासाठी इंग्लंडास धाडले , तर त्यांची 'जात' बाटली, विटाळ झाला. त्यांना प्रायश्चितामागे प्रायश्चित्ते करता करता मरणी 'मरण' येऊन 'योनिप्रवेश' करावा लागला! मुंबईच्या दगडी योनीतून , लाक्षणिक पुनर्जन्म घ्यावा लागला! मग काय आश्चर्य की , इंग्रजांच्यावर युरोपात काय पेच आहेत ; किंवा त्यांच्यावर काय पेच मारता येण्यासारखे आहेत ; हे ज्ञान तर राहोच ; पण इंग्रजांची लोकसंख्या तरी किती आहे ह्यांची देखील माहिती हिंदूंना मिळू नये आणि त्यांनी त्या वेळच्या पत्रांतील उतार्यांलतील पुढील वाक्याप्रमाणे एकमेकांस आश्चर्य विचारावे की , 'हे शिंचे इंग्रज, आहेत तरी किती!' कारण, या विटाळवेडापायी, परदेशगमन निषिद्ध झाले!

ह्या विटाळवेडापायी आम्हास मुकुटापेक्षा मुकट्याची काळजी अधिक वाटली. परदेशाचे राज्य घेण्यासाठी देखील परदेशांत जाणे म्हणे-विटाळ! पण परदेशाने स्वदेशांत येऊन स्वदेशाचे राज्य घेतले तरी तो काही नाही होत विटाळ! मुकुट गेल्याचा विटाळ नाही, मुकटा सोवळा राहिला म्हणजे झाले. या मुकट्यापायी मुकुट दवडले. परदेशगमन निषिद्ध करून परकीय राजकारण ठार बुडवून राज्ये गमावली. अरेबियांत मुसलमानांचे रेताळ वादळ उठल्याची पहिली बातमी येताच हिंदू सेना अरेबियावर चालून जात्या तर ? ह्या वेळेस बलुचिस्थान हिंदू होते- अफगणिस्थानावर हिंदू राज्य होते. पण त्याचवेळी परदेशगमन निषिद्धतेची अवदसा आठवू लागली होती. मग अरेबियाची बातमी मिळणार कशी? पुढे अफगाणिस्थान पडले- हिंदूंना अटकेची नित्याची अटक झाली. मुसलमान आत आले; पण हिंदुबाहेर पडेना. नाहीतर मुकटा विटाळता ना! त्यावेळचे परदेशाविषयीच्या

आत्मघातक, अज्ञानाचे एक व्यंग्य चित्र 'गोमंतक' काव्यात दोन श्लोकांत खेचले आहे, ते किती यथार्थ आहे! सर्वसामान्य जनतेस पर देश माहिती किती आणि कशी मिळे त्याची कल्पना त्यांतील एका भटक्या साधूच्या वर्णनावरून बरोबर येते. गावच्या मारुतीचे देवळात किंवा पिंपळा-वडांच्या पारावर ; गोसावी बैरागी आला की , त्याचे भोवती लोक जमत.

**"ये तिथे फिरता साधूः धुनी पेटवुनी बसे।**
**प्रार्थिता बहुती सांगे, लव देश कुठे कसे।।**
**वेद चिलमिच्या शब्दी शब्दी सोडीत तो धुरा।**
**विलायतकशी आहे काशीच्याच पुढे जरा।।"**

ज्यावेळी त्याच विलायतच्या इंग्रजांचे हजारो लोक हिंदुस्थानात घुसून आपला व्यापार गिळंकृत करीत होते ; आपली भांडणे ऐकत होते. आपल्या किल्ल्यांतील भगदाडे इंचाइंचानी मोजून टिपीत होते आणि शेवटी बाजीरावाच्या अर्ध्या सिंहासनावर एक पाय ठेवून चढले देखील होते. त्या वेळेस त्याच इंग्रजांच्या देशाविषयी आणि त्यांच्या शत्रूंच्या देशाविषयी हे घोर अज्ञान आपल्या सामान्य जनतेत पसरलेले होते! राज्य बुडण्याच्या अनेक कारणांपैकी हे परदेशगमन निषिद्धतेचे या- विटाळवेडाचे कारण- हे एक प्रमुख घटक होते. त्यात यावर देखील कोणास शंका असणे , शक्य आहे काय ? खरोखर! या विटाळवेडाने मुकुटापायी मुकुट घालविला! ते मागचे राहो , पण अत्यंत दुर्दैवाची गोष्ट ही की, ह्या विटाळवेडापायीच आजही हिंदूंचा एकमात्र अवशिष्ट असलेला मुकुटही नाशाचे जबड्याच्या छायेत निस्तेज होऊन पडला आहे. तो मुकुट नेपाळचा. ती नाशाची छाया म्हणजे हे विटाळ-वेड. नेपाळ आणि अफगाणिस्थान यांची तुलना केलेला 'श्रद्धानंदा'तील लेख, आमच्या वाचकांना आठवतच असेल. त्यात अमीर युरोपमध्ये जाऊन केवढ्या महत्वाच्या राजकीय उलाढाली करीत बसला आहे आणि नेपाळचे महाराजही जर युरोपमध्ये तशाच स्वतंत्र महाराजांच्या नात्याने जाते ; तर हिंदू राष्ट्राचाही केवढा गौरव आणि हित होण्याचा संभव होता हे विशद केलेले होते. पण नेपाळचे महाराज हिंदू ; त्यांच्या पायात परदास्याच्या परकी बेड्या जरी सुदैवाने पडलेल्या नसल्या , तरी स्वकीयांच्या या विटाळवेडाच्या विषारी बेड्या त्यांच्या हृदयांस जखडून धरीत आहेत. त्या परदेशगमन त्यांस करू देत नाहीत. त्यांस तर काय , पण त्यांचा एक जावई विलायतेत युरोपांत जाऊ पाहात होता , त्यासदेखील राजपंडितांच्या आज्ञेवरून घरून विलायतेच्या प्रवासास जाण्याची एखाद्या महान अपराध्याप्रमाणे बंदी करण्यात आली आहे! न जाणो महाराज नाहीत, तर त्यांचा जावई का होईना- पण युरोपांत जाता तर हिंदुंचे एक तरी राज्य उरले आहे, हे युरोपास कळून त्यांच्याशी संधी स्थापित करून हिंदुस्थानांत एखादे मोठे राजकारण उभे राहील!

त्यातही ह्या विटाळवेडाच्या निलर्ज्जपणाची पराकाष्ठा व्यक्त करणारी गोष्ट म्हणजे ही की मागे एकदा हेच महाराज , प्रधान आणि जर्मन युद्धाचे वेळी , हजारो गुरख्यांच्या पलटणी युरोपमध्ये गेल्या होत्या! पण तेव्हा, इंग्रजांची आज्ञा झाली होती. मग राजपंडित काय नि स्मृति कायः सगळ्या गप्प! महाराज हिंदु पण त्याचा विटाळः इंग्रज अहिंदु पण त्याचा विटाळ नाही! तसेच हे! इंग्रजाच्या वतीने इंग्रजी गौरवासाठी परदेशगमन निषिदः विटाळ होतो! खाण्यापिण्याच्या अत्यंत बाष्कळ अशा ह्या विटाळवेडापायी पाच कोटी हिंदु बाटविले गेले. अस्पृश्यता , जातीभेद इत्यादी गाढवपणाच्या फाटाफुटींनी हिंदुराष्ट्राच्या जीवनास खंडित करून त्यांचे तुकडे तुकडे उडविले. परदेशगमन निषिद्ध करून मुकुट्यापायी मुकुट घालविले! हे सर्व कसे झाले आणि कसे होत आहे ही शिवाशिवीची अवदसा राष्ट्रास पाऊल म्हणून पुढे कसे टाकूच देत नाही , एकवेळ ती परदास्याची लोखंडाची बेडी तोडणे सुलभ. पण हा जातीय हृदयास घट्ट जखडून टाकणारा , मुकट्याचा गळफास सोडविणे किती दुष्कर झाले आहे हे पुन्हा एकदा प्रत्ययास आणून देणारे वर उल्लेखिलेले नेपाळच्या महाराजांच्या जावयास परदेशगमनाची बंदी करून टाकणारे प्रकरण वाचकांस त्या जमातांच्याच, कळकळीच्या शब्दांत सांगून टाकतो.

नेपाळच्या मुख्यमंत्र्यांचे एकुलते एक जामात आणि नेपाळी राज्यांतील बजंग प्रदेशाचे एका काळचे अधिपती राजे कर्नल राजा जयपृथ्वी बहादुरसिंग ह्यांची ‘बंगलोर डेली पोस्ट’च्या प्रतिनिधीने , नेपाळ मंत्र्याबरोबर ते कलकत्ता छावणीमध्ये असता त्यांच्या एकाएकी आश्चर्यकारक नाहीसे होण्याविषयी हिंदी पत्रांनी नुकत्याच केलेल्या नाना प्रकारच्या विधेयांविषयी खरा प्रकार स्पष्ट व्हावा म्हणून बंगलोर येथे नुकतीच भेट घेतली. खरोखर वस्तुस्थिती काय होती. त्याविषयी राजेसाहेब म्हणतातः-

“मी एका विद्वान गृहस्थाच्या साहाय्याने ‘मनुष्यस्वभाव’ या विषयावर मनुष्यजीवन नि मनुष्यज्ञान यांची सांगोपांग चर्चा करणारे , एक शास्त्रीय पुस्तक वैयक्तिकरित्या, लिहित आहे. ते जवळजवळ पुरे झाले असल्यामुळे , आणि वारंवार घडणार्यार धार्मिक माथेफिरूपणा , जातीय वैषम्य , राष्ट्रीय द्वेष वगैरे प्रकारांनी अखिल मानुषकाला कसा भयंकर त्रास सहन करावा लागत आहे , हे दृष्टीस आणल्याने माझ्या मनात एक निराळाच विचार बळावला आणि तो म्हणजे अखिल मनुष्य जातीवरील या संकटाची तीव्रता कमी करण्याच्या हेतूने , एक सार्वजनिक संस्था काढणे हा होय. अशा संस्थेपासून इच्छित हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतांना जगातील निरनिराळ्या देशांतील तत्वज्ञानी आणि शास्त्रीय संस्थांची माहिती करून घेणे अपरिहार्य आहे , असे वाटल्यामुळे त्याकरिता आणि त्याचबरोबर माझ्या त्या पुस्तकावर अभिप्राय घेण्यासाठी म्हणून मी जगभर प्रवास करण्याचा निश्चय केला.”

“पण माझे देश-बांधव नेपाळी राज्यांतील एकाही हिंदु मनुष्याला हिंदु धर्माने घालून दिलेले निर्बंध नि रुढी मोडण्याची मोकळीक देत नाहीत ; देणारही नाहीत. जलमार्गाने अत्यंत दूरच्या देशास जाणे आणि हिंदु उच्च वर्णियेतर लोकांच्या हातचे अन्न घेणे म्हणजे हिंदु धर्माचे उल्लंघन करणे असे मानले जाते. तात्त्विक दृष्ट्या मी जरी कोणाही हिंदुइतकाच हिंदू आहे , तरी हिंदूंमधील धार्मिक अंधश्रद्धा आणि भोळेपणा ही माझ्या मताला केव्हांही न पटणारी आहेत. आणि म्हणून माझे काम तडीस नेण्यास मला दोहोंपैकी एकच मार्ग मोकळा होता. एक म्हणजे महाराजांपाशी (नेपाळमंत्री) परवानगी मागणे आणि त्यांनी नाही म्हणतांच, “मला आपल्या परवानगीची आवश्यकता नाही”, असे म्हणून निघून जाणे. पण हे करणे प्रशस्त वाटेना आणि दुसरा मार्ग म्हणजे त्यास योग्य म्हणा किंवा अयोग्य म्हणा. पण कोणच्या तरी मार्गांनी लोकापवाद टाळावा म्हणून कोणासही न कळविता पळून जाणे. ह्यांपैकी मी दुसरा मार्ग पसंत केला आणि माझ्या हालचालींचा किंचितही सुगावा लागू न देता मी कलकत्त्याहून पळालो. माझ्या शोधाने थोडे दिवस हिंदी पत्रांत मोठीच खळबळ उडवून दिली. मी मुंबईस आहे असे नेपाळमंत्र्यांस कळताच त्यांनी माझ्या अपेक्षेप्रमाणे मला थोपवून धरण्याचा यशस्वी प्रयत्न केला. निर्बंध बंधने आणि रुढी ही फरक केली जाण्यास योग्य असतात , इतकेच काय पण त्यांत वेळोवेळी दुसर्यांी देशांतून फरक होत आलेलाही आहे हे जरी मला ठाऊक आहे, तरी मला हे मान्य करणे भाग आहे , की महाराज (नेपाळमंत्री) हे असली बंधने तोडण्याइतकी नेपाळची सिद्धता आहे की नाही, हे ठरविण्यास माझ्याहून फार योग्य मनुष्य आहेत. परंतु मी हे वैयक्तिक, उत्तरदायित्वावरच करणार आहे आणि हिंदुस्थानात मी गेली चौदा वर्षे राहात आलो असल्यामुळे माझ्या कोणत्याही कृत्याने नेपाळी लोकांना केव्हांही दुःख होऊ नये, अशी इच्छा असल्याने महाराज नि मी मिळून या प्रकरणात काही तरी उपाय काढू अशी मला फार उमेद आहे. अशा काही तरी समेटावाचून हिंदुस्थान सोडणे हे केव्हांही मला श्रेयस्कर नाहीच.”

“काही पत्रांनी प्रसिद्ध केल्याप्रमाणे माझ्या डोळ्यांना औषधोपचार , हाही परदेशांत जाण्यांत माझ्या अनेक हेतूंपैकी एक होता. माझ्या अपरिपक्व मार्गांनी अखिल मानुषकाची सेवा करण्याची माझी अत्यंत प्रबळ इच्छा आहे आणि त्यासाठी Humanistic मंडळ सुरू करण्याचा माझा विचार आहे. या मंडळाचे उद्देश लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. यद्यपि पूर्वी माझे ते उद्देश सर्व जग हिंडून झाल्यावर प्रसिद्ध करण्याचा विचार होता.” - अशा ह्या विटाळाचा आपणांस केव्हा विटाळ वाटणार?

लेखांक १७ वा

# नेपाळास शल्य सलू लागले !

(१९२८)

हा त्यांचा अफगाणिस्थान- हा आमचा नेपाळ! दोन्ही संख्या , क्षेत्रफल, परंपरा, शौर्य, स्वातंत्र्य इत्यादी वृत्तांनी तुल्यबळ असता , अफगाणिस्थानचा एकाएकी, चोहींकडे इतका उदो उदो का व्हावा-इतकी महत्वाकांक्षा तो प्रकटपणे का धरू शकतो , युरोपांतील महाशक्तीशाली राष्ट्रांशी समानतेने संधीविग्रह घडू बिघडू शकण्याची शक्ती त्यात कुठून संचारली आणि हा आपला नेपाळ इंग्रजांच्या ताटाखालचे मांजर होऊन जगात कोणाशीही बोलण्याची धमक न धरिता खाली मान घालून का बसला आहे. हा अत्यंत लाजिरवाणा स्थितीभेद, हे विषारी शल्य, आमच्या नेपाळीय बंधूंच्या मनास, शेवटी सलू लागले खरे?

आजपर्यंत ज्या अत्यंत अनुकूल परिस्थितीत नेपाळला आंतरराष्ट्रीय राजकारणाने ढकलीत आणले आहे; त्याची जाणीव किंवा नेणीवही स्पष्टपणे त्यास होऊ नये , इतक्या चैतन्यहीन स्थितीस आपले हे वीरवर ज्ञातिबंधु पोचले होते. स्वतःच्या अवनतीची जाणीवही नष्ट होण्यासारखी दुसरी भयंकर अवनती नाही! आत रुपलेल्या शल्याची कळ लागणेही, व्यथा होणेही बंद होते. तेव्हा त्याच स्थितीस मरण म्हणतात! नेपाळास स्वतःच्या महत्वाची, राष्ट्र ह्या दृष्टीने त्याच्या अस्तित्वाचीही जाणीव नाहीशी झालेली होती. हिंदू स्वातंत्र्याचा ध्वज, त्याच्या हातात होता. पण तो नेपाळ स्वतः निश्चेतन होऊन पडल्यासारखा दिसत होता. हे पाहून विव्हल अंतःकरणाने आम्ही त्यास हलवू लागलो ; डवचळू लागलो; व्याकूळ आशेने आणि भयंकर भीतीने आणि तळमळत हाक मारू लागलो. “ऊठ! नेपाळा, ऊठ! आणि या तुझ्या दाराशी ठोठावण्यास आलेल्या भारताच्या भाग्यश्रीचे स्वागत कर!”

हिंदुजातीच्या व्याकूळ आशेच्या स्पर्शासरशी नेपाळचे हृदय थरथरू लागले. त्या महान महत्वाकांक्षेचे प्रतिध्वनी हळू हळू आणि अस्पष्टपणे का होईना , पण त्याचे हृदयातून उठू लागले.

नेपाळ जागू लागला. किंचित डोळे उघडू लागला. त्यास जपानची , काबूलची, इराणची, इतकेच काय; पण एवढ्याशा तिबेटची परिस्थिती दिसली; स्वतःची दिसली आणि विषाद वाटू लागला की अरे हे काय ? मी स्वतंत्र आहे ना ? हा हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज माझे हातात देऊन मला देवाने हिंदुस्थानच्या राज्यश्रीच्या भवितव्येवर पहारा करण्यासाठी अथे नेमिले आहे ना ? मग मी असा एखाद्या अंगचोर किवा आळशी सैनिकासारखा पहार्याविर तो ध्वज हातात धरीतच उभ्या उभ्या डुलक्या काय घेत बसलो आहे! हा अफगाण आपल्या सामर्थ्याची नागली, जगाच्या बाजारात ओरओरडून विक्री करीत आहे ;

आणि माझे हे गहू देखील तसेच पडून! हा अत्यंत लाजिरवाणा स्थितिभेद, हे विषारी शल्य नेपाळला सलू लागले खरे!

त्याचे प्रत्यंतर जर कोणास पहाणे असेल , तर त्यांनी गुरखासंघाचे मुखपत्र जे "गुरखा संसार" त्यातील आजकालचे लेख पहावे. नेपाळी लोकांचा संघटित असा हाच एक संघ आहे. त्याचे नाव 'गुरखा संघ' असे जरी आहे आणि जरी "नेपाळ संघ" म्हणून नेपाळीय यच्चावत हिंदुमात्राला संघटित करणारा संघ त्यांनी लवकरच काढावा अशी आम्हांस उत्कट इच्छा आहे ; तरी नेपाळी बंधूंत आमच्या भावभावनांचे प्रतिबिंब किती पडत आहे ते अजमावण्यास ह्या नेपाळच्या अनन्य संघाच्या उद्‌गारांवांचून आपणांस दुसरे साधन नाही. या गुरखा संघाचे 'गुरखा संसार' हे मुखपत्र आहे. इतकेच नव्हे तर नेपाळीय बंधूंनी चालविलेल्या अवघ्या दोन तीन पत्रात तेच प्रमुख आहे. त्याचे चालकत्व श्री. सुभेदार चंदनसिंग या सुशिक्षित आणि महायुद्धामध्ये युरोपांत मोठमोठ्या ब्रिटिशादिक सैनिक अधिकार्यां त रुळलेल्या आणि रणांगणांत तावून सुलाखून आलेल्या एका सैनिक संपादकाकडे एका वीरलेखकाकडे आहे. या पत्राचा प्रसार गुरखा जनतेत , नागरिकांत आणि सैनिकात झालेला आहे. यावरून ते गुरखा समाजाच्या प्रवृत्तीचे सध्यांच्या परिस्थितीतील एकच उपलब्ध असलेले प्रामाणिक द्‌योतक आहे. हे सर्वांच्या ध्यानात येईलच.

हे पत्र त्याच्या गेल्या महिन्यातील (२९ जून १९२८) अंकात एकाजागी लिहिते कीः-
" . . रोगी जिवंत आहे तोवरच त्यास काय ते औषध देण्याचा उपयोग! ही बिचारी गुरखा जाती-- आज तिला वेळेवर औषध जो देईल, तोच तिचा खरा त्राता. दुःख, दारिद्र्य, अज्ञान या रोगांनी ती ग्रस्त आहे. त्यावर आता तत्काल उपाय केला पाहिजे. हे कर्तव्य राजाचे आहे. आणि त्या राजासही ज्यांचे साह्याविना चालता यावयाचे नाही ; त्या राष्ट्रांतील सर्व शिक्षित आणि विचारवान समाजाचे आहे."

"राजाचे हातात बल , धन, अधिकार, अवसर, सर्व साधने असतात. त्यांच्या द्‌वारे तो थोड्याच काळात राष्ट्राचे कल्याण करू शकतो. सुशिक्षित समाजाचेही कर्तव्य आहे की , त्याने प्रजेच्या सुखदुःखांची पुकार राजापर्यंत पोचवून संघटनेच्या बळाने त्यास राष्ट्रीय प्रगतीस साह्य करण्यास वेळेवर भागही पाडले पाहिजे. राजाने नेहमी ध्यानात बाळगावे की प्रजा सदासर्वदा चूप बसू शकत नाही. प्रजेने ध्यानात ठेवावे की आरडाओरड केल्यावाचून प्रत्यक्ष माता देखील मुलास दूध देत नाही. ज्या देशांत राजा प्रजेच्या हिताची जाणीव सोडून स्वेच्छाचारी होतो, त्या त्या देशांत कोणा ना कोणातरी दिवशी प्रचंड खळबळ उडून राजविद्रोहाच्या ज्वाळा उठतात. क्रांतीयुद्धे होतात. त्या क्रांतीयुद्धांत राजा , प्रजा आणि त्यांचा देश ह्यांची सर्वांची राखरांगोळी होण्याचाही संभव असतो. यासाठी असा प्रकार आमच्या नेपाळात घडू नये. म्हणून आम्ही ईश्वराची करुणा भाकित आहो! " (अर्थात नेपाळचा राजा स्वदेशीय , स्वधर्मीय, आहे, म्हणूनच तिथे प्रजेत आणि राजांत

परस्परांविषयी इतकी चिंता वाटते. नेपाळचा राजा हिंदुंचा खरा राजा आहे. "घरात शिरला चोर तया मी मानीयला राजा " असा प्रकार नेपाळात काही झालेला नाही! म्हणून इतकी करुणा तरी भाकावयाचीय. )

आमची आमच्या गोरखा जातीस , आमच्या समाजास आमच्या देशास , सुशिक्षित बंधूंस अशी आग्रहाची विनंती आहे की , हे बंधूंनो ज्याप्रमाणे आपले घर , वाडी, बैल, अलंकार, मत्ता आपली समजून तिच्या संरक्षणासाठी आणि प्रवर्धनासाठी झटता , त्याच प्रकारे आपल्या देशालाही आपलाच आहे हे ओळखून त्याचे संरक्षण करणे आपण आपले कर्तव्यच समजले पाहिजे. ज्याप्रमाणे आपला पुत्र , पुत्री, आई, बहीण, इष्टमित्र यांना संकटातून वाचविण्यासाठी आपला जीव देखील धोक्यात घालून झुंजण्यास आपण प्रवृत्त होतो. अगदी तसेच आपण आपल्या जातीसही तितक्याच ममत्वाने आपली समजून तिच्या उद्धारासाठी प्राणाचा पण लावून झुंजले पाहिजे. माझा देश हे माझे घर आहे, माझा किल्ला आहे, माझी जाती आहे , माझे कुटुंब आहे. माझ्या देशासाठी माझा प्राण अर्पण करणे , माझे कर्तव्य आहे. असा विचार प्रत्येक गुरखा नरनारीचे मनात येईल , जेव्हा स्वदेशाभिमानाची ज्योत त्यांच्या हृदयात प्रज्वलीत होऊन उठेल , तेव्हा देशोन्नतीला फार वेळ लागणार नाही. सुशिक्षित समाजाने आता जातीसंघटनांचा डंका वाजविला पाहिजे. राजकारण आणि शिक्षण दोन्ही शक्ती त्यांच्यांत समाविष्ट झाल्या पाहिजेत. नुसत्या शिक्षणाला काय जाळावयाचे आहे! राजा आणि प्रजा या दोन शक्ती संयुक्त बलाने देशोन्नती करण्यासाठी जेव्हा पुढे येतात ; तेव्हा ती किती सहज आणि सत्वर होते ते जपानच्या उदाहरणावरून आपणास सहज शिकता येईल!

अशी प्रस्तावना करून या पत्रात त्याच्या देशभक्त संपादकांनी जपानच्या इतिहासाचे समालोचन करणारी एक लेखमाला चालू केली आहे. त्यात येता जाता हे दाखविले आहे की, "जे जपान एका पत्रास वर्षापूर्वी आज नेपाळ आहे त्याहून नसले तरी तितकेच अवनत होते. आणि अमेरिकेच्या मूठभर सैनिकांना बघताच भयाने थरकापून गेले. तेच जपान आज त्याच अमेरिकेस जड होऊन बसले आहे. तसेच नेपाळही राजा प्रजाजन संयुक्त बलाने, यत्न करतील तर जगात का नाव काढणार नाही!"

आम्हीही आमच्या नेपाळीय बंधूंस प्रतिज्ञेवर सांगू शकतो की , नेपाळ जपानपेक्षा अधिक बलिष्ठ होऊन बसेल. कारण जपान चार कोटी आहे. पण नेपाळच्या मागे २२ कोटी हिंदु आहेत. नेपाळ बावीस कोटी आहे! जर चाणक्याच्या दृष्टीने एक ज्योत नेपाळच्या दृष्टीच्या दीपांत कोणी पेटवील , तर हा उभा हिंदुस्थान नेपाळचा आहे! नेपाळ हिंदुस्थानात विलीन होऊन हिंदुस्थानच होणारा आहे!! या आजच्या नेपाळात ती शक्ती आहे. त्यातही परिस्थितीने , ती शक्ती सांगता येत नाही , इतकी वाढविली आहे. आता केवळ तीत विश्वास हवा! धाडस हवे! नेपाळातच नव्हे तर उभ्या भारतात ते हवे?

आणि म्हणूनच ते उत्पन्न होण्यासाठी नेपाळने नव्हे , तर आपण सर्वजणांनी, हा नेपाळचा डाव पणास लावून आता खेळला पाहिजे. त्याची कुठे थोडी चेतना उत्पन्न होत आहे. हे वरील उतार्यावरून दिसून येईल. पण ती शतपटीने अधिक जाज्ज्वल्यतेने आणि शीघ्रतेने प्रवर्धमान झाली पाहिजे. तर उपयोग! नाही तर , "गुरखा संसार"च्या कर्त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'रोगी' मेल्यावर वैद्य काय कामाचा ? ही भारताच्या भाग्योदयाची येणारी महान सुवर्णसंधी हातातून निसटण्याचे आधी नेपाळचा डाव अचूक पडला पाहिजे! तो एकच हुकमी पत्ता आता आपल्या हातात उरलेला आहे. पण तो हुकमी एक्का आहे. वेळेवर टाकीला तर डाव जिंकलाच म्हणून समजावे. पण तीव्र दुःखाची गोष्ट की हे अजून कोणीच लक्षात घेत नाही. जो तो चुलबोळकी, खेळण्यात गुंतलेला! जिकडे तिकडे, नुसती ट्रांव ट्रांव चालली आहे. जो रामबाण तो भात्यांत असून त्याचा ज्याला त्याला विसर , आणि बोरूचे बाण सोडून लुटपुट्या लढायात जो तो दंग! नेपाळ हा आजच्या भारताचा चंद्रगुप्त आहे. त्यास चेतना देणार्याल चाणक्याचे काम देवा, आता तू तरी कर.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक १८ वा**

# गुरखा संसार आणि "श्रद्धानंद"

**(१९२८)**

मराठी 'श्रद्धानंदा'त नेपाळच्या जागृतीविषयी आणि भारतीय राजकारणांत नेपाळचे केवढे परिणामकारक साधन , आज आपल्या हिंदुजातीचे हाती आहे. याची जाणीव हिंदुमात्रास करण्यासाठी जे लेख येतात ; त्याविषयी पुष्कळ सद्गृहस्थांकडून विचारण्यात येते; की हे विचार नेपाळी जनतेस , कसे पोहोचणार. या प्रामाणिक शंकेचे समाधान करण्यासाठी आम्ही प्रथम हे उत्तर देतो की नेपाळचा आपल्या एकमात्र स्वतंत्र हिंदुराज्याचा अत्यंत महत्वाचा उपयोग हिंदुजातीच्या भाग्योदयाचे कार्यी करणे न करणे हे एकट्या नेपाळचे हाती नाही. त्या विषयाची जाणीव , नेपाळेतर हिंदूस-महाराष्ट्रासही होणे, तितके अवश्य आहे की जितके ती जाणीव स्वतः नेपाळच्या आपल्या स्वबंधूंस , होणे अवश्य आहे. यासाठी मराठी 'श्रद्धानंदाने' महाराष्ट्रांत तरी त्या प्रश्नाकडे सर्वत्रांचे लक्ष आकर्षून घेण्याची कामगिरी जरी केली तरी ते उपयुक्तच आहे. परंतु त्या शंकेस दुसरे उत्तर असे आहे की , नेपाळच्या प्रसिद्ध पुढार्यांशी काही अंशी तरी , विचारविनिमय या लेखांच्या द्वारे अधिक चालू झाला आहे. प्रथम मराठी श्रद्धानंदाच्या मराठी लेखांचे हिंदी पत्रे भाषांतर करीत ते कधीकधी गुरखा जनतेतही वाचले जाई. पण आता 'हिंदी श्रद्धानंद' निघाल्याने ते विचार, तत्काल गुरख्यांतील नेपाळबारेहच्या प्रांतांत वसलेल्या लोकांत वाचले जातात. पण हिंदी न जाणणार्या अशा आपल्या नेपाळीय हिंदुबंधूंसाठी ते वाचावयास मिळावे, म्हणून "गुरखाली" भाषेतच ह्या दोन तीन वर्षात निघालेले वृत्तपत्र जे 'गुरखा संसार' तेही पण केव्हा केव्हा 'श्रद्धानंदा'तीलच लेखांचे भाषांतर करण्याची देशहितैषी तत्परता दाखवित असते. 'गुरखा- संसारा'ची आणि त्याच्या वीर-विद्वान , अशा गुरखा संपादकाची ओळख आमच्या वाचकांस 'शल्य सलू लागले ' त्या ताज्या लेखांत करून देण्यात आलीच आहे. त्या वृत्तपत्रांत 'गुरखाली' भाषेत सध्या, 'श्रद्धानंदा'तील "नेपाळच्या महाराजांचे कर्तव्य" हा लेख भाषांतर केला जात असून त्याचे आरंभी खाली उद्धृत केलेली संपादकीय टीप दिलेली आहे. तीविषयी आम्ही संपादकांचे आभारी आहोत. तीवरून 'श्रद्धानंदा'चे हृद्गत नेपाळच्या अंतःकरणात कसे प्रतिबिंबित होऊ लागले आहे , हे वाचकांच्या ध्यानात येईलच. उलट पक्षी, नेपाळचे हृद्गत नेपाळेतर हिंदुहृदयांत प्रतिबिंबित व्हावे म्हणून आम्हीही गुरख्यांच्या त्या प्रमुख 'गुरखा संसार' पत्रांतील आणि 'Himalayan Times' मधील लेखांचा संदेश मराठी आणि हिंदी श्रद्धानंदातून देत असतोच.

**गुरखा संसारकर्ते त्या टिपणीत लिहितातः-**

"खाली छापीत असलेला लेख मुंबईचे प्रसिद्ध समाचार पत्र 'हिंदी श्रद्धानंदा'च्या ता. २३ जून १९२८ च्या अंकातून उद्धृत केलेला आहे. या समाचार पत्रात गुरखा जातीच्या उन्नतीविषयी प्रायः अति मनोहर आणि विचारणीय लेख , प्रकाशित होत असतातः ज्यांचा अनुवाद आम्ही, समयी समयी, "गोरखा संसारा"च्या वाचकवर्गाच्या लाभार्थ प्रकाशित करीत राहणार आहोत. "

**लेखांक १९ वा**

# नेपाळला काय वाटते ?

**(१९२८)**

'गुरखा समाचार' पत्र आपल्या अफगाणिस्थान-विषयक अग्रलेखात लिहितो , की "अफगाणिस्थान आणि नेपाळ भारतवर्षाची दोन शेजारी स्वतंत्र राज्ये होत. अफगाणिस्थान मुसलमानी राज्य आणि नेपाळ हिंदु; भारतवर्षांच्या दोन मुख्य जाती ज्या हिंदु मुसलमान त्या या दोन स्वतंत्र राज्यांच्या बर्या‍ा वाईट स्थितीच्या कीर्तीच्या , जातीच्या, अवनतीच्याविषयी अनुक्रमे चिंतित असतात. हिंदूंना नेपाळचा अभिमान वाटतो. मुसलमानाना काबुलचा परंतु दुर्दैवाने नेपाळच्या हालचालींचा पत्ता जगताला तर राहोच , पण प्रत्यक्ष हिंदुस्थानला नव्हे , सर्व नेपाळी जनतेला देखील लागत नाही . पण काबुलला काही सुधारणा झाली की लगेच सर्व जगतभर त्याचा डंका वाजविण्यात येतो.

खरे म्हटले असता सभ्यता , धनधान्य जन-संख्या या सर्व गोष्टीत नेपाळ वरचढ असताही या समयी जो मान आणि मर्यादा काबूलच्या बादशहाची त्याने सर्व जगभर जो प्रवास केला आणि बरोबरीने टर्की , रशिया, जर्मनी, इटली इत्यादी राष्ट्राधिपतींशी जी संगनमते केली; त्यामुळे त्याचा जगांत होत आहे, त्या मानाने नेपाळचा मान आज जगात किती तरी कमी होत आहे!

मानवी सभ्यतेत काबुलपेक्षा आम्ही हिंदु धर्मावलंबी लोक किती तरी पुढे आहोत. 'जंगली' म्हणून गाजलेल्या ह्या काबुलने गेल्या पाच-दहा वर्षांत किती भिन्न सुधारणा केल्या, किती आश्चर्यजनक कार्य केले!

पेशावरचे 'सरहद्द' पत्र म्हणते, की काबुलात विद्याप्रसार अनिवार्य (Compulsory) करण्यात आला आहे. बालबालिकांना शाळेत धाडलेच पाहिजे. विश्वविद्यालय उघडले जात आहे. सर्व देशांत दूरध्वनी (Telephone) बिनतारी, मोटारमार्ग चालू आहेत. टाकसाळ , नोटा सुधारत आहेत. पडद्याच्या विषयी जुन्या लोकांचा मतभेद असताही सुधारणा होणार आहे. इटलीतून १०० मोटारी अलिकडेच आल्या. व्यापार जोरात आहे. शिल्पशास्त्र वाढत असून, जर्मन, फ्रेंच आदिक अनेक शिक्षक आणवून शिक्षण देण्यात येत आहे. तुर्कस्थानमधून सैनिक शास्त्रज्ञांचा विशिष्ट संच (Staff) आणवून अफगाण सेना युरोपच्या तोडीस तोड देणारी, करण्यात येत आहे. जगातील राष्ट्रांचे प्रतिनिधी काबुलला येऊन रहात असून काबूलचे राजदूत तिकडे रहात आहेत. प्रतिवर्षी शेकडो अफगाणी तरूण युरोप अमेरिकेतून शिकून काबुलला येत आहेत!"

'असंतोषः श्रीयोर्मूलम्'! नेपाळी मनांत , सध्यांच्या विमूढ अवस्थेविषयी , किती असंतोष उत्पन्न होत आहे ; हे वरील गुरखाली भाषेतील उतार्यावरून दिसलेच आणि

www.savarkarsmarak.com

त्यातच भावी क्रांतीचे बीज आहे! वरील उतार्यां तील एका वाक्याविषयी मात्र , एक आग्रहाची सूचना करणे आहे ; की, 'भारतवर्षाच्या शेजारी नेपाळ आहे ' असी भ्रमोत्पादक वाक्ये, आम्ही चुकून देखील लिहू नयेत! नेपाळ भारतवर्षाचे शेजारी नाही , नेपाळ, भारतवर्षाचे आंत आहे. नेपाळ भारतवर्षाचा एक अवयव आहे! नेपाळ आणि भारतवर्ष दोन नाहीत अंगांगी भावाने , संबद्ध झालेले ते एक एकजीवी राष्ट्र आहे. बंगाल , भारतवर्षाचे शेजारी आहे, हे म्हणणे जितके चुकीचे तितकेच नेपाळ भारताचा शेजारी म्हणणे चुकीचे आहे! शत्रू तसे म्हणोत! पण कुलभंगाचे, गृहभंगाचे ते पाप आमच्या हातून तरी स्वप्नांतही चुकून देखील घडणार नाही. अशी आम्ही सदोदित दक्षता बाळगिली पाहिजे. हे आम्ही गुरखा संसाराच्या स्वदेशाभिमानी हिंदू पुढार्यांास सांगणे नकोच. सहजगत्या शीख आणि हिंदू, नेपाळ आणि हिंदुस्थान अशी वाक्ये लेखनात पडतात; पण ती फार घातक असतात!

शीख हिंदू आणि शीखेतर हिंदु हे वाक्य बरोबर आहे. पण शीख आणि हिंदू हे वाक्य चुकीचे आणि कुलोच्छेदक आहे. कारण नेपाळ भारत वर्षांतर्गतच आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

लेखांक २० वा

# नेपाळा ! तुला राज्य करण्याची आवश्यकता तरी अजून वाटत आहे ना?

(२० सप्टेंबर १९२८)

**काकोऽपि जीवति चिराय बलिंच भुंक्ते!**

पुण्याच्या प्रख्यात 'केसरी' पत्रात नेपाळची वस्तुस्थिती प्रत्यक्ष अलीकडेच पाहून आलेल्या प्रसिद्ध वैमानिक कॅप्टन पटवर्धन यांची भेट आणि त्या प्रसंगी त्यांनी दिलेली काही माहिती छापण्यात आलेली आहे. वैमानिक पटवर्धन हे वैमानिक विषयांत तज्ज्ञता मिळवून युरोपमध्ये आणि नंतर काही दिवस अफगाणिस्थानात विमान विभागात प्रत्यक्ष नोकरी करून नावाजलेले आहेत. उभ्या हिंदुस्थानात या नवीन कलेचा आणि शास्त्राचा अभ्यास करून त्यात प्राविण्य मिळविणार्याग अगदी पहिल्या चार पाच गृहस्थांत पटवर्धन यांची गणना केली पाहिजे. आपल्या या ज्ञानाचा उपयोग आपल्या एकमात्र स्वतंत्र हिंदुराज्याच्या अभ्युदयार्थ करावा अशी अत्यंत स्पृहणीय महत्वाकांक्षा धरून हा शूर देशभक्त अनेक कष्ट सहन करीत नेपाळास गेला आणि तेथील महाराजांस भेटला. पण त्याच्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे ठायी , महाराजांनी त्यांस कळविले की , 'विमानासंबंधी त्यांना अद्याप आवश्यकता वाटत नाही!'

सहा सात हजार वर्षापूर्वी कुबेराचे 'पुष्पक' विमान घेउन देखील एकदा त्यात बसण्याची आणि ते अयोध्येस घेऊन येण्याची आवश्यकता श्रीरामचंद्रास वाटली होती ; पण सहा सात हजार वर्षे उलटली. तरी नेपाळच्या महाराजांस विमानांची आवश्यकता अद्याप वाटत नाही! युरोपमध्ये लहान मुलांची 'उडती' (Fly) म्हणून एक सायकलच्या पद्धतीची एकेरी विमाने निघून घरोघरी ती सायकलसारखी दिसू लागण्याची वेळ आली , तरी नेपाळास एकाही वैमानिकाची किंवा विमानाची आवश्यकता अद्याप वाटत नाही ? अफगाणिस्थानला विमानी विद्या आपल्या देशांत आणण्याची इतकी घाई झाली की ती विमाने आपल्या घरी करण्याचे, कारखाने काढण्याचे ज्ञान संपादन करून येण्यासाठी त्याने स्वतःचे लोक परदेशांत पाठविले असतांही ते परत येण्याची देखील वाट न पाहता इटलीसारख्या परस्थ राष्ट्रांतील तज्ज्ञांस हजारो रुपये देऊन स्वदेशांत त्याने आणविले आणि उत्तमोत्तम विमाने परदेशांतून विकत घेतली. पण त्या अफगाणच्या अजूनही अगदी बरोबरीने असलेल्या हिंदु नेपाळास स्वतःच्या पौरुषाने ती विद्या संपादन करून आलेल्या स्वदेशीय आणि स्वधर्मीय वैमानिकासही उत्तेजन देण्याची 'आवश्यकता अद्याप वाटत नाही!' ज्या कॅप्टन पटवर्धनांची आवश्यकता अहिंदु अफगाणिस्थानास वाटली, त्याने

त्यास नोकरीवर ठेवून घेतले, तेच पटवर्धन म्लेंछ सत्तेपेक्षा स्वकीय हिंदु सत्तेसच प्रबळ करण्याची महनीय आकांक्षा धरून नेपाळास गेले असता , त्या हिंदूंच्या स्वतंत्र राजास , त्यांची आवश्यकता वाटली नाही! त्यांना दार बंद करून, निरोप देण्यात आला!

जगतामध्ये भूयुद्ध आणि समुद्रयुद्ध , दुय्यम प्रतीला पोचविणार्या , आणि म्हणूनच आगामी युद्धांतून ज्या युद्धसाधनांचे महत्व सर्व साधनांहून अत्यंत उत्कट होणार आहे. ज्या वैमानिक बळाची वाढ करण्यासाठी कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्चून प्रचंड विमाने भयंकर शस्त्रास्त्रांनी, सज्ज करून ठेवण्यात इंग्रजादिक राष्ट्रे गुंग झाली आहेत. त्या वैमानिक साधनांची नेपाळाच्या महाराणांस अजून आवश्यकताच वाटत नाही ? महाराज तुम्हांस विमानाची आवश्यकता अजून वाटत नाही , पण निदान राज्य करण्याची आवश्यकता तरी अजून तुम्हांस वाटत आहे ना ? का शेवटच्या बाजीरावासारखी आठ नऊ लाख रुपयांची भृती (पेन्शन) घेऊन , ब्रह्मवर्तास, हरीहरी म्हणत बसण्याचे मनांत येत आहे? जर तसे नसेल, जर अजून तुम्हास स्वतंत्र हिंदूंच्या स्वतंत्र राज्याचे हे श्वेत छत्र डोक्यावर जड झालेले वाटत नसेल , तर विमानावाचून चालेल कसे ? अजून आवश्यकता वाटत नाही म्हणजे काय ? हजार वर्षापूर्वी, अरबस्थानांत मुसलमानी वादळ उठताच ते प्रकरण आहे काय हे समजून घेण्याची हिंदूंना आवश्यकता 'अजून' वाटली नाही. त्यावेळी बलुचिस्तान, अफगाणिस्थान, दोन्हीही हिंदूंचीच होती. तेव्हांच जर ती आवश्यकता वाटली ; तर अरबांना अरबस्थानापुढे, पाऊलही टाकू न देण्याची संधी हिंदूंना साधणे शक्य होते. पण तेव्हा ती आवश्यकता 'अजून' वाटली नाही! तिकडची वार्ता देखील मिळविली नाही. जेव्हा बलुचिस्तान गिळून ते अरब सिंधवर आदळले आणि अफगाणिस्तान गिळून पंजाबच्या हृदयात त्यांचा पंजा शिरला ; तेव्हा मग ते कोण ? हे जाणण्याची आवश्यकता हिंदूंना थोडी थोडी वाटू लागली! जर प्रथमच आपण उलट स्वार्या चढविल्या असत्या जशा चंद्रगुप्ताने चढविल्या, तर ही दशा होती का ? पण 'अजून' आवश्यकताच वाटली नाही! त्याला काय करावे! पुढे मुसलमानांनी बंदुका आणि दारू मोठ्या आणि नवीन प्रमाणावर आणली; पण ती कला त्यांच्या पूर्वी नसली तरी तत्काल शिकण्याची हिंदूंना आवश्यकताच वाटली नाही! उभे हिंदुस्थान मुसलमानांनी गिळल्यावर मग डोळे उघडले तरी देखील बहुतेक बंदुका परदेशांतून इकडे येत , हिंदु कारागिरांच्या आणि अधिकार्यांच्या हाती स्वतंत्रपणे त्या आयुधांचे कारखाने फार थोडे चालत. पुढे युरोपच्या पलटणी आल्या. पण युरोप कुठे हेही जाणून घेण्याची 'अजून' आवश्यकता वाटली नाही. मग त्या पलटणीच्या युद्धपद्धतीस शिकण्याची गोष्ट दूरच! स्वदेशाची अर्धी पूर्व , अर्धी दक्षिण युरोपने गिळली ; तेव्हा कुठे हिंदूंना पलटणीची थोडी आवश्यकता भासू लागली. तेव्हा ही पलटणी ठेवण्याची त्यांच्या चालकत्वाची कला तरीही युरोपियनांचेच हाती होती. ते परकीय लोक , स्वदेशांत येऊन स्वतःच राजे होऊन बसेतो हिदूंना आयुधादिकांची 'अजून' आवश्यकता वाटली नाही.

आता, स्वातंत्र्य गेल्यावर ती वाटू लागली. स्वातंत्र्य जाऊन इंग्रजांचे राज्य झाल्यावर आता इंग्रजांच्या विधिमंडळात आम्ही ठराव आणतो की आम्हांस सैनिक शिक्षण पाहिजे! स्वतःच्या सेना नामशेष झाल्यावर सेनापती होण्याची आवश्यकता आली असे आम्हांस वाटते. असलेली स्वराज्ये गेल्यावर स्वराज्याच्या योजना करण्याची वेळ आली असे आम्ही समजतो. ब्रह्मावर्ताला गेल्यानंतर बंड करून उठतो! मेल्यानंतर औषध पितो!! हिंदूंचा हा मागचा इतिहास ही पिढीजात अंगी मुरलेली घरबुडाऊ ढिलाई ही भंगड गुंगी हा घरकोंबडेपणा, महाराज तुम्हांस दिसत नाही का ; डसत नाही का? विमानाची आवश्यकता म्हणे 'अजून' वाटत नाही! मांडीवर मांडी चढवून सहा हजार वर्षांपूर्वीच्या रामाच्या पुष्पक विमानाच्या गप्पा झोडण्याची आवश्यकता मात्र प्रत्यही आम्हास वाटते!

विमानांची अजून आवश्यकता नाही खरीच! इंग्लिशांची विमाने खालून , रशियाची विमाने वरून , चीनची विमाने पूर्वेकडून आणि अफगाणिस्तानची विमाने पश्चिमेकडून भयंकर स्फोटकांचे आणि विषारी वायूंचे वर्षाव करीत कळपचे कळप नेपाळवर उडून, चढून, त्यांच्या परस्पर झुंजीच्या, भयंकर अंधकारांत, नेपाळचा या स्वतंत्र हिंदु राष्ट्राचा श्वास बंद करून ते बुडवून टाकण्याची शुभसंधी अजून प्रत्यक्षात थोडीच आली आहे! ती आली , नेपाळही महाराष्ट्रादिक प्रांताप्रमाणे कोणत्यातरी परकीय साम्राज्याने स्थापिलेल्या विधिमंडळात नेपाळच्या परतंत्र प्रजेचे प्रतिनिधी आज जसे आम्ही याचना करतो तसे जेव्हा ठराव आणतील की नेपाळच्या दोन तीन विद्यार्थ्यांस वैमानिक विभागांत घ्याल का? आणि परकीय गव्हर्नर सांगेल की एकदम दोन तीन नाही 'फार तर अर्धा-पाऊण विद्यार्थी दर सिंहस्थी घेत जाऊ! " ---तेव्हा तुम्हांस विमानांची आवश्यकता पटेल! राज्य गेल्यावर जशी आम्हांस आता राज्याची हौस येत आहे ; तशी तुमची दंत नखे उपटली जाऊन जेव्हा नेपाळ निःशस्त्र निर्वीय होईल , तेव्हा त्यास विमानादिक शस्त्रांच्या आवश्यकतेची वेळ आली ; असे वाटू लागेल! भवितव्यतेचे असे धोरण दिसते! नाहीतर हे भिकेचे डोहाळे , आम्हास का जाणवते! आम्ही हे जाणून आहो , की वास्तविक पाहता नेपाळास-- आवश्यकता वाटत नाही असे नसून भीती वाटत आहे , की जर आपण विमानादिक शस्त्रास्त्रे सज्ज करू लागलो तर आपणावर कोणा शनीची वक्रदृष्टि होईल. पण आम्ही म्हणतो , अशी भीती वाटणे , हेच भिकेचे डोहाळे होत. भिऊन जर लाभ होता , तर गोष्ट निराळी. पण आज भिऊनही मरण , न भिऊनही मरण, अशी स्थिती आहे. मग भ्या तरी का? "किमुत मुधा मलिनयशः कुरुध्वे". आज, जर नेपाळचे भाग्य उघडावयाचेच असेल, तर भीती सोडल्यानेच ते उघडण्याचा , भीती धरून राहण्यापेक्षा शतपट अधिक संभव आहे. भीतीने मात्र मृत्यु निश्चित आहे. तो अफगाण पहा! अजून नेपाळची आणि त्याची बरोबरी आहे. अजून त्याचा घोडा स्पर्धेत फार दूर गेला नाही. अफगाणने भीती सोडली, आणि नेपाळने ती सोडली नाही , हाच सध्या काय तो फरक आहे. अजून जर

नेपाळ भीती सोडून शूरासारखा पुढे सरसावेल तर अफगाणास गाठून मागे टाकून , एका महत्तम राष्ट्राच्या राजश्रीचा स्वामी होईल! निदान शूरास साजेल असे काही तरी नाव जगात ठेवून जाईल. ही वेळ अशी आहे की , 'आहे तितके जतन करावयाचा' उत्तम मार्ग म्हणजे 'पुढे आणिक मिळविण्यासाठी ' साहसाच्या कर्मक्षेत्रांत उडी घेणे हाच होय. धरकोंबडेपणाने आहे तेही बुडणार हे निश्चित! श्री. पटवर्धन सांगतात की नेपाळमध्ये जुन्या प्रकारच्या तोफा ओतण्याचा एक कारखाना आहे. त्या तोफांचे कारखान्यात एक जर्मन शिल्पी, आणून आधुनिक साधारणा राबविण्याचा नेपाळ विचार करीत असल्यामुळे इंग्रज जरा रागावला आहे!

ते का? नेपाळवर इंग्रज रागावू शकतो , -एक जर्मन आणून नवीन तोफा नेपाळ करू लागला म्हणून! -पण त्या अमीराने लढाऊ मोटारी , लढाऊ विमाने, लढाऊ सेनानी, लढाऊ तोफा शेकड्यांनी युरोपातून आणल्या , जर्मन, इटालियन, रशियन, तुर्क या इंग्रजांच्या विपक्षीय राष्ट्रांतील शेकडो निवडक सैनिक , अधिकारी आणि शिक्षक बोलावून सैनिक सज्जतेच्या कारखान्यांचा नुसता घणघणाट उसळविला. सरसीमेवर इंग्रजांच्या नाकावर नवे किल्ले बांधण्याचा उपक्रम केला ; पण इंग्रज त्याच्यावर नाही तो कुठे रागावला? यावरून नेपाळ रागावून घेतो ; रागास भीक घालतो म्हणून इंग्रज नेपाळवर रागावतो! ही गोष्ट उघड होत नाही काय ? जर खरोखरच इंग्रज असा आततायीपणाने , रागवत असेल , तर नेपाळने अमीराप्रमाणेच त्या रागास धाब्यावर बसवून पुढे पाऊल टाकले पाहिजे. इंग्रज -नेपाळ मित्र राष्ट्रे म्हणवितात मग नेपाळची शक्ती वाढत आहे. हे पाहून इंग्रजांस वैषम्य का वाटावे? आणि जर ते खरोखरच वाटत असेल तर ही मैत्री तरी काय कामाची? शत्रु जे करतो तेच जर मित्र करील तर मग तो रागावला तरी अधिक काय करणार? इंग्रजांच्या भिंवयीच्या कोनाच्या सुताच्या आधारानेच जर नेपाळ लटकत असेल तर हिंदुस्थानांतील मांडलिक राज्यांत आणि नेपाळात फरक तो काय!!

खरी वस्तुस्थिती ही आहे की, इंग्रज रागावतो म्हणून नेपाळ भीत नाही, तर नेपाळ भितो म्हणून इंग्रज रागावतो.

तेव्हा नेपाळच्या प्रगतीचे मार्गात खरी धोंड म्हणजे इंग्रजांचा राग नसून आमची स्वतःची भीती, भ्याडपणा हीच आहे. जर इंग्रजांचा राग ही धोंड असती तर अमीराचा मार्ग तिने अडविला असता. इंग्रजांना राग आला तरी त्याची चिंता न करिता आज जगात इतर राष्ट्रे जगत आहेतच की नाही! इंग्रजांचा लोभ नाही , म्हणून काही रशिया मेला नाही. जपान वठला नाही. चीन हटला नाही. अफगाण हरला नाही , पण नेपाळलाच तेवढी ही अडचण का ? नेपाळात साहस नाही म्हणून ? नाही तर नेपाळचे महाराज इंग्रजांचे अंगणांतील कोंबड्यासारखे कलकत्त्याच्या कुंपणापर्यंतच येऊन परत का गेले ? नेपाळांतील प्रतिनिधी देशोदेशी जाऊन राष्ट्राराष्ट्रांशी संधी स्थापून आपले स्वातंत्र्य चरितार्थ का करीत

नाहीत! आज इंग्रजांशी असलेली मैत्री तोडलीच पाहिजे असे नाही ; पण, इंग्रजांची वाटत असलेली भीति मात्र सोडली पाहिजे. हे सांगण्याचे आमचे मुख्य विधेय आहे. दोन मुख्य गोष्टी नेपाळच्या राजकार्य धुरंधरांनी आज अगदी आपल्या मनांत , वज्रलेखणीने खोदून ठेविल्या पाहिजेत- भीत भीत राहिलो तर जगू हा भ्रम आहे. म्हणूनच नेपाळने ध्यानांत ठेवण्याची पहिली गोष्ट ही की आज नेपाळ अफगाणिस्थानासारखे पराक्रमी साहस न करील तरच नेपाळ नामशेष होण्याचा अधिक संभव आहे.

जे आहे तेच राखू , म्हणून म्हणणार्याथ घरकोंबडेबणाने, जे आहे तेही तो गमावून बसेल. दार उघडून नेपाळ बाहेर न आला तर दुसरे त्याची दारे फोडून आत घुसण्यास थोडेच सोडणार आहेत! चोराच्या भीतीने पांघरूण ओढून निजणार्यार भ्याड गृहस्थाचे धन तो अधिकच निश्चितपणे लुटतो. तुम्ही परदेशगमन केले नाही म्हणून परक्यांचा संग तुम्हास चुकला का? तुम्ही त्यांचेकडे गेले नाही; तरी ते तुमच्याकडे येऊन तुमच्या घरात घुसतातच! तुमच्या देशांत ते घुसून त्यालाच "परदेश" करून टाकला की, त्यांनी! परदेशांत जाणे नाही; कारण, त्याने 'संस्कृती' विटाळते पण परके स्वदेशांत शिरून त्या देशांतच त्या संस्कृतीला शिवले, त्याची वाट काय? अरबस्थान किंवा इंग्लंड आज जशी म्लेंच्छ भूमी आहे; तशीच हिंदुस्थानात म्लेंच्छभूमीच झालेली नाही का ? घराला घर नेटले , मंदिराला मशिद, स्मशानाला कबरस्थान, धर्मासनच नव्हे तर सिंहासनच देखील बाटले ना? म्हणून आता आहे तेच राखावयाचे असेल , तरीही पुढे अधिक मिळविण्यासाठी बाहेर पडलेच पाहिजे! पराक्रमी साहस करून चोर दारे फोडीतो न थांबता तो अर्ध्या रस्त्यावर आहे , तोच दार उघडून बाहेर पडून चार सावांशी संधीसूत्र लावून सहाय्य घेऊन त्यास वाटेवर आपणच जाऊन गाठला पाहिजे! नाहीतर, चोरांच्या घणाखाली दार फुटून एकाएकी त्याचे हाती पडावे लागेल. तुम्ही दार उघडले नाही ; म्हणून तो जात नाही ; हे निश्चित. नेपाळने जी दुसरी गोष्ट ध्यानात ठेवावयाची ती ही की, जर कधी नेपाळास कोणाची भीती बाळगण्याची कधी कमी आवश्यकता असेल तर ती आज आहे! अशी सुवर्णसंधी आलेली आहे. नेपाळच्या आजुबाजूस सर्व पक्षविपक्षांचे गट बांधले जात आहेत. तिकडे रशिया , इकडे चीन, तिकडे अफगाण, खाली इंग्रज! परस्पर टोलवाटोलवी , परस्पर छेदाछेदी, परस्पर सुंदाला उपसुंद उठवून शहाला शह देऊन , अनुकूल तेथे सूत्र जमवून , 'स्वतः' मोकळे होण्याची ही केवढी आणि आजवर कधीही न आलेली संधी!! याचाही ज्यांना उपयोग करून घेता येत नाही. ती जिवंत माणसेच नव्हेत. फार काय सांगावे ? ती पहा! नेपाळच्या अंगणापर्यंत आग आली! तो तिबेट हलला की! कर्झनपासून तिबेटात ब्रिटिशांनी बस्तान ठोकले. तारा , दूरध्वनी, वाफ, विद्‌युत् इत्यादी सुधारणा दिल्या. तिबेटातील तरूण परदेशात गेले. कोणास पत्ता नाही. पण आंतून सुरुंग भरत होता. तो उडविण्याची किल्ली -वात सगळी इंग्रजांस वाटले , आपल्याच हाती आहे. पण इतक्यात रशिया उठला , चीन उठला आणि तिबेटाला आग

लागली. इंग्रजांस नको तिथेच नको तशीच! तिबेटात शेतकरी दंगे करून उठत आहेत , कर देत नाहीत. चीनच्या सेनेस , साहृय घेऊन बंड उभारत आहे. चीनमधून क्रांतीची लाट तिबेटात आली. नेपाळच्या अंगणात आली. चीनची स्थिती झाली तीच तिबेटाची बोलता बोलता होणार. रशियाची तत्त्वे, रशियाची शस्त्रे, रशियाचे सेनानी, तिबेटला कसले स्वस्थ बसू देणार! त्यांची आग नेपाळच्या अंगणांस भिडली; तरीही आमच्या महाराजांना कशाचीच 'अजून आवश्यकता ' वाटत नाही! म्हणून विचारतो की राज्य कारावयाची तरी अजून आवश्यकता वाटते आहे ना? असेल तर पुढचे बोलणे!!

आणि ते पुढचे बोलणे हे आता या किंवा त्या व्यक्तीशी नाही. महाराज तरी एक व्यक्तीच! राष्ट्राचे बळ नसले, तर ते काय करणार! आणि राष्ट्राचे बळ असले तर त्यांनी म्हटले तरी ऐकतो कोण, अडणार काय? म्हणून आता नेपाळच्या भवितव्यतेविषयांचे पुढचे बोलणे, हे नेपाळी तरुण हो, आम्ही तुम्हांशी बोलणार.

आम्ही तुम्हांस विचारतो की नेपाळच्या त्या भ्याडपणाची विमाने नको म्हणण्याची, या कलकत्त्याहून परत जाण्याची या घरकोंबडेपणाची लाज तुम्हांस वाटत नाही का! तो अमीर जगात गाजला आणि आपले हे गुरख्यांचे स्वतंत्र हिंदुराज्य यास जगांत कोणी भीक घालीत नाही. याची लाज तुम्हांस वाटत नाही का ? तरुण नेपाळा जर वाटत असेल तर उठ आणि कार्यास लाग. त्या कार्याच्या रूपरेषेविषयीचे पुढचे बोलणे आता तुझ्याशीच बोलावयाचे! सुदैवाने तुम्हांसही लाज थोडीबहुत वाटत आहे. म्हणून श्री. पटवर्धनांनी संदेश सांगितला आहे, त्यावरून दिसते पटवर्धन म्हणतात--

"नेपाळच्या तरुण पिढीविषयी राष्ट्राने आशा निश्चितपणे बाळगावी. तरुण गुरखा वृद्ध गुरख्याच्या जुन्या पुराण्या जळमठ्या मतांना कंटाळला असून त्यांच्या डोक्यात प्रत्यही, नवविचारांची खळबळ सुरू आहे. शेजारच्या अनेक राष्ट्रांचा बडेजाव उघड्या डोळ्यांनी पहात असता समुद्रगमनासारख्या (समुद्रगमन निषिद्वतेच्या) शास्त्राधाराचा वृद्ध नेपाळी, जो खल करीत आहेत ; त्याचा त्यास वीट आला आहे. परदेशांत जावे नि तेथून ज्ञान, विज्ञान, कला मिळवून नेपाळी हिंदु राष्ट्र अखंड जगतात , गाजवावे अशी त्यांना महत्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे. "

तथास्तु! कार्याची रूपरेषा समजावून घेऊन तीप्रमाणे हिंदुजातीच्या उद्धारार्थ बद्धपरिकर होणारा, नेपाळी तरुण उत्पन्न होत आहे. आता त्याच्याशीच हे आमचे बोलणे आहे.

**लेखांक २१ वा**

# आनंदाची बातमी!

# नेपाळात राज्य घटनेची आणि लोकसभा स्थापण्याची प्रगट चळवळ चालू झाली!

**(सप्टेंबर १९२८)**

श्री. सुभेदार ठाकूर चंदनसिंह ह्या प्रसिद्ध देशभक्त हिंदु संघटनाभिमानी 'तरुण गुर्खा' संपादकांच्या नेतृत्वाखाली नेपाळच्या महाराजाधिराजांनी नेपाळांत इंग्लंडप्रमाणे नियंत्रित राजसत्तेची स्थापना करावी , म्हणून प्रगटपणे चळवळ चालू झाली आहे. 'तरुण गुर्खा' पत्रात ते लिहितातः--

"नेपाळ आणि नेपाळेतर हिंदुस्थान एक , अखंड आणि अविच्छेद्य राष्ट्र आहे. राज्याच्या चंचल-उलाढालीने आमचा जातीय दैवी आत्मा दुभंगू शकत नाही. मुसलमान संघाच्या उत्तर पश्चिम घाल्यापासून हिंदु संघाचा बचाव झाला पाहिजे. . . ते उत्तरदायित्व नेपाळचे आहे. म्हणून प्रथमतः नेपाळने निर्भयपणे आपली शक्ती वाढविली पाहिजे. त्याचे सूतोवाच म्हणजे नेपाळात विधीनियंत्रित राज्यसत्ता (Constitutional Monarchy), स्थापन करणे हे होय. . . इंग्लंडप्रमाणेच राजा सर्वश्रेष्ठ राहील! बाकी सर्व अधिकार लोकसभा चालवील. हे महत् कार्य संपादन करण्याची बुद्धी , विवेक, शक्ती, देवतास्वरूप महाराज समशेरजंग बहादुर यांना ईश्वर देवो. हिंदु लोकांचे घरचे घर पेटले आहे. आता त्वरीत धावले पाहिजे. म्हणून अविलंबेकरून सर्व गुरखा जातीच्या स्त्रीपुरुषांच्या अनुमतीने एकच मागणी , एकच पुकार झाला पाहिजे की राज्य घटना स्थापा! गुरखा नरनारींच्या सह्यांसह एक प्रचंड आवेदन (Memorial) धाडण्यात येणार, त्यास सह्या द्या! बहु संमत्तीने तरुण गुरख्याचे संपादन स्वतः आवेदन पत्र प्रजा-प्रतिनिधी शिष्टमंडळांसह नेऊन महाराजांचे हाती देतील!"

आमच्या नेपाळी बंधूंच्या या कार्यास सर्व हिंदु लोकांनी पाठिंबा दिला पाहिजे. नेपाळचा प्रश्न रंगत चालला. आजपर्यंतचे अरण्य-रोदन व्यर्थ गेले नाही. अजून अनेक अद्भूत घटना घडावयाच्या आहेत. हा नुसता सूतोवाच आहे. आता येत्या हिंदु महासभेने एका स्वतंत्र ठरावांत नेपाळच्या ह्या मागणीस पाठिंबा द्यावा. वास्तविक पाहता राष्ट्रीय सभेनेच हा ठराव करावयास हवा. पण त्यांना सध्या सायमन कमिशनच्या धुक्यापुढे दुसरे काही दिसणार नाही! जवाहरलाल नेहरूंच्या स्वातंत्र्य संघाने तरी, त्यांच्या भावी भारताच्या व्याख्येत, नेपाळ, गोमंतक, पाँडेचरी यांचा स्पष्ट निर्देश करावा. ब्रिटिश भारत म्हणजेच भारत ही खुळी कल्पना त्यांनी तरी सोडून द्यावी.

नेपाळच्या लोकसभेच्या या मागणीस ईश्वर सहाय्य करो! आणि अफगाणिस्थानच्या उन्नतीच्या वेगाहून द्रुततर वेगाने नेपाळास यशश्री माळ घालो! कारण नेपाळ आम्हा हिंदूंचा आज सांस्कृतिक पीडमाँट आहे- निदान होऊ शकेल! केवळ साहस मात्र पाहिजे!

रत्नागिरी हिंदुसभा आणि नेपाळीय आंदोलन

हिंदुसंघटनात्मक नेपाळीय आंदोलनाचा अगदी प्रथमपासूनच उत्कट पुरस्कार करीत आलेल्या रत्नागिरीच्या हिंदुसभेने त्या आंदोलनाने, आक्रमिलेल्या वरील मन्वंतराची बातमी ऐकून तात्काळ राज्यघटना स्थापक चळवळीचे पुढारी श्री. ठाकूर चंदनसिंह यास तारेने अभिनंदन कळवून, सहानुभूतीच्या फुलाची म्हणून पाच रुपयांची नोट धाडली आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

लेखांक २२ वा

# 'तरुण गोरख्या'ची तळमळ आणि या महिन्याचा कार्यक्रम

'श्रद्धानंदा'च्या वाचकांस माहीत आहेच की, सुभेदार चंदनसिंग यांनी "तरुण गोरखा" नावाचे नवीन पत्र गेल्या दोन तीन महिन्यांपूर्वी गोरखाली भाषेत काढले आहे. सुभेदार ठाकूर चंदनसिंग यांच्या प्रमुख पुरस्काराने स्थापन झालेल्या आणि आज तीन-चार वर्षे , नेपाळी समाजाच्या नेतृत्वाची धुरा धारण करणार्याप "गुरखा संघ" नावांच्या संस्थेचे "गुरखा संसार" नावाचे एक पत्र आहेच ; जे ठाकूर चंदनसिंह यांनीच प्रथमपासून संपादून सुस्थित स्वरुपास आणले होते.

"गुरखा संसारांत", श्रद्धानंदातील, नेपाळीय लेखांची भाषांतरेही येत. शेवटी "नेपाळा उठ आणि या दाराशी ठोठावित असलेल्या भारताच्या भाग्यश्रीचे स्वागत कर या 'श्रद्धानंदा'तील लेखांचे भाषांतर गुरखाली भाषेत ज्या अंकात प्रसिद्ध झाले , त्या अंकानंतर, लवकरच ठाकूर चंदनसिंगांनी "गुरखा संसाराचे " संपादकत्वाचे त्यागपत्र दिले. कारण "संघाचे" संसार हे मुखपत्र इंग्रज सैन्यांतील अनेक गुरखा अधिकारी , समितीत असलेले, तेव्हा त्या पत्रांतील प्रगामी क्रांतीकारी विचारांचे दायित्व , त्या सर्वांवर पडण्याचा संभव , संघाविषयी गुप्त पोलिस विभागाच्या (C. I. D. ) कपाळालाही, शंकेखोर आढ्या पडत चाललेल्या अशा स्थितीत सर्व गुरख्यांस एकत्रित बांधण्याचे एक कार्य तरी करीत असणार्यास आणि त्या मानाने उपयुक्त आणि म्हणूनच अवश्य असणार्यास "गुरखा संघास" या "गुरखा संसारांतील" लेखांनी काही मळमळ सुटून अस्वस्थता वाटू नये , एतदर्थ ठाकूर महाशयानी संसाराची बेडी तोडून , त्या पत्राच्या संपादकत्वाचे त्यागपत्र देऊन तेजस्वी प्रगामी शक्तीचे द्योतक अशा रक्तवर्णीय वेषांत नटलेल्या नि रक्त उसळून सोडणार्यार देवदूताची तुतारी फुंकीत चाललेला आपला 'तरुण गोरखा ' काढला. गोरखा समाजावर एकंदरीत समाजतः पडलेल्या राष्ट्रीय औदासिन्य, राष्ट्रीय अज्ञान आणि राष्ट्रीय चैतन्याचा अभाव यांच्या छायेचे आवरण त्या संकलित समाजाचे मुखपत्र जे 'गुरखा संसार' त्यावर आणि गुरखा संघावर पडावे हे सहाजिकच होते. परंतु तरुण गुरख्याच्या मनांत जी आता एक महान महत्वाकांक्षा उदय पावत आहे. अंगात जी एक अखिल हिंदु उत्थानाची उर्मी उसळत आहे आणि सर्व जगाच्या तिरस्कारास आपण आपल्या कृतीने आणि कृतिशून्यतेने पात्र होत आहोत ; हे पाहून या मानी हिंदु रक्तांत जी असह्य तळमळ ; जी उत्क्षोभक खळबळ उत्पन्न होत आहे त्याचे प्रतिबिंब , मरणोन्मुख जुन्याची बेडी तोडून विमुक्त झालेल्या या उदयोन्मुख नव्या 'तरुण गुरख्यां 'त उमटावे हेही सामाजिक आहे! ज्या विचारांचा दुंदुभी एकटा एकच "श्रद्धानंद" आजवर निष्ठेने दुमदुमवीत आला , त्याचीच

ललकारी देणारे रणशींग , फुंकीत 'तरुण गुरखा" ही त्याचे बाजूस येऊन उभी राहिल्याने त्या आकांक्षेचे रणगीत आता किती तरी रंगू लागत आहे. जागृतीचा तीर नेपाळास अगदी नेमका लागला. हिंदूंच्या भावी भाग्यश्रीचे दिव्य दर्शन पाहण्यास साक्षी मिळाला. जे आम्हांस सलते, तेच गोरख्यांस सलू लागले. जो आमच्या डोळ्यांत खुपतो, तोच तरूण गोरख्यांचे डोळ्यांत खुपू लागला. आमच्या ह्या अरण्यांतील रोदनाचाही ध्वनी , नेपाळच्या सिंह गुहेत शेवटी ऐकू गेला. आता , आमच्यावरील कार्य व्याकुलतेचा भार , किती तरी हलका होत आहे!

"तरूण गोरखा " पत्राच्या म्हणजे तरुण गोरख्यांचे मनास नेपाळच्या आजच्या मानहीन जीवनाचे शल्य कसे सलू लागले आहे आणि उद्याच्या भाग्यश्रींच्या स्वयंवराचे भयंकर दिव्यांत जगताने तोंडात बोट घालून रहावे असे काही महान कृत्य , असे काही शककर्तृत्व, असा काही विक्रम गाजवणार्या अखिल हिंदु आकांक्षेने त्यांचे हृदय कसे फुरफुरू ल ागले आ हे ; त्याची थोडी कल्पना त्या पत्राच्या खालील काही उतार्यांवरून आमच्या नेपाळेतर हिंदु बंधूंस येईल.

नेपाळी गुरख्यांस पौर विभागांत घेण्यात येऊ नये; म्हणून हिंदुस्थान सरकारने, जी आज्ञा काढली आहे, ती आम्ही खाली दिलेल्या पत्रांत बाहेर आली आहेः-

डिव्हिजनल ट्रान्सपोर्टेशन सुपरिटेंडंट भुसावळ, यांजकडून नागपूरचे स्टेशन सुपरिटेंडं ह्यांस, पत्र क्र. ता. १९।१०।२६ चे अ. टी. २०।१४७.

सैन्येतर विभागांत गुरख्यांच्या नेमणुकी-संबंधी वरील प्रकरणासंबंधी हिंदुस्थानसरकारने खालील आज्ञा सोडली आहेः-

१) सैन्य नि सैनिक पोलीस पथक ह्यांशिवाय कोठेही नेपाळ राष्ट्राच्या गुरख्यांना सरकारी जागा देण्यात येऊ नयेत , सैन्यांत नि सैनिक पोलिसांतही सम्मत झालेल्या संख्येपर्यंतच घेण्यात यावे.

२) सध्या, इतर सरकारी विभागांत , चाकरीस असलेल्या , नेपाळी गुरख्यांना कामावरून काढण्याची आवश्यकता नाही, परंतु ह्यापुढील भरती थांबविण्यात यावी.

ह्यापुढे कोणाही गुरख्यास कोणाच्याही जागेवर न नेमण्याकडे लक्ष असावे. पत्र पावल्याचे कळवावे.

आपल्या ऑक्टोबर १९२८ च्या अंकांत "तरुण गोरखा" पत्रांत "स्वातंत्र्य संग्राम" नावाच्या अग्रलेखांत, नेपाळची राजपद्धती सुधारण्याविषयी आणि इंग्रजांनी "नेपाळी लोकांस सेनेत तेवढे, दहावीस रुपड्यावारी नोकर्यास द्याव्या, पण पौर (Civil) विभागातील धनत्तर नोकर्या मात्र देऊ नयेत" या वरील पत्रांतील आज्ञेप्रमाणे जे जे अन्याय नेपाळी जनतेवर चालविले आहेत; त्यासंबंधी, तीव्र निषेध व्यक्त करीत संपादक म्हणतात , "आज प्राण गेला, जावो; पण जातीय सेवा न सोडली पाहिजे. आपण एक कोटी गुरखे आहोत! आपल्या

जातीत काही उपजत वैगुण्य नाही! आपला देश तर काश्मीरसारखा एक स्वर्ग आहे! पण वैगुण्य जे आहे ते शासन पद्धतीत- राष्ट्रव्यवस्थेत आहे! आता नुसती सुधारणा , सुधारणा, म्हणून ओरडून भागावयाचे नाही! आता जर आपल्या वंशजांचे कल्याण हवे असेल ; तर एकदम प्रत्येक गोरखा नरनारींनी स्वतंत्रतेची प्रबल इच्छा धरून ह्या स्वातंत्र्य संगरासाठी कंबर कसावी. चोरून चोरुन आता किती दिवस सहन करणार? राजकीय बेडी, तुटल्याविना न समाजसुधार, न विद्याप्रचार, न देशोन्नती, यथासांग होणारी आहे! तेव्हा, त्या बेडीसच प्रथमतः तोडली पाहिजे! चुप , चुप, असे म्हणत आम्हांस तुम्ही किती दिवस दाबून ठेवणार? असा उपदेश देणारे देशद्रोही आहेत! पण ईश्वराच्या आज्ञेसाठी , स्वराष्ट्राच्या कल्याणासाठी, स्वज्ञातीच्या उद्धारासाठी, मरणे ! ---अहो हे केवढे सौभाग्य! एक येशू मेला असता, जगास गवसणी घालण्याची शक्ती , खिस्तीधर्मांत आली. कंस म्हणाला , कृष्णास मारीन! -पण मेला कंस! रावणासारख्याची तीच गत! हे प्रत्यक्ष माहिती असता शुभ कार्यात नुसत्या राक्षसी डरकावण्यास भिऊन जो रेंगाळेल तो गुरखा नव्हे! तो मनुष्य नव्हे! तुम्ही गुरखे दहा बारा रुपड्यांसाठी , भाडोत्री लढण्यात -माना कापण्यांत आणि कापून घेण्यांत भूषण मानता! पण , स्वदेशासाठी मरण्यास मात्र भिता! अहो ही केवढी लाज! हे केवढे लांछन! निरंकुश शासनाचा अंत करा! मग ते पोपचे असो , वा झारचे असो! राजनैतिक स्वतंत्रता आमच्या नेपाळास पाहिजे! आम्हांस वाटेल तशा सुधारणा आम्ही करू! आमच्यावर कोणी तिर्हाइताने डोळे वटारता कामा नये! हे नेपाळी तरुणहो , जा, घरोघर फिरा आणि सांगा, नेपाळा उठ! स्वातंत्र्यसंग्रामार्थ उठ!"

प्रस्तुत या पत्रात "भारतीय सुधार आणि गोरखा जाती " या शीर्षकाखाली एक विद्वत्तापूर्ण लेखमाला चालू आहे. त्यांतील मुख्य विधेयास, आमचा पूर्ण पाठिंबा आहे. जे लाखो नेपाळीबंधू नेपाळेतर भागांत वसत आहेत ; त्यांचा या भारतावर इतर कोण्याही भारतीयाइतकाच, अधिकार आहे. राज्याच्या चंचल घडामोडीनी नेपाळीय भारत आणि नेपाळेतर भारत, असे दोन तुकडे जरी पाडले , तरी नेपाळी हिंदू आणि नेपाळेतर हिंदु हे उभयतः प्रथम भारतीय आणि नंतर नेपाळी- नेपाळेतर आहेत. भारतातील सर्वसंपत्तीवर राष्ट्रीय दृष्ट्या नेपाळचाही आंशिक अधिकार आहेच. यासाठी इंग्रजांनी नेपाळी बंधूंस भारतात "Foreigner" (परकी) म्हणून संबोधून नेपाळीय भारतीयांत आणि नेपाळेतर भारतीयांत, फूट पाडण्याचा दुष्ट प्रयत्न जो आजवर चालविला होता त्याचा आम्ही तीव्र निषेध करितो. ह्या उभ्या हिंदुस्थानांत जर कोणी खरा Foreigner (परकी) असेल तर तो इंग्रज आहे. आणि तो खरा परकी आमच्या रक्तामांसाच्या सख्या , नेपाळी बंधूंस सांगतो, की, या भारतात तू परकी! घरच्या धन्यास दारचा सांगतो की , घरात तू चोर आणि मी धनी!

वरील काही उतार्यातवरून "तरुण गोरख्याच्या" हृदयाची तळमळ किंचित व्यक्त होईल. आता त्यांच्या सध्याच्या कार्यक्रमाविषयी आम्हांस एवढी विनंती करणे आहे की, त्यांनी या वर्षाच्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेस, अवश्य जावे. एव्हापासून:-

१) शेकडो गुरख्यांनी राष्ट्रीय सभेचे सभासद व्हावे.

२) डिसेंबरात, राष्ट्रीय सभेत गुरख्यांनीही प्रतिनिधी निवडून द्यावेत. गुरखासंघ इत्यादी संस्थांचे वतीने किंवा दार्जिलिंग , कलकत्ता, बनारस इत्यादी स्थानिक राष्ट्रीय सभा मंडळांनी, आपल्या प्रतिनिधीत, गुरख्यांची नावे अवश्य घालावीत.

३) यापुढे नेपाळीय आंदोलनाविषयी बोलतांना "गोरखा" हा आंशिक शब्द न वापरता नेपाळी राष्ट्र, नेपाळ सेना, नेपाळी जनता असे शब्द वापरावे. कलकत्त्याची प्रमुख संघटनाभिमानी 'श्रीकृष्ण संदेश', 'स्वतंत्र', 'मतवाला' आदिक पत्रांनी, कलकत्त्यासच, नेपाळी प्रतिनिधी, राष्ट्रीय सभेत घालता येतील, अशी व्यवस्था, सत्वर करावी आणि लोकमत जागृत करावे.

४) राष्ट्रीय सभामंडपात प्रत्येक प्रांताप्रमाणे "नेपाळ" म्हणून एक विभाग राखून ठेवावा. जरी या वर्षी तो पुरा भरला नाही. तरी निदान नेपाळाची स्मृती तरी तो जागृत ठेवील! राष्ट्रांत नेपाळ आहे, ही आठवण तरी राष्ट्रास राहील! या कामी, 'श्रीकृष्ण संदेश'चे श्री. गद्रे इत्यादी संघटनाच्या कलकत्त्याच्या पुढार्यांनी अगदी त्वरीत, राष्ट्रीय सभावाल्यांशीच चर्चा करून व्यवस्था करून घ्यावी.

५) कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेबरोबर जी हिंदु सभा होईल , तीत ठाकूरसिंगाच्या तरुण गोरखा पक्षाने जाऊन नेपाळविषयी लोकमत जागृत करावे. आगामी मार्च एप्रिलांत , हिंदुमहासभा होईल, तीत ठाकूर चंदनसिंगासुद्धा शक्य तितक्या गोरख्यांनी प्रमुखपणे भाग घ्यावा, भाषणे द्यावीत, भारतीय अशा, प्रत्येक चळवळीत तरूण गुरखा पक्षाने अगदी प्रमुखपणे पुढाकार घ्यावा नि जर इतर जुनी खोडे त्यांस बाजूस ठेवू लागली तर भांडण तंडण झाले, तरी चिंता नाही. पण भारतीय संस्थांत नेपाळची जन्मसिद्ध अधिकाराची जागा जिंकून घ्यावी.

६) सायमन कमिशनपुढे, जे पत्र शिखादिक मंडळी आपल्यापुरती विशिष्ट मतधारी आदिक, अधिक अधिकार मागत आहेत. तोवर गोरख्यांनाही -नेपाळलाही , इंग्रजी भारतात त्यांची जी मंडळी आहेत, त्यांना नेपाळी मतदारसंघादिक, प्रकारे विशिष्ट अधिकार दिले पाहिजेत. हे अगदी अवश्य आहे. त्याचप्रमाणे गोरख्यांच्या नोकरीवरील इंग्रजी विभागांतील निर्बंध उठले पाहिजेत- नेपाळास विधिमंडळातून आणि विधी समितीतून राखीव जागा , असल्या पाहिजेत. भारत वर्षांत दहा लाख गुरखा आहे! त्यांनी भारत वर्षांत प्रत्येक सार्वजनिक संस्थांत आणि चळवळीत शिखांप्रमाणेच आपले अस्तित्व दाखविले पाहिजे! पुढाकार आणि भाग घेतला पाहिजे!

७) इंग्रजी भारतात असलेल्या नेपाळी बंधूंनी या एकदोन महिन्यांत इतका हा सध्यांचा कार्यक्रम पार पाडावा. त्यासहच जिथे जिथे नेपाळी तरुण आढळेल ; तिथे तिथे त्यास अफगाणाकडे बोट दाखवून म्हणावे, "ते बघ! त्याहून अधिक कर; तर तू जातीचा नेपाळी - तर हिंदु! " अशा प्रकारचा धूमधडाका उडवून शासन विधान मागावे ; परराष्ट्रांशी, संधिविग्रहाचा स्वतंत्र राष्ट्राचा अधिकार , प्रत्यक्षपणे गाजवावा आणि जसा , गेल्या वर्षाचा तुच्छ अफगाण आजचा प्रबळ अफगाण झाला , तसा आजचा तुच्छ नेपाळ , पुढील पाच वर्षांत प्रबळ करावा! हिंदुस्थानचा मुकुटमणी व्हावा! अजून वेळ आहे! आरंभही ठीक झाला आहे. परमेश्वर पाठीशी उभा आहे. तेव्हा नेपाळा उठ नि 'भुंक्ष्व राज्यं समृद्ध'.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

**लेखांक २३ वा**

# नेपाळच्या नव्या महाराजांना आपल्या हिंदु बांधवांच्या सहानुभूतीहून दुसरे काही एक अधिक संतोषप्रद नाही

**(श्रद्धानंद ८ फेब्रुवारी १९३०)**

नेपाळचे विगत प्रधान महाराज चंद्रसमशेर जंग , वारल्यानंतर त्यांचे जागी त्यांचे बंधु, राणा भीम समशेर जंग हे नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्याचे मुख्य प्रधान झालेले आहेत. ही बातमी वाचकांना कळलेलीच आहे. नेपाळच्या राणा वंशाचा असा नियम असतो की वंशांत जो जेष्ठ असेल तो महाराज पदाचा उत्तराधिकारी होतो ; मग तो पुत्र असो वा भ्राता, त्या नियमानुसार चंद्र समशेर जंगाचे पश्चात त्यांच्या कुलांतील ज्येष्ठ पुरुष त्यांचे बंधु भीम समशेर जंग हेच असल्याने त्यांस मुख्य प्रधानपदाचा अभिषेक नेपाळांत मोठ्या उत्साहात झाला. हे पूर्वी मुख्य सेनापती , (कमांडर-इन्-चीफ) होते. नेपाळमध्ये सध्याच्या घटनेनुरुप महाराजाधिराज श्री ५ त्रिभुवन विक्रमदेव, हे सिंहासनाधीश्वर समजले जातात. आता त्यांचे मुख्य प्रधानमहाराज श्री. ३ भीम समशेर जंग हे झाले आणि जो मुख्य प्रधान असेल, त्याचा भावी उत्तराधिकारी-म्हणजेच त्यांच्या कुलांतील त्याच्याहून दुसर्या् प्रतीचा जो ज्येष्ठ पुरुष असेल, तो मुख्य सेनापती पदावर नेमिला जातो.

नेपाळचे विगतमहाराजांनी नेपाळचे स्वातंत्र्य-शक्ति अखंड राखली. इतकेच नव्हे तर तिची किंचित मात्र वृद्धिही केली हे खरे आहे. पण तरीही जगातील सर्व जाती आणि राष्ट्रे आणि त्यातही एशियांतील आपले सर्व शेजारी शतकांची अंतरे , एकेक वर्षांत आक्रमित असता त्यांच्या त्या प्रगतीचे मानाने , गेल्या प्रधानांचे राजवटीत नेपाळची प्रगती लज्जास्पद मंदतेने झाली, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. महाराज चंद्र शमशेर जंग नेपाळवर शासन करीत असतात. चीन- तो एशियांतील अफीमी सुस्त- एकाएकी खडबडून उठला. आज दहा वर्षांच्या तुमुल रणकंदनानंतर आणि यादवीनंतरही न थकता प्रगतीच्या मार्गावर सारखा अग्रेसरच होत आहे. चीनच्या सैनिकाने , तोड्याच्या बंदुका फेकून मशिनगन्स घेतल्या, मांचूची परकी बादशाही उखडून टाकून स्वदेशीय लोकसत्ता स्थापिली, परक्यांची हांजी हांजी करणे बंद करून त्यासच 'हात आटपा!' म्हणून अप्रतिवार्य आज्ञा दिली. बैलगाडी सोडून चीनची राष्ट्रशक्ती विमानांतून प्रगतीची पाठ पुरवीत चालली. तिकडे अफगाण 'अमीरा'चा अफगाण 'बादशहा' झाला. युरोपांतील तो आजारी तुर्क , युरोपांतील प्रबळ आणि प्रगमनशील , स्वतंत्र नागरिक झाला. रशियांतील अनियंत्रिय राजसत्तेची अनियंत्रित समाजसत्ता झाली-झारचा लेनीन झाला! सर्व बाजूंनी अशी प्रागतिक स्थित्यंतरे,

वैमानिक वेगाने ज्या कालावधीत चालली होती आणि चालली आहेत. त्या कालावधीत नेपाळ अजूनही त्या आपल्या जुन्यापुराण्या खटार्यांतच र र करीत चालला होता. ही गोष्ट नेपाळच्या प्रधानांच्या काय आणि नेपाळच्या प्रजेच्या काय , अकर्मण्यतेचीच साक्ष होय , असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. अर्थात या विधानांत हेही विधान अंतर्भूत झालेलेच आहे की, अधिक प्रगती झालेली नाही. ही जरी तीव्र खेदाची गोष्ट आहे. तरीही विगत महाराजांनी निदान नेपाळचे असलेले स्वातंत्र्य तरी गमावले नाही आणि ज्या विषम परिस्थितीत आणि ज्या आतील अकर्मण्य दुर्बलता आणि बाहेरील प्रबळ आक्रमण यांच्या पेचात सध्या आपली हिंदु जाती सापडली आहे. त्या बिकट प्रसंगी नेपाळने आहे ते तरी राखले ही गोष्टही थोडी फार समाधानाचीच होय आणि एवढ्यासाठी देखील विगत महाराज चंद्र समशेर जंग बहादूर यांची आठवण सर्व हिंदुजाती कृतज्ञभावनेच काढीत राहील.

परंतु आता नवीन महाराजापासून हिंदुजाती ह्याहून इत्याधिक पराक्रमाची अपेक्षा करीत आहे. नुसते जिवंत राहिलेच पाहिजे. पण नुसते जिवंत रहाण्यापेक्षा आता काही जिवंत राहिल्यासारखे नाव गाजविले पाहिजे. आहे ते तर जतन केलेच पाहिजे. पण जे गेलेले ते आणि नवीन मिळविलेही पाहिजे. हिंदूंचे राष्ट्र जगांतील इतर प्रबळ राष्ट्रांप्रमाणे आणि प्रबळ राष्ट्रांत प्रगतीत आणि पराक्रमांत प्रमुख स्थानी स्थापिले पाहिजे.
ही आकांक्षा अतिशयोक्ती, वायफळ वल्गना आहे. म्हणून म्हणता? का? चार कोटी इंग्रज अर्ध्या जगावर राज्य करतात ते काय आकाश फाडून आले आहेत की काय ? हा चीन पहाता पहाता प्रबळ झाला. लाखो सैनिकांच्या सेना उत्तमांतील उत्तम शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन त्यात वावरत आहेत. तो जपान , तो चिमटीएवढा अफगाणिस्थान? -आणि आम्ही हिंदु २२ कोटी असून आम्ही एक राष्ट्र प्रबळ राष्ट्र निदान जगातील दोन दोन कोटींच्या इटाली फिटाली सारखे, तरी प्रबळ राष्ट्र होऊ म्हणून म्हणताच अतिशयोक्ती का व्हावी ? आणि ती वायफळ वल्गना आहे असे हिंदूनाच का वाटावे?

हिंदूंची अंतरबाह्य दुर्बलता फार निराशाजनक आहे. म्हणून ही भलतीच इच्छा , ही वायफळ वल्गना होय असे तुम्हांस वाटते , नाही? ते खरंच. आपली प्रस्तुतची अंतर्बाह्य दुर्बलता ही अत्यंत निराशाजनक आहे- परंतु त्या निराशेला आणि त्या दुर्बलतेला , जी कारणे झाली आहेत, त्या सर्व कारणांत मुख्य कारण म्हणजे हे होय की , एखादी मोठी इच्छा करण्याची देखील कुवत, हे हिंदुनो, तुमच्यात अशी राहिली नाही! आपल्या दुर्बलतेचे अर्धे कारण म्हणजे आपल्या राष्ट्राची इच्छाशक्तीदेखील मारली गेली. हे २२ कोटींचे हिंदु राष्ट्र प्रबळतम होईल ही आशाच नव्हे तर ते तसे होणे ही इच्छा देखील तुम्हांस अशी वायफळ वाटू लागली! एक मुसोलिनी, एक लेनीन, एक नेपोलियन, एक कमाल, अघटित आकांक्षा धरणारा, आणि त्यासाठी प्राण हातावर घेऊन , निघणारा, एकेक पुरुष काय करू शकतो ते तुम्हांस दिसत नाही का? त्यात धोका आहे? असेल! पण नुसत्या मरत जिवंत

राहाण्यापेक्षा अशा दैवी उन्मादाच्या धोक्यांत येणारे, मरणच खरे जिवंत रहाणे होय. नाही, तर 'काकोऽपि जीवति चिरायबलिंच भुंक्ते ' त्या कावळे चिमण्या काहीही म्हणोत , पण गरूड हेच वाँच्छिणारः- "मंथायाची विषधरविषे हाव ती रत्नकामी।। माध्यान्हीच्या दिनमणिवरी धावती दिव्यगामी।। झंजा झोके मज अनुभवू हेच उल्हास वाटे।। काकस्वास्थी करट घरिच्या जीवणे मृत्यु देते।।१।।

नेपाळच्या महाराजांनी तशी काही महान आकांक्षा धरावी , काही थोर पराक्रम करावा, हिंदूंच्या राष्ट्रांचे नाव जगद्राष्ट्रामध्ये पुन्हा एकदा उज्ज्वल करावे अशी आमची उत्कट इच्छा आहे. नेपाळीय आंदोलनाच्या गेल्या ४ वर्षांच्या प्रयत्नांनी नेपाळच्याविषयी अखिल हिंदु जगतात जी ममत्व बुद्धी उत्पन्न झाली आहे , ती आता एक नवीन शक्ती नेपाळच्या महाराजांचे तूणीराचे बळ पूर्वीहून पुष्कळ अधिक पटीने वाढवीत आहे. तिचा कुशल उपयोग त्यांनी केल्यास नेपाळच्या शत्रूंस आता पूर्वी इतक्या धिक्काराने किंवा उपक्षेने नेपाळास वागविता येणे शक्य नाही. नेपाळच्या वृद्धीवरच नव्हे तर स्थितीसही ह्या बळाचा पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. म्हणून आता नेपाळने 'संशयात्मा विनश्यती' हे ध्यानात धरून कर्तव्यसंगरांत संधी साधताच धीटपणे पुढे पाऊल टाकावे --नव्हे ती संधी जुळवून, शोधून, साधून आणावी. नवीन महाराजांस , त्यांच्या राज्यसूत्रधारणाच्या या आनंददायी पण अत्यंत उत्तरदायी प्रसंगाचे संधीस अखिल हिंदु जनतेचे वतीने आम्ही हा सूचक संदेश देणे हेच नेपाळच्या एकमात्र स्वतंत्र हिंदु राष्ट्राविषयी आणि महाराजांविषयी आम्हांस वाटत असलेल्या राष्ट्रीय ममतेचे आणि राष्ट्रीय आशेचे खरे द्योतक समजतो. नेपाळचे महाराजांचे शुभचिंतनपर संदेश हिंदुस्थानातील बर्यायच हिंदुसभांकडून गेले आणि बर्याचच हिंदु पत्रांनी महाराजांच्या अभिनंदनपर लेख लिहिले ही गोष्टही अखिल हिंदुमात्रांत नेपाळच्या भवितव्याविषयी जी एक पूर्वी नसलेली ममत्वबुद्धी आणि विश्वास उत्पन्न झाला आहे, त्याचीच दिग्दर्शक आहे. त्या सर्व लेखापत्रात आणि महाराजांनी त्यापैकी ज्यांस प्रत्युत्तरे धाडली , त्या प्रत्युत्तरात रत्नागिरीच्या हिंदुसभेने महाराजांस धाडलेला अभिनंदनपर ठराव आणि त्यास महाराजांचे आलेले प्रत्युत्तर ही आमच्या ह्या लेखांतील विधेयांचा प्रामुख्याने अनुवाद करणारी आहेत.

रत्नागिरी हिंदुसभा आपल्या ठरावांत म्हणतेः-

"नेपाळच्या विगत मुख्य प्रधानांच्या मृत्युविषयी रत्नागिरी हिंदुसभा आपली समवेदना प्रकट करीत आहे. तथापि त्यांच्या अधिकाराची सूत्रे त्यांच्याकडून कोणत्याही प्रकाराने कमी नसलेल्या एका थोर पुरुषांचे हाती पडत आहेत ही तिला त्यांतले त्यात समाधानाची गोष्ट वाटत आहे. हिंदुसंघटनाच्या विवर्धमान आंदोलनामुळे अखिल हिंदुजगत् हिंदूंचे एकमात्र स्वतंत्र राज्य म्हणून आणि त्यायोगेच हिंदूंच्या भवितव्यतेचा एक प्रबल

आधार म्हणून नेपाळकडे बघू लागले आहे. नेपाळचे बाहू प्रबळ असोत! आणि हिंदुत्वाच्या कार्याचे आणि उद्दिष्ट आकांक्षेचे धुरंधरत्व करण्यास नेपाळ आणि नीट-धीटपणे धजेल , तर जे एक महान भवितव्य त्याचे सन्मुख त्याची वाट पहात आहे , त्याचे मर्म नेपाळचे हृदयांत नीट ठसो! या ध्येयाच्या प्रात्प्यर्थ निदान पहिली गोष्ट म्हणून जी नेपाळने तत्काळ केली पाहिजे असे आमचे आग्रहाचे सांगणे आहे ती ही की , जगातील प्रमुख राष्ट्रांशी नेपाळने स्वतंत्रपणे राष्ट्रीय व्यवहार चालू करावे. आणि जागतिक राजकारणांत आणि राष्ट्रसंघांत आपले स्वतंत्र अस्तित्व आणि अधिकार स्थापावे , जगास जाणवावे , जर्मनी, रशिया, अमेरिका, फ्रान्स, टर्की, इत्यादी स्वतंत्र राष्ट्राशी जसे अफगाणिस्थानाने केले तसे नेपाळनेही स्वतंत्रपणे दळणवळण आणि संधीसंबंध घडवून आणले पाहिजेत. अशा घटनेने नेपाळची शक्ती आणि वजन तत्काळ पुष्कळ पटीने वाढल्यावांचून राहणार नाही. विगत मुख्य प्रधानांनी नेपाळचे स्वातंत्र्य ब्रिटिशांकडून मान्य करून घेतले. विद्यमान मुख्य प्रधान ते आता सर्व जगाकडून मान्य करून घेवोत आणि जगांतील राजकारणात नेपाळलाही एक प्रबळ आणि कर्त्या घटकाचे स्थान प्राप्त करून देवोत. जगांतील प्रत्येक मोठमोठ्या राजधान्यांतून नेपाळचा ध्वज हिंदु स्वातंत्र्याचा प्रतिनिधी म्हणून फडकू द्या. नेपाळने सदोदित स्मरण ठेवावे की प्रस्तुत स्थितीत नेपाळ हा हिंदुत्वाची ढाल आणि तरवारही आहे. महाराजांचे जातिबंधु , धर्मबंधु, आणि स्वदेशबंधु असलेले उभ्या हिंदुस्थानांतील कोटी कोटी हिंदु जनता हीच प्रार्थना करीत आहे की , देव नेपाळला ती दूरदृष्टी , ती शक्ती आणि विशेषत्वेकरून ती निर्भय उठावणी , ती धाडसी प्रेरणा देवो की, प्रमुखतः जिच्यामुळे राष्ट्रे भाग्याला आणि गौरवाला चढू शकतात!”

रत्नागिरी हिंदुसभेच्या वरील ठरावास महाराजांचे अमात्य श्रीमान मरिचीसिंह यांचे हस्ते खालील उत्तर आले आहेः-

**काठमांडू**

**नेपाळ;**

**१० जानेवारी ३०.**

### नेपाळच्या महाराजांचे आलेले प्रत्युत्तर

“ज्या पत्रांत रत्नागिरी हिंदुसभेने नेपाळच्या आणि त्याच्या शासकांसंबंधी हार्दिक शुभेच्छा आणि कळकळीचे विचार प्रदर्शित केले होते ते आपले पत्र पाहून महाराजांना कितीतरी आनंद झाला. आमच्या धर्मबंधूंच्या या अशा स्नेहाची आणि प्रेमाची जोड आम्हांस मिळावी याहून अधिक संतोषाची आणि समाधानाची दुसरी गोष्ट काय असणार ? महाराज ते पूर्ण जाणून आहेत आणि म्हणूनच त्याविषयी रत्नागिरी हिंदुसभेचे ते आभार मानीत आहेत. ”

---------------------------